# पाकिस्तानी दहशतवाद सद्य परिस्थती आणि उपाय योजना

# BRIG HEMANT MAHAJAN ARTICLES FROM 2015-2019

## पहीले पान

**समर्पण**

देशाकरता प्राणार्पण करणार्या,

भारतीय सशस्त्र दलांतील शूर अधिकारी आणि सैनिकांना,

हे पुस्तक सादर समर्पित.

शूरांतील शूर लोकांच्या आकाशगंगेत त्यांच्या आत्म्यांना शांती लाभो.

## दुसरे पान

**शूर शिपायाचा पोवाडा**

हे सशस्त्र बांधवा, तू ऐन तारुण्यातच दैववशात शहीद झालास.

तुझे देशबांधव किंवा राजकीय स्वामी दुःख करतील किंवा मनास लावून घेतील अशी अपेक्षा धरू नकोस, त्यांच्याकरता तू केवळ आणखी एक अश्रू आहेस.

दूरदर्शन वाहिन्या एखाद-दोन दृश्ये दाखवतील, तसेच मुद्रित माध्यमेही करतील, मग सगळेच विसरले जाईल, तुझे कुटुंबीय उर्वरित आयुष्यभर

हरपलेल्या मुलाचा, भावाचा, पतीचा अथवा वडिलांचा शोक करत राहतील.

हे सशस्त्र बांधवा, तू ऐन तारुण्यातच दैववशात शहीद झालास.

**ह्या अमृत-ओळी आठवा**

माध्यमांचे स्वातंत्र्य आपल्याला वार्ताहरांनी नव्हे तर सैनिकांनी दिलेले आहे!

अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य आपल्याला कवींनी नव्हे तर सैनिकांनी दिलेले आहे!

जगण्याचा, हवे ते कष्ट करण्याचा आणि सुखप्राप्तीचा अधिकारही राजकारण्यांनी नव्हे तर सैनिकांनी मिळवून दिलेला आहे!

सैनिकच ध्वजवंदन करत असतो, ध्वजाच्या छायेत झोप घेत असतो आणि त्याच्या पार्थिवासही ध्वजातच गुंडाळले जात असते!

देशाची सुरक्षा, देशाचा सन्मान आणि देशाचे क्षेमकुशल सर्वप्रथम असायला हवे, नेहमीच आणि प्रत्येक वेळी!

तुमची स्वतःची सोय, आराम आणि सुरक्षितता सर्वात नंतर, नेहमीच आणि प्रत्येक वेळी!

“घरी जाल तेव्हा त्यांना आमच्याबद्दल सांगा आणि म्हणा की, तुमच्या उद्याकरता आम्ही आमचे वर्तमान दिलेले आहे!”

## पाकिस्तानी दहशतवाद सद्य परिस्थती आणि उपाय योजना

# अनुक्रमणिका


अनुक्रम विषयभाग

पृष्ठ

समर्पण

शूर शिपायाचा पोवाडा आणि ह्या अमृत ओळी आठवा

अनुक्रमणिका

ब्रिगेडिअर हेमंत महाजन, युद्ध-सेवा-मेडल, यांची व्यक्तीरेखा


## लेखकाचे मनोगत आणि प्रस्तावना

त्यांच्या द्विराष्ट्र-सिद्धांता (Two Nation Theory) पासून फारकत घेऊन, जम्मू-आणि-काश्मीरसारख्या मुस्लिमबहुल राज्याने, भारतात सामील होण्याचा निर्णय घेतला हे पाकिस्तानला कधीही पचू शकलेले नाही. पाकिस्तानने, काश्मीरवर ताबा मिळवण्याच्या असंख्य योजना केलेल्या आहेत. ज्यांत १९४७-४८ मधले आक्रमण, १९६५ ची “ऑपरेशन जिब्राल्टर” मोहीम आणि १९९९ चे कारगिल युध्द हेही समाविष्ट आहे.

पाकिस्तानचे राष्ट्राध्यक्ष झिया-उल-हक ह्यांनी योजिलेली, काश्मीरमधील दहशतवादात अत्यंत महत्वाची घटना म्हणजे “ऑपरेशन टोपॅक”. हिच्यात

दहशतवादी हिंसाचारात ६३,००० हून जास्त लोक मारले गेले. गंभीररित्या जखमी झालेल्यांची संख्या २.५-लाखांहूनही जास्त आहे. १९८० पासून पाकिस्तानने "छुप्या-युद्धा (प्रॉक्सी-वॉर)"ची व्यूहरचना अवलंबिलेली आहे.

"इस्लामच्या ज्या तलवारीने तीन महाशक्तींचा (ग्रेट ब्रिटेनचा १९ व्या शतकात, अमेरीका आणि रशिया या महाशक्तींचा वर्तमान शतकात) पराभव केला, ती भारताचाही पराभव करू शकेल" ही पाकिस्तानात आणि इंटर-सर्व्हिसेस-इंटेलिजन्स (आय.एस.आय.) मध्ये स्वीकृत समजूत आहे. आय.एस.आय.चे उद्दिष्ट; काश्मीरमुक्तीचे कमी, आणि भारताला थकवा यावा, ह्याकरताचा न संपणारा हिंसाचार निर्माण करण्याचेच अधिक राहिले आहे.

पाकिस्तानचे भारतामधील छुपे युद्ध सुरू ठेवण्याकरता हे कडवे, परदेशीय भाडोत्री घुसवणे महत्वाचे आहे, कारण भारतिय दहशतवादी असहकार करतात. मारल्या गेलेल्या दहशतवाद्यांची भरपाई करण्यासाठी, प्रशिक्षण शिबिरातून आलेले नवे दहशतवादी, ज्येष्ठ सहकाऱ्यांसोबत घुसवावे लागतात. पाकिस्तानला वाटते की, त्यांच्या आण्विक आणि क्षेपणास्त्र सामर्थ्यापायी, भारतीय नेतृत्वास आण्विक युद्धाचे भय वाटते. यामुळे भारतीय भूदलाकडून होऊ शकणाऱ्या प्रतिक्रियात्मक प्रतिसादापासून (पारंपारिक युध्द), त्यांचे रक्षण झाले आहे. हे खरे आहे का?

हे पुस्तक संशोधन प्रबंध नाही.सुरक्षेचा पूर्ण आढावा घ्यायचा असेल, तर एक महाग्रंथच तयार करावा लागेल. पुस्तक बोजड होऊ नये, सहजपणे वाचले जावे, असा मी प्रयत्न केला आहे. एखादा सुगरण शितावरुन

भाताची परीक्षा करतो, तसे तुमच्या सारखे जाणकार वाचक या अल्प माहीतीवरुन भारताचे संपूर्ण चित्र डोळ्यासमोर आणू शकतील. भारतामधील देशविरोधी कारवाया आणि छुप्या युध्दाच्या विरूध्द जनजागृती करण्याचा प्रयत्न, या पुस्तकात करण्यात आला आहे. त्यात किती यश मिळाले, हे वाचकांनी ठरवायचे.

**भारताची अंतर्गत सुरक्षेची अवस्था - भारतास भेडसावणारे धोके**

भारतातील फारच थोडे धोरणकर्ते भारताच्या प्रादेशिक अभंगतेस असलेला धोका मान्य करण्याचे साहस करतात. राष्ट्राची सुरक्षितता आणि अभंगता मतपेटीच्या राजकारणापाशी ओलीस पडलेली आहे. ईशान्येकडील काँग्रेसशासित राज्यसरकारांनी गेल्या पंधरा वर्षांत ५ ते ६ कोटींहून अधिक बांगलादेशींना देशात शिरू दिलेले आहे. भ्रष्ट शासकीय अधिकारी आणि निष्प्रभ सीमा-सुरक्षा-दलाच्या सहयोगाने हे घडून येत आहे. अशाप्रकारे देश भरकटत गेला तर, लोकशाही आणि आर्थिक विकासातील वाढही उपयोगाची ठरणार नाही.

वर्तमान सुरक्षा अवस्था, हा गंभीर प्रश्न उभा करत आहे की, ढिसाळ सुरक्षा हाताळणीमुळे, भारताचा विकास आणि आर्थिक वाढ, टिकाऊ राहिलेली नाही काय? भारतास भेडसावत असणारे पाच मुख्य धोके पुढीलप्रमाणे आहेत.

१. माओवाद/ नक्षलवाद/ डावा दहशतवाद

२. ईशान्येचे बांगलादेशीकरण

३. किनारी प्रदेशातील दहशतवाद

४. काश्मीरमधील छुपे युद्ध

५. समाजाचे मूलतत्त्वीकरण/ जातीय दंगे

## प्रकरण-१जम्मू-आणि-काश्मीरमधील छुपे युद्ध

**काश्मीरची काश्मिरीयत कडून वहाबी धर्माकडे वाटचाल**

**काश्मिरी विद्यार्थ्यांवरील राजद्रोहाचा गुन्हा एक योग्य निर्णय**

**पुस्तक परिचय- आव्हानः जम्मू-आणि-काश्मीर मधीलछुप्या युद्धाचे**

**जम्मू-काश्मीर वर राष्ट्रीय आपत्ती:अभुतपुर्व लष्करी मदतकार्यांमुळे परिस्थिती काबुमध्ये**

**हुरियतच्या नेत्यांवर देशद्रोहाचा खटला चालवा**

**मुफ्ती महंमद सईद आणि फुटीरतावाद्यांचा आगीशी खेळ**

**३७० कलम आणि काश्मिर खोर्यातील भावनिक एकात्मता**

## प्रकरण २- भारत पाकिस्तान संबध्द एक शुन्याचा पाढा-54 pages

**२९ मार्च २०१५पाकिस्तानातील हिंसाचार आणि भारत**

**२६ एप्रिल २०१५ चीन-पाकिस्तान मैत्रीचा नवा अध्याय:गरज नवी रणनीती आखण्याची**

**१७ मे २०१५ पाकिस्तानचा कांगावा आणि वास्तव**

२६ जुलै २०१५स्मृती कारगिल युद्धाच्या
२६ जुलै २०१५कारगिलची पुनरावृत्ती होईल का?
२३ ऑगस्ट २०१५ न संपणार्या विवरात पाकिस्तान
६ सप्टेंबर २०१५ भारत-पाक युद्धाची पन्नाशी
११ ऑक्टोबर पाकिस्तानचे शेपटू वाकडेच
१८ ऑक्टोबर बलुचिस्तानचा स्वातंत्र्यलढा आणि भारत
१ नोव्हेंबर पाकिस्तानची वाढती अण्वस्त्रक्षमता आणि भारत

## प्रकरण 3- भारतातील दहशतवादः हजार जखमांनी रक्तबंबाळ भारत-28 pages

१७ मे २०१५ सागरी सुरक्षा : एक समीक्षा
२ ऑगस्ट २०१५धडा पंजाब हल्ल्याचा
२० सप्टेंबर इसिसविरुद्धची ‘डिजिटल लढाईङ्क qजकण्यासाठी...
१५ नोव्हेंबर अमली पदार्थांचा गोल्डन ट्रँगल आणि भारत
२२ नोव्हेंबर २०१५पॅरिसवरील हल्ला आणि भारत
...हेडली की जबानी!

## प्रकरण-4 ईशान्येचे बांगलादेशीकरण-22 pages

१५ मार्च २०१५- बांगला देशींची घुसखोरी बाबत हवे गांभीर्य
१७ मे  २०१५ भारत आणि बांगलादेश भू-सीमा कराराचे महत्त्व
७ जून २०१५ नरेंद्र मोदी बांग्लादेश दौरा ठरणार ऐतिहासिक?
१४ जून २०१५ बांगलादेश दौर्याची फलनिष्पत्ती
९  आॅगस्ट २०१५नॅशनल रजिस्टर ऑफ सिटीझन्सचा वापर करून बांगलादेशी घुसखोरी रोखण्यासाठी सरकारचा प्रयत्न

## प्रकरण ५- माओवाद/ नक्षलवाद/ डावा दहशतवाद

माओवाद्यांची सत्यशोधन समिती आणी खडंणी राज्य

माओ हिंसाचार आणी मतपेटीचे राजकारण

वाढता माओवादी दहशतवाद: राज्यांच्या उदासीनतेचा परिपाक

महाराष्ट्रात माओवाद आणि आदिवासी विकास

माओवाद्यांशी वाटाघाटी आणि शांतता-दिल्ली दूर है

माओवाद्यांच्या बीमोडासाठी व्यापक संयुक्त कारवाई जरुरी

माओवाद संपवण्यासाठी सर्व समावेशक उपाय

माओवाद्यांचा चक्रव्यूह भेदायचा तर...

२०१४-15 मध्ये मावोवाद्यांचा हिंसाचार कमी झाला

## प्रकरण 6- दहशतवाद थांबण्याकरता आक्रमक परराष्ट धोरण-20pages

९ ऑगस्ट २०१५ संपूर्ण जगाला हवी दहशतवादाविरुद्ध एकजूट

२२ मार्च २०१४अफगाणिस्तानमधील सत्ताबदल भारताला घातक

२३ ऑगस्ट २०१५युएई दौर्याचे दहशतवादाविरुद्ध एकमेकांना मदत

१ फेब्रुवारी २०१५-दहशतवादाचे बदलते स्वरुप आणि भारत अमेरिका संबंध

१ मार्च २०१५भारत-इस्त्रायल संबंध वेगळ्या वळणावर

## प्रकरण 7- दहशवादा विरुध्द सर्व समावेशक उपाय योजना-18 pages

१२ जुलै २०१५ सीमांवर लक्ष ठेवण्यासाठी युएव्ही--

२४ मे २०१५ चीनच्या शेजारील राष्ट्रांशी मैत्री करून चीनला घेरण्याचा भारताचा प्रयत्न ?

१४ जून २०१५२१ स्पेशल फोर्सेस म्यानमारमध्ये बंडखोरांच्या ट्रेनिंग

**<u>कँपवर केलेला हल्ला संदेश 'प्रत्युत्तराचा</u>**

**<u>२ ऑगस्ट २०१५पुन्हा एकदा 'एक्सरसाईज मलबार</u>**

# <u>प्रकरण 8- अंतर्गत सुरक्षेबाबत अतिशय सतर्क राहण्याची गरज-8 pages</u>

**ब्रिगेडिअर हेमंत महाजन, युद्ध-सेवा-मेडल, यांची व्यक्तीरेखा**

ब्रिगेडिअर हेमंत महाजन, इंडियन-मिलिटरी-अकादमीत, जुलै १९७३ मध्ये, डेहराडून येथे रुजू झाले. १५ जून १९७५ रोजी ते "कमिशन्ड ऑफिसर" म्हणुन पायदळातील ७-मराठा-लाईट-इन्फन्ट्रीत रुजू झाले. जम्मू-आणि-काश्मीरच्या राजद्रोह व अतिरेक-प्रवण क्षेत्रांत, पंजाबात आणि ईशान्य भारतातील राजद्रोह-विरोधी-कार्यवाहीत त्यांनी सविस्तर सेवा केली. तसेच १९७५ पासूनच्या लष्कराने हाती घेतलेल्या सर्व महत्त्वाच्या कार्यवाहींमध्ये त्यांचा सहभाग होता.

**त्यांच्या कामगिरीची ठळक वैशिष्ट्ये**

१९९५ ते १९९८ त्यांनी पूँछ क्षेत्रात काम केले. पूँछ आणि राजौरीच्या सर्वात अवघड क्षेत्रातील, सर्वाधिक दहशतवादाच्या काळात, त्यांनी "ऑपरेशन रक्षक" मधे,७-मराठा-लाईट-इन्फन्ट्रीचे नेतृत्व केले . त्यांची बटालियन, पाकिस्तानमधून जम्मू-आणि-काश्मीरमध्ये होणारी घुसखोरी रोखण्यास जबाबदार होती. त्यांच्या बटालियनला "युनीट सायटेशन आणि १८ शौर्य-पदके" प्राप्त झाली.

"ऑपरेशन पराक्रम" च्या दरम्यानच्या निरनिराळ्या युध्द-हालचालींत त्यांचा सक्रिय सहभाग होता. भारतीय लष्कराने केलेली ही सर्वात मोठी

जमवाजमव होती, ज्यामुळे त्यावेळी पाकिस्तानसोबत  युद्ध परिस्थिती निर्माण झालेली होती. त्यांच्या कठोर परिश्रमांची पावती म्हणून, त्यांना लष्कर-प्रमुखांकडून प्रशस्ती-पारितोषिक प्राप्त झाले.

पुन्हा एकदा जम्मू-आणि-काश्मीर मधील पूँछ, कृष्णाघाटी, सुरणकोट आणि राजौरी इलाख्यांतील “ऑपरेशन रक्षक” ह्या कार्यवाहीत त्यांनी ब्रिगेडच्या नेतृत्वाची धुरा वाहिली.त्यांच्या एका युनिटला युनीट-गौरव घोषित झाला. त्यांची बॉर्डर-सिक्युरीटी-फोर्स (बी.एस.एफ.) बटालिअन ही देशातील सर्वोत्कृष्ट बटालिअन म्हणून घोषित झाली आणि ब्रिगेडमधील एका अधिकार्यास २००६ सालचे सर्वोच्च पारितोषिक अशोक चक्र प्राप्त झाले.

फेब्रुवारी २००६ मध्ये ते, “हायर कमांड विंग” चे अध्यापक -डी.एस.- म्हणून, आर्मी-वॉर-कॉलेजमध्ये रुजू झाले. तिथे त्यांनी प्राविण्यासह तीन वर्षे सेवा केली. हायर कमांड अभ्यासक्रम, भूदल, नौदल व हवाईदलाच्या सर्वोच्च ७० कर्नल व समकक्षांचा असतो. संचालक-अध्यापक ह्या नात्याने, राष्ट्रीय सुरक्षेचे निरनिराळे पैलू समजून घेण्यासाठी, अधिकारी-विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्याची जबाबदारी त्यांचेवर होती. नियोजनात्मक तयारीत आणि शत्रुराष्ट्राविरुद्धच्या युद्धांत, मोठ्या संख्येतील युद्धखेळ खेळले जातात.त्यांनी अधिकारी-विद्यार्थ्यांना; युध्दव्यवस्थापनाचे विविध पैलू, आण्विक-जैव-रासायनिक-युद्धसेवा, काश्मीर व ईशान्येतील विद्रोह, डाव्या-पक्षांचा-अतिरेक, दहशतवाद, सागराकडूनचा विद्रोह इत्यादींसारख्या विषयांत; मार्गदर्शन केलेले आहे.

**सेवाकाळात त्यांना खालील पदके प्राप्त झालेली आहेत.**

अ) जी.ओ.सी.-इन.-सी. सेंट्रल कमांड कमेंडेशन कार्ड

आ) युद्धसेवा मेडल

**अतिरिक्त अनुभव**

अ) **माध्यम अनुभवः** इलेक्ट्रॉनिक माध्यमांतून ते अनेकदा वावरलेले आहेत.

आ) **लेखन अनुभवः** “आर्मी-वॉर-कॉलेज-जर्नल”, “इन्फन्ट्री”, “प्रतिविद्रोही” इत्यादी व्यावसायिक भूदल नियतकालिकांतून ते नियमितपणे लेखन करत असतात.

इ) **मास्टर-ऑफ-फिलॉसॉफी करता मार्गदर्शनः** भूदल, नौदल आणि हवाईदलाच्या अधिकार्यांना, देवी-अहिल्या-विश्व-विद्यालय, इंदौर-विद्यापीठाच्या “मास्टर-ऑफ-फिलॉसॉफी (एम.फिल.)” पदवीप्रत नेणार्या त्यांच्या संशोधनाच्या कामांत ते मार्गदर्शन करत असतात.

ई) **परदेशांतील लष्करी मुत्सद्देगिरीः** लष्करी दूतकर्म -आणि सुरक्षा-सहकार्य सुधारण्याकरता त्यांनी अनेकदा, परदेशांतून प्रतिनिधिमंडळांचे नेतृत्व केलेले आहे. त्यांनी भेट दिलेल्या काही देशांत, भूतान, म्यानमार, थायलंड, मलेशिया, सिंगापूर, यू.ए.ई., इजिप्त, कजाखस्तान, किरघिस्तान इत्यादींचा समावेश होतो.

उ) **वृत्तपत्रीय लेखनः** राष्ट्रीय सुरक्षेवरील त्यांचे लेख आघाडीच्या सर्व मराठी वृत्तपत्रांतून नियमितपणे प्रकाशित होत असतात. त्यांनी

१००० हून अधिक लेख निवृत्तीनंतरच्या साडेसहा वर्षांत प्रकाशित केलेले आहेत.

ऊ) **अतिथी-प्राध्यापकः** महाराष्ट्रातील अनेक विचार-मंथनांत ते राष्ट्रीय सुरक्षेशी संबंधित विषयांवर, सरासरीने दर-महा पाच ते सहा व्याख्याने देत असतात. त्याकरता ते नागपूर, मुंबई, कोल्हापूर, बेळगाव, सोलापूर इत्यादी शहरांत भेटी देत असतात.

ऋ) सेंटर-फॉर-ऍडव्हान्सड-अँड-स्ट्रॅटेजिक-स्टडीजचे ते सभासद आहेत. त्यांनी "पाक-मिलिटरी-स्ट्रॅटेजी", "नक्षलिझमः पास्ट, प्रेझेंट अँड फ्युचर", आणि "काश्मीरः स्टेटस ऑफ प्रॉक्सी वॉर" हे शोधनिबंध सादर केलेले आहेत.

ऌ) जुलै-२०१२ मध्ये त्यांनी "**नक्षलिझमः चायनाज प्रॉक्सी वॉर ऑन इंडिया**" हे पुस्तक प्रकाशित केले आणि ऑक्टोंबर-२०१३ मध्ये त्यांनी **"आव्हान चीनी ड्रॅगनचे**" हे मराठी पुस्तक प्रकाशित केले.१० मे २०१४ मध्ये त्यांनी "**आव्हान काश्मीरमधील छुप्या युध्दाचे"** हे पुस्तक प्रकाशित केले. मे २०१५ मध्ये त्यांनी "**देशासमोर सुरक्षेची बहुआयामी आव्हाने आणि भारताची सरंक्षणसिध्दता" हे पुस्तक प्रकाशित केले."PROXY WAR IN JAMMU & KASHMIR:A WINNING STRATEGY"** हे पुस्तक ईग्रजी भाषेत ऑक्टोंबर-२०१३प्रकाशित केले.

आक्रमक परराष्ट्रधोरण आणि **भारताची बाहय,अंतर्गत व सुरक्षा** जुलै २०१५ पर्यंत प्रकाशित .

**आगामी पुस्तके- INDIAS COASTAL SECURITY:CHALLENGES & WAY AHEAD**_ईंग्रजी भाषेत फ़ेब्रुवारी २०१६ पर्यंत प्रकाशित होणार आहे.

ऍ) दूरदर्शनच्या वृत्त-वाहिन्यांवरील वाद-विवादांत ते भाग घेत असतात. **मराठी वाहिन्याःमी मराठी,टीव्ही ९ मराठी,जय महाराष्ट्र,डिडि सह्याद्री,** आय.बी.एन.-लोकमत, झी-२४-तास, ए.बी.पी.माझा, दूरदर्शन. **हिंदी वाहिन्याः** सहारा समय, न्यूज एक्सप्रेस-२४, इंडिया-टी.व्ही. **इंग्लिश वाहिन्याः** टाईम्स नाऊ.

**प्रकरण-१जम्मू-आणि-काश्मीरमधील छुपे युद्ध**

**काश्मीरची काश्मिरीयत कडून वहाबी धर्माकडे वाटचाल**

**काश्मिरी विद्यार्थ्यांवरील राजद्रोहाचा गुन्हा एक योग्य निर्णय**

**पुस्तक परिचय- आव्हानः जम्मू-आणि-काश्मीर मधीलछुप्या युद्धाचे**

**जम्मू-काश्मीर वर राष्ट्रीय आपत्ती:अभुतपुर्व लष्करी मदतकार्यांमुळे परिस्थिती काबुमध्ये**

**हुरियतच्या नेत्यांवर देशद्रोहाचा खटला चालवा**

**मुफ्ती महंमद सईद आणि फुटीरतावाद्यांचा आगीशी खेळ**

**३७० कलम आणि काश्मिर खोर्यातील भावनिक एकात्मता**

## जम्मू-आणि-काश्मीरमधील छुपे युद्ध

भारतीय भूदलाने स्वातंत्र्यप्राप्तीपासून जम्मू-आणि-काश्मीरचा प्रत्यक्ष ताबा राखलेला आहे. राज्यातून जर भूदलास काढून घेतले तर, कितीही पोलीस,

निमलष्करी दले दिली तरी ती राज्य सांभाळू शकणार नाहीत. राजकारणी आणि नोकरशहा ह्यांनी परिस्थितीवर तोडगा काढण्याकरता काहीही केलेले नाही. त्यामुळे धोका अनेक पटींनी वाढलेला आहे. काश्मीर खोऱ्यातील निरनिराळ्या हुरियत कॉन्फरन्सच्या मोर्चांतून आणि दगडफेकी आंदोलनांतून, हजारोंच्या संख्येने येणाऱ्या, लष्कर-ए-तय्यबा, हिज्बुल-मुजाहिद्दीन, ऑल-पार्टीज-हुरियत-कॉन्फरन्स ह्यांच्या समर्थकांद्वारे फडकविल्या जाणाऱ्या झेंड्यांनीच हा धोका प्रदर्शित होत असतो.

शांतता प्रयत्नांच्या बुरख्याआड, पाकिस्तानच्या साहाय्याने, लष्करी-गुप्तवार्ता-आस्थापने शस्त्रास्त्रसज्ज घुसखोरांना काश्मिरात घुसवतच आहेत. सध्या ते दबा धरून आहेत, भारतीय संघराज्यावर अनेक आघाड्यांवर क्रूर-हिंसक-हल्ले करण्याच्या सुयोग्य संधीची वाट पाहत आहेत. हुरियत कॉन्फरन्सने आयोजित केलेल्या मोर्चांमधून अशा सूप्त शक्तींनी डोके वर काढले होते. पिपल्स-डेमॉक्रॅटिक-पार्टी आणि नॅशनल-कॉन्फरन्स ह्यांमधील राष्ट्रविरोधी राजकारण्यांकडून अशा शक्तींना सशक्त समर्थन मिळत असते. त्याचवेळी, इस्लामाबादेच्या मार्गदर्शनाखाली खेळल्या जात असलेल्या मनोवैज्ञानिक युद्धप्रयासांचा एक भाग म्हणून, ह्या वा त्या मुद्द्यावरून, भारतीय भूदलाची प्रतिमा मलीन करण्याची एक मोहीमही सुरू आहे. एवढी युद्धे आणि दहशतवादाची निर्यात करूनही इस्लामाबादला काश्मीर जिंकून घेता आलेले नाही, ह्याचे कारण भारतीय भूदलच आहे.

त्यामुळेच, काश्मीर मधून निर्लष्करीकरणाबाबतची बोलणी आणि भूदल-विशेषाधिकार-कायदा रद्द करण्याची मोहीम, काश्मीरबाबतची त्यांची

उद्दिष्टे साध्य करण्याचे केवळ बहाणे आहेत. काश्मीरमधील स्वातंत्र्य-लढ्याच्या बुरख्याआडचा इस्लामिक दहशतवाद हा, म्हणूनच संपूर्ण देशास अस्थिर करणारा आहे. काश्मीरचा उपयोग उर्वरित भारताकरताचे प्रवेशद्वार म्हणून करून घेण्याचा इस्लामाबादचा निर्धार आहे.

## काश्मीरची काश्मिरीयत कडून वहाबी धर्माकडे वाटचाल

कश्मीरमधील फुटीरवादी संघटना 'आझाद कश्मीर'चे स्वप्न दिवसाउजेडीही पाहत असतात. सत्ताधारी नॅशनल कॉन्फरन्स असो की मेहबुबा मुफ्ती यांची पीपल्स डेमोक्रॅटिक पार्टी, या मंडळींनाही कश्मीरच्या 'स्वतंत्र' आणि 'स्वायत्त' दर्जाची उचकी अधूनमधून लागत असते. फुटीरवादी संघटनांना कश्मीर पेटविण्यासाठी काहीतरी निमित्तच हवे असते. आता संसदेवरील हल्ल्याचा मुख्य सूत्रधार अफझल गुरू याच्या फाशीला एक वर्ष झाल्याचे निमित्त या संघटनांना मिळाले आहे. गेल्या ९ फेब्रुवारी रोजी अफझल गुरूला फासावर लटकविण्यात आले होते. त्याचे कारण देत फुटीरवाद्यांनी जम्मू-कश्मीरमध्ये तीन दिवसांचा 'बंद' पुकारला आहे. कोण हा अफझल गुरू आणि त्याच्यासाठी कश्मीरमध्ये तीन-तीन दिवसांचा बंद पुकारण्याची हिंमत होतेच कशी?

अफझल गुरूला फाशी दिली तर कश्मीरमध्ये आगडोंब उसळेल अशी 'टिव टिव' ओमरनीच केली होती.(तसे काही झाले नाही).काश्मिरचे मुख्य मंत्री ओमर अबदुल्लानी २९जानेवारीला विधान केले की भारतातले कुठलेच सरकार ३७० कलम हठवु शकत नाही. जम्मू-आणि-काश्मीरचे नागरी

प्रशासन, निरपवादपणे निष्प्रभ आणि भ्रष्ट ठरत आहे. ते दिशाहीन आणि प्रशासकीयदृष्ट्या सातत्यविहीन होत आहे. हे स्पष्ट होत आहे की, पोलीस, न्यायव्यवस्था आणि स्थानिक नागरी प्रशासन ह्यांसारखे समाजाचे अनेक जबाबदार घटक काश्मीर खोर्यात लयास गेलेले आहेत. त्यामुळे नागरी प्रशासनाचा बोजवारा उडालेला आहे. ओमर अबदुल्लाना राज्यकारभार चांगला करुन जनतेचे प्रश्ण सोडवण्यात फ़ारसा रस नाही.

**<u>२६ जानेवारीला काश्मीर खोर्यामधे तिरंगा झेंडा फ़डकवयाची हिंमत नाही</u>**

मेहबूबा मुफ्ती आज काश्मीरमध्ये काय भूमिका वठवत आहेत हे पाहणे सयुक्तिक ठरेल. गिलानी, यासिन मलिक या फुटीरतावादी नेत्यांच्या विरोधात त्या 'ब्र'देखील काढत नाहीत. उलट केंद्र सरकार काश्मीरबाबत पुरेसे संवेदनशील नसून, भारतीय लष्करामुळे तेथील जनतेच्या मानवी हक्कांची पायमल्ली होत आहे, असा आरोप त्या सतत करत असतात.२६ जानेवारीला काश्मीर खोर्यामधे कोणाचीही तिरंगा झेंडा फ़डकवयाची हिंमत झाली नाही.

३० जानेवारीला एका चित्रपटाच्या चित्रीकरणादरम्यान अभिनेता शाहीद कपूर व इरफान खानवर स्थानिक नागरिकांनी हल्ला केल्याची घटना घडली आहे. काश्मीरमध्ये हैदर या चित्रपटाचे चित्रीकरण सुरू आहे. नागरिकांनी कांगडी (काश्मिरी शेगडी) ने अभिनेत्यांवर हल्ला केला. यानंतर नागरिकांनी भारत विरोधी घोषणाही दिल्या. ६५ वर्षानंतर पण तिथे देशप्रेम/राष्ट्रवाद का रुजला नाही ?.२०१३ मध्ये काश्मीरमध्ये आयएआ्यच्या आंतकवादी कारवायामुळे २० सामान्य नागरिक ,६१

सैनीक, आणि १०० आंतकवादी मारले गेले

**<u>काश्मीर राजकारणात अतिरेक्यांचा वाढता प्रभाव</u>**

काश्मीरमधील सामाजिक परिस्थितीत मूलतत्त्ववादाचा  वाढता प्रसार, राजकारणात वाढता प्रभाव (INFILTRATION  SEPARATISTS IN GOVT ) , फुटीरतावादी मंच व शासकीय व्यवस्था ह्यांच्यातील सीमारेषेचे धूसर होत जाणे, प्रदेशातील अनधिकृत अर्थव्यवस्थेचे विस्तारते जाळे(खोट्या नोटा),  सूप्त अतिरेकी-कैंद्रांचे (स्लिपर सेल्सचे) वाढ, प्रदेशातील फुटीरतावादी व उर्वरित भारतातील फुटीरतावाद्यांत, विशेषतः माओवाद्यांत, घट्ट होत जाणारे संबंध, मानवी हक्कांच्या नावाखाली लष्कराविरोधात होणारा वाढता अपप्रचार आणि अतिरेकी सत्तांचे विस्तारते सामर्थ्य, ह्या घटकांचा विचार, ह्या प्रदेशातील प्रत्यक्षातील परिस्थितीबाबतचा निर्णय करतांना व्हावयास हवा.

आपल्या बाजूचे काश्मिरी सुदैवी आहेत. त्यांना रस्ते, वीज, शिक्षण, रूळमार्ग, प्रचंड केंद्रीय अनुदाने आणि देशातील इतर राज्यांच्या तुलनेत सर्वोच्च दरडोई मिळकत लाभत असते. जम्मू-आणि-काश्मीरला सर्वात जास्त केंद्रीय मदत मिळत असते, जी बिहार व उत्तरप्रदेशासारख्या गरीब राज्यांनाही मिळत नाही. भारताच्या इतर राज्यातील जरुरी वस्तुंच्या पुरवठ्यावरच,त्यांच्या दैननदिन गरजा भागतात.काश्मीरमध्ये सफ़रचंदा शिवाय फ़ारसे काहीच ऊगवत नाही. सफ़रचंदाची बाजारपेठ अर्थातच भारताची मोठी शहरे आहेत.देशातून येणारे पर्यटक ह्याच काश्मिरी लोकांच्या उपजीविकेचा मुख्य स्त्रोत आहे. पण,खोर्यातील काश्मिरी

आणखी मदतीची मागणी करत आहेत.

**<u>काश्मिरीयत ते वहाबी धर्म</u>**

रस्त्यांवर निदर्शने करणारे, संचारबंदी मोडणारे आणि पोलीस व इतर सुरक्षा दलांवर हल्ले करणारे हे लोक कोण आहेत? खोर्यातही केवळ चार जिल्हेच निदर्शनांत सामील होतात. श्रीनगर, सोपोर, बारामुल्ला आणि अनंतनाग. हे काश्मिरीयतीस परके असणार्या, वहाबी धर्मवेडावर पोसले जाणारे, सुन्नी मुसलमान आहेत.त्यांची बुद्धी ईतकी भ्रमित केली आहे, की ते कुठल्याही परिस्थितीत शांत राहू शकत नाहीत. जम्मू-आणि-काश्मीरमधील मुसलमानांतील शिया लोक निदर्शनांचा भाग नसतात.

आय.एस.आय.ने अतिरेक्यांना हिंसाचार वाढविण्यास निक्षून सांगितले आहे, ज्यामुळे काश्मीरकडे जगाचे लक्ष वेधले जाईल. आय.एस.आय.ला असे वाटते की, आंतरराष्ट्रीय समुदायाचा एक मोठा हिस्सा, अजूनही काश्मीर मुद्द्याचा सहानुभूतीने विचार करतो.

**<u>विध्वंसक आणि अतिरेकी कारवायांना सौदी अरेबिया अर्थपुरवठा करते</u>**

सौदी अरेबियाचा वापर, विध्वंसक आणि सिमी-इंडियन मुजाहिदीन संकूल कर्नाटक, आंध्र प्रदेश, तामिळनाडू आणि महाराष्ट्रातील अतिरेकी कारवायांना, अर्थपुरवठा करण्यासाठी करून घेत आहे.

ज्यांना सौदी अर्थपुरवठ्याचा लाभ मिळत असतो ते, "वहाबी-वेलफेअर-ऑर्गनायझेशन, 'अल-हदिथ' ", हे धार्मिक आणि सांस्कृतिक स्वरूपाचे<u>(वाचा वहाबी धर्मचा प्रचार )</u> शक्तीशाली बल व सस्थां म्हणून काश्मीरमध्ये उदयास येत आहे. ह्या संघटनेने मदरसा, मशीदी, प्राथमिक

आणि माध्यमिक शाळा, दवाखाने ह्यांचे बांधकाम हाती घेतले आहे. ती संघटना एका विद्यापीठाच्या स्थापनेची अनुमतीही मागत आहे. तिचे मनमिळाऊ नेते(??), अतिरेकी असल्याचे नाकारतात. आपल्या शिक्षण आणि संगणक प्रेमाचा ते दाखला देतात. ते म्हणतात की, नियोजित विद्यापीठात स्त्रिया आणि मुस्लिमेतर लोकांचीही(अजून एकाची पण झाली नाही) नोंदणी केली जाईल.

१५ लाख सदस्य(काश्मीर लोक संखेच्या १०%) असल्याचा दावा करणारा हा गट, दीर्घ काळापासून त्या भूभागातील मुस्लिमांच्या धार्मिक सहिष्णुतेकरता ज्ञात असलेल्या प्रदेशात, अतीरेकी विचार सरणीचा प्रसार करत आहे. पूर्वीच्या मानाने, जास्त स्त्रिया बुरखा घालत आहेत किंवा घरीच राहत आहेत. अरबी-शैलीच्या आणखीही मशीदी उभ्या राहत आहेत.मदरसा, मशीदीचे प्रमाण प्रचंड वाढले आहे.

अल-हदिथ सौदी अरेबियाचे प्रतिनिधित्व करत असून, काश्मीरातील सर्व-मुस्लिमीकरणाच्या प्रसाराचे शक्तीशाली उदाहरण असल्याने, काश्मीरातील मुस्लिमेतर अल्पसंख्यांक घाबरून असतात. वहाबींचे अतिरेक्यांसकट इतरत्र राहणार्या वहाबींशी संबंध असू शकतात. भारताने मोकाट सोडलेल्या ह्या प्रदेशात,अल-हदिथ एक शक्तीशाली नवीन बल उदयास येत आहे . मात्र दिल्ली सरकारला चिंता नाही.

बंदुकविहीन अतिरेक हाताळण्याबाबत भारत सरकार अगदीच अनभिज्ञ असल्याचे दिसते आहे. सरकार मूलतत्त्ववादास अर्थपुरवठा करते आहे

काय? काश्मिरीयतीची जागा वहाबी धर्मवेड घेत आहे काय? सौदी अरेबिया अतिरेकी कारवायांना अर्थपुरवठा करत आहे काय? सरकार मूलतत्त्वीकरणास (RADICALIZATION)अर्थसाहाय्य करत आहे काय? विध्वंसक आणि अतिरेकी कारवायांना सौदी अरेबिया अर्थपुरवठा करते.आपण ह्या संघटनेस पूर्णविराम देऊ शकतो काय? आपण मूलतत्त्व-प्रसार करणारा सर्व सौदी अर्थ-पुरवठा थांबवत का नाही?.धर्मनिरपेक्ष भारताने, करदात्यांचा पैसा आणि सहभाग वापरून, मूलतत्त्ववादी इस्लामी राष्ट्राची निर्मिती करावी काय?

## <u>दहशतवादाचे बदलते स्वरुप</u>

“जम्मू-आणि-काश्मीर मधील एलओसी वरील घुसखोरी विरोधी अभियान(**<u>ANTI INFILTRATION OPERATIONS</u>** ), दहशतवादी विरोधी अभियान(**<u>ANTI TERRORISTS OPERATIONS</u>**),हिंसाचाराचा सामना आणि सामान्य जीवन पुनर्स्थापित करणे आपण(भारतीय सैन्याने) चांगल्या प्रकारे साधले आहे.मात्र खोट्या अफ़वा(**<u>DELIBRATE RUMOURS</u>**),खोटे आरोप(**<u>FALSE HUMAN RIGHTS ACCUSATIONS</u>**),दुशप्रचार,(**<u>DISINFORMATION CAMPAIGN</u>**),दगड्फ़ेक (STONE TERRORISM),निदर्शने करणारे (AGITATIONAL TERRORISM)वगैरेशी लढण्यात आपण कमी पडतो आहोत. ह्या त्रुटीवर मात करणे आवश्यक आहे. ह्या लढाईचा अर्ध्याहून अधिक भाग केवळ काश्मीरी लोकांची, उर्वरित भारतीयांची आणि इतर देशांतील नागरिकांची हृदये आणि मने जिंकण्याचाच आहे.प्रचंड भ्रष्टाचार, ढिसाळ प्रशासन हेही काश्मीरातील युद्धास मदतच करत आहेत. वहाबी

आक्रमण थांबवून काश्मीर खोर्यास बाकी काश्मीर व भारताशी जोडणे महत्वाचे आहे.

1947 साली, फाळणीनंतर अस्तित्वात आलेल्या पूर्व पाकिस्तानात हिंदूंची संख्या 34 टक्के होती. त्यानंतर बांगला देशच्या निर्मितीनंतर ही टक्केवारी घटत गेली. हिंदूंवर सातत्याने होत असलेले अत्याचार, जिवाच्या भयाने झालेली स्थलांतरं असे अनेक मुद्दे ही घट होण्यास कारण ठरले. बांगला देश सरकारची अधिकृत आकडेवारी आज हिंदू 9 टक्क्यांपेक्षाही कमी असल्याचे दर्शवते. जे उरले आहेत, ते जीव मुठीत धरून येणारा दिवस ढकलत आहेत.

## काश्मिरी विद्यार्थ्यांवरील राजद्रोहाचा गुन्हा एक योग्य निर्णय

३ मार्चला जम्मू-काश्मीरच्या पुलवामा जिल्ह्यातील एका कनिष्ठ न्यायालयावर अतिरेक्यांनी हल्ला केला. यात दोन पोलिस शहीद झाले. दोन नागरिक जखमी झाले. बांगलादेशमध्ये सुरू असलेल्या 'आशिया कप' स्पर्धेमध्ये १ मार्चला भारत आणि पाकिस्तान यांच्यात क्रिकेट सामना झाला. या सामन्यात पाकिस्तानने भारतावर विजय मिळवल्यानंतर मीरट मधील 'स्वामी विवेकानंद सुभारदेती विद्यापीठा' च्या ६० काश्मिरी विद्यार्थ्यांनी आनंदोत्सव साजरा केला. विद्यापीठाच्या वसतिगृहात राहणाऱ्या या विद्यार्थ्यांनी आपापल्या खोलीतून बाहेर येऊन 'पाकिस्तान जिंदाबाद!' अशा स्वरूपाच्या घोषाण दिल्या. त्यांच्या या कृत्यामुळे विद्यापीठ परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले.

भारत आणि पाकिस्तान यांच्यात झालेल्या क्रिकेट सामन्यात पाकिस्तान विजयी झाल्यानंतर येथे आनंद साजरा करणाऱ्या काश्मिरी विद्यार्थ्यांवर उत्तर प्रदेश पोलिसांनी देशद्रोहाचा गुन्हा दाखल केला. मात्र रात्री हा देशद्रोहाचा गुन्हा मागे घेण्यात आला. शत्रू जिंकल्यावर उत्सव साजरे करणे हे फ़क्त फितुरांचे

लक्षण आहे. आणि या साठी कायदाची नाही तर नितीमत्तेची गरज आहे. अशाच प्रकारची घटना हरयाणामध्ये गुरगाव येथे पण घडली.तिथे पण ४ काश्मिरी विद्यार्थ्यांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**<u>देशामधल्या काही प्रतिक्रिया</u>**

भारताच्या पराभवाबद्दल पाकिस्तानचे उदात्तीकरण करण्याच्या या प्रकारामुळे सार्या क्रिकेटप्रेमींमध्ये संतापाची लाट उठली नसती तरच नवल. दिल्लीपासून गल्लीपर्यंत सर्वत्र या काश्मिरी विद्यार्थ्यां विरुद्ध संतापाची लाट उसळली. काही प्रातिनिधिक प्रतिक्रिया:-

१) ज्या भूमीने आपल्याला वाढवले, खाऊ पिऊ घातले, सन्मानाने जगू दिले त्या भूमी बद्दल असे ??

२) यांना तिकडे पाठवून द्या. म्हणजे तिकडे जाता क्षणीच भारतीय म्हणून गोळ्या घालतील.

३) अतिशय भयानक प्रकार आहे .अनेक मुलांना पालक कोणती शिकवण देत असतील , देशविरोधी भावना किती प्रमाणत देशात खदखदत आहे , अनेक तरुणांना भारता पेक्षा पाकिस्तान जवळचा वाटत आहे.

३) भारत जर धर्मनिरपेक्ष आहे तर पाकिस्तानला पाठींबा द्यायला काय हरकत आहे?

४) अनेक जण कोणत्याच महाविद्यालयात शिकत नाहीत आणि पाकिस्तान सामना जिंकल्यावर जल्लोष करतात, अशा लोकांचे काय करायचे? असे लोक महाराष्ट्रात देखील बघायला मिळतात.

पाकिस्तानचा विजयोत्सव साजरा करणाऱ्या या विद्यार्थ्यांचे वर्तन राष्ट्रविरोधी असून, त्यांच्यावर कठोर कारवाई करण्याची मागणी केली. या विद्यापीठात

विविध शाखेत २०० काश्मिरी विद्यार्थी शिकत आहेत.

**<u>काश्मीर खोऱ्यात पडसाद</u>**

काश्मिरी विद्यार्थ्यांवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल केल्याचे पडसाद काश्मीर खोऱ्यात उमटले. या विद्यार्थ्यांवर नोंदवलेले गुन्हे मागे घेण्यात यावेत आणि विद्यापीठ प्रशसनाने राष्ट्राची माफी मागावी, अशी मागणी 'पीपल्स डेमोक्रेटिक पार्टी' ने केली आहे. सत्ताधारी 'नॅशनल कॉन्फरन्स' ने ही या घटनेचा तीव्र निषेध व्यक्त केला. विद्यार्थ्यांच्या वर्तणुकीमुळे राष्ट्रीय एकात्मतेला बाधा पोहोचलेली नाही. त्यामुळे त्यांच्यावर चुकीच्या पद्धतीने कारवाई करण्यात आलेली आहे. काश्मिरी राजकीय पक्ष दहशतवादी किंवा फ़ुटीरवाद्यांच्या विरुध्द ब्र पण काढत नाही. पण राष्ट्रद्रोही कारवायांचे नेहमीच समर्थन करतात.

काश्मिरी विद्यार्थ्यांवरील कारवाईवर पाकिस्ताननेही मतप्रदर्शन केले आहे. उत्तर प्रदेश पोलिसांचा हा निर्णय दु:खद आणि दुर्दैवी आहे. शैक्षणिक संस्थांमध्ये मतप्रदर्शन करण्यास वा भावना व्यक्त करण्यास विद्यार्थ्यांना मोकळीक असावी, असे पाकिस्ताने सांगितले.

काश्मिरी विद्यार्थ्यांवरील राजद्रोहाचा गुन्हा आणि कारवाई योग्य की अयोग्य यावर वाद सुरू आहे. पाकिस्तानच्या विरोधात जेव्हा सामना असतो, तेव्हा निव्वळ खेळाचा विचार होत नाही; कारण पाकिस्तान हा भारताचा शत्रू आहे. या दोन देशांमध्ये फाळणीचे कटू वास्तव आहे. त्यानंतरही पाकिस्तानने भारताच्या विरोधात चार वेळा युद्ध केले आहे. काश्मीरवरील आपला दावा कायम ठेवत तेथे गेल्या अडीच दशकांपासून छुपे युद्ध छेडले आहे. काश्मीरमधील फुटीरतावाद्यांना, दहशतवाद्यांना फूस देण्याबरोबरच त्यांना लष्करी प्रशिक्षण पाकिस्तान देत आला आहे. त्यामुळे पाकिस्तानच्या विरोधातील क्रिकेटचा सामना हा फक्त खेळापुरता मर्यादित राहत नाही.

**<u>काश्मीर खोऱ्यामध्ये अनेक पाकिस्तान धार्जिणे</u>**

अनेक भारतीयांना काश्मीर मधील सत्य परिस्थिती माहित नाहीं. काश्मीर खोऱ्यामध्ये (काश्मीरची २०% लोक संख्या) मध्ये अनेक पाकिस्तान धार्जिणे आहेत, तिथे लहान मुले पण भारतीय तिरंग्याला किंवा राष्ट्र गीताला मानत नाहीत. ते जरी भारतात असले तरी , आजून पण तेथील लोक भारत आपला देश मानत नाहीत. १४ ऑगस्टला पाकिस्तानचा झेंडा फडकवला जातो. १५ ऑगस्टला भारतीय ध्वज फ़डकवला जात नाही. मारल्या गेलेल्या दहशतवाद्यांच्या अंतविधी करता पूर्ण शहर लोट्ते, अमर रहे अशा घोषणा केल्या जातात.जेंव्हा सैनिक शहिद होतात, तेंव्हा अंतविधीस कोणीच नसते. ऊलट जखमी सैनिकांना घेऊन जाणाऱ्या गाड्यांवर दगड फ़ेक केली जाते. आज हे ६७ सापडले पण असे असंख्य देशद्रोही आपल्या दे्शामध्ये आहेत आणि मते कमी पडत आहेत म्हणून बंगला देशातून ४-५ कोटी घुसखोरांना आपण भारतात येण्याचे आमंत्रण दिले.

**<u>काश्मिरी कुरापत आता काश्मिरच्या बाहेर पण</u>**

‘पाकिस्तान जिंदाबाद’ चे हे नारे निवडणुकीच्या उत्सवातील नव्हते, तर ते होते पाकिस्तानने भारताच्या केलेल्या पराभवाबद्दल, पाकिस्तानचा जयघोष करणारे. असे आक्षेपार्ह नारे देणारे युवक पाकिस्तानी नव्हते, तर ते होते , देशाचा अविभाज्य भाग असलेल्या जम्मू-काश्मीरमधील. या घोषणा देणाऱ्या काश्मिरी युवकांविरुद्ध देशद्रोहाचा गुन्हा दाखल करून उत्तरप्रदेशमधील मेरठच्या प्रशासनाने योग्य तीच कारवाई केली होती.

भारताचा पराभव अशा पद्धतीने साजरा व्हावा, ही बाबच देशाच्या जखमेवर मीठ चोळणारी म्हणावी लागेल. हा सारा प्रकार निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर घडल्याने आणि आपल्या राज्यातील विद्यार्थ्यांवर अन्याय होत असल्याची भावना झाल्याने, जम्मू आणि काश्मीरचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी जो टाहो फोडला, त्याचे मुळीच समर्थन होऊ शकत नाही.

उत्तरप्रदेश सरकार एकाएकी का झुकले, यामागे मतपेटीचे राजकारण जबाबदार आहे. ओमर अब्दुल्लांना देशद्रोहाची खरी व्याख्या तरी समजते काय? अरब देशांमध्ये देशद्रोहाच्या आरोपाखाली किती कठोर शिक्षा आहेत, हे अखिलेश आणि ओमर या मुख्यमंत्र्यांनी जाणूनच घ्यायला हवे. मनात आले तर दाखल केला देशद्रोहाचा गुन्हा आणि कुणी दबाव टाकला म्हणून काढून टाकले ते गुन्हे, इतके का कुचकामी कायदे झालेत आपले? कुणीही यावे, भारताविरुद्ध घोषणा द्याव्या आणि त्यांच्याविरुद्ध कारवाईच्या नावाने बोंब, इतका का लवचीक झालाय आपला कायदा?

राहिला प्रश्न काश्मिरी विद्यार्थ्यांनी दिलेल्या ‘पाकिस्तान जिंदाबाद’ च्या नाऱ्यांचा, त्यांच्यावर कायद्यानुरूप कारवाईच केली जायला हवी. खबरदार! असा इशारा देत काश्मिरी कुरापतखोरांना बेनकाब करण्याची कठोर कारवाई झाली, तरच भविष्यातील अशा घटनांपासून भारताला मुक्ती मिळू शकेल.

**पुस्तक परिचय- आव्हानः जम्मू-आणि-काश्मीर मधील छुप्या युद्धाचे**

हे पुस्तक माधवी-प्रकाशन-पुणे येथे, खालील पत्त्यावर विक्रीस उपलब्ध आहे. किंमत रु.२२५/-.

चंद्रशेखर जोशी,दत्तकुटी, १४१६ सदाशिवपेठ, पुणे ४११०३०,दूरध्वनीः २४४७४७६२, २४४७५३७२, भ्रमणध्वनीः ९३२५०९७८९४,

ई-मेलः madhavipublisher@gmail.com

कोणकोणते धोके ह्या काळाच्या उदरात दडलेले आहेत? ते प्रत्येक सुजाण नागरिकाने समजून घेण्याची आवश्यकता आहे. मात्र ती माहिती सहजी उपलब्ध असणारी नाही. ब्रिगेडिअर हेमंत महाजन ह्यांनी ह्या पुस्तकाच्या रूपाने ती समोर आणली आहे. काश्मीरची समस्या काय आहे? हे जाणून घेण्याचा सोपा सोपान म्हणजेच, ’आव्हान जम्मू आणि काश्मीर मधील छुप्या युद्धाचे’ हे पुस्तक आहे.

ह्याकरता ह्या पुस्तकातील काश्मीरच्या साद्यंत इतिहासाचे विवेचन वाचणे जरूर आहे. जम्मू आणि काश्मीर राज्याच्या इतिहासाचे अनोखे तपशील देणारा मजकूर, राज्याच्या भौगोलिक सीमांचे यथार्थ दर्शन करविणारे सुरेख मुखपृष्ठ आणि राज्याच्या वर्तमान परिस्थितीचा जणू भावार्थप्रदीप शोभेल असा आढावा, ह्यांनी हे पुस्तक सजलेले आहे.

भारत स्वतंत्र झाला तेव्हा जम्मू आणि काश्मीर हे एक स्वतंत्र राष्ट्र होते. इंग्रजांनी त्यास स्वतःचा मार्ग निवडण्याचे स्वातंत्र्य दिले होते. मुस्लिमबहुल लोकसंख्येचे आधारे, पाकिस्तान त्याचेवर पाकिस्तानात विलीन होण्याकरता दबाव टाकत होता. भारत नेहमीप्रमाणे तटस्थ होता. जम्मू आणि काश्मीरचे महाराजा हरिसिंह स्वतंत्र राहू चाहत होते. पाकिस्तानने त्या राज्यावर हल्ला चढविला. काही कळायच्या आतच, राज्याच्या मोठ्याशा भूभागावर पाकिस्तानने आपली सत्ता प्रस्थापित केली. महाराजा हरिसिंह ह्यांना भारताची मदत घेण्यावाचून पर्याय नव्हता. त्याकरता, नेहरूंनी जम्मू आणि काश्मीर भारतात विलीन करावे अशी अट घातली. महाराजा हरिसिंह ह्यांनी हा निर्णय घेण्यास लावलेल्या अक्षम्य विलंबाचे पर्यवसान, आपण आज पाकव्याप्त काश्मीरच्या स्वरूपात पाहतो आहोत. हा सर्व उत्कंठावर्धक इतिहास ह्या पुस्तकात तपशीलाने दिलेला आहे.

जम्मू आणि काश्मीर राज्याचे भारतात झालेले विलीनीकरण, सोबत अनेक समस्या घेऊनच झाले. घटनेचे ३७० कलम, पाकव्याप्त काश्मीर, पाकिस्तानने चीनला दिलेला भारतीय भूभाग आणि चीनच्या ताब्यात असणारा आकाशी चीन, मुस्लिमबहुल प्रांतातील हिंदू अल्पसंख्यांकांचे प्रश्न, घूसखोर-निर्वासित आणि विस्थापितांच्या समस्या, ह्या त्या समस्यांपैकीच काही आहेत. ह्या समस्यांच्या निरसनार्थ भारतीय संघराज्याची संसाधने मग सततच खर्च होत राहिली. काश्मीरातील लोकांच्या समस्यांकरता भारतीय संघराज्याचा पैसा प्रमाणाबाहेर खर्च होऊ लागला. उत्तरप्रदेश, बिहारसारख्या बिमारू राज्यांनाही कधी मिळाली नाहीत, एवढी संसाधने काश्मीरावर खर्ची पडू लागली. जिथे जाऊन राहू शकत

नाही, जिथली जमीन खरेदी करु शकत नाही, त्या राज्यास, इतर राज्यांनी मदत तरी किती करायची! हा आर्थिक असमतोलाचा प्रश्न मग उपस्थित झाला. ह्या आर्थिक प्रश्नाची सम्यक ओळख ब्रिगेडिअरसाहेबांनी ह्या पुस्तकात व्यवस्थित करून दिलेली आहे. त्याकरताही हे पुस्तक वाचनीय आहे.

अशीच समाज-प्रबोधक आणि शासनास ज्ञानदीप ठरावीत अशी, निरनिराळ्या विषयांवरची पुस्तके निरंतर लिहिली जावीत, अशी सदिच्छा मी ह्या निमित्ताने व्यक्त करतो.

दहशतवाद हा लघुउद्योग झाला असून मोठय़ा प्रमाणावर तरुणांना याकडे खेचले जाते. या चक्रव्यूहातून त्यांना बाहेर काढणे गरजेचे आहे. काश्मीरप्रश्नी इतिहासात अनेक चुका झाल्या आहेत. राजकारण्यांच्या चुकीच्या धोरणामुळे आपल्या सहनशक्तीला दुर्बलता समजली जात आहे.

काश्मीरला भारतापासून वेगळी करेल अशी कोणतीही ताकद जगात नाही. परंतु, ते आपल्याकडे ठेवण्यासाठी किती बळी जाणार हा प्रश्न आहे. एखाद्या राष्ट्रापासून वेगळे होणे ही तेथील लोकांची मानसिक युती आहे. त्यामुळे तेथील लोकांमध्ये जोपर्यंत ही भावना निर्माण होणार नाही तोपर्यंत काश्मीर हा भारताचा अविभाज्य भाग आहे, असेही ते म्हणाले.

काश्मीर हे भारताचे डोके आहे. त्याचा एक लचका चीन तोडत आहे आणि दुसरा लचका हा पाकिस्तान तोडत आहे. हल्ले होतात तेव्हाच आम्ही एकत्र येतो. बांग्लादेश स्वतंत्र झाले त्यावेळेसच काश्मीरचा प्रश्न निकाली लागला असता. चुका लष्कराकडून घडत नसून, राजकारण्यांकडून घडत आहेत.

भारतीय सैन्यामुळे आज देश एकसंध आहे. काश्मीरमधून आज ज्या नद्या वाहत आहेत त्या पाकिस्तानला सुजलाम-सुफलाम बनवत आहेत. काश्मीर स्वतंत्र देश व्हावा, ही अमेरिकेची कुटनिती आहे.

**सक्षम नेतृत्वाची गरज**

सीमेपलीकडून होणारी घुसखोरी थांबवायला आणि दहशतवाद नष्ट करण्यासाठी सामर्थ्यवान शासन आणि सक्षम नेतृत्व हवे. जम्मू काश्मीरमधील तरुण सीआरपीएफ, सैन्याच्या जवानांवर दगडफेक करतात. अफवा पसरवून बंद पुकारतात. जिहादी कारखाने युवकांना पैसा पुरवितात. पाकिस्तान येथे दहशतवादाची शाळा चालविते. मात्र तिथले राज्यकर्ते या कारवाया विरोधात कारवाई न करता समर्थनच करतात. हे थांबविण्याची आज गरज आहे.

१९८० पासून काश्मीरमध्ये छुप्या युद्ध रचनेला सुरुवात झाली. ते आजही सुरु आहे. जम्मू काश्मीर समस्येचे मूळ हे ज्या काश्मीरखोऱ्यात आहे. या खोऱ्यामध्ये राहणारे लोक हे पाकधार्जिणे आहेत. येथील लोकांना भारताशी जोडून घेण्याची गरज आहे. जिहादच्या यंत्रणा सज्ज असून कोणत्याही क्षणी दगडफेकीच्या घटना, अफवा पसरविण्यामध्ये आयएसआय त्यांना मदत करते. येथील ८० टक्के नागरिकांना भारतापासून वेगळे होण्याची इच्छा नाही. काश्मीरमध्ये कुशासन आणि भ्रष्टाचार प्रचंड आहे.

## जम्मू-काश्मीर वर राष्ट्रीय आपत्ती:अभुतपुर्व लष्करी मदतकार्यांमुळे परिस्थिती काबुमध्ये

### २५० हून अधिक लोकांचा बळी

गतवर्षी उत्तराखंडमधील केदारनाथ, गौरीकुंड आदी ठिकाणी जसा प्रलय आला होता , तसाच प्रकार यावर्षी जम्मू-काश्मीरमध्ये घडला . राज्यात पूरस्थिती गंभीर असल्याची दखल घेऊन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी पूरग्रस्त भागांची हवाई पाहणी केली आणि हे 'राष्ट्रीय संकट' असल्याचे घोषीत केले. पूरग्रस्तांना मदत तसेच त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी राज्य सरकारला अतिरिक्त एक हजार कोटी रुपये देण्यात येतील. राज्यातील पूरस्थितीची योग्य रीतीने छाननी झाल्यानंतर आवश्यकता भासल्यास आणखीही मदत निश्चितपणे दिली जाईल, असेही आश्वासन त्यांनी दिले. राज्यात आलेल्या पुराने आत्तापर्यंत २५०

हून अधिक लोकांचा बळी घेतला आहे. शेकडो जनावरेही पुरात वाहून गेली आहेत.

पाकव्याप्त काश्मीरलाही पुराचा प्रचंड तडाखा बसला असून मानवतावादी भूमिका घेऊन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बचावकार्यासाठी सर्वतोपरीने पाकिस्तानला सहकार्य करण्याचे जाहीर केले आहे. 'जमात-उद-दावा' या दहशतवादी संघटनेचा म्होरक्या असलेल्या हाफिजने पाकिस्तानात आलेल्या पूराचे निमित्त करून भारताच्या नावाने पुन्हा एकदा शंख केला आहे. 'भारताने कोणतीही पूर्वसूचना न देता काश्मीरमधील धरणांचे पाणी पाकिस्तानातील नद्यांमध्ये सोडले. त्यामुळेच २०० निरपराधांचे प्राण गेले', असा आरोप हाफिजने लगावला.

**लष्करी कॅण्टोनमेण्ट पाण्याखाली तरीही मदतकार्य सुरु**

श्रीनगर शहरास पुराचा मोठा तडाखा बसला असून पुराच्या पाण्याने अनेक ठिकाणी रस्त्यांची हानी झाली . ठिकठिकाणची दूरसंचार यंत्रणा विस्कळीत झाली असून शहरातील लष्करी कॅण्टोनमेण्ट, सचिवालय तसेच उच्च न्यायालयाच्या इमारतींची पुरामुळे मोठी हानी झाली . पूरस्थितीचा मुकाबला करण्यासाठी भारतीय हवाई दलाने २९ विमाने आणि हेलिकॉप्टर्स तैनात केली. आतापर्यंत लष्कराने १२,५०० हजार लोकांना सुरक्षित स्थळी हलविले . अजूनही काही भागांतील संपर्क खंडित झाल्यामुळे लोक अडकले असून त्यांच्या सुटकेसाठी तातडीचे प्रयत्न सुरु झाले. मुसळधार पाऊस, खराब हवामान आणि पूरस्थिती यामुळे जम्मू ते श्रीनगरला जोडणारा ३०० किलोमीटर लांबीचा राष्ट्रीय महामार्ग चार दिवस बंद पडला होता.जम्मू परिसरात अनेक ठिकाणी रस्ते वाहतूक बंद पडल्यामुळे सुमारे तीन हजारांहून अधिक पर्यटक आणि अन्य वाहनांचा खोळंबा झाला होता.

बचाव कार्य युद्धपातळीवर सुरू असून लष्कराचे जवान तसेच इतर बचाव पथके आपल्या प्राणांची बाजी लावून आपद्ग्रस्त जनतेला सुखरूप ठिकाणी हलवण्यासाठी प्रयत्नांची शिकस्त केली. वाईट हवामानामुळे विमानोड्डाणे रद्द करावी लागली आहेत. जवळजवळ २५०० गावे पाण्याच्या विळख्यात सापडली .

तर ४०० गावांना जलसमाधी मिळाली आहे. दुथडी भरून वाहणार्या नद्यांच्या प्रवाहात जवळजवळ पन्नास पूल वाहून गेले, घरेदारे पाण्याखाली गेली, हजारो कि. मी. चे रस्ते उखडले गेले. सात हजार घरे पूर्णपणे उद्ध्वस्त झाली आहे.जीवित, सांपत्तिक हानीचा आत्ताचा जो प्राथमिक अंदाज आहे .

**<u>आपत्तीच्यावेळी पंतप्रधानांची भेट</u>**

जम्मूहून श्रीनगरकडे जाणारे सर्व महामार्ग, पूल तुटल्यामुळे, या राज्याचा रस्तेमार्गाने उर्वरित भारताशी तसेच दूरसंचार यंत्रणा निकामी झाल्यामुळेही संपर्कही तुटला होता. मोठ्या भागातील वीजपुरवठा खंडित झाला आणि तेथे मदत पोहोचविण्यास राज्य शासनाची तोकडी पडलेली यंत्रणा आणि राज्याचे हजारो कोटी रुपयांचे नुकसान हे या राज्याचे चित्र होते. या आपत्तीची तातडीने दखल घेत, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आधी गृहमंत्री राजनाथसिंह यांना राज्यातील आपत्तीचा आढावा घेण्यासाठी पाठविले. त्यांनी संपूर्ण स्थितीचे निरीक्षण केल्यानंतर त्यांना या तांडवाची कल्पना आली आणि त्यानंतर तातडीने अकराशे कोटी रुपयांची मदत मोदी सरकारने जाहीर केली. स्वत: पंतप्रधान जम्मू-काश्मीरमध्ये दाखल झाले. त्यांनीही हवाई निरीक्षण केले आणि मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांच्यासह राज्यातील वरिष्ठ अधिकार्यांसोबत चर्चा केली. त्यानंतर आणखी एक हजार रुपयांची मदत राष्ट्रीय आपत्तिसदृश घटना म्हणून घोषित केली. जम्मू-काश्मीरच्या इतिहासात अशा आपत्तीच्या वेळी स्वत: पंतप्रधानांनी भेट देण्याची ही पहिलीच वेळ आहे.

लष्कर पूरग्रस्तांच्या मदतीसाठी तैनात करण्यात आलेले आहे. खुद्द राजधानी श्रीनगरच्या अनेक भागांत रस्ते पाण्याखाली होते. विमानतळ रस्त्याच्या परिसरातही रेड अलर्ट जारी करण्यात आला होता. पूरग्रस्तांना वेळेत मदत पुरवणे आणि त्यांना सुरक्षित ठिकाणी हलवणे तसे सोपे नव्हते. या लोकांना आसरा देण्यासाठी पुरेशी सुरक्षित ठिकाणे, त्यामुळे तंबूंमधून त्यांची सोय करावी लागली. त्यासाठी पंचवीस हजार तंबू लागले.

**<u>युद्धपातळीवर मदतकार्य हाती घेतले</u>**

सर्व राज्ये समान आहेत आणि ही राष्ट्रीय आपत्ती आहे, असे समजूनच आमची वाटचाल राहील, याचे दर्शन मोदींनी घडविले. त्यांनी श्रीनगरमध्ये असतानाच, पंत प्रधान निधीतून कंबल खरेदी करण्यासाठी पाच कोटी रुपयांची तत्काळ तरतूद केली. जम्मू-काश्मीर भागात रात्रीच्या वेळी प्रचंड थंडी असते. यावेळी तर तेथे वातावरण थंड असतानाच पाऊस आणि पुराच्या थैमानामुळे परिस्थिती अधिकच बिकट झाली आहे. मोदींनी लगेच लष्कर आणि सीमा सुरक्षा दलांना ५ हजार तंबू उभारण्याचे आदेश दिले. सोबतच प्रत्येक मृतकाच्या वारसाला दोन लाख आणि गंभीर जखमीला पंतप्रधान निधीतून ५० हजार रुपयांची मदत घोषित केली. देशातील विविध दूध उत्पादक संघांकडून ५०० टन दूध बालकांसाठी आली.

अन्नधान्य, विविध रोगप्रतिबंधक औषधींचा साठा ही सर्व रसद राज्याच्या विविध भागात येण्यास सुरवात झाली आहे. या कामासाठी हर्क्युलस सी-१३० जातीची महाकाय विमाने, सोबतच आयएल-७८, गजराज ही माल आणि शेकडो सैनिक एकाच वेळी वाहून नेणारी विमाने दिमतीला देण्यात आली.

पुराच्या पाण्यात अडकल्यांना बाहेर काढण्यासाठी तब्बल २२ हेलिकॉप्टर्सची व्यवस्था करण्यात आली. लष्कराच्या ३५० च्या वर तुकड्या कार्यरत करण्यात आल्या. बदामीबाग येथील लष्कराचे कंटोनमेंट पाण्याखाली आहे. दोन जवान मदतकार्य करताना वाहून गेले, पण पुढे बचावले. लष्कर प्रमुख जनरल सुहाग यांनी सगळ्यांना वाचवेल्या शिवाय कंटोनमेंटमध्ये परत जाणार नाही असे सांगितले आहे. तुटलेले पूल तातडीने दुरुस्त करण्यासाठी मिलिटरी इंजिनीअर्सना तातडीने पाचारण करण्यात आले. त्यांनी अवघ्या २४ तासांत अनेक नद्यांवर नविन पुल बांधले. हे पूल कार्यरत झाल्यामुळे तातडीने मोठ्या प्रमाणात पीडितांना रसद पोहोचविण्याची व्यवस्था होऊ शकली, दूरसंचार यंत्रणा सुरू करण्यासाठी अभियंते आणि तंत्रज्ञांची मोठी चमू पाठविण्यात आली.

पूरग्रस्तांच्या मदतीसाठी लष्कराने राहण्याचे तंबू, ब्लँकेट्स इत्यादींचे वितरण

केले. 'लष्कराने पूरग्रस्त भागात तेवीस हजार लीटर पाणी आणि ६०० किलो बिस्किटे वाटली. लष्कराची ६० वैद्यकीय पथके पूरग्रस्त भागात तैनात करण्यात आली आहे. बचावकार्याला अधिक वेग यावा म्हणून ४५ हॅलिकॉप्टर्स आणि विमाने राज्याच्या विविध भागात मदत पोहोचवी आहेत. केंद्र सरकारतर्फे ८५ टन औषधांचा पूरवठा जम्मू आणि काश्मीरला करण्यात आला आहे. १६ मदत शिबिरे उभारली आहेत. नौदलाच्या जवानांनी श्रीनगर-सोपोर महामार्गावर अडकलेल्या २०० नागरिकांची सुटका केली.

महाराष्ट्र आणि गुजरातमधून ५०० बोटी मदतकार्यासाठी विशेष विमानाने पाठविण्यात आल्या. राष्ट्रीय आपत्ती निवारण चमूच्या (एनडीआरएफ) जवानांनाही मोठ्या संख्येत तैनात करण्यात आले. पुराच्या पाण्यात अडकलेल्या लोकांना सुरक्षितपणे बाहेर काढण्यासाठी हेलिकॉप्टर्स दिवसभर घिरट्या घालीत होते.

आतापर्यंत शेकडो लोकांना वायुसेनेने बाहेर काढले. विमानतळ, इस्पितळांचा मार्ग पुरामुळे बंद झाला. तेथे रस्त्यांवर बोटी फिरत होत्या आणि पीडितांना मदत करीत होत्या. मोठ्या संख्येत पर्यटक अनेक ठिकाणी अडकून पडले होते. त्यांना बाहेर काढण्यासाठी युद्धपातळीवर मदतकार्य हाती घेण्यात आले. वैष्णोदेवी आणि त्यापुढील रेल्वे वाहतूक पूर्णबंद बंद झाली होती.

**<u>संकटाचा सामना लष्कराने अत्यंत प्रभावीरीत्या केला</u>**

उत्तराखंडमध्ये अतिवृष्टी झाली तेव्हा आलेल्या संकटाचा सामना लष्कर आणि हवाई दलाने अत्यंत प्रभावीरीत्या केला. केदारनाथच्या यात्रेकरूंना ज्या प्रकारे त्यांनी मदत केली त्याला तोड नव्हती. काश्मिरी जनतेच्या मदतीसाठीही लष्कर आणि अन्य यंत्रणांनी प्रयत्नांची शिकस्त करणे अपेक्षित आहे.

देशावर ज्या ज्या वेळी राष्ट्रीय आपत्ती आली, त्या वेळी मदतीसाठी तातडीने धावून जाण्याचे राष्ट्रीय कर्तव्य लष्कर, वायुसेनेने चोख बजावले आहे. आपल्या

प्राणाची पर्वा न करता, पीडितांच्या मदतीसाठी जवान सदैव तत्पर असतात. त्याची प्रचीती उत्तराखंडमधील आलेल्या भीषण आपत्तीच्या वेळी केवळ भारतानेच नव्हे, तर संपूर्ण जगाने अनुभवली. त्या वेळी बचावकार्य करताना पाच जवानांना शहीद व्हावे लागले. यावेळीही संपूर्ण मदतकार्य लष्करकेंद्रित झाले आहे, हे स्पष्टच आहे.या सर्व आपत्तींवर तातडीने मात करण्यासाठी केंद्र, राज्याच्या खांद्याला खांदा लावून काम करण्यासाठी तयार असल्याची ग्वाही पंतप्रधानांनी दिल्यामुळे या राज्यातील जनतेला मोठा दिलासा मिळाला आहे. सक्षम, संवेदनशील पंतप्रधान असला की, तो किती तातडीने उपाययोजना करू शकतो, याचा वस्तुपाठच मोदींनी घालून दिला आहे. राज्याला जोडणारे तीनही महामार्ग पूर्णपणे खराब झाले आहेत. मनाली हा लेहकरता एकमेव मार्ग उपलब्ध आहे. बॉर्डर रोड ऑर्गनायझेशन हे महामार्ग वाहतूकयोग्य होण्यासाठी किमान सात दिवस लागतील. दूरसंचार यंत्रणा पूर्ववत करण्यासाठी युद्धस्तरावर प्रयत्न हाती घेण्यात आले आहेत.संततधार पावसामुळे स्थगित झालेली वैष्णोदेवी यात्रा पूर्ववत झाली आहे.

या पुरामुळे राज्यातील बहुतेक वीज प्रकल्पांना झटका बसला आहे. पाणीयोजना प्रभावित झाल्या आहेत. जवळजवळ साठ टक्के पाणीप्रकल्पांना झटका बसल्याचा अंदाज आहे. दूरसंचार व्यवस्था कोलमडली आहे. हे सगळे पुन्हा उभारण्याचे मोठे आव्हान सरकारपुढे आहे.

## पाक धार्जिण्या नेत्यांमुळे जम्मू-काश्मीरमध्ये हिंसाचार वाढण्याची शक्यता

## मुख्यमंत्री सईदवर लगाम घाला नाही तर सरकार बरखास्त करा

पीडीपीचे सरकार आल्यापासून फुटीरतावाद्यांना 'अच्छे दिन' आले आहेत. कारण, देशाच्या विरोधात युद्ध पुकारणारा फुटीरतावादी मसरत आलम याच्या सुटकेनंतर आता मुख्यमंत्री सईद यांनी आशिक हुसेन फक्तू या फुटीर नेत्याला सोडण्याच्या हालचाली सुरू केल्या . मुख्यमंत्री सईद यांनी आपल्या पदाची शपथ

घेतल्यानंतर लगेच जी भीषण वक्तव्ये केली ती धक्कादायक आहेत. जम्मू-काश्मिरातील निवडणुका पाकिस्तान, दहशतवादी संघटना आणि फुटीरतावादी हुर्रियत परिषदेच्या नेत्यांनी दिलेल्या सहकार्यांमुळेच यशस्वी होऊ शकल्या, असे विधान त्यांनी केले. हे विधान सहज जाता जाता नाही, तर या विधानाचे तपशीलवार विश्लेषण करून त्यांनी या सहकार्याबद्दल पाकिस्तानचे आणि दहशतवादी संघटनांचे आभारही मानले आहेत.

**<u>सुप्रीम कोर्टाच्या अफझलला फाशी देण्याच्या निर्णयाची खिल्ली</u>**

सईद दर दिवशी देशाचा रक्तदाब वाढवीत आहे. जम्मू संसदेवर हल्ला चढविणारा अफझल गुरूला देशाच्या न्यायव्यवस्थेने फाशीची शिक्षा सुनावली. मुफ्तींना तिहारच्या तुरुंगात गाडलेला दहशतवादी अफझल गुरुचा मृतदेह काश्मिरात नेऊन त्यावर मजार उभारायची आहे. जम्मू-काश्मीरमध्ये कायदा-सुव्यवस्थेला धक्का पोहोचवण्याचे प्रयत्न सुरू असल्याचे गोपनीय अहवाल मिळाल्यामुळे अफझलचा मृतदेह त्याच्या नातलगांना देण्याऐवजी सरकारनेच दिल्लीच्या तिहार जेल परिसरात त्याच्यावर सरकारी खर्चाने अंत्यसंस्कार केले होते. हे माहीत असूनही पीडीपीच्या राजा मंजूर अहमद, मोहम्मद अब्बास वानी, दिलावर वीर, अडव्होकेट मोहम्मद युसुफ, एजाझ अहमद मीर, नूर मोहम्मद शेख या नेत्यांनी अफझल गुरुचा मृतदेह ताब्यात देण्याची मागणी केली . जम्मू-काश्मीरमध्ये सत्तेवर आल्यानंतर लोकप्रतिनिधी असूनही पीडीपी नेत्यांनी सुप्रीम कोर्टाच्या अफझलला फाशी देण्याच्या निर्णयाचीच खिल्ली उडवली आहे.

भारताच्या पवित्र संसदेवर हल्ला करण्याचे महापातक, आपल्या साथीदारांसमवेत करणार्या या देशद्रोहीला अवास्तव महत्व देऊन, त्याच्या अवशेषांवर एखादे स्मारक बांधून त्या गुन्हेगाराचे उदात्तीकरण करण्याचे व त्याचे महत्व अकारण वाढवून त्याला हुतात्मापण बहाल करण्याची ही हीन कृती भारताने कदापि मान्य करू नये.

**<u>मसरत आलम भट २०१० मधल्या काश्मिर दंगलीचा सुत्रधार</u>**

मसरत आलम भट या काश्मीर मुस्लीम लीगच्या अध्यक्षाला तुरुंगातून सोडवून त्याच्या घरी सुखरूप पोहोचवून मुफ्तींनी देशद्रोही क्रुत्य केले आहे. २०१०मध्ये त्याने काश्मिरात घडवून आणलेल्या दंगलीत ११२ जण ठार झाले, तर ४५०० सीआरपीएफ़ जवान, पोलीस त्यात जखमी झाले.सुरक्षा यंत्रणावर हल्ले चढविण्याच्या अनेक योजना आखण्याचा व त्या अमलात आणण्याचा आरोप त्याच्यावर आहे. सार्वजनिक सुरक्षा कायद्याखाली त्याला सहा वेळा अटक झाली असून, तो बराच उशिरा व पोलिसांची भरपूर दमछाक करून तुरुंगात डांबला गेला आहे. १८ आॅक्टोबर २०१० पासून तुरुंगात असलेल्या या मसरतला मुफ्तींच्या सरकारने निर्दोष सोडून त्याच्या श्रीनगरातील घरी सुखरूप पोहचविण्याची कामगिरी आता केली आहे.मसरत आलम भटला लगेच पुन्हा तुरुंगात टाकले पाहीजे.

**हुर्रियत कॉन्फरन्सच्या सईद अली शाह गिलानी यांचे प्रक्षोभक वक्तव्य**

य़ाच दरम्यान दिल्लीमध्ये पाक उच्चायुक्त अब्दुल बासीत यांनी फुटीरतावादी नेते गिलानी यांची भेट घेतली. पाकिस्तानचे उच्चायुक्त अब्दुल बासित यांची भेट घेणारे हुर्रियत कॉन्फरन्सच्या जहाल गटाचे नेते सईद अली शाह गिलानी यांनी पुन्हा एकदा प्रक्षोभक वक्तव्य केले , जम्मू-काश्मीर हे भारताचे अंगच नाही. हा एक वादग्रस्त प्रदेश आहे आणि भारताने ही सत्यता मान्य करायलाच हवी, असे म्हटले आहे.

फुटीरतावादी नेता मसरत आलमच्या सुटकेवरून देशभरात राजकीय वादळ उठले असताना, गिलानी म्हणाले की, मसरतवरील सर्व आरोप खोटे आणि निराधार आहेत. त्याची मुक्तता हा फार मोठा विषय नाही. त्याला न्यायालयाने मुक्त केले आहे. यापूर्वीही त्याला अनेकदा जामीन मिळाला आहे. न्यायालयाने त्याच्यावरील सर्व आरोप आधीच खारीज केले आहेत. त्याला मी चांगल्या प्रकारे ओळखतो. तो चांगला माणूस आहे. सईद अली शाह गिलानीना पब्लिक सेफ्टी अक्टअंतर्गत व त्यांचा वयाचा विचार न करता पुन्हा तुरुंगात टाकले पाहीजे.

**फक्तूची सुटका झाल्यास दहशतवाद वाढण्याचा धोका**

जम्मू-काश्मीरमध्ये फुटीरतावादी नेते मसरत आलम याच्या सुटकेच्या मुद्यावरून गदारोळ सुरुच आहे. या दरम्यान पीडीपी सरकारने 22 वर्षांपासून तुरुंगात कैद असलेल्या आणि हत्यांचा आरोप असलेल्या दहशतवादी डॉ. मोहंमद कासीम फक्टुसह इतर 800 "राजकीय'( दहशतवादी???) कैद्यांना सोडण्याची तयारी सुरू केली आहे. मुफ्तींच्या या कारभाराविषयी सुरक्षा दलांनी तीव्र चिंता व्यक्त केली आहे. आलमनंतर फक्तूचीही सुटका झाल्यास खोऱ्यातील वातावरण चिघळण्याचा व दहशतवादाची व्याप्ती वाढण्याचा धोका आहे. फक्तू हा जमियत-अल-मुजाहिदीन या इस्लामी संघटनेचा एकेकाळचा टॉप कमांडर आहे. मानवाधिकार कार्यकर्ता एच. एन. वांच्छू यांच्या हत्येप्रकरणी त्याला जन्मठेपेची शिक्षा झाली आहे. फुटिरतावादी महिलेशी विवाह केलेल्या फक्तूचे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित आहे. मुख्यमंत्री मुफ्ती मोहंमद सईद यांनी 2010 मध्ये झालेल्या दगडफेकीनंतर तुरुंगात कैद असणारे आणि ज्यांची सुटका करता येईल अशा फकटूसह ३५ कैद्यांची फाईल मागवली . त्यांना जेकेएलएफ, हुर्रियतचा गिलानी गट, मीरवाइज गट, शब्बीर शाहसह इतर गटांचे नेते यांचा पाठींबा आहे. पब्लिक सेफ्टी ॲक्टअंतर्गत हे ३५ जण तुरुंगात कैद आहेत. यादरम्यान, मसरत आलमने पुन्हा विखारी वक्तव्य केले आहे. ते म्हणाले की, ‘बलिदान वाया जाणार नाही. आम्ही स्वातंत्र्य मिळवूनच दम घेऊ.’राष्ट्रद्रोहासह अनेक गंभीर गुन्ह्यांमध्ये हवा असलेल्या मसरतला पकडण्यासाठी दहा लाखांचे बक्षीसही जाहीर केले होते. अशा देशविघातक गुन्हेगाराची राजकीय कैदी म्हणून मुक्तता करण्याचे धाडस दाखवणारे सईद सरकार कोणत्या मानसिकतेचे आहे, हेच दिसून येते.

**सईद पाकिस्तानधार्जिणे नेते**

हा सारा घटनाक्रम आचंबित करणारा आहे. राष्ट्रप्रेमी भारतीय नागरिकाला अस्वस्थ करणारा आहे .यापूर्वी यशस्वीपणे पार पडलेल्या निवडणुकांबद्दल

पाकिस्तानचे आभार कोणी मानले होते काय? भारतातील एका राज्यात होणाऱ्या निवडणुकांशी इतर देशांचा संबंधच काय हा साधा प्रश्न आहे. सईद यांनी आपल्या विधानांनी सारा देश अस्वस्थ करून ठेवला आहे. जम्मू-काश्मिरात झालेल्या सत्तांतरामुळे तेथे काही चांगले घडू शकेल, या आशेवरच पाणी फेरले गेले आहे. सईद यांच्यासारख्या मनोवृत्तीच्या नेत्यांकडे राज्याची सूत्रे गेली असल्याने त्या राज्याच्या भविष्यात पुढे काय वाढून ठेवले आहे, याची कल्पना करवत नाही.

हेच सईद व्ही. पी. सिंह पंतप्रधान असतानाच्या काळात देशाचे गृहमंत्री होते. मुफ्ती मोहम्मद सईद यांच्या मुलीचे, म्हणजे रुबिया सय्यद मुफ्ती यांचे अपहरण झाले होते. ते अपहरण यानी स्वत:च्या संकुचित राजकारणासाठी घडवून आणले होते .तिच्या सुटकेच्या बदल्यात या महाशयांनी पाच कडव्या दहशतवाद्यांना सोडून दिले होते. यामुळे मुफ्ती महाशय राज्याला कुठे घेऊन जाणार, हे सहज लक्षात यावे. भारताने साऱ्या देशाची सुरक्षा आणि सुरक्षाविषयक गुपिते गृहमंत्री म्हणून त्यांच्या हाती विश्वासाने सोपवली होती; परंतु त्यांनी आपले खायचे दात पुन्हा दाखवले आहेत. १६ वर्षांपूर्वी देशाचे गृहमंत्रिपद आणि दहा वर्षांपूर्वी जम्मू-काश्मीरचे मुख्यमंत्रिपद भूषवलेली व्यक्ती एवढी अपरिपक्व कशी काय वागू शकते? सईद यांच्यासारख्या पाकधार्जिण्या नेत्यांमुळेच जम्मू-काश्मीरची समस्या अधिक गुंतागुंतीची बनते. अशी पाकधार्जिणी विचारसरणी बाळगणाऱ्यांच्याच हातात पुन्हा या संवेदनशील राज्याची सूत्रे जावीत, यासारखे दुर्दैव नाही.

**राज्य देशाच्या हिताचा विचार नाही**

जम्मू-काश्मीरचे मुख्यमंत्री झालेले मुफ्ती मोहम्मद सईद हे भारतीय नागरिक आहेत की पाकिस्तानी, असा प्रश्न उपस्थित करावा लागत आहे. जाणीवपूर्वक ते ही कृती करीत आहेत. भारतीय जनता पार्टीने तीव्र स्वरूपाचा आक्षेप घेतल्यानंतरही सईद यांचे बरळणे सुरूच असल्याने, ते सगळे काही समजून उमजूनच बोलत आहेत, हे स्पष्ट आहे. जम्मू-काश्मीरच्या जनतेने आपल्याला

निवडून दिले आहे, त्यामुळे आधी प्रदेशाचा विकास करावा, राज्याचे हित बघावे, असा विचार न करता ते आपली राजकीय पोळी शेकण्याचा आणि जनाधार आणखी मजबूत करण्याचा प्रयत्न करीत आहेत. जम्मू-काश्मीरच्या राजकारणातील त्यांचे जे प्रतिस्पर्धी आहेत, त्यांना मागे ढकलण्यासाठीच सईद यांनी पावले उचलण्यास प्रारंभ केला आहे. राज्याचे आणि देशाचे हित त्यांच्या ताळेबंदात कुठेच दिसत नाही. यामुळे स्वत:चा जीव धोक्यात घालून देशाच्या सीमेचे अन् काश्मिरातील जनतेचे रक्षण करणार्या आमच्या शूर जवानांचे मनोधैर्य खच्ची होऊ शकते.

**मुख्यमंत्री सईदना लगाम घाला**

जनमताचा आदर करण्याच्या प्रामाणिक उद्देशाने भाजपाने पीडीपीशी समझोता केला आणि मुफ्ती मोहम्मद सईद मुख्यमंत्री झाले. काश्मीर खोर्यातील जनतेची आर्थिक स्थिती सुधारली पाहिजे, काश्मीर खोर्याचा विकास झाला पाहिजे, तेथील जनता राष्ट्राच्या मुख्य प्रवाहात सहभागी झाली पाहिजे, हे भाजपाने आधीच म्हटले होते. भाजपाशिवाय कोणत्याही पक्षाने विकासाच्या मुद्याला हात घातला नव्हता- ना कॉंग्रेसने, ना पीडीपीने. नॅशनल कॉन्फरन्स तर आधी सत्तेत होतीच. कुणीच कधी काश्मीरची वा तेथील जनतेची चिंता वाहिली नाही. सगळ्यांनी आपली राजकीय शक्ती वाढविण्यातच वेळ खर्ची घातला.पण आता भाजपा पण आपल्या प्रतिस्पर्ध्यांचा डाव ओळखण्यात अपयशी ठरल्याचे दिसते आहे.

गेल्या पंचवीस वर्षांच्या महत प्रयत्नानंतर काश्मीरमध्ये शांतता प्रस्थापित झाली आहे आणि जनतेची दहशतवाद्यांच्या विळख्यातून मुक्तता झाली आहे. आता घड्याळाचे काटे उलटे फिरवून मुफ्ती आणि त्यांची सैतानी टोळी काश्मिरी जनतेला पुन्हा दहशतवाद्यांच्या तावडीत देणार असेल, तर तो भयंकर राष्ट्रीय गुन्हा ठरेल. मुफ्तीजी, तुमच्या निष्ठा कुणाबरोबर आहेत, एकदा कळू द्या. आत्ताच सडेतोडपणे स्पष्ट शब्दांत अशा देशविरोधी मागण्या करणार्यांना

खडसावून सांगणे इष्ट राहील. देशहिताचा विचार ते लोक जर करीत नाहीत, तर दरवेळी बाकीच्यांनी त्यांना किती समजून घ्यायचे, याचाही विचार व्हायला हवा. भाजपसारख्या प्रखर राष्ट्रप्रेमी पक्षाकडून आता सारवासारव होता उपयोगी नाही. मुख्यमंत्री सईद यांना लगाम घालण्याचे काम भाजपला अधिक जबाबदारीने पार पाडावे लागणार आहे. वेळप्रसंगी जम्मू-काश्मिरातील सत्तेवर पाणी सोडण्याचे धारिष्ट्यही भाजपला दाखवावे लागेल.

## हुरियतच्या नेत्यांवर देशद्रोहाचा खटला चालवा

सत्तेवर आलेले जम्मू-काश्मीरमधील पीडीपी-भाजप यांचे आघाडी सरकार स्थिर होण्याच्या आत दहशतवादी रंग दाखवू लागले आहेत. मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतल्यानंतर 'शांततेत मतदान पार पडू दिल्याबद्दल' मुफ्ती महंमद सैद यांनी मानलेले आभार 'लष्करे तोयबा' चे बोलविते धनी विसरले असावे. नाही तर लागोपाठ दोन दिवस भीषण हल्ले करून दहशतवाद्यांनी जम्मूत रक्ताचे सडे घातले नसते.

आधी दहशतवाद्यांनी कथुआ जिल्ह्यातील पोलिस ठाण्यावर हल्ला चढविला. तेथे सहाजणांना ठार केले. लष्कराने अखेर हे दोन दहशतवादी ठार केले. शनिवारी, पुन्हा दोन दहशतवाद्यांनी सांबा जिल्ह्यात हल्ला चढविला. या हल्ल्यातले दोन्ही दहशतवादी ठार झाले. या हल्ल्यांनी राज्य आणि केंद्र सरकारपुढे आव्हान उभे केले आहे.

एकीकडे, पीडीपी सातत्याने 'लष्करी विशेषाधिकार कायदा' रद्द करण्याची मागणी करीत आहे. दुसरीकडे, काश्मीर पेटवणारा मसरत आलामसारखा दहशतवादी तुरुंगातून बाहेर येत आहे. दहशतवाद्यांच्या विरोधात खंबीर भूमिका घेण्याबाबत पीडीपीचा इतिहास फारसा उज्ज्वल नाही. काश्मिरात शांततेत मतदान होऊ दिले याचा अर्थ पाकिस्तानने हा विषय अजेंड्यावरून पुसून टाकला

असा होत नाही. अशावेळी, केंद्र सरकारला मुफ्ती महंमद सैद व त्यांची कन्या मेहबूबा यांना नियंत्रणात ठेवता येते का, यावरच काश्मीरची पुढची वाटचाल अवलंबून आहे.

## फुटीरतावाद्यांना गोंजारण्याची नीती कायम

पाकिस्तानने जम्मू-कश्मीरमधील जहाल फुटीरतावाद्यांना गोंजारण्याची दुष्ट नीती कायम ठेवली आहे. नवी दिल्लीतील पाकिस्तानचे उच्चायुक्त अब्दुल वसित यांनी 'पाकिस्तान डे' निमित्त मसरत आलम याला शाही खान्यासाठी दावत दिली. पाकिस्तानच्या या वर्तनाविरोधात देशभरात संताप व्यक्त होत आहे. या समारंभाला फुटीरतावादी अनेक नेते उपस्थित होते. यासीन मलिक याने तर 'पाकिस्तान डे' ला आपण गेली २२ वर्षे न चुकता हजर राहतो' अशी शेखी मिरवली. पाकिस्तानच्या राजदुताने निमंत्रण दिलेल्या शाही खान्याला तब्येत बरी नसल्याने मला जायला जमले नाही. पण माझ्या सहकार्यांना त्यासाठी धाडले आहे, असे मशरत आलम याने सांगितले. 'हुर्रीयत कॉन्फरन्स' चे अध्यक्ष मिरर्वेझ उमेर फारूख यांनी पाकिस्तानचे उच्चायुत अब्दुल बसित यांची भेट घेऊन प्रदीर्घ चर्चा केली.

## सर्व वादांवर चर्चेतूनच तोडगे निघतील : मोदी

राजधानीतील 'पाकिस्तान डे' च्या समारंभाला परराष्ट्र राज्यमंत्री व्ही. के. सिंग यांनी हजेरी लावली. पाकिस्तान दिनाच्या कार्यक्रमाला भारत सरकारच्या आदेशावरूनच हजेरी लावल्याचे स्पष्टीकरण व्ही. के. सिंग यांनी दिले. सरकारने या कार्यक्रमासाठी मला पाठविले. मी कार्यक्रमाला हजेरी लावली आणि दहा मिनिटांनी परत आलो, असे सिंग यांनी सांगितले.

गेल्या वर्षी 'हुर्रियत'च्या नेत्यांना पाकिस्तानचे उच्चायुक्त अब्दुल बसित यांनी आपल्या निवासस्थानी चर्चेसाठी बोलावले होते. त्यावरून भारताने पाकिस्तानशी चर्चा थांबवली होती. पाकिस्तानचे उच्चायुक्त अब्दुल बसित यांनी जम्मू-कश्मीरमधील फुटीरतावाद्यांना मेजवानीसाठी दावत दिल्यानंतर भारताने

नेहमीपणे कडक शब्दांत आपली भूमिका जाहीर केली.

हिंसाचार आणि दहशतवादापासून मुक्त असलेल्या वातावरणातील द्विपक्षीय चर्चेतूनच वादाच्या सार्या प्रश्नांवर तोडगे निघतील, याची मला खात्री आहे, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पाकिस्तानचे पंतप्रधान नवाझ शरीफ यांना पाठवलेल्या एका पत्रात म्हटले आहे. २३ मार्चला 'पाकिस्तान डे' साजरा झाला. त्यानिमित्त शुभेच्छा देण्यासाठी मोदी यांनी हे पत्र शरीफ यांना पाठवले आहे.

**पाकिस्तान चे चाळे**

पाकिस्तान दिवस साजरा करत त्या दिवशी काश्मीरमधील फुटीरतावादी हुरियत कॉन्फरन्सच्या नेत्यांनी म्हणे चर्चा केली. पाकिस्तानचा भारतातील उच्चायुक्त अब्दुल बासितना आपण भारतामध्ये पाकिस्तानचे प्रतिनिधी आहोत याचा विसर पडून आपण आयएसआयचे अधिकारी आहोत असा समज झाला असावा? उघड उघड भारतात हे महाशय काश्मीरमधल्या फुटीरतावादी गद्दारांशी भेटून चर्चा करतात. हे चालले तरी काय?

मुसलमानांसाठी पाकिस्तान या स्वतंत्र राष्ट्राची मागणी करणारा ठराव २३ मार्च १९४० रोजी लाहोर येथे करण्यात आला होता. हा दिवस पाकिस्तानात प्रजासत्ताक दिन म्हणून साजरा केला जातो. त्याला 'पाकिस्तान डे' असेही म्हटले जाते. मुळात भारतात पाकिस्तान दिवस साजरा करण्याचे औचित्य ते काय?

**पाकिस्तानला अद्दल घडवा**

देशद्रोहिंना थोडी संधी मिळाली की त्यांचे धाडस वाढतच जाते. बासितने पाकिस्तान दिवस साजरा करताना दावत दिली आणि त्यासाठी भारतातून फुटून निघण्याची दिवसरात्र कारस्थाने करणार्या हुरियत कॉन्फरन्सच्या देशद्रोही लोकांना बोलावले. गेल्या वर्षी भारत-पाकिस्तान सचिव पातळीवर चर्चा ठरलेली असताना अशाच प्रकारे पाकिस्तानच्या उच्चायुक्ताने हुरियतच्या फुटीर लोकांशी चर्चा केल्यामुळे भारताने ही सचिव पातळीवरची चर्चाच रद्द केली होती. तरीही या

वर्षी पुन्हा त्यांनी तोच उद्योग केला आहे. आता यांना चांगली अद्दलच घडविली पाहिजे.

दोनच दिवसांपूर्वी सलग दोन हल्ले काश्मीरमध्ये दहशतवाद्यांनी केले आहेत. त्या पार्श्वभूमीवर या असल्या चर्चा आणि त्यात शांततेची भाषा या लोकांच्या तोंडी शोभत नाही. पाकिस्तान उच्चायुक्त आणि हुरियत यांची सगळी चर्चा भारतापासून काश्मीरचा लचका कसा तोडायचा याच उद्देशासाठी आहे. असल्या चर्चा भारत सरकारच्या नाकावर टिच्चून दिल्लीत घडत असतील, तर त्यावर जालीम उपाय करण्याची गरज आहे.

पाकिस्तानची लढण्याची ही खुमखुमी तीन वेळा भारताने जिरवूनही, बांगला देश त्यांच्यापासून बाजूला झाला तरी अजून जिरलेली दिसत नाही. असंख्य प्रश्नांनी गांजलेले पाकिस्तानातील सरकार आपले अपयश झाकण्यासाठी नेहमीच संकट वाढले की भारताच्याविरोधात वातावरण तापविण्याचा हथकंडा वापरत आले आहे. आता फुटीरतावाद्यांशी भारताच्या राजधानीत चर्चा करणे या घडामोडीची गंभीर दखल घेण्याची गरज आहे.

**बासितना पाकिस्तानचा रस्ता दाखवा**

काश्मीरचे भारतात बिनशर्त विलीनीकरण झालेले आहे. भारतीय संसदेने काश्मीर हा भारताचा अविभाज्य घटक असल्याचा ठराव पास केलेला आहे. या पार्श्वभूमीवर कोणी जर काश्मीर भारतापासून तोडण्याचे मनसुबे मनात ठेवून उघड उघड या देशात येऊन देशाच्या राजधानीत चर्चा करत असतील, तर तो देशद्रोह समजला पाहिजे. इतिहासातील घोडचुकांचा गैरफायदा घेत हुरियत आता काश्मीरचा मुद्दा आंतरराष्ट्रीय मुद्दा असल्याचा कांगावा करण्याच्या प्रयत्नात आहेत. बासित येथे जर देशद्रोह्यांना फूस देत असतील, तर त्यांना पाकिस्तानचा रस्ता दाखविण्याची वेळ आली आहे.

**हुरियतच्या नेत्यांवर देशद्रोहाचा खटला चालवा**

काश्मीरची समस्या काश्मीरमध्ये नसून ती दिल्लीत आहे . काश्मीर प्रश्नाचा गुंता दिल्लीतील सोयीने राजकारण करणार्या भंपक राजकारण्यांनी वाढविलेला असेल तर आता दिल्लीच्या कणखर नेतृत्वानेच हा प्रश्न सोडविला पाहिजे. पंतप्रधान नरेंद्र मोदींची खरी कसोटी, ते पाकिस्तानच्या घडामोडींबाबत नेमकी काय भूमिका घेतात, यावरच लागेल. मोदी यांनी पाकिस्तानचा आगामी दौरा रद्द करावा. पाकिस्तानचे पंतप्रधान नवाझ शरीफ यांनी दहशतवादाशी लढावे लागत असल्याने विकासकामांकडे लक्ष देता येत नसल्याची खंत नुकतीच व्यक्त केली. जो पर्यंत दहशतवादी हल्ले थांबत नाही तो पर्यंत चर्चा करणे अयोग्य आहे. पाकिस्तानी उच्चायुक्ताला उघड उघड भेटून फुटीरतेची बिजे पेरणार्या हुरियतच्या लोकांना दिल्लीतच तातडीने अटक करून त्यांच्यावर देशद्रोहाचा खटला चालविला पाहिजे. शांतता, चर्चा, बोलणी, सामोपचार, तोडगा असे शब्द वापरून ही मंडळी उघड उघड भारताच्या विरोधी कारस्थाने आखत आहेत. ही कारस्थाने वेळीच उधळून लावली पाहिजेत!

## मुफ्ती महंमद सईद आणि फुटीरतावाद्यांचा आगीशी खेळ

**पाकिस्तान झिंदाबाद, पाकचा ध्वज फडकावणे, खोर्यातील नित्याचेच गैरप्रकार**

पाकिस्तानात आमचं नेहमी खुल्या दिलानं स्वागत केलं जातं. पण भारतात पाकिस्तानी कलाकारांना नेहमीच विरोध केला जातो. कारण, इथं पाकिस्तान हा आपला शत्रूच आहे हे लोकांच्या मनावर ठसवण्यासाठी त्यांचं ब्रेन वॉशिंग केलं जातं,' असं वादग्रस्त वक्तव्य अभिनेते नसीरुद्दीन शाह यांनी केलं आहे. नसीर यांच्या या वक्तव्याला पाकिस्तानी मीडियात सध्या प्रचंड प्रसिद्धी मिळत असून त्यावर उलटसुलट चर्चा सुरू आहे.

गेल्या काही दिवसांपासून काश्मीर खोरे सातत्यपूर्णपणे अधिक तापत आहे (तिथे हिंसाचार/दगडफ़ेक सुरु करायला कुठलेही निमित्य चालते?) फुटीरतावादी नेत्यांनी या आगीस भडकावण्याचे चोख काम केले आहे. सदर वातावरण अस्थिरच राहत त्यावर आपली छाप कशी राहील हेच पाहिले जात आहे. भारता

विरुध्द सतत गरळ ओकणारे अजून वेगळे काय करणार? अनेक सवलतींच्या नावाखाली या देशात पाय ताणून आरामात सुस्त, मस्तपैकी रहाता येत असल्याने यांची पिढय़ानपिढय़ा सुरु असलेली गुर्मी अधिकच बळकट होताना दिसत आहे. पाकिस्तान झिंदाबाद च्या घोषणा देणे, पाकचा ध्वज फडकावणे आदी खोर्यातील गैरप्रकार तर तसे नित्याचेच झाले आहेत. पण हे सर्व करणारे देशद्रोही भारत सोडण्यास काही तयार नाहीत; कारण ज्या देशाच्या झिंदाबादच्या घोषणा ते देत असतात त्यांची अर्थव्यवस्था केव्हाची कंगाल झाली आहे. हे ठाऊक असल्याने ते भारतातच आपली नाटके दाखवत थांबून आहेत. पाकला जाऊन उपाशी मरण्यापेक्षा भारताशी बेईमानी करण्यात यांना सुख मिळत आहे आणि हिच शिकवण ते दगडफ़ेक करणार्या युवकांना देत आहेत. कंगाल पाकिस्तानात काही दिवस राहून तर दाखवा. मग भारत कसा नंदनवन आहे हे तुम्हाला कळेल.

**दहशतवाद्यांची सुरक्षा भारतीय पोलिस का करतात**

देशवासियांच्या कर रुपी पैशांवर जगणारे ही हिंमत कधीच करणार नाहीत. या खोर्यामध्ये लष्कर आपले काम व्यवस्थित करत आहे. त्यांनी काय करावे, करू नये याबाबत फुटकळ सल्ले तेथील देशद्रोह्यांनी देऊ नये. अतिवृष्टीमुळे महापूर येऊ दे वा अन्य कोणतीही मदत देण्याची पाळी येऊ दे. लष्करावर, त्यांच्या गाडय़ांवर, हेलीकॉप्टरवर दगडफेक करत त्यांची नासधूस करणेच देशद्रोह्यांना चांगले वाटत आले आहे. त्यामुळे या देशद्रोह्यांना संकटसमयी मदत करायची की नाही? हे वेळीच ठरवणे अत्यावश्यक आहे. तीच मदत देशातील अन्य गरजूंच्या बिकट प्रसंगी वापरत येईल. याच गद्दारांवर सरकार ने १००० कोटी रुपये त्यांच्या सुरक्षेवर खर्च केले. दहशतवाद्यांची सुरक्षा कोणा पासुन करायची? सईद सत्तेत येताच, जम्मू-काश्मीर सरकारने पाच वर्षांनंतर गिलानीला रॅली काढण्याची परवानगी दिली होती. सुरक्षा जवानांविरुद्ध त्यावेळी सातत्याने होणार्या हल्ल्यांना मसरत आलम याचीच चिथावणी दिली होती.

त्यामुळेच त्याला तुरुंगात डांबण्यात आले होते. तुरुंगातून सुटलेल्या मसरत

आलमने श्रीनगर विमानतळापासून हैदरपुरा भागातील गिलानी यांच्या निवासस्थानापर्यंत रॅलीचे नेतृत्व केले. यावेळी आलमसह अन्य फुटीरतावाद्यांनी पाकिस्तान झिंदाबादच्या घोषणा दिल्या, तसेच अनेक समर्थकांच्या हाती पाकिस्तानचे झेंडे गौरवाने फडकत होते. या घटनेची देशभर तीव्र प्रतिक्रिया उमटली.

**मसरतचा उलटा दावा**

आपण कोणतेही बेकायदा कृत्य केले नसल्याचा दावा मसरत आलम याने केला. समर्थकांनी झेंडा फडकवला असला, तरी त्यात काही चुकीचे वाटत नाही. सभांमध्ये पाकिस्तानचा झेंडा फडकविणे हे काही नवीन नसून, १९४७ सालापासून हे प्रकार घडत आहेत.जम्मू-कश्मीरात पीडीपी-भाजपचे सरकार आहे, मात्र मुख्यमंत्री मुफ्ती महंमद सईद हे आपला ‘अजेंडा’ राबवीत आहेत. सईद यांनी दहशतवादी मशरतला तुरुंगातून सोडणे महागात पडले. विस्थापित पंडितांना पुन्हा कश्मीर खोर्यात आणून स्वतंत्र टाऊनशिप उभे करण्याचे धोरण एनडीए सरकारने आखले. स्वतंत्र नगराला खुद्द मुख्यमंत्री सईद यांचा विरोध आहे. त्यामुळे फुटीरवादी आणि अतिरेकी गटांचे फावले.

मशरत आलमला अखेर अटक झाली. मुळात या पाक एजंटास सोडले हीच चूक होती. त्याच्या सुटकेच्या विरोधात इतके काहूर का माजले होते ते मशरत आलमने जे कारनामे केले त्यावरून कळलेच असेल. कश्मीरच्या तुरुंगात मशरत आलमला ठेवले होते. मशरत आलमने कश्मीरात भारताविरोधी मोहीम चालवली. कश्मिरी तरुणांची डोकी भडकवून त्यांना हिंसाचारास प्रवृत्त केले. मशरत आलम हा पाकिस्तानचा एजंट आहे व आहेच. पाकिस्तानला जे हवे तेच तो कश्मीरच्या भूमीवर करीत होता. अशा देशद्रोह्याची सुटका करणे हाच मोठा देशद्रोह होता. भाजपचे राष्ट्रवादी विचारांचे सरकार सत्तेवर असताना मशरत आलमसारखे अतिरेकी सुटूच कसे शकतात?. मशरत आलमला सोडून एक प्रकारे पाकिस्तानच्याच हातात कोलीत देण्याचा प्रयत्न झाला. कारण इकडे मशरत

आलमची सुटका होताच तिकडे पाकिस्तानात '२६/११' हल्ल्याचा मास्टरमाईंड लखवी याची सुटका केली गेली. तो लखवीही भारताविरुद्ध गरळ ओकू लागला. मशरत आलमने सुटका होताच, 'छोट्या तुरुंगातून मोठ्या तुरुंगात आलो' ही भावना व्यक्त केली. म्हणजे कश्मीरला स्वातंत्र्य हवे. भारतात राहणे म्हणजे पारतंत्र्यात, म्हणजेच तुरुंगात राहण्यासारखे असल्याचे मत तो व्यक्त करतो. अशा माणसांना कायमचे ठेचणे हाच राष्ट्रीय सुरक्षेचा मार्ग आहे.

**हफीज सईद, यासिन मलिक, स्वामी अग्निवेश एकाच माळेचे मणी**

हुरियत नेत्यांना सीमेपलीकडून पैसादेखील मिळतो. पाकिस्तान दिनाच्या कार्यक्रमाला त्यांना सन्मानाने निमंत्रितसुद्धा केले जाते. यामुळे हुरियत नेत्यांना भारतात मूल्य नसले तरी भारतातील त्यांचे उपद्रवमूल्य त्यांची किंमत वाढवून जाते. जनता पक्ष आणि पीपल्स डेमॉक्रॅटिक पार्टी (पीडीपी) या दोन राजकीय धृवांचे आघाडी सरकार सत्तेवर आल्यानंतर काश्मीरमधील अदृश्य तणावाला थोडा उतार पडेल, असा अंदाज होता. प्रत्यक्षात, हा अदृश्य ताण दगडफेक, उपोषण, आंदोलन, उग्र वक्तव्ये आणि गोळीबार यांच्या रूपाने फसफसून वर येऊ लागला आहे. मसरत आलमला अटक झाल्यावर आणि न्यायालयाने सात दिवसांची पोलिस कोठडी दिल्यानंतर हुरियत कॉन्फरन्सचे नजरकैदेत असणारे म्होरके सय्यद अली शाह गिलानी यांनी काश्मीर बंदची हाक द्यावी, या बंदमध्ये हिंसाचार व्हावा आणि त्याचवेळी सीमेपलीकडे बेछूट बोलणारा हफीज सईद याने पाकिस्तानी लष्कराच्या काश्मिरातील 'जिहाद' ला पाठिंबा जाहीर करावा, ही सारी लक्षणे काही ठीक नाहीत.

हे कमी म्हणून की काय, काश्मिरी पंडितांच्या स्वतंत्र वसाहती करण्यास विरोध म्हणून यासिन मलिक याने ३० तासांचे उपोषण सुरू केले. प्रसिद्धीचे तंत्र अवगत असलेले स्वामी अग्निवेशही मलिकच्या मांडीला मांडी लावून बसले. दहशती नेत्यांना सोडले की, चर्चेसाठी अनुकूल वातावरण निर्माण होईल, हा राज्य सरकारचा ठोकताळा इतका चुकला आहे की, प्रदीर्घ काळानंतर प्रथमच

काश्मीरच्या रस्त्यांवर हिंस्र झालेली तरुणाई दिसू लागली. अखेर या हिंसक तरुणांवर गोळीबार करावाच लागला. त्यात एकाचा बळी गेला. दोन जखमी झाले. म्हणजे, काश्मीरमधील आगीत आणखी तेल पडले.

**केंद्र सरकारसमोर तिहेरी आव्हान**

'सारेच फुटीरतावादी पाकिस्तानी नाहीत. त्यातले अनेक हिंदुस्थानचे नागरिकही आहेत.' असे विधान आता मुफ्ती करीत आहेत. पण हे भारताचे नागरिक रस्त्यावर उतरल्यावर पाकिस्तानचा जयजयकार का करतात, याचे उत्तर मुफ्तींना द्यावे लागणार. आणि शत्रुदेशाचे ध्वज नाचवून मायदेशाचा धिक्कार केला जाणार असेल तर फौजांसमोर कठोर पावले टाकण्यावाचून दुसरा पर्याय तरी काय राहतो? सत्तेवर आल्या क्षणी काश्मिरातील विशेष सुरक्षा कायदा रद्द करा, अशी मागणी करणाऱ्या मुफ्ती यांना हा कायदा नसेल तर राज्य करणे कसे अशक्य होईल, याची एव्हाना कल्पना आली असेल. आता उन्हाळा वाढत जाईल, तशा सीमेवरून आत शिरण्यासाठी फटी शोधल्या जातील. काही महानगरांमध्ये हल्ले करण्याची कारस्थानेही नक्कीच शिजत असणार. अशावेळी, मुफ्ती यांचे सरकार दहशतवाद्यांना तुरुंगातून मुक्त करण्याचे खेळ करणार असेल, तर हे असले सरकार किती काळ चालवायचे, याचा विचार करावा लागेल. मुफ्ती यांनी चार पावले पुढे टाकायची आणि केंद्राने दटावल्यावर दोन पावले मागे घ्यायची, असे सतत चालले आहे. बरे, मुफ्ती यांची पावले काश्मिरी समाजाच्या हिताची नसून दहशती संघटनांचे लांगूलचालन करणारी आहेत. या संघटना पाकिस्तानच्या पाठिंब्याने मस्तवाल बनल्या आहेत. मुफ्तींचे सरकार टिकवायचे, दहशतवाद्यांना वेसण घालायची आणि पाकिस्तानला चबढब करू द्यायची नाही, असे तिहेरी आव्हान केंद्र सरकारसमोर उभे राहिले आहे.

फुटीरवादी हुरियत गटाचा नेता सईद अली शाह गिलानीला अद्याप नजरकैदेत घरातच ठेवले आहे. दरम्यान, श्रीनगरसह अनेक भागांत फुटीरवाद्यांकडून हिंसाचार सुरू आहे. दगडफेकीत पोलिसांसह १४ जण जखमी झाले. त्याचप्रमाणे

हुरियत नेता मिरवैझ उमर फारूख याने त्राल येथे रॅली काढण्याचा प्रयत्न केला. त्याला रोखल्यानंतरही हिंसाचार उसळला आहे. दगडफेकीत दोन पोलिसांसह १४ जण जखमी झाले. श्रीनगरसह कश्मीर खोर्यात सध्या तणाव असून, लष्कर आणि पोलीस बंदोबस्तात वाढ करण्यात आली आहे. २०१० प्रमाणे तणाव निर्माण करण्याचा फुटीरवाद्यांचा कट आहे.

**सर्वसामान्य काश्मिरी माणसाच्या दीनवाण्या आयुष्याचे काय?**

सर्वसामान्य काश्मिरी माणसाच्या दीनवाण्या आयुष्यांबाबत कुणीही बोलत नाही. निदर्शनांच्या दरम्यान, बंद राहिलेल्या शाळा-कॉलेजांबद्दल कुणीही बोलत नाही. झालेल्या प्रचंड व्यापारी नुकसानांबद्दल कुणीही बोलत नाही आणि त्याकाळात अर्धांग वायू झालेल्या बँका व सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेबाबतही कुणीही बोलत नाही. भारताने काश्मीरला, आंतरराष्ट्रीय वाद म्हणून स्वीकारावे यासाठी भाग पाडण्याच्या हताश प्रयत्नांचा भाग म्हणून, जिलानी आणि त्यांची माणसे ’निदर्शनांची कॅलेंडरे’ जारी करत असतात. काँग्रेस आणि नॅशनल कॉन्फरन्सच्या नेत्यांना केवळ माध्यमांकरता निवेदने जारी करण्याचेच काम शिल्लक राहते. त्यांच्या कुठलाही नेत्याने, ज्यांनी त्यांना सत्तेवर आणले त्यांच्यात मिसळण्याचे धैर्य दाखविलेले नाही. हुरियत, निदर्शक आणि हिंसक जमावाचे कुटुंबीय ह्यांना नुकसान-भरपाई करून देण्यास बाध्य केले पाहिजे.

पिपल्स-डेमॉक्रॅटिक-पार्टी ही फुटिरतावाद्यांचे मुखपत्र असल्यागत कार्यरत आहे. मुलाबाळांच्या शिक्षणाचा बोजवारा, खोर्यातील अर्थव्यवस्थेचा खेळखंडोबा आणि हजारो रोजमजुरांची दुर्दशा करत असणार्या फुटिरतावाद्यांना आव्हान देण्याची धमक त्यांच्यात नाही.

एका सर्वेक्षणानुसार २०१० मध्ये दगडफेकीमुळे, खोर्यातील व्यापारास सुमारे २१,००० कोटी रुपयांचे (४.५ अब्ज डॉलर्सचे) नुकसान झाले. जम्मूमधील व्यापारीही असे म्हणतात की श्रीनगरमधील व्यापारी संबंध तुटल्यामुळे त्यांचेही ७,१०० कोटी रुपयांचे (१.५ अब्ज डॉलर्सचे) नुकसान झाले. आर्थिकदृष्ट्या

मागासलेल्या एका राज्याला असले बंद कसे परवडतील?

## ३७० कलम आणि काश्मिर खोर्यातील भावनिक एकात्मता

काश्मीरवर हक्क दाखवण्याची आंतरिक उर्मी पाकिस्तानला स्वस्थ बसू देत नाही. त्यामुळेच पाकिस्तान, काश्मीर ताब्यात घेण्यासाठी भारताबरोबर वारंवार युद्धाची भाषा बोलत आहे.

३७० व्या कलमामुळे काश्मिरी जनतेचा खरेच फायदा झाला आहे का? यावर चर्चा करण्याची गरज आहे. चर्चा संविधानात नमूद ३७० व्या कलमाची असो की, महिलांच्या सशक्तीकरणाची. उद्‌देश एकच- नागरिकांमधील भेदभाव समाप्त व्हावा आणि भारतीयतत्वाबद्‌दल विश्वालस वाढावा. कलम ३७० जम्मू-काश्मीरच्या कोणत्याही नागरिकाला हे जाणीव करून देत नाही की, तो भारताचा नागरिक आहे. संसदेत कोणत्याही कायद्याला मंजुरी देताना, सर्वात आधी एक ओळ असते 'जम्मू-काश्मीर राज्य वगळून.' ज्या देशभक्त जवानांनी आपल्या प्राणाचे बलिदान देऊन या भारत देशाचे रक्षण केले, आजही जे जीव मुठीत घेऊन तेथे लढत आहेत, त्यांना या राज्यात एक इंचही जमीन खरेदी करण्याचा अधिकार नाही. संपूर्ण भारतात हे असे एकमेव राज्य आहे, जेथे सरकारी अधिकारी, मंत्र्यांच्या वाहनांवर दोन झेंडे लागलेले असतात. एक तिरंगा आणि दुसरा जम्मू-काश्मीरचा. केवळ या राज्यात कोणत्याही पाठ्‌यपुस्तकात राष्ट्रगीत छापले जात नाही. या सर्व बाबी राष्ट्रीय एकतेला मजबूत करणार्या आहेत का? या सर्व बाबी कोण बदलणार?

**<u>भारत मुर्दाबाद...</u>**

'अफझल तेरी याद में रो रही ये जमीं, रो रहा आसमॉ... अफझल के वारिस जिंदा है... आय अम अफझल, हँग मी टू इंडिया... वी ऑल आर अफझल... भारत मुर्दाबाद...' भारताविरोधातील ही घोषणाबाजी पाकिस्तान,

चीन किंवा भारताच्या कुणा शत्रू राष्ट्रात झालेली नाही; तर श्रीनगरच्या विद्यापीठातील आहे. ती ही दहशतवादी अफझल गुरूच्या समर्थनासाठी. अफझल गुरूचा कैवार घेत शेकडो विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या कॅम्पसमध्ये जोरदार मोर्चा काढला. दिवसभर चाललेल्या या निदर्शनाकडे विद्यापीठ प्रशासनाने, सरकारने पूर्ण कानाडोळा केला.खरेतर भारताविरोधातील ही घोषणाबाजीला काश्मीर खोर्यात कुठलेही कारण पुरेसे आहे.

**<u>तिरंगा फडकविल्याने चित्रीकरण बंद पाडले</u>**

चित्रपटाच्या सेटवर असलेल्या तिरंग्याला आक्षेप घेत काश्मीर मधील फुटीरवादी विद्यार्थी संघटनांनी दिग्दर्शक विशाल भारद्वाज यांच्या "हैदर' चित्रपटाचे चित्रीकरण बंद पाडले. तसेच, चित्रपटातील कलाकारांचा निषेध करत या संघटनांनी भारतविरोधी आणि "स्वातंत्र्या' च्या घोषणाही दिल्या.

ही घटना हजरतबल येथील विद्यापीठाच्या आवारात घडली. विशाल भारद्वाज यांच्या "हैदर' या चित्रपटाचे चित्रीकरण श्रीनगरमध्ये सुरू होते. या चित्रपटामध्ये शाहीद कपूर मुख्य भूमिकेत आहे. मुळात कश्मीरमध्ये भारताचा तिरंगा फडकविणे हेच महाकठीण काम झाले आहे. भारताचा स्वातंत्र्यदिन, प्रजासत्ताक दिन येथे लष्करी सुरक्षा कवचात साजरा करावा लागतो.

जम्मू-काश्मिरमध्ये महिलांनी परराज्यातील पुरूषाशी लग्न केल्यास त्यांना भेदभावाला समोर जावे लागते, केंद्रीय मंत्री शशी थरूर यांची पत्नी सुनंदा पुष्कर यांनी मोदींना पाठिंबा दिला. मूळच्या काश्मिरच्या रहिवासी असलेल्या सुनंदा पुष्कर यांनी मोदींच्या वक्तव्यावर सहमती दर्शवली आहे. एखाद्या स्त्रीने 'परराज्यातील' माणसाशी लग्न केल्यास तिच्यासोबत भेदभाव होतोच. मुख्यमंत्री ओमर अब्दूल्ला यांच्याएवढे अधिकार त्यांच्या बहिणीला नाहीत. कारण त्यांनी अन्य राज्यातील तरुणाशी (ओमर

अब्दुल्लांच्या, बहिण सचिन पायलट यांची पत्नी) विवाह केला. हा भेदभाव का होता.

**आधी भावनिक एकात्मता?**

इतर राज्यांतील नागरिक जम्मू-कश्मीरात फक्त पर्यटक म्हणूनच जाऊ शकतात. अतिरेक्यांना येथे घुसखोरी करून राहण्याची संपूर्ण मुभा आहे, पण भारताच्या नागरिकांना ते स्वातंत्र्य नाही. येथील नागरिकांना इतर राज्यांच्या तुलनेत स्वस्त दरात जीवनावश्यक वस्तू दिल्या जातात व त्यासाठी त्यांना खास ‘सबसिडी’ दिली जाते. ३७० कलमामुळे जम्मू-कश्मीरचा विकास खुंटला आहे. नवे उद्योग नाहीत, प्रकल्प नाहीत. गुंतवणूक नाही. त्यामुळे तरुणांना रोजगार नाही.

इतर भागातील लोकांना जम्मू-काश्मीभरमध्ये जमिनी घेता येत नाहीत. उद्योगधंदे घालता येत नाहीत. मतदार होता येत नाही म्हणून विकास खुंटला आहे. आजही तेथे ९९ वर्षांच्या कराराने जागा मिळतात.(एकाही उद्योगपतीने जागा घेतल्याचे ऐकीवात नाही) जो प्रचलित कायदा आहे, तो ही कट्टरपंथी काश्मिरींना पुरेसा वाटत नाही. काश्मिरी जनता आपल्या वैशिष्ट्यांसह भारतीय मुख्य प्रवाहाशी एकरूप होईल आणि मग ३७० वे कलम काढावे, असे तेथील जनतेलाही वाटेल अशी अपेक्षा होती. दुर्दैवाने ६६ वर्षांनंतरही काश्मिर खोर्यातील भावनिक एकात्मता दूरच आहे.

**तरतुदीचे घातक परिणाम देश आणि समाजावरही**

स्वतंत्र भारताच्या आणि जम्मू-काश्मीरच्या इतिहासातील महत्त्वाचा अध्याय म्हणजे राज्यघटनेतील ३७० वे कलम.वास्तविक, जम्मू-काश्मीरच्या विलीनीकरणाची सर्वांत जास्त गरज राजा हरीसिंगांनाच होती; कारण पाकिस्तानच्या सैन्याने हल्ला केला होता. त्यामुळे राजाच्या या अटी स्विकारणे भारत सरकारला अजिबात आवश्य क नव्हते; ३७० व्या

कलमामुळे जम्मू-काश्मीर राज्याला इतर राज्यांच्या तुलनेत विशेष स्थान, दर्जा मिळाला आहे.

पंजाबमधून १९५६ मध्ये बोलाविण्यात आलेल्या सफाई कर्मचार्यांचना "राज्य नागरिकत्व' देण्यात आले; परंतु त्यामुळे त्यांच्या उच्चशिक्षित पुढच्या पिढीला फक्त सफाई कामगार म्हणूनच काम करता येईल, अशी परिस्थिती आहे. राज्यातील मुलीने राज्याबाहेरील मुलाशी लग्न केले व कोणत्याही कारणाने ती माहेरी परत आली, तर तिला वडिलोपार्जित संपत्तीत कोणताही अधिकार नव्हता. तो सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाने मिळाला; पण तिच्या मुलांना उच्च शिक्षणाचे अधिकार नाहीत. पंचायतराज व स्थानिक स्वराज्य संस्था सक्षम करण्यासाठी केल्या गेलेल्या ७३ व ७४ व्या घटनादुरुस्त्या तेथे लागू नाहीत, राज्यघटनेची १३४ कलमे लागू नाहीत, डिलिमीटेशन कायदा लागू नसल्याने मतदारसंघांची पुनर्रचनाही करणे शक्य नाही.

**<u>कश्मीरास विशेष राज्याचा दर्जा का?</u>**

काश्मीरच्या जम्मू, काश्मीर आणि लडाख या तीन भागांचा विचार केला, तर अगदी जम्मू-काश्मीर विधानसभेची रचना करतानाही जम्मू, लडाखवर अन्याय करून काश्मीर खोर्याच्या हातातच विधानसभेतील निर्णायक शक्ती राहील, अशी रचना करण्यात आली. ना लोकसंख्येचे प्रमाण गृहीत धरलेले, ना क्षेत्रफळ! जम्मू आणि लडाखपेक्षा काश्मीरला जास्त प्रतिनिधित्व देण्यात आलेले आहे. या जोरावरच अब्दुल्ला घराण्याची मनमानी वर्षानुवर्षे चालली आहे.

काश्मिरी लोक इतर राज्यात जमीन/जागा घेऊ शकत असतील तर इतर राज्यातील लोकांना पण काश्मिरात जागा घेता आली पाहिजे. केंद्र सरकार कडून मोठमोठया आर्थिक मदती घेणे आणि तरीही स्वत:ला देशापासून वेगळे समजणे ह्या गोष्टी देशाच्या एकात्मतेला छेद देणार्या आहेत.

भारतीय संसदेला जम्मू-काश्मीरबाबत फक्त संरक्षण, परराष्ट्र धोरण, दळणवळण या विषयात कायदे करण्याचा अधिकार आहे, कलम ३७० हे देशाच्या स्वातंत्र्याच्या विरोधात आहे. वास्तविक आपला देश एक आहे व देशातील सर्व राज्ये, सर्व नागरिक समान आहेत. मग फक्त जम्मू-कश्मीरास विशेष राज्याचा दर्जा का?

काश्मिर हे युद्धजन्य क्षेत्र आहे. अमेरिकेचे सैन्य अफगाणिस्तानमधून गेल्यावर तालिबानींची आत्मघातकी पथके जम्मू-काश्मीरमध्ये मोठ्या कारवाया करण्याची शक्यता आहे. ही लढाई लष्कर आणि निमलष्करी दलांना लढावी लागणार आहे. अशा काळात काश्मिरी जनतेला त्यांच्या वेगळेपणासह भावनिकदृष्ट्या भारताशी जोडण्यासाठी सर्वांनाच पुढाकार घ्यायला हवा.

## प्रकरण २- भारत पाकिस्तान संबध्द एक शुन्याचा पाढा

२९ मार्च २०१५पाकिस्तानातील हिंसाचार आणि भारत
२६ एप्रिल २०१५ चीन-पाकिस्तान मैत्रीचा नवा अध्याय:गरज नवी रणनीती आखण्याची
१७ मे २०१५ पाकिस्तानचा कांगावा आणि वास्तव
२६ जुलै २०१५स्मृती कारगिल युद्धाच्या
२६ जुलै २०१५कारगिलची पुनरावृत्ती होईल का?
२३ ऑगस्ट २०१५ न संपणार्या विवरात पाकिस्तान
६ सप्टेंबर २०१५ भारत-पाक युद्धाची पन्नाशी
११ ऑक्टोबर पाकिस्तानचे शेपटू वाकडेच
१८ ऑक्टोबर बलुचिस्तानचा स्वातंत्र्यलढा आणि भारत
१ नोव्हेंबर पाकिस्तानची वाढती अण्वस्त्रक्षमता आणि भारत

पाकिस्तान शांततेबाबत बोलत असतो, तेव्हा दक्षिण भारतासहित सर्व देशात दहशतवादी केंद्रे पसरत असतात. २६-११ च्या हल्ल्यावरून स्पष्ट

होते त्यानुसार, मुस्लिम मूलतत्त्ववादाची, जिहादी दहशतवादाची प्रसारक्षेत्रे (फुटप्रिंटस) दुर्लक्षिण्याने दुष्परिणामांना सामोरे जावे लागत आहे. लष्कर-ए-तय्यबा आणि जैश-ए-मोहम्मद, इस्लामी / जिहादी दहशतवादाचे प्रमुख खेळाडू आहेत. दहशतवादी हल्ल्यात होणारे नुकसान लक्षणीय असते, तरीही मुख्य काळजी धार्मिक आधारांवर वाढत जाणाऱ्या असहिष्णुतेची असते, ज्यामुळे निधर्मी संस्कृतीच्या आधारासच धक्का बसत असतो. पाकिस्तानमधील हल्लीच्या अंतर्गत गोंधळाच्या परिस्थितीत, अमेरिकेचा दबाव असतांना, मोठ्या हिंसक घटना कदाचित घडणारही नाहीत, मात्र तशा त्या घडविण्याचे सामर्थ्य मात्र अबाधितच राहील.

देश जळत असतांना,बहुतेक राजकिय पक्ष आपलेच तुणतुणे वाजवत राहतात. ह्यामुळे, भारतीय संघराज्याच्या प्रादेशिक अखंडतेस गंभीर स्वरूपाचा धोका निर्माण होत असतो. चीन, पाकिस्तान, बांगलादेश, म्यानमार आणि नेपाळ (माओवादी) हे शेजारी असल्याने, भारतीय संघराज्याच्या प्रादेशिक अखंडतेस असलेला धोका आणखीनच वाढतो. दहशतवादी गट, मवाळ असलेल्या भारतावर हल्ला करण्याचे जोरदार प्रयत्न करतील. मदरसे, मशिदी, मौलवी आणि मुस्लिम मूलतत्त्ववादी संघटना ह्यांच्या अपवित्र युतीच्या साहाय्याने, जातीयवादाचा प्रसार करून ते भारताच्या निधर्मी संस्कृतीवर हल्ला करतील. ते हवाला द्रव्य, खोट्या नोटा आणि आर्थिक केंद्रांवर थेट हल्ले करून भारतीय अर्थव्यवस्थेस अस्थिर करतील. जम्मू-आणि-काश्मीर व ईशान्येप्रमाणेच, माध्यमास दहशतवादी-लष्करी-गटांची मुखपत्रे होण्यास भाग पाडले जाईल. देशास भेडसावणारी सुरक्षेची आव्हाने बहुआयामी (मल्टिफेरियस) आहेत. केवळ

एकजूट झालेला भारतच त्यांचा प्रभावीरीत्या सामना करू शकेल.

## **२९ मार्च २०१५पाकिस्तानातील हिंसाचार आणि भारत**

गेल्या काही वर्षांपासून पाकिस्तानातील अंतर्गत हिंसाचाराचे आणि अंतर्गत दहशतवादाचे प्रमाण लक्षणीयरित्या वाढले आहे. या हिंसाचारामध्ये अल्पसंख्यांकांबरोबरच सामान्य नागरिक, सुरक्षादलाचे जवान मोठ्या प्रमाणावर मृत्युमुखी पडत आहेत. तालीबानी दहशतवाद्यांविरोधात पाकिस्तान सरकार आणि सैन्याने सुरू केलेल्या युद्धमोहिमेमध्ये दहशतवादी मारले जात असले तरी सामान्य नागरिकही मोठ्या प्रमाणावर मारले जात आहेत. त्यामुळे तेथील जनतेमध्ये प्रचंड असंतोष आहे. परिणामी, तेथे अराजक पसरले आहे. त्याचबरोबर भारताविरुद्ध कारवाया करणार्या दहशतवाद्यांवर पाकिस्तान सरकार कोणतीही कारवाई करताना दिसत नाही. अशा वेळी आपण त्यांच्याशी शांतता चर्चा करण्यातून काहीच हाशिल होणार नाही.

पाकिस्तान हा हिंसाचाराच्या आगीत होरपळतो आहे. २००३ पासून २०१५ पर्यंत झालेल्या दहशतवादी हिंसाचारात पाकिस्तानमध्ये २०,२१० सामान्य नागरिकांचा आणि ६१०५ सुरक्षा रक्षकांचा मृत्यू झाला आहे. तसेच ३० हजारांहून अधिक दहशतवादी ठार झालेले आहेत. दहशतवादाने ग्रासलेला जगातील दुसर्या क्रमांकाचा देश म्हणून पाकिस्तानचा उल्लेख करण्यात येत आहे. हा हिंसाचार संपूर्ण पाकिस्तानमध्येच पसरलेला असून फाटा (फेडरली ॲडमिनिस्टर्ड टड्ढायबल एरिया) या अफगाणिस्तानलगतच्या भागात तो अधिक प्रमाणात आहे. त्यापाठोपाठ बलुचिस्तान, सिंध आणि पंजाब या इतर प्रांतांमध्येही हिंसाचाराचे प्रमाण मोठे आहे. या हिंसाचाराचे अनेक पैलू आहेत.

### **शियांवर होणारे हल्ले**

२००१ पासून पाकिस्तानमध्ये आंतरजातीय आणि आंतरजातीय धर्मिय हल्ल्यांमध्ये शिया मुसलमानांना मोठ्या संख्येने मारले जात आहे. पाकिस्तान सरकारच्या आकड्याप्रमाणे ७ मार्च २०१५ पर्यंत शिया मुसलमानांवर ४१२ हल्ले झाले असून त्यामध्ये २४०७ शिया नागरिक मारले गेले आहेत; तर आणि ४३३९ गंभीर जखमी झाले. पाकिस्तानमध्ये इतर अल्पसंख्याक नागरिकांवरही हल्ल्यांचे प्रमाण वाढते आहे. ख्रिश्चन नागरिकांवर २२ हल्ले झाल असून त्यांमध्ये १२८ ख्रिश्चन नागरिक मारले गेले आहेत. १० अहमदीही आणि दोन शिख ही मारले गेले. एकूणच, पाकिस्तानमध्ये अल्पसंख्याकांवर मोठ्या प्रमाणात दहशतवाद्यांकडून हल्ले होत आहेत.

**पाकिस्तानात होणार्या दहशतवाद् भारताच्या १० पट जास्त**

प्रमाण हे भारतामध्ये होणार्या हिंसाचाराच्या तुलनेत १० पट जास्त आहे. पाकिस्तानमध्ये मोठे दहशतवादी हल्लेही वाढलेले आहेत. यामध्ये पेशावरधील हल्ल्याचा उल्लेख करता येईल. पाकिस्तानात आत्मघातकी हल्ल्यांचे प्रमाणही खूप आहे. २००२ पासून तर आजपर्र्यंत ४११ आत्मघातकी हल्ले झाले असून त्यामध्ये ६३२९ नागरिक मारले गेले आणि १३०५८ हे गंभीर जखमी झाले.

प्रत्येक वेळी असे हल्ले झाल्यानंतर पाकिस्तान सरकार छापील उत्तरे देते. कोणत्याही प्रकारचा दहशतवाद खपवून घेतला जाणार नाही आणि पाकिस्तान भूमीवरून दहशतवाद संपवण्याचा प्रयत्न करू, असे या सरकारकडून सांगितले जाते; पण कधीही पुरेशी कृती केली जात नाही.

**ऑपरेशन ‘जर्ब-ए-अज्ब**

पेशावरमधल्या आर्मी स्कूलमध्ये झालेल्या हल्ल्यानंतर पाकिस्तानी सैन्याने ‘तेहेरीक-ए- तालिबान पाकिस्तान‘ या दहशतवादी संघटनेविरुद्ध ‘ऑपरेशन जर्ब-ए-अज्ब नावाची एक युद्धमोहीम १५ जून २०१४ रोजी सुरू केली असून आजही ती सुरू आहे. आत्तापर्यंत या मोहिमेमध्ये २००० हून

अधिक दहशतवाद्यांना मारण्यात आले आहे. यामध्ये पाकिस्तानी सैन्याचे २०० सैनिक मारले गेले आहेत आणि ८०० जणांना गंभीर जखमा झाल्या आहेत. हे आकडे हे पाकिस्तानी सैन्याने जाहीर केलेले असून त्यांची वास्तवता पाकिस्तानातील माध्यमांकडून पडताळून पाहिली जात नाही; याचे कारण ही युद्धमोहीम सुरू असणार्या भागामध्ये माध्यमांना जाण्यास मज्जाव करण्यात आला आहे. त्यामुळे त्यांच्या सत्यतेबाबत संदिग्धता आहे.

**<u>भारतीय सैन्याकडून धडे घेण्याची गरज</u>**

दहशतवाद्यांच्या विरुद्ध पाकिस्तानी सैन्य हवाई दलाची विमाने, हेलिकॉप्टर गनशिप, तोफखाना, रणगाडे यांसारखी मोठी हत्यारे वापरत आहे. अशा प्रकारची हत्यारे भारतीय सैन्य काश्मिरमध्ये किंवा ईशान्य भारतात होणार्या अँटी टेररिस्ट ऑपरेशमध्ये कधीही वापरत नाही. कारण यामुळे इतर सामान्य नागरिकांचे नुकसान होण्याची शक्यता असते. फाटा आणि बलुचिस्तान भागामध्ये अशाच प्रकारे सामान्य नागरिक मारले गेल्यामुळे तेथे पाकिस्तान सरकार आणि सैन्याविरुद्ध प्रचंड असंतोषाचे वातावरण आहे. परिणामी, त्यातून  दहशतवाद कमी होण्याऐवजी वाढत आहे. त्यामुळे पाकिस्तानने याबाबत भारतीय सैन्याकडून धडे घेण्याची गरज आहे.

**<u>आम जनता अमेरिकन, पाकिस्तानी सैन्याविरोधात</u>**

पाकिस्तानमध्ये  सध्या अफगाणिस्तान आणि पाकिस्तानच्या सीमेवर असणार्या दहशतवाद्यांविरुद्ध अमेरिकन सैन्याचे ड्रोनचे हल्लेही सुरू आहेत. ड्रोन हे बिना पायलटचे विमान असते. एखाद्या घरामध्ये दहशतवादी लपलेले आहेत अशी माहिती मिळाली तर ते तिथे जाऊन एक क्षेपणास्त्र डागून त्यांना उद्ध्वस्त केले जाते.  मिळालेली गुप्तहेर माहिती अचूक असेल तरच ड्रोनचा वापर होऊ शकतो. तसेच प्रत्येक ड्रोन हल्ल्यामध्ये दहशतवाद्यांसोबत  निरपराध नागरिकही मारले जातात.

त्यामुळे अफगाण-पाक सीमेवरील जनता ही अमेरिकन सैन्य आणि पाकिस्तानी सैन्याच्या विरोधात गेली आहेत.
अमेरिकेन गुप्तहेर खात्याच्या माहितीप्रमाणे अफगाणिस्तानातील अनेक युवक तेहरिके तालिबान पाकिस्तान या संघटनेमध्ये सामील होण्यासाठी भरती होत आहेत. यामुळे येणार्या काळामध्ये ही दहशतवादी संघटना आणि तालिबानी शस्त्रधार्यांची संख्या वाढण्याची शक्यता आहे.
पाकिस्तानमध्ये आणखी एक भयानक प्रकार घडत असतो. तो म्हणजे अनेक पाकिस्तानी नागरिक घरामधून गायब होतात किंवा त्यांना गायब केले जाते. काही काळानंतर त्यांचे मृतदेह सापडतात. बलुचिस्तानच्या एका संस्थेने अशा गायब झालेल्या व्यक्तींविरोधात न्यायालयात खटला दाखल केला आहे. त्यांच्या माहिती प्रमाणे गेल्या पाच वर्षांत ४५५७ जणांचे मृतदेह आढळले असून त्यामध्ये २६६ नागरिक कोण होते याविषयी माहिती मिळू शकलेली नव्हती.

**<u>२४ दहशतवाद्यांना एकाच वेळेला फाशीची शिक्षा</u>**

पेशावरवरील हल्ल्यानंतर पाकिस्तानने नॅशनल इंटरनल सिक्युरिटी पॉलिसी नावाचे एक धोरण तयार केले असून दहशतवादाचा नायनाट करण्यासाठी राष्ट्रीय कृती आराखडा तयार केला आहे. त्यानुसार ५४०० संशयित दहशतवाद्यांची नावे आणि त्यांच्या समर्थकांची नावे उघड करण्यात आली आहेत. तसेच अशा समर्थकांना आर्थिक आणि इतर मदत करणार्या संस्थांवर देशामध्ये बंदी घालण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. याशिवाय पाकिस्तानातील तुरुंगांमध्ये अनेक दहशतवादी विविध प्रकारच्या शिक्षा भोगत आहेत. यापैकी अनेक दहशतवाद्यांना फाशी देण्यास सुरुवात केली आहे. मध्यंतरी, २४ दहशतवाद्यांना एकाच वेळी फाशीची शिक्षा देण्यात आली. पाकिस्तानी सैन्याच्या माहितीप्रमाणे गेल्या काही महिन्यांमध्ये ६०० दहशतवादी त्यांनी पकडलेले आहेत. त्यामध्ये तेहरिके तालिबान पाकिस्तान या  संघटनेच्या दहशतवाद्यांचे प्रमाण सर्वाधिक

आहे.

असे असले तरी भारताविरूद्ध दहशतवादी कारवाया करणार्या दहशतवाद्यांविरूद्ध पाकिस्तानकडून कोणतीही कारवाई अद्यापपर्यंत केली जात नाही. अफगाणिस्तानमध्ये आलेल्या नवीन सरकारने त्यांच्या सैनिकांना भारतामध्ये प्रशिक्षण देण्याऐवजी पाकिस्तानमध्ये प्रशिक्षण द्यायला सुरुवात केली आहे. अफगाणिस्तानचे सैन्य आता पाकिस्तानच्या सैन्याला तेहरिक-ए-तालिबान पाकिस्तानच्या विरुद्ध कारवाई करण्यासाठी मदत करत आहे. त्यामुळे भारतात दहशतवाद वाढण्याचा धोका आहे.

**पाकिस्तानमधल्या अंतर्गत परिस्थितीचा भारतावर परिणाम**

२६ नोव्हेंबर रोजी मुंबईवर झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा मास्टरमाईंड अब्दुल रहेमान लखवी याचे अटक नाट्य गेल्या काही दिवसांपासून सतत सुरू आहे. त्याच्यावर खटला चालवणार्या दहशतवादविरोधी न्यायालयाने केलेल्या विधानावरून या खटल्याबाबतचा संशय वाढला आहे. न्यायालयाने म्हटल्यानुसार, या खटल्यासंदर्भात अद्याप इतके साक्षीदार शिल्लक आहेत की, त्यामुळे हा खटला संपण्यासाठी अजून १० वर्षे लागू शकतात. अर्थातच याला पाकिस्तानी सरकार कारणीभूत आहे. त्यामुळे हे सरकार जमाते उल दावा आणि हकानी नेटवर्क, लष्करे तोयबा, जैशे महमंद यांसारख्या भारताविरुद्ध दहशतवादी कारवाया करणार्या दहशतवादी संघटनांविरुद्ध कारवाई करेल, अशी शक्यता आजतरी दिसत नाही.

हे सगळे सुरू असतानाच भारत-पाकिस्तान संबंधांमध्ये काही महत्त्वपूर्ण घटना घडल्या आहेत. पंधरा दिवसांपूर्वीच भारताचे परराष्ट्र सचिव पाकिस्तानच्या दौर्यावर गेले होते. मागील वेळी पाकिस्तान हाय कमिशनने हुर्रियत कॉन्फरन्सच्या नेत्यांची भेट घेतल्यामुळे भारत सरकारने पाकिस्तानसोबत सुरू असलेल्या वाटाघाटी थांबवण्याचा निर्णय घेतला होता. या निर्णयाला भारतीय जनतेचे पूर्ण समर्थन मिळाले होते. पण आता भारत सरकारला पाकिस्तान सरकारशी वाटाघाटी करण्यास

अमेरिका भाग पाडत आहे.

**<u>जहाल फुटिरतावाद्यांचे लांगूलचालन</u>**

पाकिस्तानने जम्मू-कश्मीरमधील जहाल फुटिरतावाद्यांना गोंजारण्याची दुष्ट नीती कायम ठेवली आहे. नवी दिल्लीतील पाकिस्तानचे उच्चायुक्त अब्दुल वसित यांनी ‘पाकिस्तान डेनिमित्त जम्मू-काश्मीर खोर्यातील दहशतवादी मसरत आलम याला शाहीखान्यासाठी दावत दिली. पाकिस्तानच्या या वर्तनाविरोधात भारतात संताप व्यक्त होत आहे. या समारंभाला अनेक  फुटीरतावादी नेते उपस्थित होते. यासीन मलिक याने तर ‘पाकिस्तान डेला आपण गेली २२ वर्षे न चुकता हजर राहतो आहोत, अशी शेखीही मिरवली. हे खरोखरच धोकादायक आहे. राजधानीतील ‘पाकिस्तान डेच्या समारंभाला पररष्ट्र राज्यमंत्री व्ही. के. सिंग यांनी हजेरी लावली. पाकिस्तान दिनाच्या कार्यक्रमाला भारत सरकारच्या आदेशावरूनच हजेरी लावल्याचे स्पष्टीकरण व्ही. के. सिंग यांनी दिले. सरकारने या कार्यक्रमासाठी मला पाठविले. मी कार्यक्रमाला हजेरी लावली आणि दहा मिनिटांनी परत आलो, असे सिंग यांनी सांगितले आहे.

**<u>वाटाघाटी करण्याकरिता  सध्या योग्य वेळ नाही</u>**

काही दिवसांपूर्वी सलग दोन हल्ले काश्मीरमध्ये दहशतवाद्यांनी केले आहेत. या पार्श्वभूमीवर शांतता चर्चा करणे वा तशी भाषा करणे हे पाकिस्तानच्या तोंडी शोभत नाही. पाकिस्तानचे उच्चायुक्त बासित येथे देशद्रोहयांना फूस देत असतील, तर त्यांना पाकिस्तानचा रस्ता दाखविण्याची वेळ आली आहे. पाकिस्तानी उच्चायुक्ताला उघड उघड भेटून फुटितरतेची बीजे पेरणार्या हुर्रियतच्या लोकांना दिल्लीतच तातडीने अटक करून त्यांच्यावर देशद्रोहाचा खटला चालवला गेला पाहिजे. सध्या पाकिस्तानातील अंतर्गत अराजकता, वाढता दहशतवाद या पार्श्वभूमीवर तेथील कमजोर सरकारशी वाटाघाटी करण्यातून काय हाशील होणार आहे? जोपर्यंत पाकिस्तान सरकार तेथील अंतर्गत  हिंसाचारावर नियंत्रण

मिळवत नाही आणि भारतावर होणारे दहशतवादी हल्ले थांबवत नाही, तोपर्यंत त्यांच्याशी कोणत्याही प्रकारच्या वाटाघाटी वा शांतताचर्चा केल्या जाऊ नयेत.

**२६ एप्रिल २०१५ चीन-पाकिस्तान मैत्रीचा नवा अध्याय:गरज नवी रणनीती आखण्याची**

चीन आणि पाकिस्तानची मैत्री हिमालयापेक्षा जास्त उंच, हिंदी महासागराहून अधिक खोल आणि  मधापेक्षाही जास्त गोड आहे, असे म्हटले जाते. आता या दोन्ही देशांचे संबंध अधिक घनिष्ट होणार आहेत. चीनचे अध्यक्ष शी झिनqपग यांच्या नुकत्याच झालेल्या पाकिस्तान भेटीमध्ये झालेल्या करारांमधून याचे स्पष्ट संकेत मिळाले आहेत. भारताचे हे दोन्ही पारंपरिक शत्रू एकत्र आल्यामुळे आपल्यापुढील धोका वाढला आहे. या दोन्ही देशांमध्ये सहकार्यसंबंध वाढताना दिसत असले तरी त्यामध्ये अनेक अडचणी आहेत. भारताने आता त्यांचा फायदा घेत नवी रणनीती आखण्याची गरज आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे आगामी काळात चीनभेटीवर जाणार आहेत. त्यादरम्यान त्यांनी या नव्या रणनीतीची चुणूक दाखवण्याची आवश्यकता आहे.

**सार्वकालिक मित्र असणार्या पाकिस्तानशी ५१ करार**

चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग पाकिस्तानच्या १९-२१ एप्रिलच्या दौर्यात सार्वकालिक मित्र असणार्या पाकिस्तानशी ५१ करार केले. यामध्ये सर्वात महत्त्वाचा आहे तो ४६ अब्ज डॉलरचा इकॉनॉमिक कॉरिडॉरचा करार. अरबी समुद्रात ग्वादरदीप बंदर, पाकव्याप्त काश्मीरमध्ये गतिमान लोहमार्गाचे जाळे, तीन हजार किलोमीटरचे रस्ते, ऊर्जानिर्मिती प्रकल्पासाठी चीन पाकिस्तानला मदत करणार आहे. असे असले तरी पाकिस्तानकडून याचा खरा वापर लष्कराच्या हालचाली गतीमान करण्यासाठी, युद्धसामग्रीची ने-आण करण्यासाठी केला जाण्याची शक्यता अधिक आहे. याशिवाय चीन पाकिस्तानला आठ पाणबुड्या देणार आहे. यामुळे हिंदी महासागरात

चिनचा प्रभाव वाढणार आहे.

१९७९ साली चीनने पाकला जोडणारा काराकोरम हायवे बांधला. त्यानंतरचा हा सर्वांत मोठा प्रकल्प असून, यामुळे चीन आणि पाकिस्तान यांच्यातील अंतर कमी होणार आहे. त्यामुळे चीनकडून ऊर्जा उत्पादनासाठी साहित्य आयात करणे पाकिस्तानला सोपे जाणार आहे. या कॉरिडॉरमुळे पाकिस्तानचा अविकसित पश्चिम भाग ग्वदार हा चीनच्या मदतीने विकसित करण्यात आलेल्या बंदराशी जोडला जाणार आहे. यासाठी लागणारे रस्ते पाकव्याप्त काश्मीरमधून जाणार असून, रस्ता, रेल्वे व व्यापारी क्षेत्र यांचे मोठे जाळे उभारले जाणार आहे. पहिला टप्पा ऊर्जा निर्मितीचा असून, तो येत्या तीन वर्षांत पूर्ण होईल. त्यानंतर १०,४०० मेगावॅट वीज तयार होईल व चीनला हिंदी महासागरात थेट प्रवेश मिळेल.

याशिवाय, नैसर्गिक वायू आणि तेलाचा पुरवठा करणारी एक प्रचंड पाईपलाईन बांधण्याचा प्रयत्नही चीनकडून होणार आहे. ग्वादर बंदरामधून सुरू होणारी ही पाईपलाईन पर्शियन गल्फच्या तोडांवर आहे. जगामधील नैसर्गिक वायू आणि तेलाचे साठ टक्के साठे या भागात आहेत. म्हणजेच या खनिज समृद्ध भागातील नैसर्गिक वायू आणि तेल आपल्या प्रांतामध्ये नेण्याचा चीनचे महत्त्वाकांक्षी उद्दिष्ट आहे. याशिवाय पाकिस्तान चीनला ग्वादरचे बंदर विकसित करण्यासाठी चाळीस वर्षे लीजवर देणार आहे. विशेष म्हणजे, या बंदरामध्ये चीनशिवाय अन्य कोणत्याही राष्ट्राला काम करता येणार नाही. त्यामुळे चीनला आपले नौदल सामर्थ्य वाढवण्यासाठी एक मोठे बंदर हाताशी लागले आहे. तसेच या बंदरामुळे अरबी समुद्र, पर्शियन गल्फ आणि  हिंदी महासागरात चीनी नौदलाची मोठ्या प्रमाणात हालचाल वाढणार आहे. भारताला खच्ची करण्यासाठी पाकिस्तानचा वापर करण्याची रणनीती हा चीनच्या धोरणाचा भाग आहे.

गेल्या ५० वर्षांपासून चीन आणि पाकिस्तानची सामरिक मैत्री टिकून आहे. चीनकडून पाकिस्तानला प्रचंड मोठ्या प्रमाणात अण्वस्त्रांची आणि क्षेपणास्त्रांची मदत केली जात आहे. चीन आणि पाकिस्तानची मैत्री हिमालयापेक्षा जास्त उंच आहे, हिंदी महासागराहून अधिक खोल आहे आणि  मधापेक्षाही जास्त गोड आहे, असे म्हटले जाते. चीनच्या अध्यक्षांची ही पाकिस्तान भेट भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आगामी चीन भेटीपूर्वी झाली आहे.

**कृत्रिम बेटे**

चीन आज वादग्रस्त दक्षिण चीन समुद्रात अनेक कृत्रिम बेटे तयार करत आहे. यासाठी अनेक ठिकाणी समुद्रामध्ये भराव टाकण्यात येत आहे. यातून निर्माण होणार्या बेटांवर चीनी हवाईदलासाठी लांब धावपट्ट्या बनवण्यात येणार आहेत. त्यामुळे या कृत्रिम बेटावर चीनचे हवाई दल अवतरणार आहे. चीनचा हा सागरी विस्तारवाद ज्या भागामध्ये सुरू आहे, त्या भागामध्ये सागरीसीमांवरून चीनचे  जपान, व्हिएतनाम, फिलीपाईन्स आणि इतर दक्षिण पूर्व आशियाई देशांशी वाद सुरू आहेत. तरीही चीनने वेगाने पावले टाकत आहे; यातून त्यांना दोन फायदे होणार आहेत. पहिला म्हणजे समुद्रामध्ये विमाने उतरवण्यासाठी कृत्रिम धावपट्ट्या आणि दुसरे म्हणजे या बेटांच्या चारही बाजूच्या २०० नॉटिकल माईल समुद्रावर कब्जा. हा कब्जा मिळाल्यामुळे आंतरराष्ट्रीय कायद्यांनुसार त्या भागात असलेले तेल, गॅस आणि इतर धातू उत्खननाची परवानगी चीनला मिळणार आहे. त्यामुळे त्यांचे सागरी विस्तारवादाचे ध्येय साध्य होणार आहे, त्यांचे सागरी क्षेत्र वाढणार आहे. हे बेकायदेशीर आहे. त्यामुळे चीनच्या या आक्रमक विस्तारवादाला रोखण्यासाठी भारताने जपान, फिलीपाईन्स आणि इतर राष्ट्रांशी युती करून चीनला शह दिला पाहिजे. त्यांच्याशी मैत्रीचा फायदा आपल्याला भविष्यकाळात चीनशी लढण्याची वेळ आल्यास मित्र राष्ट्र म्हणून होऊ शकतो.

**<u>भारतावर काय परिणाम होईल?</u>**

कारकोरम हायवे पाकिस्तानने चीनला दिलेल्या ६५०० किमी भागाच्या पाकव्याप्त काश्मीरमधून जाणार आहे. वास्तविक, पाकव्याप्त काश्मीर हे भारताचे आहे. त्यामुळे हा भाग पाकिस्तानने चीनला कायमचा देणे हेच मुळात बेकायदेशीर आहे. याशिवाय काराकोरमचा रस्ता आणि गॅसची पाईपलाईन लडाखच्या जवळून जाणार असल्यामुळे लडाखला मोठा धोका पोहोचण्याची शक्यता आहे. याशिवाय चीन पाकिस्तानला ८ पाणबुड्या देणार आहे. या पाणबड्यांमधून पाकिस्तानला अण्वस्रे असणारी क्षेपणास्रे डागता येणार आहेत. यामुळे भारताला सामरिक धोका निर्माण होणार आहे. अथांग समुद्राच्या तळाशी असणार्या पाणबुड्या शोधणे हे गवताच्या गंजीतून सुई शोधण्याइतके कठीण असते. तसेच सर्वांत मोठा धोका म्हणजे दुर्दैवाने ही पाणबुडी दहशतवादी संघटनेच्या हाती लागली तर त्यातील अण्वस्रांचा वापर भारताविरुद्ध केला जाऊ शकतो. ही भीती काल्पनिक नाही. ५० ते ६० नौसैनिक असणार्या पाणबुडीवर दहशतवादी गटाने कब्जा मिळवणे हे कठिण नाही. पाकिस्तानी नौद्लतळावर तहरीक ए तालिबान पाकिस्तान या संघटनेच्या दहशतवाद्यांनी नुकसान केल्याचे आपण पाहिलेले आहे. तसाच धोका या पाणबुड्यांबाबतही संभवतो. या पाश्र्वभूमीवर भारताने अमेरिका आणि इतर युरोपियन राष्ट्रांची मदत घेऊन पाकिस्तानी पाणबुडी हलचालीवर लक्ष ठेवावे लागेल.

**<u>पाकिस्तान चीनसंबधात अनेक अडचणी</u>**

सध्या दोन्ही देशांकडून सकारात्मक घोषणा केल्या जात असल्या तरी यावर अंमलबजावणी करणे हे तितके सोपे नाही. पाकिस्तान आणि चीनमध्ये सामरिक सहकार्य वाढत असले तरी त्यामध्ये अनेक अडचणी आहेत. पाकिस्तानने पोसलेल्या दहशतवादाबाबत चीन नाराज आहे. याचे कारण त्यांचा शिनझियाँग हा प्रांत जिहादी दहशतवादाने ग्रासलेला आहे. नरेंद्र मोदी पंतप्रधान बनल्यानंतर शी झिनपिंग हे भारताच्या भेटीवर आले

होते तेव्हा त्यांनी आजवरच्या राष्ट्राध्यक्षांचा पायंडा मोडीत पाकिस्तानला जाणे टाळले होते. इतकेच नाही तर  बराक ओबामांच्या भारत भारतभेटीनंतर, त्याला प्रत्युत्तर देण्यासाठी पाकिस्तानने चीनच्या राष्ट्राध्यक्षांना त्यांच्या नॅशनल डे दिवशी उपस्थित राहण्याचे निमंत्रण पाठवले होते. पण हे निमंत्रणदेखील चीनने टाळले होते.

आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे, आज पाक व्याप्त काश्मीरमध्ये अनेक चीनी कामगार वेगवेगळ्या रस्त्यांवर आणि वेगवेगळ्या कंपन्यात काम करत आहेत. या ठिकाणी चीनी कामगारांवर अनेक दहशतवादी हल्ले झालेले आहेत. यामुळे चीन पाकिस्तानवर अतिशय नाराज आहे. कामगारांच्या रक्षणासाठी चीनने स्व:ताचे १२,०००-१५,००० सैन्य तिथे ठेवले आहे. पाकपुरस्कृत दहशतवादापासून आपल्या नागरीकांचे रक्षण करण्यासाठी चीनने पाकिस्तानला १२ हजार जणांचे एक स्पेशल कमांडो युनिट बनवायला भाग पाडले. कमांडो युनिटचे काम चीनी कामगारांचे रक्षण करणे. तरीही आज चीनी नागरिक पाकिस्तानमध्ये सुरक्षित नाहीत. पाकिस्तानच्या उत्तर पूर्वेकडील भागामध्ये चालणारी दहशतवाद्यांची प्रशिक्षण शिबिरे  बंद करण्याबाबत चीनने पाकिस्तानवर वेळोवेळी दबाव आणलेला आहे. तरीही हे कॅम्प बंद झालेले नाहीत. कारण पाकिस्तानच्या अनेक भागांवर तेथील सरकार किंवा सैन्याचे नियंत्रण नाही.

अफगाणिस्तानातून 'नाटो फौजांच्या माघारीनंतर हा संपूर्ण भाग अशांत होण्याची भीती आहे. शिनझियांग प्रांतातील अशांतता लक्षात घेता चीनला तो प्रश्नपही भेडसावत असणार.

**<u>आता अफगाणिस्तानमधील धोरण चीन स्वत:च ठरवणार</u>**

अफगाणिस्तानमधील चीनचे धोरण हे पूर्णपणे पाकिस्तानच्या सांगण्यावर अवलंबून होते. पण आता ज्याप्रकारे पाकिस्तान दहशतवाद्यांना मदत करत आहे, त्यावरून चीन नाराज आहे. त्यामुळे आता अफगाणिस्तानमधील धोरण चीन स्वत:च ठरवणार आहे. त्यांना आता

अफगाणिस्तानमध्ये शांतता हवी आहे. अफगाणिस्तानमध्ये पाकिस्तानचे वर्चस्व नको आहे. अर्थातच ही बाब भारतासाठी अनुकूल आहे. कारण भारतही सुरुवातीपासून अफगाणिस्तानमध्ये शांतता, स्थैर्य आणि लोकशाही नांदावी यासाठी आग्रही भूमिका मांडत आला आहे. भारताने आता एक पाऊल पुढे टाकत चीनवरही मानसिक दबाव टाकून त्यांना अफगाणिस्तान संबंधामध्ये पाकिस्तानचे म्हणणे ऐकणे बंद करण्यास प्रवृत्त करण्याची गरज आहे.

आपल्या गुप्तहेर खात्याच्या मदतीने भारताने पाकिस्तानातील चीनी/ दहशतवादी प्रशिक्षणतळांची माहिती चीनला दिल्यास त्यांचे पाकिस्तानसोबतचे संबंध बिघडू शकतील. तसेच चीनकडून पाकिस्तानला केल्या जाणार्या सामरिक मदतीवरही त्याचा प्रतिकूल परिणाम होईल. थोडक्यात, पाकिस्तानकडून तुम्हाला फायदा कमी आणि नुकसान अधिक होते आहे, ही बाब चीनच्या निदर्शनास आणून देणे आवश्यक आहे. यासाठी वेगळ्या प्रकारची रणनीती आखण्याची गरज आहे. आज चीन आणि पाकिस्तानच्या मैत्रीचा पाया हा केवळ आणि केवळ भारत विरोध या एकाच मुद्द्यावर आधारलेला आहे. त्यामुळे भारताने चीनशी घनिष्ट संबंध निर्माण केले तर त्यांचा पाकिस्तानच्या बाजूला असलेला ओढा कमी होऊ शकेल. पंतप्रधान नरेंद्र मोदी आगामी चीनभेटीमध्ये या दृष्टीने सकारात्मक पावले टाकतील, अशी अपेक्षा आहे.

## **१७ मे २०१५ पाकिस्तानचा कांगावा आणि वास्तव**

### **भारतीय गुप्तचर यंत्रणा 'रॉ  पाकिस्तानमध्ये दहशतवाद वाढवत आहे?**

पाकिस्तानचा दुतोंडीपणा आणि दुटप्पीपणा आजवर अनेकदा दिसून आला आहे. सध्या हा देश त्यांनीच पोसलेल्या दहशतवादामुळे ग्रासलेला आहे. असे असताना पाकिस्तानातील प्रमुख अधिकार्यानी आणि मंत्र्यांनी आता तेथे होणार्या दहशतवादी कारवायांच्या मागे भारतीय सैन्याचा आणि भारतीय गुप्तचर यंत्रणेचा हात असल्याचा कांगावा करण्यास सुरुवात केली

आहे. विशेषतः, भारताचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवेल यांच्या नेतृत्त्वाखाली बलुचिस्तान आणि इतर प्रांतात भारत दहशतवादी कारवाया करत आहे, तेथील दहशतवाद्यांना रसद पुरवत आहे, असे आरोप पाककडून होत आहेत. हे आरोप तथ्यहीन असून त्याला कोणताही पुरावा नाही.

विविध प्रकारच्या रक्तरंजित संघर्षाचे आग्यामोहोळ बनलेल्या कराचीमध्ये दहशतवाद्यांनी एका बसवर बेछूट गोळीबार करून शिया पंथाच्या ४३ नागरिकांची निर्घृण हत्या केली. हा हल्ला भारताने केला असा आरोप पुन्हा एकदा पाकिस्तानकडून करण्यात आला आहे. नुकतेच पाकिस्तानचे संरक्षण मंत्री ख्वाजा असिफ यांनी भारताची गुप्तहेर संस्था 'रॉ ही पाकिस्तानमध्ये दहशतवाद वाढवण्याचे काम करत आहे, असा आरोप केला आहे. एका पाकिस्तानी वाहिनीला मुलाखत देताना त्यांनी सांगितले की 'रॉचे मुख्य काम पाकिस्तानला जगाच्या नकाशावरून कायमचे काढून टाकणे, हे आहे. सैन्याच्या १२ कोअर कमांडर्सच्या परिषदेनंतर पाकिस्तानी संरक्षण मंत्र्यांची ही मुलाखत दिली आहे. पाकिस्तान सैन्य ही तेथील सर्वांत मोठी शक्ती आहे. त्यापैकी वरिष्ठ १२ कोअर कमांडर्स ही पाकिस्तान सैन्याची सर्वांत मोठी शक्ती असते. पाकिस्तानचा राज्यकारभार चालवण्यामध्ये त्यांचे सर्वांत मोठे योगदान असते. त्यामुळे या परिषदेमधून जे काही पुढे येते ते महत्त्वाचे मानले जाते. या परिषदेमध्ये कोअर कमांडर्सनी भारतीय गुप्तचर यंत्रणा 'रॉ ही पाकिस्तानमध्ये दहशतवाद वाढवत आहे असे म्हटले आहे.

याला पाकिस्तान सैन्याचे प्रमुख जनरल राहिल शरिफ यांनीही रावळपिंडीमध्ये दुजोरा दिलेला आहे. एमक्यूएम (मुक्तीहिदा क्वामी मूव्हमेंट) पाकिस्तानमध्ये असलेला एक राजकीय पक्ष आहे. या पक्षाची दहशतवादी संघटनाही आहे. संस्थेचे मुख्य अल्ताफ हुसेन हे इंग्लडमध्ये राहतात. भारत या एमक्यूएमला मदत करुन, कराची शहरामध्ये मोठ्या

प्रमाणात दहशत पसरवत आहे, असा खोटा आरोप करण्यात येत आहे. १९८० च्या दशकात कराची शहरात मोठ्या प्रमाणात हिंसाचार होत होता. त्यावेळीही तत्कालीन इंदिरा गांधी यांच्या नेतृत्वाखालील भारत सरकार कराचीमध्ये अशांतता पसरवण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप करण्यात आला होता.

**भारत पाकिस्तानमध्ये दहशवाद पसरवत आहे?**

भारत पाकिस्तानमध्ये दहशवाद पसरवतो आहे असे आरोप पाकिस्तानी वर्तमानपत्रांमध्ये आलेले आहेत. पण हे प्रथमच होते आहे की गेल्या सहा महिन्यांपासून पाकिस्तानचे संरक्षण मंत्री आणि पाकिस्तानचे सैन्यप्रमुख आणि पाकिस्तानमधील  शक्तीमान असणार्या १२ कोअर कमांडर्सनी हा आरोप केला आहे. बलुचिस्तानमध्ये सध्या एक स्वतंत्र चळवळ सुरू आहे. बलुचिस्तान राज्याला पाकिस्तानपासून वेगळे व्हायचे आहे. पाकिस्तानी सैन्याचा आरोप आहे की तेथील ‘बलुचिस्थान लिबरेशन आर्मीङ्क या संघटनेला भारत मदत करत आहे. सध्या या संघटनेच्या ६०० हून अधिक कार्यकर्त्यांना भारत सैनिकी प्रशिक्षण देत असून त्या माध्यमातून बलुचिस्था पाकिस्तानपासून वेगळे करण्याला यश मिळणार आहे, असा आरोप आहे. पाकिस्तानचे पंतप्रधान नवाझ शरीफ यांनी २०१३ ची निवडणूक जिंकल्यानंतर भारताशी चांगले संबंध प्रस्थापित करण्याचा आपला प्रयत्न असेल असे सांगितले होते. २०१४ मध्ये नरेंद्र मोदी यांच्या शपथविधीला पाकिस्तानी सैन्याकडून विरोध असतानाही शरीफ उपस्थित राहिले होते. पण गेल्या सहा महिन्यांमध्ये भारत-पाकिस्तान मैत्रीसंबंध हे पुढे सरकताना दिसत नाही.

उलट मागील आठवड्यात पंतप्रधान नवाझ शरीफ यांनी सौदी अरेबियाच्या एका वाहिनीला मुलाखत देताना म्हटले होते की पाकिस्तानला भारताशी मैत्री करायची आहे, पण भारत पाकिस्तानशी मैत्री करण्यासाठी तयार नाही. अशा प्रकारचे आरोप इतक्या लगोलग होणे ही बाब असाधारण

आहे. म्हणून त्याकडे लक्ष देणे महत्त्वाचे आहे. १५ एप्रिल रोजी पाकिस्तानी सैन्यप्रमुखांनी म्हटले की, अफगाणिस्तानमध्ये भारतीय सैन्य आणि भारतीय गुप्तहेर संस्था यांचे प्रमाण आणि यांच्या कारवाया वाढलेल्या आहेत. अफगाणिस्तान सीमेला लागून एनडब्ल्यूएफपी आणि फटा या दोन पाकिस्तानच्या सीमावर्ती प्रांतामध्ये अफगाणिस्तानच्या बाजूने काही कारवाया करणे हे काम भारताकडून होत आहे.
पाकिस्तानच्या परराष्ट्र मंत्रालयाचे मुख्य सीनेटर मुर्शिद हुसेन हे पाकिस्तान मुस्लिम लीगचे सेक्रेटरी जनरल आहेत. तसेच त्यांना जनरल परवेझ मुशर्रफ यांचा उजवा हात मानले जाते. ते एक प्रसिद्ध पत्रकारही आहेत. त्यांनीही असा आरोप केलेला आहे की भारत अफगाणिस्तानच्या माध्यमातून पाकिस्तानमध्ये आणि बलुचिस्थानमध्ये कारवाया करण्याचा प्रयत्न करत आहे. पाकिस्तान सैन्यप्रमुखांनी आपण दिलेल्या वक्तव्याला पुरावा म्हणून भारताचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवल यांचा उल्लेख केलेला आहे. डोवल यांनी भारताने पाकिस्तानमध्ये दहशतवाद वाढवून पाकिस्तानचे तुकडे करण्याचा प्रयत्न चालवला आहे, असे त्यांनी म्हटले आहे.

**भारताची पाकिस्तानमध्ये असलेली कोव्हर्ट ऑपरेशन डिव्हिजन बंद**

आता प्रश्न असा उपस्थित होतो की यामध्ये तथ्य किती आहे आणि सत्य काय आहे? मुळात, अशा प्रकारच्या गुप्तहेर कारवायांविषयी आपल्याकडील माध्यमांमध्ये कधीही माहिती येत नाही. पण त्याविषयीची माहिती पाकिस्तानमध्या वर्तमानपत्रांमधूनच येते. पाकिस्तानमध्ये काहीही झाले तरी त्याचा दोष भारतीय सैन्यावर किंवा भारतीय गुप्तहेर संस्थांना देण्याची परंपराच आहे. भारतीय गुप्तहेर संस्थेवर खापर फोडून पाकिस्तान सरकार आपल्या जनतेला भारताविरुद्ध एकत्र करण्याचा प्रयत्न करते. १९९० च्या दशकामध्ये तत्कालीन पंतप्रधान इंद्रकुमार गुजराल यांनी भारताची पाकिस्तानमध्ये असलेली

कोव्हर्ट ऑपरेशन डीव्हिजन बंद करण्याचा निर्णय घेतला होता. आज पाकिस्तानने  भारतात २०० ते २५० छुपे सेल्स तयार केले आहेत. त्यांच्या मदतीने पाकिस्तान भारतामध्ये दहशतवादी  कारवाया करत असतो; अशाच प्रकारचे काही सेल्स भारतानेही पाकिस्तानमध्ये केले असावेत अशी एक कल्पना पाकिस्तानी वर्तमानपत्रातून पुढे आली होती.

**भारतीय सैन्याचे मुक्ती वाहिनीला ट्रेनिंग**

मुळात एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की, आपले गुप्तहेर पाकिस्तानमध्ये घुसवणे ही अतिशय लांबलचक  आणि क्लिष्ट व धोकादायक प्रक्रिया असते. यासाठी पंधरा ते वीस वर्षे लागू शकतात. ती अचानक बंद केली तर त्याला पुन्हा निर्माण करण्यासाठी पंधरा ते वीस वर्षे लागू शकतात. १९७१ च्या युद्धापूर्वी भारतीय सैन्याने बांगला देशमध्ये बांगलादेश मुक्तीसेना म्हणजे मुक्ती बाहिनीला प्रशिक्षण देऊन त्यांना पाकिस्तान सैन्याविरुद्ध कारवाई करण्याकरिता मदत केली होती. ज्यावेळेस भारतीय सैन्य बांगला देशमध्ये शिरले, त्यांना मुक्ती बाहिनीच्या प्रशिक्षित सैनिकांकडून गुप्तहेर आणि इतर माहिती मिळाली होती. याविषयी अनेक पुस्तकेही लिहिली गेली आहेत. त्यामुळे भारतीय सैन्याने मुक्ती बाहिनीला मदत केली हे सत्य मानण्यास काहीही हारकत नाही. पण पश्चिम पाकिस्तान किंवा उरलेल्या पाकिस्तानमध्ये भारताने अशा प्रकारच्या कारवाया केल्या आहेत, याला कोणताही पुरावा नाही.

**पाकिस्तानमध्ये खलिस्तानी दहशतवाद्यांविरुद्ध कारवाई**

१९८४ मध्ये खलिस्तानी दहशतवादीप्रेमी एका सुरक्षा कर्मचार्याने इंदिरा गांधींवर गोळीबार केल्यानंतर असे म्हटले गेले की, तत्कालीन पंतप्रधान राजीव गांधी यांनी आपल्या गुप्तहेर संस्थांच्या मदतीने पाकिस्तानमध्ये असलेल्या खलिस्तानी दहशतवाद्यांविरुद्ध कारवाई सुरू केली होती. त्यांचे मुख्य काम पाकिस्तानी सैन्य किंवा गुप्तहेर संस्थांना मदत करणार्या खलिस्तानींना दिसताक्षणीच मारावे, असे होते. याला ऑपरेश

सीआयटीएक्स आणि ऑपरेशन सीआयटीजे असे नाव दिलेले होते. असे मानले जाते की राजीव गांधींच्या आणि इंदिरा गांधींच्या काळामध्ये आपल्या गुप्तहेर संस्थां आणि भारतीय सैन्याने पाकिस्तान भूमीच्या आत थोड्या यशस्वी कारवाया केल्या होत्या. पण १९९७ नंतर अशा प्रकारच्या सगळ्या गुप्तहेर कारवाया या पूर्णपणे थांबवल्या गेल्या. सुरुवातीला सांगितल्याप्रमाणे पाकिस्तानमध्ये काम करणार्या दोन्हीही डिव्हीजन्स् १९९७ मध्ये पंतप्रधान गुजराल यांनी बंद केल्या होत्या.

सध्या पाकिस्तानी वर्तमानपत्रात आलेल्या वृत्तांनुसार, भारतामध्ये मोदी सरकार आल्यानंतर राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवल यांनी पाकिस्तानमध्ये अशा कारवाया पुन्हा करण्याचा निर्णय घेतलेला आहे. त्याची दोन उदाहरणे म्हणजे बलुचिस्तान आर्मीला आणि एमक्यूएम या संस्थेलाही मदत करणे. एमक्यूएमही संस्था भारतातून फाळणीच्या वेळेस पाकिस्तानमध्ये स्थलांतरीत झालेल्या मुसलमानांची आहे. आजही त्यांना सामान्य पाकिस्तानी नागरीकांसारखी वर्तणूक मिळत नाही. भारतातून पाकिस्तानमध्ये गेलेले मुसलमान हे प्रामुख्याने कराची शहरामध्ये स्थलांतरीत झालेले आहेत आणि तिथेच एमक्यूएम या पक्षाचे वर्चस्व आहे. त्यामुळेच या पक्षाला भारतीय गुप्तहेर संस्था मदत करत असाव्यात, असा आरोप पाकिस्तानकडून केला जात आहे. पण खरोखरच जर अशा प्रकारच्या काही कारवाया भारतीय गुप्तहेर संस्था पाकिस्तानमध्ये करत असतील तर त्यापासून आपल्याला काय फायदा आहे आणि काय नुकसान आहे?

## पाकिस्तानच्या दहशतवादी कारवायांना प्रत्युतर म्हणून बलुचिस्तान आर्मीला मदत

भारताने पाकिस्तानमध्ये केलेल्या कारवायांविरुद्ध प्रत्युत्तर म्हणून पाकिस्तानी सैन्य आणि गुप्तहेर संस्था भारतामध्य दहशतवादी कारवाया करू शकतात. आजवर पाकिस्तानला भारतामध्ये दहशतवाद

पसरवण्यामध्ये मोठे यश आलेले आहे. १९७२ पासून पाकिस्तान भारतामध्ये दहशतवाद पसरवत आहे आणि छुपे युद्ध करत आहे. भारतीय सैन्याची ताकद प्रचंड आहे तरीही १९९९ नंतर आपण पाकिस्तानशी पारंपारिक युद्ध केलेले नाही. दरवेळी पाकिस्तानकडून अण्वस्रांचा  वापर करण्याची धमकी दिली जाते. त्यामुळे पाकिस्तानशी पारंपारिक युद्ध करण्याबाबत अमेरिका आपल्याला सबुरीचा सल्ला देत असते. कारण अण्वस्रांचा वापर झाल्यास तो संपूर्ण जगासाठी विनाशकारी ठरणारा आहे. त्यामुळेच आपण पाकिस्तान पुरस्कृत दहशतवादापासून आपले रक्षण करण्यासाठी  केवळ संरक्षणात्मक अथवा बचावात्मक कारवाया करत आहोत. यामध्ये सीमेवर कडक पहारा ठेवणे, अंतर्गत सुरक्षा बळकट करणे, दहशतवादी हल्ला झाल्यास दहशतवाद्यांना पकडणे याच माध्यमातून आपण पाकपुरस्कृत दहशतवादाचा सामना करत आलेलो आहोत आणि  आजही करतो आहोत. अशा बचावात्मक कारवायांसाठी, प्रतिबंधासाठी प्रचंड प्रमाणात पैसा खर्च करावा लागणार आहे. पोलिस दलाची, गुप्तहेरांची आणि इतर अर्धसैनिक दलांची संख्या वाढवावी लागणार आहे. आजवर भारताचा बराच पैसा या सर्वांसाठी खर्च झाला आहे. तो विचारात घेता, पाकिस्तान खोटा आरोप करत असेल तर पाकिस्तानच्या दहशतवादी कारवायांना प्रत्युतर म्हणून आपण खरोखरच बलुचिस्तान आर्मीला आणि एमक्यूएम पार्टीला मदत करणे हे एक प्रभावी उत्तर होऊ शकते.

## INDO PAK RELATIONS२६ जुलै २०१५स्मृती कारगिल युद्धाच्या

जगातील सर्वांत उंच पर्वतरांगांमध्ये कारगिलचे युद्ध झाले होते. याआधी इतक्या उंचीवर कोणतेही युद्ध झालेले नाही. या युद्धात पाकिस्तानचे साडेचार हजाराहून अधिक सैनिक मारले गेले. २६ जुलै रोजी शैवटच्या पाकिस्तानी सैनिकाला मारण्यात आल्याने हा दिवस ‘कारगिल विजय दिवस म्हणून साजरा केला जातो. लढाईत शस्त्र आणि सैनिक हे दोन

घटक महत्त्वाचे असतात. मात्र कोणतेही शस्त्र चालविण्याकरीता असणारा सैनिक सर्वांत जास्त महत्त्वाचा असतो आणि सैनिक सदैव सतर्क असतील तर देश सुरक्षित राहतो. म्हणूनच भारतीय नागरिकांनी आणि सरकाने आपल्या सैनिकांची काळजी घेतली पाहिजे. आजच्या घडीला देशाच्या सुरक्षिततेला बहुआयामी धोके आहेत. यासाठी मोठ्याप्रमाणावर सैन्याबरोबरच देशप्रेमी नागरिकांचीही भारताला गरज आहे.

**<u>कारगिलमधे घुसखोरी पाकिस्तानी सैन्याची</u>**

२६ जुलै रोजी कारगिल युद्धाला १६ वर्षे पूर्ण होतील. मात्र अजूनही या युद्धाची वीरगाथा प्रत्येक भारतीयाच्या मनामध्ये तितकीच जिवंत आहे. आजपर्यंतच्या युद्धांपैकी केवळ कारगिल युद्धाचा प्रसार वर्तमानपत्रे आणि दूरचित्रवाणी वाहिन्यांवर फार मोठ्या प्रमाणात करण्यात आला. या युद्धावर अनेक पुस्तकेही प्रकाशित झालेली आहेत. कारगिल, लेह हा भाग समुद्रसपाटीपासून १३ हजार ते १८ हजार फुट उंचीवर आहे. तिथे वर्षांतून सहा महिने बर्फ पडतो आणि जमीनीवर बर्फ साचलेला असतो. उणे ३० ते उणे ४० इतके तापमान या भागात असते. यामुळे १९९९ साली लडाख ते कारगिलपर्यंतच्या या मोठ्य सीमेवर फक्त एक ब्रिगेड म्हणजे केवळ तीन ते चार हजार सैनिक तैनात केलेले होते. काश्मीरच्या सीमेवर सुमारे दोन लाख सैनिक पहारा देत आहेत. पण कारगिल येथे काश्मीरपेक्षा दुप्पट लांब असलेल्या सीमेवर केवळ तीन ते चार हजार सैनिक होते. पाकिस्तानी सैन्याने भारतीय सैन्य पहारा देत नसलेल्या कारगिलच्या डोंगरांवरती आपले सैनिक घुसवून वर्चस्व प्रस्थापित केले. पाकिस्तानी सैन्य आपल्या सिमेच्या आत घुसले आहे हे कळायला सुमारे तीन महिने लागले.

**<u>२६ जुलै ‘कारगिल विजय दिवस</u>**

भारतीय सैन्याला ही गोष्ट समजल्यानंतर भारतीय हद्दीतून पाकिस्तानी सैन्याला हुसकावून लावण्यासाठी भारतीय सैन्याने ‘ऑपरेशन विजय ही

मोहिम राबविली. सुरूवातीला हे आमचे सैनिक नसून दहशतवादी असल्याचा कांगावा पाकिस्तानने केला, मात्र हे खरे नव्हते. पाकिस्तानी सैन्याच्या नॉर्दन लाईट इन्फंटड्ढीच्या ११हून अधिक बटालियन्स (एका बटालियनमध्ये ७५० ते १००० सैनिक असतात) यांनी कारगिलच्या वेगवेगळ्या भागांमध्ये घुसखोरी केली होती. त्यांना हुसकावून लावण्यासाठी भारतीय सैन्याने १० ते १५ हजार सैनिकांच्या दोन तुकड्या युद्धभूमीवर उतरवल्या होत्या. २६ जुलै रोजी शैवटच्या पाकिस्तानी सैनिकाला मारण्यात आल्याने हा दिवस ‘कारगिल विजय दिवस म्हणून साजरा केला जातो.

**<u>५४३ अधिकारी आणि जवान युद्धात शहीद</u>**

जगातील सर्वांत उंच पर्वतरांगांमध्ये कारगिलचे युद्ध झाले होते. याआधी इतक्या उंचीवर कोणतेही युद्ध झालेले नाही. या युद्धात पाकिस्तानचे साडेचार हजाराहून अधिक सैनिक मारले गेले तर भारताचे ५४३ अधिकारी आणि जवान या युद्धात शहीद झाले. १३००हून अधिक भारतीय सैनिक/अधिकारी यात गंभीर जखमी झाले होते. या युद्धात सुरवातीला लेफ्टनंट सौरभ कालिया यांना पाकिस्तानी सैन्याने कुठपर्यंत घुसखोरी केली आहे हे शोधून काढण्याची कामगीरी सोपविण्यात आली. आपल्या तुकडीबरोबर गस्तीसाठी गेले असता पाकिस्तानी सैन्याने त्यांच्यावर जोरदार हल्ला केला. यात लेफ्टनंट सौरभ कालिया यांच्यासह काही भारतीय जवान पकडले गेले. त्यानंतर त्यांना अतिशय क्रूरपणे मारण्यात आले. लेफ्टनंट कालिया यांचे वडील आजही त्यांच्या मारेकर्यांना कठोर शिक्षा मिळावी यासाठी प्रयत्न करत आहेत.

कारगिल युद्धातला दुसरे हिरो कॅप्टन विक्रम बत्रा हे होते. सिंहाइतका शुर असल्याने बत्रा यांना त्यांचे सैनिक शेरशहा म्हणत असत. कारगिल युद्धाच्या केवळ दीड वर्षे आधी भारतीय सैन्यात सामिल झालेल्या कॅप्टन विक्रम बत्रा यांनी एक ऐतिहासिक कामगिरी केली. कारगिलचे पहिले

शिखर जिंकल्यानंतर प्रसिद्धी माध्यमांनी त्यांना पुढे काय असे विचारले असता, ‘जेवढा प्रदेश जिंकला तेवढा पुरेसा नाही, ‘ये दिल माँगे मोअर‘ अशी प्रतिक्रीया कॅप्टन बत्रा यांनी दिली. त्यांच्यामुळेच ‘ये दिल माँगे मोअर हे वाक्य प्रसिद्ध झाले. त्यानंतर पॉइंट ५१४०च्या वरती असलेल्या पाकिस्तानी सैन्यावर चालून जाण्याची कामगिरी कॅप्टन बत्रा यांच्याकडे सोपविण्यात आली. त्यांनी पॉइंट ५१४० जिंकला, मात्र त्यात ते शहिद झाले. युध्दाआधी, मी ‘भारताच्या ध्वजामध्ये लपेटूनच परत येईल असे कॅप्टन बत्रा म्हणाले होते. ते खरे ठरले. या युद्धातले सगळ्यात पहिले ‘परमवीर चक्र कॅप्टन बत्रा यांना प्रदान करण्यात आले.

**<u>युद्धभूमीला भेट द्या</u>**

त्यानंतर लेफ्टनंट विजयंत थापर यांना ‘थ्री पिंपल्स या शिखरावर पाठविण्यात आले. यात त्यांच्या दोन राजपुताना रायफल्सचे कंपनी कमांडर मेजर आचार्य शहिद झाले. २२ वर्षांचे विजयंत काही महिन्यांपुर्वीच सैन्यात अधिकारी झाले होते. विजयन यांनी ‘थ्री पिंपल्स या १७ हजार फुट उंचीवर असलेल्या शिखरावर भारताचा झेंडा फडकवला; पाकिस्तानचे १५० सैनिक असलेल्या या शिखरावर चढण्यासाठी थापर यांनी तानाजी मालुसरे यांच्याप्रमाणेच सर्वांत अवघड कड्याची निवड केली होती. विजयन यांच्या शौर्याबद्दल त्यांना विरचक्र प्रदान करण्यात आले. मात्र त्यात त्यांना विरगती प्राप्त झाली. विजयन यांनी मोहिमेवर जाण्याआधी आपल्या कुटुंबियांसाठी एक पत्र लिहले होते. मी परत आलो नाही तरच हे पत्र माझ्या कुटुंबियांना पाठवावे असे त्यांनी सांगितले होते. या पत्रात त्यांनी आपले वडील निवृत्त कर्नल व्हि. एन. थापर यांना युद्ध संपल्यानंतर आम्ही किती कठीण परिस्थितीमध्ये लढलो हे पाहण्यासाठी या युद्धभूमीला भेट द्या असे म्हटले होते. ७८ वर्षे वयाचे निवृत्त कर्नल व्हि. एन. थापर हे दरवर्षी २६ जुलै रोजी कारगिल येथील १८ हजार फुटांवरच्या विरभूमीवर जाऊन सैनिकांना श्रद्धांजली अर्पण करत आहेत.

ते पत्र अजरामर झाले आहे.

**<u>परमविर कॅप्टन मनोज पांडे, ग्रेनेडियर योगेंद्रसिंग यादव, शिपाई संजय कुमार यांची विरगाथा</u>**

कॅप्टन मनोज पांडे यांनी ‘खालुबर नावाच्या शिखरावर हल्ला करून ते शिखर पाकिस्तानकडून परत मिळवले. त्यात कॅप्टन मनोज पांडे यांना विरगती प्राप्त झाले. त्यावेळी आपल्या तुकडीतील सैन्याला उद्देशून शेवटचे दोन शब्द काढले होते. ते शब्द ‘ना छोडनू असे होते. नेपाळी भाषेतील या शब्दांचा अर्थ ‘दुश्मनांना सोडू नका असा होता. २४ वर्षांच्या मनोज पांडे यांना मरणोपरांत ‘परमवीर चक्र प्रदान करण्यात आले. या युद्धात ग्रेनेडियर योगेंद्रसिंग यादव यांनी आपल्या प्लाटूनबरोबर ‘टायगर हिलवर हल्ला केला होता. त्यांनी ‘टायगर हिलवरती भारताचा तिरंगा फडकवला. यात ते गंभीर जखमी झाले होते. त्यांना ‘परमवीर चक्र प्रदान करण्यात आले. १३ जॅक रिफच्या सिपाही संजय कुमार यांना ‘पॉईंट ४८७७वर जाण्याचा आदेश मिळाला. संजयकुमार यांनी पाकिस्तानी सैन्यावरती जोरदार हल्ला करून तीन जवानांना यमसदनी धाडले. यात ते गंभीर जखमी झाले होते. त्यांना परमवीर चक्र प्रदान करण्यात आले आहे. या युद्धात अनेक अधिकारी आणि जवान गंभीर जखमी झाले होते. त्यात मेजर डी. पी. सिंग यांना गंभीर जखमी झाल्यानंतर आपला एक पाय गमवावा लागला होता. तरीही त्यांनी हार मानली नाही. ते आजही कृत्रिम पाय लावून धावण्याच्या शर्यतीत भाग घेत असतात. ते भारताचे अग्रणी ‘ब्लेड रनर म्हणून ओळखले जातात. गंभीर जखमी झाल्यानंतर अवयव गमावलेले अनेक जवान आहेत. तरीही आपल्या अपंगत्वावर मात करत ते जीवन जगत आहेत.

**<u>तरूण अधिकारी आणि शुर जवानांचे युद्ध</u>**

कारगिल युद्ध हे तरूण अधिकारी आणि त्यांच्या हाताखाली असलेल्या शुर जवानांचे युद्ध होते. हा भाग प्रचंड डोंगराळ असल्याने या भागात

तंत्रज्ञान अणि क्षेपणास्त्रांचा फारसा उपयोग होत नव्हता. हे युद्ध पायदळाचे युद्ध होते. पाकिस्तानी सैन्यावर प्रत्यक्ष हल्ला करून त्यांना मारावे लागत होते. या युद्धात शहिद झालेले जवान आणि अधिकारी २० ते २६ या वयोगटातील होते. आपले ३६ अधिकारी, ५७६ सैनिक आणि हवाई दलाचे पाच जवान शहिद झाले. शहिद झालेल्या अधिकार्याची रँक लेफ्टनंट, मेजर, कॅप्टन, लेफ्टनंट कर्नल अशी होती. पाकिस्तानकडून होणारी घुसखोरी रोखण्यासाठी भारताच्या अनेक बुद्धीमान अधिकारी, सैनिकांनी आपले प्राण अर्पण केले.

या युद्धात चार परमवीर चक्र, चार महावीर चक्र, २९ वीर चक्र आणि ५२ सेना मेड्ल प्रदान करण्यात आले होते. या युद्धात १८ ग्रेनेडियर्स, २ राजपुताना रायफल्स, १३ जम्मु आणि काश्मीर रायफल्स, १८ गढवाल रायफल्स आणि ८ सिख रेजीमेंट या सैन्य तुकड्यांनी विशेष पराक्रम गाजवला. मोठा पराक्रम गाजवल्याने या तुकड्यांचा ‘युनिट सायटेशनने गौरविण्यात आले.

**<u>पाकिस्तानने घुसखोरी का केली?</u>**

पाकिस्तानने भारताच्या हद्दीत घुसखोरी करण्याला दोन कारणे होती. पाकिस्तानला सियाचिन सीमेवर असलेल्या भारतीय सैन्याची रसद तोडण्याकरीता कारगिल-श्रीनगर या मार्गावर कब्जा करायचा होता. दुसरे म्हणजे, सैन्याने जम्मु काश्मिरमध्ये चांगले काम केल्यामुळे तेथील दहशतवाद्यांचे कंबरडे मोडले होते. त्यामुळे या दहशतवादाला पुन्हा पुनरजिवीत करण्यासाठी पाकिस्तानी सैन्याने याआधी दुर्लक्षित असलेल्या भागाकडे भारतीय सैन्याचे लक्ष एकवटण्यास भाग पाडले. कारगिलच्या युद्धानंतर या भागात तीन ते चार हजार सैन्य असणार्या या भागात दोन तुकड्या म्हणजेच १५ ते २० हजार सैन्याची नेमणूक करण्यात आली आहे. त्यामुळे तेवढेच सैनिक काश्मीर खोर्यातून कमी झालेले आहे. त्यामुळे यानंतरच्या काळात काश्मीरमधला दहशतवाद मोठ्या प्रमाणावर

वाढला होता. आता पुन्हा या दहशतवादावर नियंत्रण मिळवले आहे. कारगिलच्या युद्धानंतर भारतीय सैन्याने द्रास भागात एक युद्धस्मारक बांधलेले आहे. कारगिलला भेट देणारे अनेक पर्यटक या युद्धस्मारकाला भेट देत असतात. तिथे गेल्यानंतर कारगिलचे युद्ध झालेली अनेक शिखरे तेथून दिसतात. त्यामुळे या भागात लढणे किती अवघड असते याची प्रचिती आपल्याला येते. कारगिल युद्धावरती ‘एलओसी कारगिल, ‘स्वर्णगाथा,मिशन फ़त्ते‘ असे अनेक चित्रपट निघाले, त्यांना चांगला प्रतिसाद मिळाला होता.

**<u>गरज शूर सैनिक आणि देशप्रेमी नागरिकांचीही</u>**

या युद्धात आपले रक्त सांडून आपल्या तरुण अधिकारी आणि सैनिकांनी पाकिस्तानी सैन्याला पिटाळून लावत आपल्या मायभूमीचे रक्षण केले. लढाईत शस्त्र आणि सैनिक हे दोन घटक महत्त्वाचे असतात. मात्र कोणतेही शस्त्र चालविण्याकरीता असणारा सैनिक सर्वांत जास्त महत्त्वाचा असतो आणि सैनिक सदैव सतर्क असतील तर देश सुरक्षित राहतो. म्हणूनच भारतीय नागरिकांनी आणि सरकाने आपल्या सैनिकांची काळजी घेतली पाहिजे. आपल्याला धोका निर्माण झाल्यावरच देव आणि सैनिक यांची नेहमीच आठवण येते. मात्र आलेले संकट संपल्यावर आपण या दोघांनाही विसरतो. जे राष्ट्र आपल्या सैनिकांना विसरते ते राष्ट्र कधीही सुरक्षित राहू शकत नाही आणि महासत्ताही बनू शकत नाही. आजच्या घडीला देशाच्या सुरक्षिततेला बहुआयामी धोके आहेत. यासाठी मोठ्याप्रमाणावर सैन्याबरोबरच देशप्रेमी नागरिकांचीही भारताला गरज आहे. २६ जुलै ‘कारगिल विजय दिवसाच्या निमित्ताने देशाकरता प्राणार्पण करणार्या, भारतीय सशस्त्र दलांतील शूर अधिकारी आणि सैनिकांना, देशवासीयांची आदरांजली. शूरांतील शूर लोकांच्या आकाशगंगेत त्यांच्या आत्म्यांना शांती लाभो.

**<u>२६ जुलै २०१५कारगिलची पुनरावृत्ती होईल का?</u>**

येत्या २६ जुलै रोजी कारगील युद्धाला १६ वर्षे पूर्ण होत आहेत. या युद्धापासून आपण काय शिकलो याबाबत विचार करण्याची गरज आहे. किंबहुना कारगिलसारखी परिस्थिती भविष्यात उद्‌भवली तर त्यासाठी आपण सक्षम आहोत की नाही हेही पाहणे गरजेचे आहे. भारताच्या उत्तरेकडील सीमेबरोबरच समुद्री सीमा,अंदमान-निकोबार, लक्षद्वीप बेटांचे रक्षण, भारत-चीन सीमा, ईशान्य भारततातिल बंडखोरी, बांगलादेशी घुसखोरी, माओवाद/नक्षलवाद, दहशतवाद अशी अनेक आव्हाने आज भारतासमोर आहेत. लष्कर आणि गुप्तचर यंत्रणांची ताकद वाढवून आपण या संकटांचा सामना करू शकतो. मात्र त्यासाठी प्रचंड राजकीय इच्छाशक्ती आणि निधीची गरज आहे.

२६ जुलै रोजी कारगीलच्या युद्धाला १६ वर्‌षे पूर्ण होत आहेत. यानिमित्ताने कारगील युद्धातून आपण काय शिकलो हे समजून घेणे महत्त्वाचे आहे. कारगीलसारखे युद्ध भारतासमोर पुन्हा येऊ शकते का यावरही चर्चा होणे गरजेचे आहे. कारगीलच्या युद्धानंतर सुब्रमण्यम यांच्या अध्यक्षतेखाली ‘कारगील रिव्हयू कमीटीची‘ स्थापना करण्यात आली होती. कारगील युद्धादरम्यान आपल्या काय चुका झाल्या आणि यापुढे कोणती काळजी घेणे गरजेचे आहे हे तपासण्याचे काम या समितीचे होते. या समितीच्या अहवालात अनेक सुधारणा सुचविल्या होत्या. लवकरात लवकर सैन्याचे आधुनिकीकरण करणे, सीमेवरती रस्त्यांचे जाळे निर्माण करणे, सैन्यामधील रिक्त जागा भरण्यास या समितीने सांगितले होते. मात्र १६ वर्ष उलटूनही या समितीच्या सुचनांवर पुरेशी कार्यवाही करण्यात आली नव्हती. मात्र गेल्या वर्षभरात सैन्याच्या आधुनिकीकरणाला गती मिळालेली आहे. सैन्यदलाचे बजेट दरवर्षी २५ टक्क्यांनी वाढविले तरीही सैन्यदलाचे आधुनिकीकरण करण्यास दहा ते पंधरा वर्ष लागू शकतात. सध्याचे सरकार या आधुनिकीकरणासाठी प्रयत्न करेल आणि सीमेवर रस्ते बांधण्यासाठी ठोस पावले उचलेल अशी अपेक्षा

आहे.

**पुन्हा कारगीलसारखे युद्ध होणार का?**

ज्या लेह लडाख भागात कारगीलचे युद्ध झाले त्या भागात आपले सैन्य फार कमी होते. या भागात भारतीय लष्कराने सैन्याची संख्या आणि पेटड्ढोलिंग वाढविल्यामुळे या भागात पुन्हा कारगील युद्धासारखी परिस्थिती निर्माण होणे जवळपास अशक्य आहे. तो भाग आता सुरक्षित झाला आहे. मात्र लडाखच्या भारत-चीन सीमेवर अद्यापी सैन्याची संख्या फारच कमी आहे. त्या भागात कारगीलसारखी परिस्थिती उद्भवू शकते. त्यामुळे हे होऊ नये यासाठी १७ माऊंटन स्ट्राईक कोर नावाची एक नवी लष्करी तुकडी तयार करावी असे सुचवले होते. आजच्या घडीला पैसे मिळाले तरी आगामी तीन ते चार वर्षांत ही तुकडी तयार होऊ शकते.

**निर्मनुष्य बेटांवर दहशतवादी तळ प्रस्थापित होण्याचा धोका**

भारताकडे अंदमान आणि निकोबार तसेच लक्षद्विप, मिनीकोय हे दोन द्विपसमुह आहेत. अंदमान आणि निकोबारच्या ६५० बेटांपैकी केवळ २८ बेटांवरच मनुष्य वस्ती आहे. उर्वरित बेटांवर मनुष्यवस्ती नसल्यामुळे तसेच त्या भागात सैन्य नसल्यामुळे समुद्री लुटेरे किंवा दहशतवादी तेथे आपले तळ बनवू शकतात अशी भीती आहे. त्यामुळे या बेटांवरती कोस्टगार्ड, नौदल, तसेच हवाई दलाच्या माध्यमातून पेट्रोलिंग वाढविण्याची गरज आहे. अशी बेटे शत्रुने ताब्यात घेतल्यास ती बेटे परत मिळविण्याची ताकद आपल्या सैन्यात असणे गरजेचे आहे. अंदमान आणि निकोबारमध्ये सैन्याच्या दोन बटालियन्स तैनात करण्यात आलेल्या आहेत. प्रत्येक बेटावर सैन्य ठेवायचे असल्यास मोठ्या प्रमाणावर सैनिकांची तसेच पैशांची आवश्यकता भासणार आहे. त्यामुळे सध्यातरी या भागात टेहाळणीचा पर्यायच लष्कराने स्वीकारला आहे. या भागात कोणीही आक्रमण करण्याचा प्रयत्न केल्यास तो हाणून पाडण्याची क्षमता भारतीय सैन्यामध्ये आहे.

अरबी समुद्रातील लक्षद्विप समुहावरही अशीच परिस्थिती आहे. सोमालियन चाचे, पाकिस्तान आणि मालदिव या भागातील दहशतवादी या भागातून जात असल्याची शक्यता गुप्तहेर खात्याने कायमच वर्तवली आहे. त्यामुळे या द्विपसमुहावरतीही लक्ष ठेवण्याची गरज आहे. मात्र ही बेटे आंदमान-निकोबर द्विपसमुहाच्या तुलनेत लक्षद्विप बेटे भारतीय सीमेपेक्षा जवळ असल्याने गरज पडल्यास दहशतवाद्यांना हुसकावण्यासाठी आपल्या सैन्याला लागणार्या बोटी आणि विमाने तयार आहेत. त्यामुळे या बेटाच्या सुरक्षेची जास्त काळजी करण्याची गरज नाही.

भारताच्या समुद्री सीमा आजही असुक्षित आहेत. २६/११च्या हल्ल्यानंतर कोस्टगार्ड, नौदल, पोलीसांकडे असलेल्या बोटी, रडारांची संख्या वाढलेली असली तरीही अजूनही किनारपट्टीवरून अतिरेक्यांची घुसखोरी, शस्त्रे, बनावट नोटा, अंमली पदार्थांची तस्करी सुरूच आहे. त्यामुळे सागरी सुरक्षा अजून सक्षम करण्याची गरज आहे.

**<u>युद्धाचे स्वरूप बदलत आहे</u>**

आगामी काळात कारगीलसारखी युद्धे कमी होतील आणि युद्धाचे स्वरूप बदलण्याची शक्यता आहे. त्यामुळे केवळ कारगीलसारख्या युद्धासाठीच तयार राहणे शहाणपणाचे ठरणार नाही. आपल्या शत्रुंनी कोणत्याही प्रकारचे युद्ध लादले तर त्या युद्धाला चोख प्रत्युत्तर देता आले पाहिजे. सध्या पाकीस्तानने भारताच्या अंतर्गत सुरक्षेची परिस्थिती गंभीर करून ठेवलेली आहे. काश्मीरमध्ये रोजच फडकणारे इसिस आणि पाकिस्तानी झेंडे पाहता काश्मीरमध्ये छुपे युद्ध पुकारण्यात आले आहे की काय असा प्रश्न निर्माण होतो. याशिवाय ईशान्य भारतातील काही बंडखोरांनी नुकतेच आपल्या काही जवानांना ठार मारले होते. त्याला प्रत्यूत्तर म्हणून आपल्या सैनिकांनी म्यानमारच्या सीमेत घुसून बंडखोरांना यमसदनी पाठविले होते. ईशान्य भारतात दहशतवादी कारवाया करणार्या अतिरेक्यांचे टड्ढेनिग

कॅम्प मुख्यत्वेकरून म्यानमारमध्ये आहेत. चीन आणि बांग्लादेशमध्येही या दहशतवाद्यांचे कॅम्प आहेत. अशा दहशतवाद्यांची घुसखोरी थांबविण्यासाठी प्रयत्न केले पाहिजे. एखादा दहशतवादी आत आलाच तर, दहशतवादविरोधी कारवाई करून त्याला संपवले पाहिजे.

**<u>माओवाद देश पोखरतोय</u>**

मध्य भारतामध्ये मोठ्या प्रमाणावर माओवाद पसरलेला आहे. या माओवाद्यांना चीन आणि पाकिस्तानकडून मोठ्या प्रमाणावर आर्थिक आणि शस्त्रांची मदत केली जाते. सध्यातरी माओवाद्यांसोबत लढण्यात आपण कमी पडत आहोत. भारताच्या काही भागांमध्ये होणारे हल्ले थांबविणे हे देशासमोरचे मोठे आव्हान आहे. अशा दहशतवादी कारवाया करणार्यांना गुप्तहेर खात्यामार्फत शोधून काढण्याची गरज आहे. त्यासाठी आपले गुप्तहेर खाते अजून सक्षम करण्याची गरज आहे.

भारत-पाकिस्तान सीमेकडे सर्वांचेच लक्ष असते. मात्र भारत-चीन, भारत-नेपाळ, भारत-म्यानमार, भारत-बांगलादेश, भारत-श्रीलंका येथूनही दहशतवाद्यांची घुसखोरी कायमच सुरू असते. या सर्व सीमा सुरक्षित करण्याची गरज आहे. कारगीलसारखी लढाई होण्याची शक्यता केवळ लद्दाखच्या काही भागातच आहे. याशिवाय अंदमान-निकोबार, लक्षद्विप बेटांवर अशा प्रकारची घुसखोरी होऊ शकते. त्यामुळेच आपण आपले टेहाळणी सामर्थ्याबरोबरच शत्रुला नमोहरम करण्याचेही सामर्थ्य आपल्याकडे असायला हवे. चीन, पाकिस्तानसह भारताच्या इतर शत्रुंनी भारताच्या अंतर्गत सुरक्षेची अनेक आव्हाने आपल्यासमोर आहेत. यासाठी आपल्याला आपल्या सीमा अजून सुरक्षित कराव्या लागणार आहेत. अर्थातच गेल्या काही वर्षांमध्ये आपल्या सीमा काही प्रमाणात सुरक्षित झालेल्या असल्या तरी अजूनही त्या पूर्णपणे सुरक्षित झालेल्या नाहीत. भारतासमोरील सुरक्षेची आव्हाने बहुआयामी आहेत. वेगवेगळ्या प्रकारच्या युद्धांना सामोरे जाण्यासाठी लष्कराची ताकद वाढविण्याची गरज आहे.

कारगील दिवसाच्या निमित्ताने आपले सरकार या सगळ्या सुरक्षेच्या पैलूंवरती विचार करेल अशी अपेक्षा आहे.

**<u>शस्त्रापेक्षा शस्त्र चालवणारा सैनिक जास्त महत्त्वाचा</u>**

द्रास गावामध्ये आता एक स्मारक बांधलेले असून तेथे अनेक पर्यटक भेटीसाठी जातात. तिथे गेल्यानंतर शिखरे दिसतात आणि लढाई किती अवघड होती याचा बघणार्यांला अंदाज येतो. नकळतपणे कारगिल युद्धामध्ये लढलेल्या सैनिकांपुढे आणि वीरगती मिळालेल्या शहिदांपुढे आपण नतमस्तक होतो. कारगिलच्या  युद्धावर काही चित्रपट देखील निघाले आणि ते गाजले देखील. तरुणांनी कारगिल युद्धामध्ये पराक्रम गाजवला आणि त्याचा आपल्याला अभिमान देखील आहे पण आपल्याकडे या पराक्रमाला किंवा सैनिकांच्या या बलिदानाला पाहिजे तसे महत्त्व दिले जात नाही. आपण केवळ सैनिकांना वीरगती मिळाली एवढाच उल्लेख करतो. बहुतेकवेळा त्या सैनिकांचे नावदेखील आपल्याला ठाऊक नसते. या शहिदांचे स्मरण ठेवून आपण त्यांच्यामुळे आज सुरक्षित आहोत ही भावना कायम मनात जपली पाहिजे. कितीही मोठे तंत्रज्ञान आले तरी युद्ध जे जिंकले जाते ते सैनिक जिंकतात.कुठलाही देश किती सुरक्षित आहे हे त्याच्याकडे किती शस्त्रसाठा आहे यावरून ठरत नसते तर त्यांच्याकडे असणार्या सैनिकांवरून ठरत असते. एका म्हणी नुसार 'देव आणि सैनिकांवर आपण सर्वच प्रेम करतो. पण जेव्हा आपल्याला किंवा देशाला धोका निर्माण झाले तेव्हाच त्यांची आठवण येते. ते संकट जाते तेव्हा आपण त्यांना विसरतो. जे राष्ट्र आपल्या सैनिकांना विसरते ते राष्ट्र कधीही मोठे होऊ शकत नाही. आजच्या घडीला देशाच्या सुरक्षिततेला बहुआयामी धोके आहेत. त्यासाठी सक्षम सैन्यबल गरजेचे आहे. इतकेच नाही तर देशातील प्रत्येक नागरिकाने देशप्रेम जागृत ठेवून आपले कर्तव्य पार पाडले तर या बहुआयामी धोक्यांना आपण परतवून लावू शकतो.

## २३ ऑगस्ट २०१५न संपणार्या विवरात पाकिस्तान

आपल्याकडे ‘पेराल ते उगवतेङ्क अशी एक म्हण आहे. ही म्हण तंतोतंत लागू पडणारे जगातील एक प्रमुख राष्ट्र म्हणजे पाकिस्तान. आजवर भारताविरुद्ध आणि जगाविरुद्धच्या दहशतवादाला खतपाणी घालणार्या पाकिस्तानची अवस्था आज दयनीय झाली आहे. तेथे अंतर्गत दहशतवादाने थैमान घातले असून पंजाब या पाकिस्तानचे हृदय समजल्या जाणार्या प्रांतात नुकत्याच झालेल्या आत्मघाती हल्ल्यामध्ये तेथील गृहमंत्र्यांचा मृत्यू झाला आहे. वास्तविक, पेशावरमधील हल्ल्यानंतर धडा घेऊन पाकिस्तानने दहशतवादाचे समूळ उच्चाटन करण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे होते; मात्र तेथील सरकार केवळ त्यांच्याविरुद्ध कारवाया करणार्या दहशतवाद्यांविरुद्ध मोहीम राबवते आहे. त्याचवेळी अफगाणिस्तानात हिंसाचार करणार्या आणि भारताविरुद्ध कारवाया करणार्या गटांना मदत केली जात आहे. अशाने हे दुष्टचक्र कधीही संपणारे नाही. याची परिणती महाभीषण असेल हे नक्की !

**पाकिस्तानमध्ये दहशतवाद वाढत आहे**

पाकिस्तानातील पंजाब प्रांताचे गृहमंत्री शुजा खानजादा हे १५ ऑगस्ट रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्यामध्ये ठार झाले. त्यांच्यावर दोन आत्मघातकी  दहशतवाद्यांनी हल्ला केला. यामध्ये संरक्षण दलाचे इतर १३ सैनिकही मरण पावले आहेत. तसेच अन्य १७ जण जखमी झाले आहेत. पाकिस्तानातील सर्वांत मोठी दहशतवादी संघटना तेहरिक ए तालिबान पाकिस्तानने या हल्ल्याची जबाबदारी स्वीकारली आहे. गृहमंत्री खानजादा हे पाकिस्तानी सैन्यामधून कर्नल या पदावरून निवृत्त झाले होते. आपल्या गावामध्ये जनता दरबारामध्ये बोलत असतानाच आत्मघातकी हल्लेखोराने त्यांच्यावर हल्ला केला. २०१४ मध्येच खानजादा यांनी पंजाब प्रांताचे गृहमंत्री पद स्वीकारलेले होते. त्यानंतर पंजाबमध्ये वाढणारा दहशतवाद निपटून टाकण्यासाठी त्यांनी पुष्कळ प्रयत्न केलेले

होते. मागच्याच महिन्यामध्ये पाकिस्तानमध्ये अल् कायद्याचा प्रमुख मारला गेल्याची घोषणा केली होती. त्यामुळे त्यांना अनेक दहशतवादी संघटनांकडून धमक्या मिळत होत्या.

गेल्या दहा वर्षांपासून पाकिस्तानमध्ये दहशतवाद मोठ्या प्रमाणात वाढत आहे. याचे मुख्य कारण पाकिस्तान दहशतवाद्यांना आपले एक सामरिक शस्त्र समजतो. भारताविरुद्ध काश्मिरमध्ये गेल्या अनेक वर्षांपासून या दहशतवाद्यांचा वापर पाकिस्तानकडून केला जात आहे. पण त्यामुळे दहशतवादाच्या भस्मासुराने थैमान घातले असून तेथे दहशतवाद्यांची संख्याही मोठ्या प्रमाणात वाढत आहे.

**पाकिस्तानमध्ये तीन प्रकारच्या दहशतवादी संघटना**

पाकिस्तानमध्ये अनेक प्रकारच्या दहशतवादी संघटना असून त्यांची विभागणी प्रामुख्याने तीन प्रकारात करता येते. यापैकी लष्करे तैय्यबा, हिजबुल मुजाहिद्दीन, जैश ए मोहम्मद यांसारख्या अतिरेकी संघटना या प्रामुख्याने भारताविरोधी कारवाया करत असतात; तर इतर काही संघटना या प्रामुख्याने पाकिस्तानी सरकार आणि पाकिस्तानी सैन्याविरुद्ध त्यांच्याच देशात कारवाया करत असतात. यामध्ये प्रामुख्याने उल्लेख करावा लागतो तो तेहरिक ए तालिबान आणि पाकिस्तान या संघटनेचा. याखेरीज तिसर्या प्रकारच्या संघटना या पाकिस्तानमध्ये गेल्या काही वर्षांपासून जोर धरत असलेल्या स्वतंत्रता चळवळींमध्ये सहभागी होताना दिसतात. आज बलुचिस्तान लिबरेशन आर्मी ही संघटना वेगळ्या बलुचिस्तानसाठी प्रयत्न करत आहे. याशिवाय सिंध प्रांतामध्येही स्वतंत्रता चळवळ मोठ्या प्रमाणावर सुरू आहे. याखेरीज अनेक दहशतवादी संघटना पाकिस्तानातील ख्रिश्चन, शिख, हिंदू आणि मुस्लिमांमधील काही जमाती अशा अल्पसंख्यांकांविरुद्ध कारवाया करत आहेत. अशा संघटनांची संख्याही मोठी आहे. याशिवाय जगभरात दहशतवाद माजवणार्या काही अतिरेकी संघटनांचे मूळही पाकिस्तानात आहे. यामध्ये तालिबानच्या

वेगवेगळ्या संघटनांचा समावेश होतो. यामध्ये अल् कायदाचा उल्लेख करावा लागेल. ही संघटना जागतिक दहशतवादी संघटना असून अफगाणिस्तानामध्ये सध्या या संघटनेने प्रचंड धुमाकूळ घातलेला आहे. अल्कायदासारखे हे दहशतवादी गट पाकिस्तानातील वझिरिस्तान, फताह या भागातून अफगाणिस्तानमध्ये हल्ले करतात.

यामध्ये पाकिस्तानच्या दृष्टीने चांगले दहशतवादी गट (गुड टेरोरिझम) अशी ज्यांची व्याख्या केली जाते त्यामध्ये फक्त भारताविरुद्ध कारवाया करणार्या अतिरेकी संघटनांचा समावेश आहे. इतर संघटनांकडे पाकिस्तान सरकार वाईट दहशतवादी गट (बॅड टेरोरिझम) या दृष्टीने पाहते. या अतिरेकी संघटनांच्या सततच्या हिंसक कारवायांमुळे पाकिस्तान पूर्णपणे पोखरून गेला आहे. गेल्या काही वर्षांपासून वाढलेल्या हिंसाचाराचे आकडे हे भीषण आहेत. २००३ पासून १० ऑगस्ट २०१५ पर्यंत पाकिस्तानमध्ये २० हजार ५३२ सामान्य नागरिक, ६२२९ सैनिक आणि पोलिस, ३१६६८ वेगवेगळ्या गटांचे दहशतवादी मारले गेलेले आहेत. म्हणजेच पाकिस्तानमधील हिंसाचार हा भारताच्या तुलनेने दहापटींनी जास्त आहे. पाकिस्तानातील सर्वच प्रांतात दहशतवाद पसरलेला आहे. पण सर्वाधिक दहशतवादी हे अफगाणिस्तानजवळच्या फताह (फेडरली अॅडमिनिस्टर्ड ट्रायबल एरिया) आणि उत्तर वझिरिस्तानमध्ये आहेत. याच भागामध्ये पाकिस्तानी सैन्याविरुद्ध कारवाया करणार्या तेहरिक ए तालिबान पाकिस्तान या संघटनेचेही मोठे जाळे आहे.

**अल्पंख्यांकांविरुद्ध २२२हून अधिक दहशतवादी हल्ले**

गेल्या काही वर्षांपासून पाकिस्तानी सैन्य या संघटनेविरुद्ध दहशतवादविरोधी मोहिम राबवण्याचा प्रयत्न करत आहे; मात्र यामध्ये त्यांना फारसे यश मिळालेले नाही. पाकिस्तानात घडणार्या हिंसाचाराचा गेल्या एक वर्षाचा अभ्यास केला तर असे दिसते की मरणार्यामध्ये

शियांची संख्या लक्षणीय आहे. अनेक सुन्नी दहशतवादी संघटना शियापंथियांना मारण्याचा प्रयत्न करत आहेत. संयुक्त राष्ट्रसंघाच्या कमिशन ऑन इंटरनॅशनल रिलिजन्स फ्रीडमच्या अहवालानुसार २०१४ या एका वर्षामध्ये अल्पंख्यांकांविरुद्ध २२२हून अधिक दहशतवादी हल्ले झाले आहेत. यामध्ये ४३० अल्पसंख्यांक मारले गेले असून त्यात शिया, अहमदिया, शिख, हिंदू, ख्रिश्चन यांचा समावेश आहे. तेहरिक ए तालिबान पाकिस्तान ही संघटना सध्या वेगवेगळ्या प्रकारचे दहशतवादी हल्ले करत आहे. यामध्ये सुसाईड बॉम्बिंग म्हणजेच आत्मघाती हल्ले करून पाकिस्तानी सैनिकांना आणि महत्त्वाच्या नेत्यांना मारण्याचा प्रयत्न करत आहे. २०१४ ते २०१५ या काळात या संघटनेने असे अनेक हल्ले केलेले आहेत. यामध्ये सर्वांत भीषण हल्ला हा पेशावरमधील पाकिस्तानी सैन्याच्या शाळेवर केला गेला. या हल्ल्यात १३५ शाळकरी मुले मारली गेली. यानंतर पाकिस्तान सरकारने या संघटनेविरुद्ध सुरू असलेली युद्धमोहीम अधिक तीव्र केली. या मोहिमेला ‘झर्ब ए अज्ब असे नाव आहे. पाकिस्तानी सैन्याने या मोहिमेअंतर्गत एका वर्षामध्ये २००० हून अधिक दहशतवाद्यांना ठार मारण्यामध्ये यश मिळवले आहे, असे सांगण्यात येते. यामध्ये पाकिस्तानी लष्कराचे २०० सैनिक मारले गेले असून अनेक जण जखमी झालेले आहेत. तथापि, पाकिस्तानी लष्कराने मारलेल्या या दहशतवाद्यांच्या आकडेवारीला तेथील माध्यमांकडून दुजोरा मिळताना दिसत नाही. याचे कारण ज्या भागात ही मोहीम सुरू आहे तेथे माध्यमांना मज्जाव करण्यात आला आहे. त्यामुळे मारल्या गेलेल्या दहशतवाद्यांच्या आकडेवारीवर विश्वास ठेवता येत नाही. आत्मघाती हल्ल्यांबरोबरच तेहरिक ए तालिबान पाकिस्तान ही संघटना मोठ्या प्रमाणावर बॉम्बस्फोट आणि गोळीबारही करत आहे. या संघटनेने पाकिस्तानच्या नाविक तळांवर आणि विमानतळांवरही हल्ले केलेले आहेत.

**पाकिस्तानमध्ये शस्रास्रे आणि दारूगोळा हा मोठ्या प्रमाणावर उपलब्ध**

महत्त्वाचा मुद्दा म्हणजे, आज पाकिस्तानमध्ये शस्रास्रे आणि दारूगोळा हा मोठ्या प्रमाणावर उपलब्ध आहे. असे मानले जाते की, पाकिस्तानमधील प्रत्येक नागरिकासाठी दोन एके-४७ रायफल्स उपलब्ध होऊ शकतील, इतकी ही शस्रांस्रांची संख्या मोठी आहे. यामुळे कोणत्याही दहशतवादी संघटनांना हत्यारांची, दारुगोळ्याची वा बॉम्बस्फोट घडवण्यासाठी आवश्यक सामग्रीची कधीही कमी पडत नाही.

या दहशतवादाने संपूर्ण पाकिस्तानला विळखा घातला असला तरी अफगाणिस्तानच्या सीमेलगतच्या फटाह या भागात तो सर्वाधिक प्रमाणात आहे. २०१४ च्या आकड्यांनुसार या भागात २८०० हून अधिक नागरिक मारले गेले आहेत. सिंध प्रांतात ११८०, बलुचिस्तानमध्ये ६४३, पाकव्याप्त काश्मीरमध्ये ६१७ आणि पंजाब प्रांतामध्ये १८० नागरिक मारले गेले आहेत. म्हणजेच हिंसाचाराच्या दृष्टीने विचार करायचा झाला तर पंजाब प्रांतात तो सर्वांत कमी आहे असे लक्षात येते. पंजाबला पाकिस्तानचे हृदय मानले जाते. याचे कारण पाकिस्तानचे बहुतेक राजकीय नेतृत्त्व, सैनिक आणि आर्थिक शक्ती ही या प्रांतातून येत असते. आता मात्र तहरिक ए तालिबान पाकिस्तान या संघटनेने पंजाब प्रांतामध्येही प्रवेश केलेला आहे आणि तेथील हिंसाचारही वाढताना दिसत आहे. विशेष म्हणजे पंजाब प्रांताचे मुख्यमंत्री शाहबाज हे पाकिस्तानचे पंतप्रधान नवाझ शरीफ यांचे सख्खे भाऊ आहेत. लष्करे तैय्यबा, जमात उल दवा यांसारख्या अतिरेकी संघटनांना सरकारकडून मदत मिळवून देण्याच्या कामी शाहबाज हे अग्रेसर आहेत.

**अतिरेकी संघटनांविरोधात झर्ब ए अज्ब ही युद्धमोहीम**

एकूणच, पाकिस्तानमध्ये अतिशय विचित्र परिस्थिती निर्माण झालेली आहे. पाकिस्तानमधील दहशतवाद्यांची तीन भागामध्ये विभागणी करण्यात आली आहे. यामध्ये भारताविरुद्ध कारवाया करणार्या अतिरेकी

संघटनांना पाकिस्तान सरकारकडून मदत केली जाते. दुसरीकडे पाकिस्तान सरकार आणि सैन्याविरुद्ध कारवाया करणार्या अतिरेकी संघटनांविरोधात लष्कराने झर्ब ए अज्ब ही युद्धमोहीम सुरू केलेली आहे. तिसरीकडे अल् कायदा आणि अफगाणिस्तानमध्ये काम करणार्या दहशतवाद्यांना पाकिस्तान मदत करत आहे. म्हणजेच पाकिस्तानच्या दृष्टीने काही दहशतवादी गट हे चांगले आहेत, तर काही वाईट. पाकिस्तानातील सामान्य जनता आणि काही राजकीय नेते हे या सततच्या दहशतवादाला कंटाळलेले आहेत. या सर्वांकडून दहशतवादाला कडाडून विरोध होत असून दहशतवादाची ही विषवल्ली पाकिस्तानमधून कायमची उखडून टाकण्याची मागणी सरकारकडे पुन्हा पुन्हा केली जात आहे. नवाझ शरीफ यांनीही आम्ही पाकिस्तानातून दहशतवादाचे उच्चाटन करू अशा प्रकारच्या घोषणा अनेकदा केल्या आहेत. पण केवळ घोषणाबाजीच होत आहे. प्रत्यक्षात अंमलबजावणीसाठी पाकिस्तानचे सैन्य त्यासाठी तयार आहे असे दिसत नाही.

भारतामध्ये आपण दहशतवादविरोधी अभियान राबवतो त्यावेळी आपले फक्त सैन्य हातातील शस्रांच्या साहाय्याने या अभियानात सहभागी होतात. पाकिस्तानात मात्र अशा प्रकारच्या अभियानामध्ये हवाई दल, आर्टिलरीच्या मोठ्या तोफा, हेलिकॉप्टर्स, रणगाडे आदींचाही वापर मोठ्या प्रमाणावर होत आहे. मात्र त्यामुळे प्रत्यक्षात खरे दहशतवादी मारले जाण्याऐवजी सर्वसामान्य नागरिकांचाच हकनाक बळी जात आहे. याचा परिणाम उलटा होताना दिसत आहे. अशा हल्ल्यांमध्ये १० सामान्य नागरिक मारले गेल्यामुळे त्यातून १०० नवीन युवक दहशतवादी बनून पाकिस्तानी सैन्याविरुद्ध कारवाई करण्यासाठी तयार होताहेत. यामुळे पाकिस्तानमधला हा दहशतवाद कधीही न संपणारा दहशतवाद आहे. इतका हिंसाचार होत असूनही पाकिस्तान सरकारला ही गोष्ट लक्षात येत

नाही, हे अनकालनीय आहे. वास्तविक, संपूर्ण पाकिस्तानी सरकारने पूर्ण देशभरात दहशतवादविरोधी मोहीम राबवणे गरजेचे आहे. पण तसे होत नाही. याचे मुख्य कारण म्हणजे पाकिस्तान सरकार, सैन्य आणि आयएसआय यांना ते नको आहे. अफगाणिस्तानमधून अमेरिकन सैन्य परत गेल्यानंतर अध्र्याहून जास्त अफगाणिस्तानवर आपला ताबा राहण्याच्या दृष्टीने त्यांना या दहशतवाद्यांची गरज आहे. वास्तविक, अफगाणिस्तानमध्ये काय होईल? तेथे पाकिस्तानचे नियंत्रण राहील का? तेथिल दहशतवाद, हिंसाचार थांबेल का? हे येणारा काळच सांगेल. पण सध्याची परिस्थिती पाहता अफगाणिस्तानमधील हिंसाचार हा वाढण्याची शक्यता अधिक आहे. या विषारी खेळामध्ये पाकिस्तानचे आणि त्यांना मदत करणार्या चीनचे हात भाजणार आहेत हे नक्की.  पण तरीही पाकिस्तान यापासून काहीही शिकायला तयार नाही.

दुसरी एक महत्त्वाची घटना अशी की इसिस ही दहशतवादी संघटना आता पाकिस्तानमध्ये प्रवेश करण्याचा प्रयत्न करत आहे. त्यांनी पाकिस्तानमधील इसिसच्या गटाकरिता एका पाकिस्तानी नागरिकाची प्रमुखपदी नियुक्ती केली आहे. अमेरिकन गुप्तहेर खात्याच्या माहितीप्रमाणे इसिसला पाकिस्तानमधून मोठ्या संख्येने युवक मिळत आहेत. ही अतिशय चिंतेची बाब असून येत्या काळात पाकिस्तानातील हा दहशतवाद अतिउग्र रूप धारण करणार असे दिसते आहे. या सर्वांमुळे पाकिस्तान हे न संपणार्या विवरामध्ये अडकलेले आहे आणि यातून बाहेर पडण्याची शक्यता दिसत नाही.

**<u>भारतावर काय परिणाम होणार?</u>**

गेल्या काही महिन्यांपासून पाकिस्तानने भारताच्या सीमेवर गोळीबाराचे प्रमाण वाढवलेले आहे. आता रायफल आणि लाईफ मशिन यांच्या फायरिंगबरोबरच पाकिस्तानी सैन्य मॉर्टरनेसुद्धा फायर करत आहे. अर्थात भारतीय सैन्य याला चोख प्रत्युत्तर देत आहे. पण सीमेवर वाढलेला

हा हिंसाचार ही qचतेची बाब आहे. आजवरचा इतिहास पाहता पाकिस्तानच्या अंतर्गत समस्या गंभीर होतात, त्यावेळी तेथील जनतेचे लक्ष बाहेर वळवण्यासाठी पाकिस्तानकडून भारताचा आणि काश्मिरचा वापर केला जातो. आताही तेच होताना दिसत आहे. पाकिस्तानातील सध्याची स्थिती आणि भविष्यातील चित्र पाहता सीमेवरील गोळीबाराच्या घटना आगामी काळात वाढण्याची लक्षणे आहेत. या पाश्र्वभूमीवर आपण अतिशय सजग राहणे गरजेचे आहे.

**६ सप्टेंबर २०१५ भारत-पाक युद्धाची पन्नाशी**

चीनविरोधात १९६२च्या युद्धात मोठी हार पत्करावी लागल्यानंतर भारतीय सैन्याचे मनोधैर्य खचलेले होते. याच काळात १९६५च्या पहिल्याच महिन्यात पाकिस्तानी सैन्याने मोठ्या प्रमाणावर घुसखोरी करून भारताविरोधात अघोषित  युद्ध पुकारले. जुनाट शस्त्रसाठा असलेल्या भारतीय सैन्याचा आपल्यापुढे निभाव लागणार नाही, असा विचार करून पाकिस्तानने अत्याधुनिक पॅटनङ्क रणगाडे आणि सेबर जेट विमान आणि आधुनिक हत्यारांसह भारतीय लष्करावर हल्ला केला. मात्र भारतीय सैन्याने आपल्या युध्दनिती, आणि शौर्याच्या बळावर पाकिस्तानचा हल्ला केवळ परतवूनच लावला नाही, तर पाकिस्तानच्या लाहोर आणि सियालकोट या महत्त्वाच्या शहरांपर्यंत मजल मारली. यामुळे घाबरून गेलेल्या पाकिस्तानने पंजाबच्या खेमकरण भागात रणगाड्यांनी हल्ला केला. मात्र भारतीय सैन्याच्या युद्ध डावपेचामुळे त्यांना आपल्या शेकडो रणगाड्यांवर पाणी सोडावे लागले. १९६२च्या युद्धात हार पत्करावी लागल्यानंतर १९६५च्या युद्धात मोठा विजय मिळविल्याने भारतीय लष्कराने आपली इज्जत परत मिळवली. या युद्धानंतर खर्या अर्थाने भारतीय लष्कराच्या आधुनिकीकरणाने वेग पकडला. याचा परिणाम म्हणून भारतीय लष्कराने १९७१च्या युद्धात निर्णायक विजय मिळवला.

**आम्हाला सैन्याची अजिबात गरज नाही पंडीत जवाहरलाल नेहरु**

स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान पंडीत जवाहरलाल नेहरु हे शांतताप्रिय असल्याने त्यांनी सैन्याच्या आधुनिकीकरणाकडे पूर्ण दुर्लक्ष केले होते. १९६१ मध्ये तत्कालीन लष्करप्रमुख जनरल थिमैय्या यांनी 'भारताच्या सुरक्षेसमोरची आव्हानेङ्क असा प्रबंध पंडीत नेहरू यांच्यासमोर ठेवण्याचा प्रयत्न केला होता. तेव्हा नेहरू यांना त्याचा राग आला. ''आम्ही शांततावादी आहोत, आमच्यावरती कोणताही देश हल्ला करणार नाही. आम्हाला सैन्याची गरज नाही. भारताच्या रक्षणासाठी भारतीय पोलीस सक्षम आहेत. युद्ध होणे शक्य नाही. युद्ध झाले तरी मी एकटा मुत्सद्देगिरी करून हे युद्ध थांबवू शकतो, आम्हाला सैन्याची अजिबात गरज नाही, असे नेहरू त्यावेळी म्हणाले होते.

नेहरूंच्या या शांतताप्रिय धोरणाचा परिणाम म्हणजे १९६५ मध्ये झालेल्या भारत-पाकिस्तान युद्धाच्या वेळी भारताकडे भारताकडे जुनाट विमाने होती. त्यातुलनेत पाकिस्तानकडे सेबर जेटसारखी अत्याधुनिक विमाने होती. भारताकडे दुसर्या महायुद्धात वापरण्यात आलेले शेरमन आणि सेंच्युरीयन हे रणगाडे होते; तर पाकिस्तानकडे अत्याधुनिक 'पॅटन रणगाडे होते. अमेरिकेच्या नेतृत्वाखालील 'सेंटो या संघटनेचा सदस्य असल्यामुळे पाकिस्तानला अमेरिकेकडून अत्याधुनिक शस्त्रे मिळाली होती.

१९६४ मध्ये नेहरूंचे निधन झाले. त्यानंतर पंतप्रधान बनलेल्या लालबहादूर शास्त्री यांना आंतरराष्ट्रीय पातळीवर फारसे महत्त्व दिले जात नव्हते. त्यांचा प्रशासकीय अनुभवही कमी होता. पाकिस्तानचे फिल्ड मार्शल आयुब खान लालबहादूर शास्त्रींना भेटले, त्यावेळी शास्त्री हे आमच्या विरोधात काय लढणार असे त्यांना वाटले होते. आयूब खान यांनी आपले शिक्षण युनायटेड किंग्डमच्या सॅंडहस्र्ट मिलीटरी ॲकॅडमीमध्ये पूर्ण केले होते. आंतरराष्ट्रीय स्तरावर ब्रिटनचे पंतप्रधान, अमेरिकेचे राष्ट्रपती यांच्याशी त्यांचे चांगले संबंध होते. त्या तुलनेत भारताच्या नेतृत्वाचे जागतिक महासत्तांसोबतचे संबंध अतिशय कमकुवत होते. या सगळ्या

परिस्थितीमुळे भारताशी युद्ध करून काश्मीरला भारतापासून वेगळे करण्याची योग्य वेळ असल्याचा विचार जनरल आयुब खान यांनी केला होता. आयुब खान हे पाकिस्तानचे राष्ट्राध्यक्ष आणि पाकिस्तानी सैन्याचे प्रमुख होते.

१९६२चे युद्ध हरल्यानंतर भारताच्या लष्करप्रमुखांना काढून टाकण्यात आले होते. तसेच निम्मे भारतीय लष्कर चीनच्या सीमेवर पाठविण्यात आले होते. यामुळे काश्मीर आणि पंजाबच्या पाकिस्तानी सीमेवरील सैन्य कमी झाले होते. कच्छच्या वाळवंटात भारतीय सैन्याची संख्या अत्यल्प होती. जनरल चौधरी यांना सेनाप्रमुख बनविण्यात आले होते. भारताचे वेस्टर्न कमांडचे प्रमुख लेफ्टनंट जनरल हरबक्षसिंग हे एक अनुभवी सेनापती होते. १९६५च्या युद्धातील सर्वांत महत्त्वाचा पैलू हा त्यावेळचे भारताचे नेतृत्व आणि त्यावेळची भारताची परिस्थिती हा होता. याचाच फायदा घेऊन पाकिस्तानने हल्ले केले.

**<u>'ऑपरेशन डेझर्ट होक' ऑपरेशन कच्छच्या रणात</u>**

सन १९६५च्या युद्धाला ५० वर्षे पूर्ण होत आहेत. या युद्धाचा अवधी खूप मोठा होता. हे युद्ध जानेवारी १९६५ ते सप्टेंबर १९६५ यादरम्यान चार वेगवेगळ्या काळात लढले गेले. या युद्धाची सुरुवात जानेवारी १९६५ मध्येच झाली होती. जानेवारी महिन्यात पाकिस्तानने भारताविरोधात 'ऑपरेशन डेझर्ट होक नावाचे ऑपरेशन कच्छच्या रणात सुरू केले होते. सर्वांत पहिली लढाई ही जानेवारीच्या महिन्यामध्ये कच्छच्या वाळवंटात सुरू झाली. हा भाग वाळवंटी आहे. तसेच काही भागात समुद्राचे पाणी आतपर्यंत येत असल्याने तिथे रणगाडे पाठविणे शक्य नव्हते. त्यामुळे त्या भागातल्या सर्व लढाया पायदळाच्या सैनिकांनी लढल्या.

पाकिस्तानच्या १५ ते २० हजार सैन्याने भारतीय चौक्यांवर तीन हल्ले केले. ते हल्ले परतवून लावण्यात भारतीय सैन्याला यश मिळाले. यानंतर या युद्धात आपल्याला यश मिळणार नाही हे लक्षात आल्यावर

पाकिस्तानने आंतरराष्ट्रीय स्तरावर मदत घेऊन हे युद्ध ३० जूनला थांबविण्यात आले. मात्र या काळात युद्ध म्हणून घोषित झाले नव्हते.

**काश्मीरमध्ये ऑपरेशन जिब्राल्टर**

एप्रिल महिन्यात पाकिस्तानने काश्मीरमध्ये दुसरी आघाडी उघडली. याला ऑपरेशन जिब्राल्टर असे म्हणण्यात आले. अघोषित युद्धाच्या पुढचा भाग एप्रिल ते जुलै अशा चार महिन्यात जम्मू आणि काश्मीरमध्ये जनरल अख्तर हुसेन यांनी ३० हजार पाकिस्तानी सैन्याबरोबर टोळीवाल्यांच्या रुपात काश्मीरमध्ये घुसखोरी केली. काश्मिरच्या वेगवेगळ्या भागातील भारतीय सैन्यावर हल्ले करणे सुरू केले. काश्मिरी जनता भारताविरोधात उभी राहिल्याचे दाखवून काश्मिरी जनतेला मदत करण्यासाठी पाकिस्तानी सैन्य युद्ध करून काश्मीरमध्ये प्रवेश करण्याचा प्रयत्न करणार होते. त्यांनी काश्मीरमधल्या पुरी, पुंच, अखनुर अशा महत्त्वाच्या गावांमध्ये सैन्य घुसविले. हे सैन्य साध्या कपड्यांमध्ये असल्याने ते काश्मीरचेच रहिवासी आहेत असे दाखविण्यात आले. त्यांनी भारतीय सैनिकांच्या वेगवेगळ्या तुकड्यांवर हल्ले करण्यास सुरुवात केली. त्यावेळचे काश्मीरचे मुख्यमंत्री शेख अब्दुल्ला यांनीही आपल्या देशद्रोही कारवायांना मोठा वेग दिला होता. १९६४ मध्ये शेख अब्दुल्ला यांनी अनेक वेगवेगळ्या देशांचा दौरा करून काश्मीरला भारतापासून वेगळे केले पाहिजे हे सांगण्याचा प्रयत्न केला. भारतात परतल्यानंतर शेख अब्दुल्ला यांना लागलीच तुरुंगात डांबण्यात आले होते. यामुळे काश्मीरमध्ये हिंसाचार सुरु झाला होता. हीच संधी साधून पाकिस्तानने आपले ३० हजार सैन्य काश्मीरमध्ये पाठविले. काश्मीरी जनता भारताविरोधात उठाव करत असल्याचे दाखविण्याचा प्रयत्न पाकिस्तानकडून करण्यात आला. तीन ते साडेतीन महिने चाललेल्या या अघोषित युद्धात भारतीय सैन्याने केलेल्या उत्कृष्ट कामगिरीमुळे अनेक पाकिस्तानी सैनिकांना पकडण्यात यश आले. काश्मिरी जनेतेनेही भारतीय सैन्याला मदत केली. त्यानंतर उरलेल्या

पाकिस्तानी सैन्याने पळ काढला.

**<u>मेजर रणजीतसिंग दयाल यांना महावीरचक्र प्रदान</u>**

पाकव्याप्त काश्मीरच्या हाजीपिर खिंड या भाागातून पाकिस्तानी सैन्य घुसखोरी करत असल्यामुळे भारतीय कमांडोंना ही खिंड आपल्या ताब्यात घेण्याचे आदेश देण्यात आले. त्यामुळे मेजर रणजीतसिंग दयाल यांच्या नेतृत्वाखाली भारतीय कमांडोंनी या अतिशय खोलवर असलेल्या खिंडीवर हल्ला करून तिथे कब्जा केला. यामुळे पाकिस्तानी घुसखोरांना मिळणारी मदत थांबविण्यामध्ये भारताला यश मिळाले. यानंतर जम्मू काश्मीरमध्ये घुसखोरी केलेल्या पाकिस्तानी सैन्याने तेथून पळ काढला. हाजीपीर खिंड ताब्यात घेण्याचे भारतीय कमांडोंचे शौर्य पाहून मेजर रणजीतसिंग दयाल यांना महावीरचक्र प्रदान करण्यात आले. यामुळे काश्मीरमधील घुसखोरी थांबविण्यात आपल्याला यश मिळाले.

यानंतर सप्टेंबर महिन्यात खर्या यद्धाला सुरुवात झाली. या युद्धात पाकिस्तानने सर्वात आधी जम्मूच्या छांब या गावात भारतीयांवर हल्ले केले. या सीमेचे रक्षण कठीण असल्याचे लक्षात आल्यानंतर भारतीय लष्कराने पंजाबच्या सीमेवर लष्कराची दुसरी आघाडी उघडण्याचा निर्णय घेतला. भारतीय सैन्याने स्वातंत्र्यानंतर पहिल्यांदा आंतरराष्ट्रीय सीमा ओलांडून लाहोरच्या दिशेने कूच केले. पहिला हल्ला लाहोरवर, तर दुसरा हल्ला सियालकोट भागात करण्यात आला. त्यानंतर भारतीय सैन्याला लाहोरवर हल्ला करण्यापासून रोखण्यासाठी पाकिस्तानी सैन्याने पंजाबमधल्या खेमकरण आणि असल उत्तर या गावांमध्ये हल्ला केला. येथे रणगाड्यांची मोठी लढाई झाली.

**<u>‘ऑपरेशन ग्रँडस्लॅम</u>**

या युद्धामध्ये छांब भागात झालेल्या लढाईचे नाव ‘ऑपरेशन ग्रँडस्लॅम हे होते. काश्मीरमध्ये अपारंपारीक युद्ध करणे शक्य नसल्याचे लक्षात आल्यानंतर पाकिस्तानी सैन्याने जम्मूमधील छांब या भागातील भारतीय

सैन्यावर हल्ला केला. त्यानंतर २ सप्टेंबर १९६५ला भारत-पाकिस्तानचे पारंपरिक युद्ध सुरू झाले. ६ सप्टेंबरपर्यंत पाकिस्तान सैन्याने छांबवर विजय मिळवून अखनूरच्या दिशेने आगेकूच केली. अखनूर गावावर त्यांना विजय मिळवता असता तर जम्मू-अखनूर-पुंच हा रस्ता कापला गेला असता. यामुळे पुंच राजौरीसारखे जिल्हे पाकिस्तानला भारतापासून वेगळे करता आले असते. यामुळे पाकिस्तानी सैन्याचे आक्रमण थांबविण्याकरता भारतीय लष्कराने हवाई दलाचा वापर करावा असा प्रस्ताव दिला. लढाई गंभीर वळणावर आल्यानंतर तत्कालीन संरक्षणमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्याकडे हा प्रस्ताव देण्यात आला. यावर निर्णय घेण्यात वेळ लागला असता तर अखनूर रस्ता कापला गेला असता. मात्र, चव्हाण यांनी केवळ पाच मिनिटांत निर्णय घेऊन भारतीय सैन्याची मदत करण्याचे आदेश देण्यात आले. यामुळे छांबमध्ये झालेला पाकिस्तानी हल्ला थांबविण्यात भारतीय सैन्याला यश मिळाले. यशवंतराव चव्हाण यांनी दिलेले युद्धनेतृत्व वाखाणण्याजोगे आहे.

**<u>दुसर्या महायुद्धानंतरचे रणगाड्यांमधले सर्वांत मोठे युद्ध</u>**

छांबमधला हल्ला थांबविण्यात यश मिळाले असले, तरी अखनूर रस्त्याला मोठा धोका असल्याने जनरल हरबक्ष सिंग यांनी आपल्याला पाकिस्तानची या भागातील ताकद कमी करण्यासाठी पंजाबमध्ये नवीन आघाडी उभारण्याची गरज असल्याचे पंतप्रधानांना सांगितले. पंजाब सीमेवरून भारतीय सैन्याकडून लाहोर आणि सियालकोटवर हल्ला करण्याचे नियोजन करण्यात आले होते. यासाठी आंतरराष्ट्रीय सीमा ओलांडण्याची गरज होती. हे युद्ध वाढू नये यासाठी भारताने आंतरराष्ट्रीय सीमा ओलांडू नये म्हणून संपूर्ण जगाने भारतावर दबाव आणला होता. परंतु भारतीय पंतप्रधानांनी जगाचा दबाव झुगारून लावत पंजाबमध्ये दुसरी आघाडी उघडण्यासाठी परवानगी दिली. यामुळे स्वांतत्र्यानंतर भारतीय सैन्याने आंतरराष्ट्रीय सीमा ओलांडून लाहोरच्या

दिशेने कूच केले. भारतीय सैन्याला वेळीच थांबविले नाही, तर लाहोरसारखे दुसरे सर्वांत महत्त्वाचे शहर भारताच्या ताब्यात जाऊ शकते हे फिल्डमार्शल आयुब खान यांना कळून चुकले होते. त्यामुळे त्यांनी त्या भागात मोठ्या संख्येने रणगाड्यांचा वापर केला. सियालकोट भागामध्ये भारतीय आणि पाकिस्तानी रणगाड्यांमध्ये दुसर्या महायुद्धानंतरचे रणगाड्यांमधले सर्वांत मोठे युद्ध झाले.

इचोगील कालवा ओलांडून लाहोरपर्यंत पोहोचण्याची कामगिरी ३ जाट या बटालियनने केली. त्यांनी पाकिस्तानी सैन्याला मात देऊन इचोगील कालव्याची लढाई जिंकली. यामुळे लाहोर शहरालाच मोठा धोका निर्माण झाला होता. याकरिता ३ जाट बटालियनचे कमांडींग ऑफिसर लेफ्टनंट कर्नल हाईड यांना महावीर चक्र प्रदान करण्यात आले. इचोगील कालव्याची लढाई ही १९६५च्या युद्धातील एक महत्त्वाची लढाई होती. याच भागात पुण्याचे सुपुत्र लेफ्टनंट कर्नल ए. एस. वैद्य(नंतर सैन्य प्रमुख) यांच्या रेजिमेंटनेही मोठा पराक्रम गाजवला. त्यांना महावीर चक्र प्रदान करून गौरविण्यात आले. याच भागात पुण्याचे दुसरे सुपुत्र लेफ्टनंट कर्नल ए. बि तारापोर यांच्या रेजीमेंटनेही मोठा पराक्रम गाजवला.त्यांना परमवीर चक्र प्रदान करून गौरविण्यात आले. सियालकोट आणि लाहोर भागात केलेल्या कामगिरीमुळे मेजर जनरल राजेंदरसिंग स्पॅरो यांना महावीर चक्र प्रदान करण्यात आले.

**<u>अब्दुल हमीदनी पाकिस्तानचे पाच रणगाडे उद्धवस्त केले</u>**

भारतीय सैन्याला लाहोर आणि सियालकोट भागात रोखू शकत नाही हे समजल्यानंतर पाकिस्तानने तिसरी आघाडी उघडण्याचा निर्णय घेतला. त्यांनी भारताच्या खेमकरण भागात रणगाड्यांच्या मदतीने प्रवेश केला. लाहोर आणि सियालकोट भागात पुढे जाणार्या भारतीय सैन्याला परत भारतात येण्यास प्रवृत्त करणे हे या हल्ल्याचे उद्दीष्ट होते. खेमकरण येथे भारतीय सैन्याने पाकिस्तानच्या रणगाड्यांना भारताच्या सीमेत येऊ दिले.

यानंतर खेमकरण भागात कालव्यांचे पाणी सोडून चिखल निर्माण करण्यात आला. त्यामुळे हे रणगाडे या भागातील शेतांमध्ये अडकले. त्यांच्यावरती हल्ला करून मोठ्या संख्येने हे 'पॅटनङ्क रणगाडे नष्ट करण्यात आले. याच भागात ४ ग्रेनेडीयरच्या सी. क्यू. एम. एच. अब्दुल हमीद यांनी एकट्याने पाकिस्तानचे पाच रणगाडे आरसीएल गनच्या मदतीने उद्धवस्त केले. या कामगिरीसाठी त्यांना मरणोत्तर परमवीर चक्र प्रदान करण्यात आले. असलउतर आणि खेमकरण भागात झालेल्या लढाईला पाकिस्तानच्या 'पॅटनङ्क रणगाड्यांची स्मशानभूमी समजले जाते. केवळ धैर्य आणि शौर्याच्या बळावर जुनाट हत्यारे वापरूनही भारतीय सैन्याने पाकिस्तानचा निर्णायक पराभव केला. कोणत्याही लढाईमध्ये शस्त्र आणि शस्त्र चालविणारा माणूस सगळ्यात महत्त्वाचा असतो. भारताकडे शस्त्र जुनाट असली तरी ती चालवणारे सैनिक शूर होते. त्यामुळेच अत्याधुनिक शस्त्रे असूनही या लढाईत पाकिस्तानचा पराभव झाला होता.

**<u>युद्धात भारतीय नौदलाचा उपयोग झाला नव्हता</u>**

तीन आठवडे हे युद्ध सुरू राहिल्यानंतर सगळ्या जगाने भारत आणि पाकिस्तानवर दबाव आणून हे युद्ध थांबविण्याची मागणी केली. त्यानंतर हे युद्ध थांबविण्यात आले. अजून काही दिवस हे युद्ध सुरु राहिले असते, तर लाहोर शहरला मोठा धोका निर्माण झाला असता.

या २२ दिवसांच्या युद्धात भारतीय नौदलाचा उपयोग झाला नव्हता. पाकिस्तानी नौदलाने भारताच्या द्वारका भागात तोफांचा हल्ला केला होता. त्यावेळचा पूर्व पाकिस्तान आणि सध्याच्या बांगलादेशमध्येही लढाई झाली नव्हती.

युद्ध संपण्याच्या वेळी भारतीय सैनिकांनी पाकिस्तानच्या पंजाब प्रांतातील मोठ्या जमीनीवर कब्जा केला होता. त्यामानाने पाकिस्तानने कच्छच्या वाळवंटातील अतिशय थोड्या जमीनीवरती कब्जा केला होता. भारतीय

सैन्याने आपल्या नुकसानीपेक्षा पाकिस्तानच्या रणगाड्यांचे मोठे नुकसान केले होते. हवाई लढाईतही पाकिस्तानच्या सेबरजेटचही मोठे नुकसान झाले होते. या युद्धात भारताने पाकिस्तानचा १,९२०; तर पाकिस्तानने भारताचा ५५० चौरस किलोमीटर प्रदेश जिंकला, भारताची जीवितहानी २,८६२ आणि पाकिस्तानची ५,८०० एवढी मानली जाते. भारताचे ९७ रणगाडे, तर पाकिस्तानकडे अमेरिकेचे अधिक दर्जेदार 'पॅटनङ्क रणगाडे असूनही, त्यांचे ४५० रणगाडे नष्ट झाले. या युद्धाचे पारडे उत्तरार्धात भारताच्या बाजूनेच झुकले होते, ही वस्तुस्थिती आहे.

**<u>ताश्कंदला भारताची हार</u>**

१९६२चे युद्ध थांबविण्यात आल्यानंतर अमेरिकेच्या मदतीने ताश्कंद येथे वाटाघाटी होऊन ताश्कंद करार करण्यात आला. आंतरराष्ट्रीय दबावामुळे भारताने जिंकलेली हाजीपीर खिंड पाकिस्तानला परत द्यावी लागली. ही भारताची मोठी चूक होती. लाल बहादूर शास्त्री यांनी युद्धामध्ये अतिशय चांगले नेतृत्व दिले होते, पण वाटाघाटीमध्ये त्यांना अपयश आले. याचा त्रास झाल्यामुळे त्यांचा ताश्कंद येथे संशयास्पद मृत्यू झाला. १९६२च्या युद्धानंतर यशवंतराव चव्हाणांना संरक्षणमंत्री बनविण्यात आले होते. तेव्हापासून त्यांनी संरक्षण विभागाला चांगले नेतृत्व दिले. यांच्या नेतृत्वाखाली भारतीय लष्कराचे आधुनिकीकरण सुरु करण्यात आले. याचा परिणाम म्हणून भारतीय सैन्याने १९७१चे युध्द निर्णायक पद्धतीने जिंकले. यशवंतराव चव्हाण यांनी सैन्य आणि संरक्षणमंत्रालयाला दिलेल्या चांगल्या नेतृत्वामुळेच १९६५ आणि १९७१च्या युद्धात भारताला यश मिळाले. १९६२ साली झालेल्या पराभवामुळे मानहानी सहन कराव्या लागलेल्या भारतीय सैन्याच्या दृष्टीने १९६५ सालचे युद्ध महत्त्वाचे युद्ध आहे. या युद्धात मिळालेल्या विजयामुळे भारतीय सैन्याने आपल्यावरील डाग पुसून काढला. त्यामुळे या युद्धात धारातीर्थी पडलेल्या अधिकारी आणि जवानांना भारतीय जनतेने सॅल्यूट केला पाहिजे. १९६५च्या

युद्धाच्या पन्नाशीनिमित्त वीरांचे स्मरण करणे जरुरी आहे.

**११ ऑक्टोबर पाकिस्तानचे शेपटू वाकडेच**

भारत आणि पाकिस्तानचे संबंध गेल्या ६६ वर्षांत वेगवेगळ्या कारणांमुळे चांगले होऊ शकलेले नाहीत. याचे मुख्य कारण म्हणजे पाकिस्तानला काश्मीर हवा आहे जो आपण देऊ शकत नाही. भारताला दहशतवाद नको आहे आणि जो पाकिस्तान कधीही थांबवणार नाही. भारताने पाकिस्तानशी संबंध सुधारण्यावरील लक्ष काढून ते इतर देशांशी संबंध सुधारण्यासाठी प्रयत्न करावेत ज्यायोगे आपल्या देशाची प्रगती होईल.

संयुक्त राष्ट्राच्या महासभेमध्ये पाकिस्तानचे पंतप्रधान नवाझ शरीफ यांनी भारतालाच आरोपीच्या पिंजर्यात उभे करण्याचा प्रयत्न केला.

पाकिस्तानच्या दृष्टीने कश्मीर हा एकमेव मुद्दा आहे. ते नेहमी जगाला सांगायचा प्रयत्न करतात की जर या मुद्यावर तोडगा निघाला नाही तर भारत आणि पाकिस्तान हे दोन्ही देश अणुशस्त्रधारी राष्ट्र असल्यामुळे यांच्यातील युद्ध हे जगाकरिता महाभयंकर होऊ शकते. यामुळे जेव्हा जेव्हा शक्य असते तेव्हा तेव्हा पाकिस्तान काश्मीर आणि भारत-पाक संबंध जगाच्या पटावर घेऊन जाण्याचा प्रयत्न करतो.

**भारताने पाकिस्तानला महत्त्व दिले नाही**

संयुक्त राष्ट्राच्या महासभेआधी पंतप्रधान नरेंद्र मोदी अमेरिकेमध्ये चार दिवस होते. त्यांचा अमेरिका भेटीमध्ये मुख्य उद्देश होता तो अमेरिकेतील कारखानदारांनी भारतात गुंतवणूक करावी. तसेच अमेरिकेकडे प्रगत तंत्रज्ञान भारताला मिळावे, ज्यामुळे भारताची आर्थिक आणि तांत्रिक प्रगती जास्त वेगाने होईल. शिवाय त्यांनी सिलिकॉन व्हॅलीमध्ये जाऊन भारताला जगाच्या डिजीटल नकाशावरती नेण्याचा प्रयत्न केला. मात्र, हे सगळे होत असताना भारतामधील अनेक पाकिस्तान प्रेमी तज्ज्ञांची इच्छा होती की अमेरिकेमध्ये मोदींनी नवाझ शरीफ यांना भेटावे, पण तसे काही घडले नाही. भारताने पाकिस्तानकडे संपूर्णपणे दुर्लक्ष केले. केवळ ज्या

वेळेला पाकिस्तानाने संयुक्त राष्ट्राच्या महासभेत काश्मीरचा मुद्दा मांडला, त्याचवेळेला प्रत्युत्तर म्हणून भारताने त्याला उत्तर दिले. लक्षात घ्यायला हवे हे उत्तर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिले नाही, त्या ऐवजी परराष्ट्रमंत्री सुषमा स्वराज यांना उत्तर देण्याचे काम दिले. यावरून स्पष्ट होते की भारताला या जुनाट विषयाला फारसे महत्त्व द्यायचे नव्हते.

**<u>दहशतवादी एक सामरिक शस्त्र</u>**

भारतामध्ये अनेक तज्ज्ञांची आणि अनेक राजकीय पक्षांची अशी समजूत आहे की पाकिस्तानशी बोलणी केली तर भारत आणि पाकिस्तानमध्ये कायमची शांतता प्रस्थापित होऊ शकते. अर्थातच हे सत्यापासून फारच दूर आहे. कारण पाकिस्तानमध्ये भारत-पाकिस्तान संबंध कसे असावेत हे पाकिस्तानचे पंतप्रधान ठरवत नाहीत. हे पाकिस्तानची गुप्तहेर संघटना आयएसआय आणि पाकिस्तानी लष्कर ठरवते. त्यामुळे जरी नवाझ शरीफ यांनी शांततेकडे जाणारा चार सूत्री कार्यक्रम दिला तरी यातून काही फारसे निष्पन्न होणार नाही. कारण नवाझ शरीफ यांच्या ऐवजी जनरल राहील शरीफ हे खरोखर पाकिस्तानचे राज्यकर्ते आहेत. पाकिस्तानची एक चुकीची समजूत झालेली आहे की, जर भारताविरुद्धचा दहशतवाद वाढवला की त्यामुळे भारताला वाटाघाटी करण्याशिवाय काहीही पर्याय राहणार नाही. म्हणूनच ते दहशतवादाचा वापर एक सामरिक शस्त्र म्हणून करत असतात.

सद्य परिस्थितीत भारतीय गुप्तहेर संघटनांच्या अंदाजाप्रमाणे पाकिस्तानमध्य ४० ते ४५ दहशतवादी प्रशिक्षण केंद्रे असावीत. यामध्ये अडीच ते साडेतीन हजार दहशतवादी  प्रशिक्षण घेत असतात. २५० ते ३०० दहशतवादी कुठल्याही क्षणी काश्मीरमध्ये घुसखोरी करण्याकरिता तयार आहेत. पाकिस्तान गेल्या काही महिन्यापासून काश्मीरमध्ये हिंसाचाराचे प्रमाण वाढवत आहे. पाकिस्तानकडून एलओसीवर फायरिंगचे प्रमाण पुष्कळ वाढलेले आहे. हुरियत कॉन्फरन्स या संघटनेला काश्मीरला

भारतापासून वेगळे करायचे आहे आणि त्यासाठी त्यांना पाकिस्तानची मदत कायम सुरू असते. यामुळे पाकिस्तानशी शांतता वार्ता कशा करायच्या हा एक मोठा प्रश्न आहे. पाकिस्तान दहशतवाद्यांना मदत करतो याशिवाय अनेक छुपे सेल पाकिस्तानने भारतात तयार केलेले आहेत. ते दाऊद इब्राहिमचे, लष्कर-ए-तय्यबाचे किंवा इंडियम मुजाहिदीन यांचे आहेत. यांचा भारताच्या अनेक चित्रपट निर्माते, अनेक राजकीय नेत्यांवर मोठा प्रभाव आहे.

**<u>पाकिस्तानचे भारतात छुपे सेल्स</u>**

पाकिस्तानने भारताच्या आत आपल्या मदतकर्त्यांचे जाळे मोठ्या प्रमाणावर पसरवलेले आहे. त्यामुळे भारतामध्ये कधी गडबड करायची असेल तर त्यासाठी त्यांचे छुपे सेल्स हे अनेक शहरांमध्ये तयार आहेत. एक उदाहरण म्हणजे याकूब मेमनच्या फाशीच्या वेळी १७ जाहिरात संस्थांना याकूब मेमनची फाशी कशी बेकायदा होती याच्या प्रसिद्धीचे काम देण्यात आले होते. याशिवाय अनेक संस्था पाकिस्तानला भारतामध्ये मदत करत आहे.  भारतातील पाकिस्तानी प्रेमी तज्ज्ञांना विकत घेतले जाते. अनेक प्रकारचे सेमिनार (भारत-पाक संबंध तसेच काश्मीरच्या मुद्यावरती) युरोप, अमेरिकेत आयोजित केले जातात आणि याकरिता भारतातील अनेक पाकिस्तानी प्रेमी तज्ज्ञांना बोलावले जाते. अमेरिकेचा फुकट  प्रवास करणे, तिथे तीन-चार दिवस राहणे आणि नंतर एखाद्या परिसंवादामध्ये दोन दिवस भाग घेणे आणि वर शेकडो डॉलर्सची कमाई होत असेल तर त्याकरिता भारतामधले अनेक तज्ज्ञ तयार आहेत की, जे पाकिस्तानच्या बाजूने बोलण्यास तयार असतात.

यामुळे भारताला आपल्या देशांतर्गत तयार झालेल्या छुप्या दहशतवादी संस्था, पाकिस्तानी प्रेमी तज्ज्ञ आणि संस्थांचे जे जाळे आहे ते उद्धवस्त करावे लागेल. शिवाय गुप्तहेर खात्याची माहिती घेऊन शेकडो छुपे सेल्स भारताच्या मोठ्या शहरांमध्ये पसरलेले आहेत त्यांनासुद्धा नष्ट करावे

लागेल. वर्तमान पत्रात आलेल्या बातमी प्रमाणे २०१४ मध्ये १३ छुपे सेल भारताच्या गुप्तहेर खात्याने उध्वस्त केलेले आहेत.

**<u>पाकिस्तानने दहशतवाद सोडून द्यावा</u>**

भारत-पाकिस्तान संबंधावरील नवाझ शरीफ यांच्या भाषणाला परराष्ट्रमंत्री सुषमा स्वराज यांनी सडेतोड उत्तर दिले. शरीफ यांनी काश्मीर प्रश्न सोडवण्याकरिता जो चार सूत्री प्रस्ताव पुढे ठेवला होता, तो पूर्णपणे फेटाळून लावत सुषमा स्वराज यांनी सांगितले की, जर देशामध्ये शांतता हवी असेल तर फक्त एक सूत्राचीच गरज आहे आणि ते म्हणजे, पाकिस्तानने दहशतवाद सोडून द्यावा, तरच आपण पुढे काही बोलू शकतो. तसेच मुंबईवर हल्ला करणारे हाफिज सईद, झकिउर लक्वी यांच्यावरसुद्धा कारवाई होणे गरजेचे आहे. यामुळे भारत आणि पाकिस्तानमध्ये आता पुढची चर्चा केव्हा होईल हे सांगता येणे कठीण आहे. कारण पाकिस्तानला दहशतवादाचे आपले शस्त्र म्यान करावेसे वाटत नाही. अजूनही पाकिस्तानची अशीच समजूत आहे की आपण भारताच्या बरोबरीचे आहोत आणि भारताला दम देऊन आपल्याशी वाटाघाटींसाठी भाग पाडू शकतो.

पाकिस्तानवर आंतरराष्ट्रीय दबाव आणण्यासाठी आपल्याला अमेरिकेचा वापर करता येणे शक्य आहे. तसेच पकिस्तानवर आर्थिक निर्बंध लावणे यावरसुद्धा आपण आपले लक्ष्य केंद्रीत करणे गरजेचे आहे.

प्रसारमाध्यमांनी देखील पाकिस्तानकडून पाकव्यप्त काश्मीरमधील नागरिकांवर कसा अत्याचार केला जाते हे जगासमोर आणणे गरजेचे आहे. कारण पाकव्याप्त काश्मीरमधील नागरिकांना पाकिस्तानमध्ये जाण्याऐवजी भारतात येणे जास्त आवडेल अशा घोषणा कित्येकदा झाल्या आहेत.

**<u>भारत-पाकिस्तान संबंध हा एक शून्याचा पाढा</u>**

भारत आणि पाकिस्तानचे संबंध गेल्या ६६ वर्षांत वेगवेगळ्या कारणांमुळे

चांगले होऊ शकलेले नाहीत. याचे मुख्य कारण म्हणजे पाकिस्तानला काश्मीर हवा आहे जो आपण देऊ शकत नाही. भारताला दहशतवाद नको आहे आणि जो पाकिस्तान कधीही थांबवणार नाही. म्हणून प्रश्न असा आहे की आपण या विषयी पुढे काय करावे? पंतप्रधान राजीव गांधी चीनमध्ये गेले असता त्यांनी चीनचे पंतप्रधान डेंग जीओ पिंग यांना विचारले की भारत-पाक संबंध केव्हा सुधारतील आणि सीमाविवाद केव्हा सोडवला जाईल. डेंग जीओ पिंग यांनी उत्तर दिले होते की हा प्रश्न गहन आहे आणि हा प्रश्न आपण पुढच्या पिढीकरता सोडून देऊ. म्हणूनच आपण चीनबरोबर फक्त आर्थिक संबंध सुधारण्यावर भर देत आहोत. त्याचप्रमाणे भारत आणि पाकिस्तान हा प्रश्नसुद्धा आपण आता पुढच्या पिढीसाठी सोडून द्यायला हवा आणि त्या ऐवजी आपण आपले लक्ष हे इतर देशांशी संबंध चांगले करून आपली आर्थिक प्रगती कशी होईल याकडे द्यायला हवे. कारण भारत-पाकिस्तान संबंध हा एक शून्याचा पाढा आहे आणि या संबंधांचे नवे पर्व सुरू होईल असा आशावाद बाळगण्यात फारसा अर्थ नाही. परंतु अजूनही आपल्या देशात काही भाबडे लोक आहेत ज्यांना वाटते की पाकिस्तानची विचारसरणी बदलणे शक्य आहे. ज्यावेळी पाकिस्तान भारतामध्ये खेळत असलेले छुपे युद्ध थांबवेल त्यावेळीच हे संबंध सुधारतील. त्यामुळे भारताने पाकिस्तानशी संबंध सुधारण्यावरील लक्ष काढून ते इतर देशांशी संबंध सुधारण्यासाठी प्रयत्न करावेत ज्यायोगे आपल्या देशाची प्रगती होईल.

## <u>१८ ऑक्टोबर बलुचिस्तानचा स्वातंत्र्यलढा आणि भारत</u>

दहशतवादाचे केंद्र, फॅक्टरी अशी ओळख असलेला पाकिस्तान नेहमीच अशांत राहिला आहे. पाकिस्तानमध्येच तालिबान, लष्कर आणि राज्यकर्त्यांच्या वर्चस्ववादाचा बळी नेहमीचा सामान्य माणूस ठरला आहे. भारतापासून स्वतंत्र झाल्यापासून पाकिस्तानमध्ये रोजच कोणता ना कोणता हल्ला होत असतो. पाकिस्तानमध्ये असे म्हटले जाते, की

एखाद्या दिवशी बॉम्ब हल्ला झाला नाही, तर त्याची बातमी होते. दहशतवादाला नेहमीच पाठीशी घालून त्याचे पालनपोषण करणार्या पाकिस्तानलाच आज दहशतवादाचा सर्वाधिक फटका बसत आहे. या अंतर्गत अशांततेचा परिणाम देशाच्या अर्थव्यवस्था आणि एकूणच विकासावर होत असतो. मात्र, पाकिस्तानचे राजकारणी केवळ आपल्या खुच्र्या उबविण्यातच धन्यता मानत आहेत. बलुचिस्तान हा प्रांत पाकिस्तानसाठी सामरिकदृष्ट्या खूपच महत्त्वाचा आहे. मात्र या भागात आता स्वातंत्र्यलढ्याची ठिणगी पडलेली आहे. यामागे पाकिस्तान सरकारविरोधातील असंतोष दिसून येत आहे. पाकिस्तानी सैन्य मोठ्या प्रमाणावर मारले जात आहे. बलुची लोकांचे भारताशी कायमच चांगले संबंध राहिलेले आहेत. त्यामुळे भारताने त्यांच्या स्वातंत्र्यलढ्यात मदत करायला हवी.

सध्या पाकिस्तानमधील हिंसाचार वाढतच चालला आहे. गेल्या काही वर्षांची हिंसाचाराची आकडेवारी बघितली तर आपल्याला असे दिसते की, पाकिस्तानमध्ये दरवर्षी अंतर्गत दहशतवादामुळे मरणार्या नागरिकांची संख्या ही सहा ते सात हजारामध्ये असते आणि याच्या चौपट नागरिक गंभीररित्या जखमी होतात. प्रत्येक वर्षी पाकिस्तानमध्ये शेकडो बॉम्बस्फोट होतात. तेलवाहिन्यांवर  हल्ला केला जातो. याखेरीज दरवर्षी सुमारे ३५० ते ४०० आत्मघातकी हल्ले हे केले जातात.

**<u>निम्म्याहून जास्त पाकिस्तानचा भाग पाकिस्तानच्या हाताबाहेर</u>**

भौगोलिकदृष्ट्या पाकिस्तानचे सहा मोठे भाग पडतात ते आहेत बलुचिस्तान, फाटा, केपी, पाकव्याप्त काश्मीर, पंजाब आणि सिंध. यामध्ये सर्वांत जास्त हिंसाचाराचे प्रकार हे फाटा म्हणजे फेडरली अ‍ॅडमिस्टड्ढेटेड टड्ढायबल एरियामध्ये होतात. या भागात तेहरिक-ए-तालिबान पाकिस्तान या दहशतवादी संघटनेचे वर्चस्व आहे. सिंध प्रांतामध्ये प्रत्येक वर्षी १००० ते १५०० नागरिक मारले जातात.

हिंसाचाराबाबत तिसर्या स्थानावर असणार्या बलुचिस्तान प्रांतात दरवर्षी ७५० ते हजार नागरिक मारले जातात. हा हिंसाचार कमी होण्याची काहीही लक्षणे दिसत नाहीत. यामुळे पाकिस्तान हा देश वेगाने कोसळण्याच्या मार्गाकडे जात असावा, असे म्हणणे भाग पडते. अंतर्गत हिंसाचाराचे वाढते प्रमाण पाहिले तर पाकिस्तान हे स्वतःशीच युद्ध करत असलेले राष्ट्र आहे असे म्हणावे लागेल. गेल्या अनेक वर्षांपासून पाकिस्तानी सरकार आणि लष्कराने केलेले कुठलेही उपाय यशस्वी झालेले नाहीत. पाकिस्तानच्या बहुतांश भागावरून पाकिस्तानी सरकारचे शासन हे नाहिसे किंवा विरळ होत गेलेले आहे. वेगवेगळ्या प्रांतामध्ये वेगवेगळ्या कारणांसाठी लढणारे अतिरेकी गट हे हिंसक कारवायांमध्ये गुंतलेले आहेत. अशाच प्रकारचा हिंसाचार आता पाकव्याप्त काश्मीर आणि पंजाब प्रांतामधे पण वाढत चालला आहे. काही दिवसांपूर्वी एका वृत्तवाहिनीने दाखवलेल्या एका बातमीमुळे पाकव्याप्त काश्मीरमध्ये अंतर्गत हिंसाचार किती मोठ्या प्रमाणावर वाढतो आहे हे स्पष्टपणे समोर आले होते. एका अंदाजावरून निम्म्याहून जास्त पाकिस्तानचा भाग हा पाकिस्तानी सरकारच्या हाताखाली नाही.

**<u>बलुचिस्तान सामरिकदृष्ट्या महत्त्वाचा प्रांत</u>**

बलुचिस्तान हा भौगोलिकदृष्ट्या सर्वांत मोठा प्रांत समजला जातो. हा प्रांत नैसर्गिक साधनसामग्री आणि सामरिकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा आहे. पण इथे शांतता हे  मृगजळच ठरलेले आहे. २०१५ च्या आकडेवारीनुसार १८६ सामान्य नागरिक, ७६ पाकिस्तानी सैनिक, २३३ अतिरेकी असे एकूण ४९५ जण बलुचिस्तानमध्ये मारले गेलेले आहेत. बलुचिस्तानचे दोन मोठे भाग करता येतील. एक उत्तर बलुचिस्तान आणि दुसरा दक्षिण बलुचिस्तान. उत्तर बलुचिस्तान फाटा या प्रांताला लागून आहे. तिथे अतिरेकी प्रकारचा हिंसाचार वाढतो आहे. मात्र, इतर भागामध्ये

बलुचिस्तानचा स्वातंत्र्यलढा सुरू आहे. या स्वातंत्र्यलढ्याचे मुख्य बुगती यांना जनरल मुशर्रफ यांच्या काळात सैन्याने मारले होते. याशिवाय अलंीकडेच बुगती यांच्या नातवाची आणि त्यांच्या पत्नीची कराचीत उघडपणे हत्या करण्यात आली.

पाकिस्तानी शासन आणि स्वातंत्र्य लढ्याकरता प्रयत्न करणारी बलुचिस्तान लिबरेशन आर्मी यांच्यात युद्ध सुरू आहे. बुलचिस्तान लिबरेशन आर्मी ही बॉम्ब किंवा रॉकेटच्या साहाय्याने गॅस लाईन व ऑईल लाईनवर हल्ले करीत आहे. याशिवाय रेल्वेलाईन उडवून देणे, वीज वाहिन्या तोडणे, लष्कराचे महत्त्वाचे पूल उडवणे आणि लष्करी कॅन्टॉनमेंटवर हल्ले करणे हे सुरूच आहे. प्रत्येक वर्षी बलुचिस्तानमध्येच १५० ते २०० बॉम्ब स्फोट, २५० ते ३०० रॉकेट हल्ले, १५० ते २०० भूसुरूंगांचे स्फोट आणि ५० ते ७५ वेळा हँड ग्रेनेडच्या साहाय्याने हल्ले झाल्याची नोंद मिळत आहे. बलुचिस्तानची राजधानी क्वेटा आणि इतर २६ जिल्ह्यांमध्ये  हिंसाचाराची नोंद होत आहे. गुप्तहेर खात्याच्या माहितीवरून पाच वेगवेगळे फुटीरतावादी गट बलुचिस्तानला स्वतंत्र करण्यासाठी लढा देत आहेत. बलुचिस्तान लिबरेशन आर्मी, बलुचिस्तान रिपब्लिकन आर्मी, बलुचिस्तान पिपल लिबरेशन फ्रंट, पॉप्युलेशन फ्रंट फॉर आम्र्ड रेजिस्टंट आणि बलुचिस्तान लिबरेशन फ्रंट असे हे पाच गट आहेत.

## दहा हजार दहशतवादी विरुद्ध ७५ हजार पाकिस्तानी सैन्य

पाकिस्तानी लष्कराप्रमाणे दहा ते बारा हजार दहशतवादी (स्वतंत्रसेनानी?) कारवायांमध्ये सक्रिय असावेत. यांना पाकिस्तानी शत्रूंकडून शस्त्रास्त्रे आणि पैशांची मदत मिळते, असे पाकिस्तानचे म्हणणे आहे. भारतसुद्धा या अतिरेकी गटांना मदत करत असावा असा आरोप पाकिस्तानी वृत्तपत्रांतून होतो आहे. सध्या हे पाचही गट वेगवेगळे असल्यामुळे त्यांची लढण्याची ताकद जास्त नाही. बलुचिस्तानमधील हिंसाचार हा स्वतंत्र

बलुचिस्तान किंवा राष्ट्रवादाच्या भावनेने प्रेरीत आहे. तिथे स्वातंत्र्यलढ्याला मोठा पाठिंबा आहे. पाकिस्तानचे ८५ टक्के लष्कर हे भारताच्या सीमेवर तैनात असायचे. मात्र, आता फक्त ५० टक्के लष्कर हे भारतीय सीमेवरती आहे आणि इतर ५० टक्के हे पाकिस्तानातील अंतर्गत अँटी टेरीरिस्ट ऑपरेशन्स करण्यात गुंतलेले आहे. यामध्ये बलुचिस्तानमध्येच ७५ हजार ते एक लाख सैनिक ॲकन्टी टेरीरिस्ट ऑपरेशनमध्ये करत असावे असे मानले जाते.

पाकिस्तानी सैन्यावर हल्ले होत आहेत आणि पाकिस्तानी सैन्य हे बलुचिस्तान लिबरेशन आर्मीला दाबण्याकरिता प्रयत्न करत आहेत. पाकिस्तानी सैन्य बलुचिस्तानमधील या गटांचे समर्थक असणार्या नागरिकांना मारण्याचे काम करत आहे. एका माहितीप्रमाणे प्रत्येक वर्षी बलुचिस्तान स्वातंत्र्य लढ्यासाठी लढणारे १५० ते २०० नागरिक गायब होतात. त्यांचा कधीही शोध लागत नाही. त्याशिवाय ज्या भागातून हल्ला होतो त्या भागावर शिक्षा म्हणून पाकिस्तानी सैन्य तेथील नागरिकांवर अत्याचार करते. पण त्याचा उलट परिणाम होऊन त्या भागातून दुप्पट-तिप्पट दहशतवादी तयार होत असतात. बलुचिस्तानमध्ये अल्पसंख्यांक म्हणजे थोड्या प्रमाणात हिंदू, ख्रिश्चन आणि १५-२० टक्के शिया मुसलमान आहेत. या शिया पंथीय मुसलमानांवर होणार्या हल्ल्यांचे प्रमाण वाढते असल्याचे सांगितले जाते. यामुळे अनेक शिया मुसलमानांनी बलुचिस्तानातून पाकिस्तानच्या इतर भागात पलायन केलेले आहे. याला प्रत्युत्तर म्हणून बलुचिस्तानमधील गट पाकिस्तानी सैन्यावर हल्ला करतात. या उत्तर-प्रत्युत्तराच्या खेळात हिंसाचार मात्र वाढतच चाललेला आहे.

**<u>बलुचिस्तानमधील स्वातंत्र चळवळीला मदत</u>**

बलुचिस्तानमध्ये स्वातंत्र चळवळ सुरू आहे. पाकिस्तानी सैन्य आणि गुप्तहेर संस्था पाकिस्तानच्या बलुचिस्तानमधील लोकांवर अत्याचार

करीत आहेत. आजपर्यंत हजारो बलुचिस्तानचे नागरिक जे स्वातंत्र्य लढ्यात सामिल होते ते अचानक गायब झाले आहेत आणि त्यांचा काहीही पत्ता लागलेला नाही. बलुचिस्तानचे एक मोठे नेते बुगती यांना ज्यावेळी मुशरफ प्रेसिडेंट होते त्यावेळी मारण्यात आले. आताच बुगतिंचा नातू आणि त्याच्या पत्नीला कराचीमधील एका हल्ल्यात मारण्यात आले. थोडक्यात पाकिस्तान प्रचंड बळाचा वापर करून बलुचिस्तानातील स्वातंत्र्यता चळवळ दडपण्याचा प्रयत्न करत आहे. आपण त्यांना आर्थिक आणि नैतिक पाठबळ देणे गरजेचे आहे. इराणमधील बलुची हे पाकिस्तानातील बलुचिस्तानला मदत करण्याची इच्छा ठेवून आहेत. आपण इराणच्या मदतीने बलुचिस्तानचा प्रश्न आंतरराष्ट्रीय व्यासपिठावर घेऊन जाण्यास बलुचिस्तानला मदत करू शकतो.

पाकिस्तानला हे समजवणे गरजेचे आहे की, तुम्ही आमच्या विरुद्ध काश्मीरमध्ये जर छुपे युद्ध खेळत असाल तर अशाच प्रकारचे छुपे युद्ध आम्ही सुद्धा बलुचिस्तानमध्ये खेळू शकतो. जोपर्यंत छुप्या युद्धाची किंमत पाकिस्तानी सैन्य आणि आयएसआय या संस्थेला भोगावी लागत नाही तोपर्यंत ते भारत विरोधी धोरण हे चालूच ठेवतील.  पाकिस्तानमध्ये दहशतवादी संघटनांचे महत्त्व फार वाढलेले आहे. तज्ज्ञांच्या मते पाकिस्तानी लष्कर आणि आयएसआय यांच्या खालोखाल दहशतवादी गटांच्या मताला महत्त्व दिले जाते. पाकिस्तानचे राजकीय नेते हे त्यानंतर असतात. नवाझ शरीफांना किती वाटले तरी ते भारत-पाक संबंधांवर काही करू शकत नाहीत. त्यामुळे पहिले पाकिस्तानी सैन्याला वटणीवर आणण्याची गरज आहे. एका वाट चुकलेल्या पाकिस्तानी मुलीला एक भारतीय तरुण पाकिस्तानमध्ये तिच्या आई वडीलांकडे पोहचवायचा प्रयत्न करतो हे 'बजरंगी भाईजान या चित्रपटामध्ये चांगल्या पद्धतीने दाखवण्यात आले आहे. पण पाकिस्तानने हा सिनेमा तिथे प्रदर्शित करण्यावर बंदी घातलेली आहे.

**<u>बलुचिस्तानी जनतेला पाठिंबा जाहीर करा</u>**

पाकिस्तानातील दुसर्या क्रमांकाचे महत्त्वाचे बंदर असलेले ग्वाडार हे बंदर बलुचिस्तानमध्ये आहे. हे बंदर पाकिस्तानने पूर्णपणे चीनच्या ताब्यात सोपवलेले आहे. इथूनच चीनच्या शिन झियांग प्रांताला जोडणारा काराकोरम हायवे तयार करण्यात आलेला आहे. काराकोरम हायवे चीनच्या दृष्टीने फारच महत्त्वाचा आहे. यामुळेच त्यांना बलुचिस्तानमधील गोडार बंदरातून शिन झियांगला लागणारे महत्त्वाचे सामान पाठवता येते. सुदैवाने, हा रस्ता बर्फ पडल्यामुळे सहा महिने काम करत नाही. त्याशिवाय या रस्त्यावर होणार्या चीनी वाहनांवरती स्वतंत्र बलुचिस्तान गटांनी हल्ले केलेले आहेत. यामुळे आपल्या स्वतःचे रक्षण करण्याकरिता चीनने दहा ते पंधरा हजार सैनिक बलुचिस्तान आणि काराकोरम हायवे जवळ आणलेले आहेत. त्यामुळे चीनला या भागातून काढलेल्या रस्त्याची मोठी किंमत चुकवावी लागत आहे.

**<u>भारताने काय करावे?</u>**

अशा परिस्थितीमध्ये भारताने काय करायला हवे हा प्रश्न आहे. पाकिस्तान भारताच्या काश्मीरमध्ये छुपे युद्ध करू शकतो, तर आपण बलुचिस्तानच्या स्वातंत्र्यलढ्याला का मदत करू शकत नाही? बलुचिस्तानच्या स्वातंत्र्य लढ्याला मदत करून बलुचिस्तान हे स्वतंत्र राष्ट्र बनण्यासाठी आपण मदत करायला हवी. त्यामुळे पाकिस्तानची ताकद अर्ध्याहून कमी होऊ शकते. बलुचिस्तानचे नागरिक उत्कृष्ट लढवय्ये आहेत आणि त्यांना पाकिस्तान सरकार आणि सैन्य यांच्याबद्दल मोठा राग आहे. म्हणून आपण त्यांना नैतिक मदत दिली आणि त्यांचा प्रश्न युनो किंवा आंतरराष्ट्रीय पातळीवर नेला, तर त्यांना नक्कीच मदत होईल. अनेक बलुची नागरिक इराणमध्ये स्थायिक झालेले आहेत. यामुळे आपण इराणची मदत घेऊन बलुचिस्तान लढ्याला नक्कीच मदत करू शकतो. बलुची जनतेचे भारतावरती प्रेम आहे. ज्यावेळी

भारताचा स्वातंत्र्य लढा सुरू होता तेव्हा बलुचिस्तानी लोकांशी आपले चांगले संबंध होते. पंडीत जवाहरलाल नेहरूंपासून इंदिरा गांधींपर्यंतच्या नेत्यांना बलुचिस्तानी जनतेच्या मनात मानाचे स्थान होते. म्हणून बलुचिस्तानी स्वातंत्र्य लढ्याला आणि सिंध प्रांताच्या लढ्याला आपण मदत करून पाकिस्तानला इशारा देऊ शकतो की, आम्ही सुद्धा बलुचिस्तानला मदत करू शकतो. त्यासाठी भारताने बलुचिस्तानी जनतेला आपला पाठिंबा स्पष्टपणे जाहीर करायला हवा.

**१ नोव्हेंबर पाकिस्तानची वाढती अण्वस्त्रक्षमता आणि भारत**

आजवरच्या युद्धांमध्ये मोठा पराभव पत्करूनही पाकिस्तानची खुमखुमी अजूनही कमी झालेली नाही. रोजच शस्त्रसंधीचे उल्लंघन करणे, अणूबॉम्बचा वापर करण्याची धमकी देण्याचे प्रकार पाकिस्तानकडून सातत्याने सुरू आहेत. त्यामुळे भारताला अमेरिका आणि इतर देशांची मदत घेऊन पाकिस्तानमध्ये तयार होत असलेल्या आणूबॉम्ब आणि क्षेपणास्त्र कार्यक्रमावर नजर ठेवावी लागेल. एक सुज्ञ देश म्हणून भारताने आपली पारंपरिक युद्ध करायची तयारी ठेवायलाच हवी आणि त्याचबरोबर आपली क्षेपणास्त्रे आणि अणूबॉम्ब यांचे आधुनिकीकरण करत राहाणे गरजेचे आहे. पाकिस्तान तयार करत असलेल्या नवीन अणूबॉम्बला आपले प्रतिउत्तर काय असेल याचीही तयारी करून ठेवली पाहिजे. कारण पाकिस्तान हा धोकादायक देश आहे

येत्या दहा वर्षांत पाकिस्तानकडे कमीत कमी २५० अण्वस्त्रे तयार असतील, यामुळे पाकिस्तान हा अण्वस्त्रे बाळगणारा जगातील पाचव्या क्रमांकाचा देश बनेल, अशी माहिती अमेरिकेच्या अण्वस्त्र शास्त्रज्ञ संघटनेने दिलेली आहे. 'पाकिस्तानची अण्वस्त्र क्षमता २०१५ङ्क या नावाचा एक विशेष अहवाल अमेरिकेतील अण्वस्त्र शास्त्रज्ञांनी तयार केला आहे. हा अहवाल पाकिस्तानचे पंतप्रधान नवाझ शरीफ अमेरिकेच्या दौर्यावर असताना प्रसिद्ध करण्यात आला. या अहवालाप्रमाणे

पाकिस्तानकडे सध्या ११० ते १३० अण्वस्त्रे असावीत आणि २०११ पेक्षा या संख्येत खूप जास्त वाढ झालेली आहे.

**<u>१० ते १५ नवीन अणूभट्ट्या उभारण्यास चीनी मदत</u>**

सध्या पाकिस्तानकडे असलेल्या चार अणूभट्ट्यांमधून युरेनियमचा वापर करुन प्लुटोनियम हे बायप्रॉडक्ट निर्माण केले जाते. अणूबॉम्ब बनवण्याकरिता प्लुटोनियमची गरज असते. एक अणूभट्टी एका वर्षांत जेवढे प्लुटोनियमचे उत्पादन करते त्यात दोन ते तीन अणूबॉम्ब बनू शकतात. म्हणजे पाकिस्तानकडे प्रत्येक वर्षी आठ ते बारा नवीन अणूबॉम्ब बनवण्याची ताकद आहे. तसेच काही महिन्यांपूर्वी चीनचे पंतप्रधान जेव्हा पाकिस्तान दौर्यावर गेले होते, तेव्हा त्यांनी पाकिस्तानला वीज निर्मितीसाठी अजून १० ते १५ नवीन अणूभट्ट्या उभारण्यास चीन मदत करेल असे आश्वासन दिले होते. यामुळे येणार्या काही वर्षांत अणूबॉम्ब निर्मितीसाठी लागणारा प्लुटोनियमचा साठा पाकिस्तानमध्ये खुपच वाढण्याची शक्यता आहे.

अण्वस्त्र वाहून नेण्यासाठीही तीन प्रकारच्या वाहनांचा वापर केला जातो. एक तर विमानाने अणूबॉम्ब नेऊन शत्रू राष्ट्रावर टाकणे. यासाठी ‘एफ १६ङ्क व इतर अत्याधुनिक विमानांची गरज आहे आणि अशा प्रकारची विमाने पाकिस्तानमध्ये तयार आहेत. यातील ‘एफ १६ङ्क हे अत्याधुनिक विमान अमेरिकेनेच पाकिस्तानला पुरवलेले आहे. अणूबॉम्ब वाहून नेण्यासाठी वेगवेगळ्या क्षेपणास्त्रांचा वापर करता येतो. त्यामध्ये ‘शाहीन १ङ्क आणि ‘शाहीन ३ङ्क या दोन क्षेपणास्त्रांची निर्मिती पाकिस्तानमध्ये जोरात सुरू आहे आणि तिसरा प्रकार म्हणजे पाणबूडीतून डागता येणारी क्षेपणास्त्रे. ही क्षेपणास्त्रे मात्र पाकिस्तानकडे अजून उपलब्ध नाहीत आणि अशा प्रकारची क्षेपणास्त्र तयार करण्यासाठी पाकिस्तानला अजून पुष्कळ वेळ लागू शकतो.

**<u>क्षेपणास्त्र बनवण्यास उत्तर कोरियाची मदत</u>**

भारताशी बरोबरी करण्याच्या उद्देशाने पाकिस्तान पछाडलेला आहे. त्याकरिता तो देश कुठल्याही थराला जाऊ शकतो. आपल्याला पाकिस्तानचे माजी पंतप्रधान झुल्फिकार अली भुट्टो यांचे एक वाक्य ऐकिवात असेल, ते म्हणाले होते, ‘आम्ही उपाशी राहू, पण अणूबॉम्ब मात्र नक्की बनवू.ङ्क ज्यावेळी भुट्टो यांनी अणूकार्यक्रमाला सुरुवात केली त्यावेळी इतर अरब आणि मुस्लिम देशांनी त्यांना मदत केली होती. डॉ ए. क्यू. खान यांना पाकिस्तानच्या अणूबॉम्बचे जनक मानले जाते. त्यांनी अणूबॉम्बसाठी लागणारे तंत्रज्ञान अनेक युरोपियन देशांमधून चोरी करून आणले होते. महत्त्वाचा मुद्दा असा आहे की, डॉ. ए. क्यू. खान ज्यांना हा अणूबॉम्ब बनवण्याचे श्रेय जाते ते स्वतः अणूशास्त्रज्ञ नव्हते, तर ते एक मेटरलॉजिस्ट (धातू विज्ञानशास्त्रज्ञ) होते. आपण कल्पना करू शकतो की, एका मेटरलॉजिस्टने वेगवेगळ्या ठिकाणांहून चोरून आणलेल्या डिझाईन्स व कच्च्या मालापासून अणूबॉम्ब कसा बनवला असेल. अर्थातच सगळ्याच गोष्टी चोरता येत नाहीत. या प्रकल्पासाठी ज्या गोष्टी पाकिस्तानला कमी पडत होत्या, त्यासाठी उत्तर कोरिया आणि चीनने त्यांना मदत केली. पाकिस्तानात असणारी बहुतांश क्षेपणास्त्र ही उत्तर कोरियामध्ये निर्माण झालेली आहेत. त्यामुळे क्षेपणास्त्र विज्ञानात पाकिस्तान खूप पुढे गेलेला आहे.

**चीनशी सामना करण्यासाठी अमेरिकेला भारताची गरज**

भारत आणि अमेरिका यांच्यामध्ये काही महिन्यांपूर्वी अणूकरार झाला होता. या करारामुळे आता भारताला इतर राष्ट्रांकडून शांततेसाठी अणूशक्ती निर्माण करण्याकरिता मदत आणि तंत्रज्ञान मिळणे  सोपे झालेले आहे. गेल्या वर्षी पंतप्रधान मोदी यांच्या अमेरिका दौर्‍यात हा करार झाला होता आणि यामुळे मागील एका वर्षांत आपल्याला पुष्कळ फायदा झालेला आहे. अणूशक्ती निर्माण करण्यासाठी लागणारे युरेनियम भारतात मिळत नाही, ते आता आपल्याला ऑस्टड्ढेलिया, कझाकिस्थान

यांच्याकडून मिळणे सुरू झालेले आहे. याशिवाय अमेरिका, रशिया यांनी आपल्याला अणूशक्ती निर्माण करण्याकरता लागणार्या अणूभट्ट्यांचे (न्यूक्लिअर रिॲक्टर) अत्याधुनिक तंत्रज्ञान पुरवण्याचे मान्य केले आहे. जसा आणू करार भारत आणि अमेरिकेमध्ये झाला होता तशाच प्रकारचा अणूकरार आमच्याशीपण केला जावा अशी नवाझ शरीफ यांची आत्ताच झालेल्या भेटीमधील एक मागणी होती. अमेरिकेने या करारावर सही करावी यासाठी पाकिस्तानने त्यांच्यावर दबाव आणण्याचाही प्रयत्न केला. पण भारताच्या प्रयत्नामुळे पाकिस्तानला यात यश मिळाले नाही.
अमेरिकेने भारताशी अणूकरार केला, त्याला अनेक कारणे होती. चीनच्या वाढत्या वर्चस्वाशी सामना करण्यासाठी अमेरिकेला भारताची गरज आहे. भारतालासुद्धा चीनला शह देण्यासाठी अमेरिकेसारख्या तंत्रज्ञानाची महाशक्तीची नक्कीच गरज आहे. आज अमेरिकेमधल्या वेगवेगळ्या क्षेत्रात कार्यरत असलेले ‘नॉन रेसिडन्स इंडियनङ्क म्हणजे अमेरिकेत राहणारे भारतीय यांचा दबावगट फार प्रभावी असल्यामुळे आपल्याला हा अणूकरार पूर्ण होण्याकरिता मदत मिळाली होती. भारतावर तंत्रज्ञानाचा बहिष्कार चालू ठेवला असता, तर अमेरिकन उत्पादनांना भारताची मोठी बाजारपेठ बंद झाली असती आणि अमेरिकेला अशा प्रकारची एक मोठी बाजारपेठही गरजेची होती. याचबरोबर अण्वस्त्र प्रसार बंदीमध्ये भारताचा रेकॉर्ड अतिशय उत्कृष्ट आहे. भारताकडे असणारे अणूशक्ती निर्मिती, अणूबॉम्ब निर्मितेचे तंत्रज्ञान भारताने कुठल्याही देशाला दिलेले नाही. यामुळे भारत हा एक चांगला मित्र मानला जातो आणि यामुळेच अमेरिकेने भारताशी हा अणूकरार केला.
पाकिस्तानला अणूबॉम्ब सहजतेने वापरता येणे शक्य नाही
त्यामानाने पाकिस्तान हा बेभरवश्याचा आणि धोकादायक देश आहे. याशिवाय सर्वांत महत्त्वाचा मुद्दा असा, की पाकिस्तानमध्ये दहशतवाद्यांचे प्रस्थ आज खूप वाढलेले आहे. त्यामुळे जगाला अशी भीती

वाटते, की पाकिस्तानकडे असणारे अणूबॉम्ब दहशतवाद्यांच्या हातामध्ये पडले, तर जगाच्या शांततेला मोठा धोका निर्माण होऊ शकतो. जरी पाकिस्तानकडे अणूबॉम्ब असले तरी त्याबरोबर सर्व जग त्यांच्यावर लक्ष ठेवून आहे. त्यामुळेच पाकिस्तानकडे असणारे अणूबॉम्ब त्यांना इतक्या सहजतेने वापरता येणे शक्य नाही.

अणूबॉम्बला एक राजकीय शस्त्र म्हटले जाते. अणूबॉम्बचा वापर १९४४च्या दुसर्या महायुद्धात फक्त दोन वेळा झाला होता आणि त्यानंतर त्याचा वापर पुढे कधीही झाला नाही.त्यामुळे अणूबॉम्ब हे लढाईत वापरण्याचे शस्त्र नसून सध्या ते एक धमकी देण्याचे शस्त्र बनले आहे. पण पाकिस्तानच्या अणूकार्यक्रमांमध्ये गेल्या काही वर्षांपासून एक नवीन बदल होत आहे. तो म्हणजे पाकिस्तान आता 'टॅक्टीकल न्युक्लिअर वेपन म्हणजे छोटे अणूबॉम्ब तयार करत आहे. मोठ्या अणूबॉम्बचा वापर हा मोठ्या शहरांवर किंवा एखाद्या मोठ्या लक्ष्यावर मारा करण्यासाठी केला जातो. पण ज्यावेळेस भारत-पाक सैन्यात समोरासमोरची लढाई सुरू होईल तेव्हा मोठे अणूबॉम्ब वापरले जाऊ शकत नाहीत. म्हणून आता पाकिस्तान छोटे अणूबॉम्ब ज्याला इंग्रजीत 'टॅक्टिकल न्युक्लिअर वेपन' म्हटले जाते हे तयार केलेले आहेत. या अणूबॉम्बला पाकिस्तानने 'नासेर हत्फ ९ङ्क अशी नावे दिलेली आहेत. 'नासेरङ्क हा छोटा अणूबॉम्ब, 'हत्फ ९ङ्क या क्षेपणास्त्राच्या मदतीने ५० ते ६० किलोमीटर इतका लांब फेकला जाऊ शकतो.

**<u>पाकिस्तानवर हल्ला केला, तर छोट्या अणूबॉम्बचा वापर</u>**

पाकिस्तानचे असेही म्हणणे आहे, की भारताने एक नवीन प्रकारची युद्धनीती तयार केलेली आहे. त्याला इंग्रजीत 'कोल्ड स्टार्ट डॉक्टरीनङ्क असे म्हटले जाते. 'कोल्ड स्टार्ट डॉक्टरीनङ्क म्हणजे, जर भारतावर कोणताही मोठा दहशतवादी हल्ला झाला, तर भारत आपल्या सीमेवर असलेल्या सैन्यानिशी लगेच पाकिस्तानवर हल्ला करेल. पहिले लढण्याची

पद्धत वेगळी होती. संपूर्ण सैन्य शांतताकाळात देशामध्ये अनेक ठिकाणी पसरलेले असते, ते जोपर्यंत एकत्र होऊन सीमेवर पोहोचत नाही. तो पर्यंत लढाईला सुरूवात होत नाही. ‘ऑपरेशन पराक्रमङ्कमध्ये बरोबर हेच झाले. आपल्या सैन्याची सिमेवर जमवाजमव करण्याकरता आपल्याला सात ते दहा दिवसांचा अवधी लागू शकतो, म्हणून लढाई सुरू करायला इतका वेळ लागतो. पण आता ‘कोल्ड स्टार्ट डॉक्टरीनङ्क या रणनितीमुळे जे ५० टक्के सैन्य सीमेवर आहे त्याचा वापर करून लढाईला लगेच सरूवात केली जाईल.

म्हणजे गरज पडली तर आपण पारंपरिक पद्धतीचा हल्ला पाकिस्तानवर लगेच एक ते दोन दिवसातच करू शकतो. पूर्वी याच हल्ल्याला सात ते दहा दिवस लागत असत. अशा प्रकारचा अचानक होणारा हल्ला करुन भारतीय सैन्य पाकिस्तानात घुसले, तर त्यांच्या विरुद्ध ‘टॅक्टिकल न्युक्लिअर वेपनङ्कचा वापर केला जाईल. पाकिस्तानच्या या सर्व अणूबॉम्बचा मुख्य उद्देश आहे, तो म्हणजे सगळ्या जगाला घाबरवून सोडणे. ज्यामुळे सर्व जग भारतावर काश्मीर प्रश्नावरून पाकिस्तानशी बोलणी चालू ठेवण्यासाठी दबाव आणतील. त्याचबरोबर जर भारताने झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या प्रत्यूत्तरादाखल पाकिस्तानवर हल्ला केला, तर त्याच्याविरुद्ध छोट्या अणूबॉम्बचा वापर करता येइल. ‘सेकंड स्टाईक केपेबिलिटीङ्क आहे. यामधून पाकिस्तान भारताला सांगू इच्छितो की, भले आम्ही तुमच्यावर कितीही दहशतवादी हल्ले करू, पण तुम्ही आमच्यावर हल्ला करायचा नाही. तसा तुम्ही प्रयत्न केलात तर आम्ही तुमच्याविरुद्ध छोट्या अणूबॉम्बचा वापर करू, यामुळे सगळे जग घाबरून भारत आणि पाकिस्तानचे युद्ध थांबवण्यासाठी प्रयत्न करतील. काही तज्ज्ञांना असे वाटू लागले, की आता पारंपरिक पद्धतीने युद्ध करता येणे शक्य नाही. पण बरोबर आहे का? आपण पाकिस्तानला सांगितले पाहिजे, की फक्त दहशतवादी हल्ले किंवा अणूयुद्ध हे दोनच युद्धाचे

पर्याय नसून पारंपरिक युद्ध हा सुद्धा प्रत्युत्तर म्हणून एक पर्याय आहे आणि गरज पडली, तर भारत पारंपरिक युद्धाचा देखील वापर करू शकतो. '

अणूबॉम्बबाबत भारताची निती आहे, 'नो फस्ट यूजङ्क म्हणजे, आम्ही स्वतःहून कुठल्याही शत्रूवर अणूबॉम्बने हल्ला करणार नाही, पण जर आमच्यावर शत्रुने अणूबॉम्बने हल्ला केला तर नक्कीच आम्ही त्या देशावर अणूबॉम्बने हल्ला करू शकतो. आपल्या देशाकडे सध्या 'सेकंड स्टाईक केपेबिलिटीङ्क आहे. म्हणजेच शत्रूने आपल्यावर टाकलेल्या अणूबॉम्बमुळे होणारे नुकसान सहन करून आपण त्या शत्रूवर अणूबॉम्बने मोठ्या प्रमाणावर हल्ला करू शकतो.

**<u>भारतही पाकिस्तानात छुपे युद्ध खेळू शकतो</u>**

मोदी सरकार आल्यापासून अजून एक नवीन प्रकारचे युद्ध सुरू झालेले आहे, असे पाकिस्तानी वृत्तपत्र आणि तेथील नेत्यांचे म्हणणे आहे. ज्यापद्धतीने पाकिस्तान भारतात काश्मीरमधील दहशतवाद, नक्षलवाद्यांना मदत, इतर दहशतवादी कारवाया करण्यार्यांना मदत देत आहे, त्याचप्रमाणे आता भारतानेही पाकिस्तानात छुपे युद्ध सुरू केले आहे. याचा पुरावा म्हणून त्यानी एमक्यूएम या कराचीतील मुहाजीर पार्टीचे नेते अल्ताफ हुसेन यांच्या बीबीसीला दिलेल्या मुलाखतीचा दाखला दिलेला आहे. अल्ताफ हुसने यांनी यात म्हटले होते की, भारत आम्हाला मदत करत आहे, पण दुसर्याच दिवशी त्यांनी त्यांचे हे म्हणणे मागे घेतले. याशिवाय पाकिस्तानचे असे म्हणणे आहे की सध्या बलुचिस्तानमध्ये चालू असलेल्या स्वातंत्र लढ्यामध्ये भाग घेणार्या बलुचिस्तान लिबरेशन आर्मीला भारत मदत करतो आहे. त्याचप्रमाणे अफगाणीस्तानाची मदत घेऊन पाकिस्तानातील अशांत अशा वजरिस्थानात भारत आपले नाक खूपसतो आहे. ते खरे आहे की खोटे आहे हे येणाराच काळच दाखवून देईल. पण अशा तक्रारी गेल्या सहा-सात

महिन्यांपासून पाकिस्तानी वृत्तपत्रांमधून प्रसिद्ध होत आहेत.
यावरून असे वाटते की ज्या प्रकारे पाकिस्तान आपल्या देशात छुपे युद्ध खेळतो आहे, त्याचप्रकारचे छुपे युद्ध भारतही पाकिस्तानात खेळत असावा. गेल्या महिन्यामध्येच पाकिस्तान ऑक्युपाईड कश्मीरमध्ये निदर्शने झाली. हे निदर्शन करणार्याचे म्हणणे होते की आम्हाला भारतात परत जायचे आहे. तसेच काही निदर्शनकत्र्यांनी भारताचा झेंडाही तिथे फडकवला. यावरून असे वाटते की सध्या आपण जशासतसे उत्तर देत आहोत. अशा प्रकारचे अपारंपरिक युद्ध खूप वेळ चालते आणि यात विजय मिळवणेही खूप कठीण असते.
भारताशी बरोबरी करण्याच्या उद्देशाने पाकिस्तान इतका पछाडलेला आहे की त्यासाठी तो कोणत्याही थराला जाऊ शकतो. भारताला अमेरिका आणि इतर देशांची मदत घेऊन पाकिस्तानमध्ये तयार होत असलेल्या आणूबॉम्ब आणि क्षेपणास्त्र कार्यक्रमावर नजर ठेवावी लागेल. एक सुज्ञ देश म्हणून भारताने आपली पारंपरिक युद्ध करायची तयारी ठेवायलाच हवी आणि त्याचबरोबर आपली क्षेपणास्त्रे आणि अणूबॉम्ब यांचे आधुनिकीकरण करत राहाणे गरजेचे आहे. पाकिस्तान तयार करत असलेल्या नवीन अणूबॉम्बला आपले प्रतिउत्तर काय असेल याचीही तयारी करून ठेवली पाहिजे. कारण पाकिस्तान हा धोकादायक देश आहे आणि पाकिस्तानबरोबर शांतता अनेक वर्षे प्रस्थापित होऊ शकत नाही. म्हणून आपण सगळ्या सुरक्षात्मक उपाययोजना करून ठेवणे आवश्यक आहे. ज्यामुळे पाकिस्तानने कधीही हल्ला केल्यास त्याला प्रतिउत्तर देण्यास आपण तयार असू.

## **प्रकरण 3- भारतातील दहशतवादः हजार जखमांनी रक्तबंबाळ भारत**

**१७ मे २०१५ सागरी सुरक्षा : एक समीक्षा**
**२ ऑगस्ट २०१५धडा पंजाब हल्ल्याचा**

**२० सप्टेंबर इसिसविरुद्धची ‘डिजिटल लढाईङ्क qजकण्यासाठी...**

**१५ नोव्हेंबर अमली पदार्थांचा गोल्डन ट्रँगल आणि भारत**

**२२ नोव्हेंबर २०१५पॅरिसवरील हल्ला आणि भारत**

**...हेडली की जबानी!**

**१७ मे २०१५ पाकिस्तानी बोट पकडल्यानं तर सागरी सुरक्षेची समीक्षा**

अलीकडेच भारतीय तटरक्षक दलाने भारतीय हद्दीत येणारी पाकिस्तानी बोट पकडून त्यातील जवळपास ६०० कोटी रुपयांचे अंमली पदार्थ जप्त केले. प्रत्येक वर्षी तटरक्षक दल करोडो रुपयांचे तस्करी केलेले सामान पकतात. पण न पकडल्या गेलेल्या सामानाची किंमत ही याहून दहापट अधिक असण्याची शक्यता आहे. तसेच या मार्गाने दहशतवाद्यांचा अथवा स्फोटकांचा शिरकाव देशात होण्याची दाट शक्यता असते. २६/११ नंतर आपण बर्याच अंशी सागरी सुरक्षेबाबत उपाययोजना केल्या आहेत. पण त्या पुरेशा नाहीत.

**६०० कोटीचे अफू, गांजा, चरस घेऊन येणारी एक पाकिस्तानी बोट पकडली**

९ मेला सागरी सुरक्षेच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचे असलेले आयएनएस सरदार पटेल हे नाविक तळ गुजरातच्या पोरबंदर येथे कार्यान्वित झाले. गुजरातची १६०० किलोमीटरची समूद्र किनारपट्टी या नाविक तळामुळे आता सुरक्षित झाली आहे. काही आठवड्यांपूर्वी ६०० कोटी रुपयांचे अफू, गांजा आणि चरस घेऊन भारतीय हद्दीत येणारी एक पाकिस्तानी बोट भारतीय नौदलाने एका संयुक्त मोहिमेमध्ये पकडली. या बोटीमध्ये असणार्या आठ पाकिस्तानी नागरिकांनाही पकडण्यात आले. इतक्या मोठ्या प्रमाणात भारतात चोरट्या मार्गाने आणले जाणारे अंमली पदार्थ पाहता किती भारतीय युवक नशेच्या आहारी गेले असतील याची कल्पना येते. याशिवाय  सागरी सुरक्षेसंदर्भात आणखी दोन महत्त्वाच्या घटना नजिकच्या काळात घडल्या आहेत.

यापैकी एक म्हणजे चीनचे राष्ट्राध्यक्ष शी झिनपिंग यांनी पाकिस्तानला आठ मोठ्या पाणबुड्या देण्याची घोषणा केली आहे. या पाणबुड्या येत्या काही वर्षांमध्ये पाकिस्तानला देण्यात येणार आहेत. यामुळे पाकिस्तानी पाणबुड्यांची संख्या भारतीय पाणबुड्यांइतकीच किंवा त्याहून जास्त होण्याची शक्यता आहे. या पाणबुड्यातून क्षेपणास्त्रे डागण्यात येतात. याशिवाय पाकिस्तानी दहशतवादी संघटनांनी स्वत:चे क्षेपणास्त्रही बनवले असून त्याविषयीचा व्हिडीओ जारी करण्यात आला आहे. पाकिस्तानी दहशतवादी संघटनांकडे जर क्षेपणास्त्रे असतील तर ते समुद्राच्या बाजूने येऊन किनार्याजवळ असलेल्या टार्गेटवर किंवा समुद्रात असणार्या बॉम्बे हायच्या तेलनिर्मिती प्रकल्पांवर किंवा तेल घेऊन जाणार्या पाईपलाईन्सवर क्षेपणास्त्रांनी हल्ला करण्याची शक्यता आहे. या पाश्र्वभूमीवर अशा प्रकारच्या हल्ल्यांपासून या प्रकल्पांचे रक्षण करण्याकरिता आपण किती समर्थ आहोत, असा प्रश्न निर्माण होतो.

**<u>शंभरहून जास्त वेळा समुद्राकडून हल्ला होईल अशा सुचना</u>**

२०१४ मध्ये १०० हून अधिक वेळा गुप्तचर संस्थांनी समुद्रामार्गे भारतावर हल्ला होण्याचे इशारे दिले आहेत. सुदैवाने तसे झाले नाही. पण आगामी काळात होणार नाही, असे नाही. म्हणूनच समुद्रमार्गे असलेल्या धोक्याची पुन्हा एकदा समीक्षा करणे गरजेचे आहे. प्रत्येक देशाची सागरी सीमा रेषा ही समुद्र किनार्यापासून २०० नॉटिकल मैलपर्यंत असते. यामधून मिळणारे गॅस, तेल किंवा खनिज पदार्थ यांवर त्या देशाची मालकी असते. आज आपल्या किनार्यावर १२ मोठी आणि २०० छोटी बंदरे आहेत. यापैकी मोठ्या बंदरांचे रक्षण बर्यापैकी केले जाते, पण छोट्या बंदरांचे रक्षण वाढवण्याची नक्कीच गरज आहे. समुद्रकिनार्यावर अनेक ठिकाणी स्पेशल इकोनॉमिक झोन आहेत. मुंबईजवळ, गुजरातमध्ये कांडला येथे, तसेच विशाखापट्टणम, चेन्नई आदी ठिकाणी समुद्रकिनार्यावर असे स्पेशल इकोनॉमिक झोन आहेत.

**<u>रक्षण क्षेपणास्त्र फायदपासून</u>**

तेथे मोठ्या प्रमाणात कारखाने तयार केले आहेत. याशिवाय आपले बहुतेक तेलशुद्धीकरणाचे प्रकल्प हे या समुद्र किनार्यावर आहेत. याशिवाय अणुशक्तीने वीज तयार करणारी तारापूर, जयपूर ही केंद्रेही अशा ठिकाणी आहेत. या ठिकाणी एखाद्या दहशतवादी संघटनेकडून क्षेपणास्त्रांमार्फत हल्ला केला जाऊ शकतो. अशा वेळी तो रोखण्यासाठी आपण समर्थ आहोत का ?

**<u>तस्करी कशी थांबवता येईल?</u>**

सागरी मार्गाने होणारा आणखी एक धोका म्हणजे तस्करीचा. मुंबई बंदरात अशा प्रकारची तस्करी मोठ्या प्रमाणावर सुरू आहे. यामध्ये मोठ्या प्रमाणावर डिझेल हे भारतामध्ये चोरट्या मार्गाने आणले जात असल्याचे वृत्त माध्यमांमधून प्रसारित झाले आहे. याशिवाय खोटया नोटा अफू, गांजा, चरस, सोने आणि चांदी तसेच इतर अनेक गोष्टींची तस्करी केली गेलेली आहे.

डिझेल किंवा इतर गोष्टींच्या तस्करीबरोबरच स्फोटकांची, हत्यारांची तस्करी केली तर काय होईल? माध्यमांनीच दिलेल्या वृत्तांनुसार, माओवाद्यांना आंध्रप्रदेश जवळच्या विशाखापट्टनमच्या किनार पट्टीवरून हत्यारे पुरवली जात असल्याचे अहवाल समोर आले आहेत. बांगलादेशी हे समुद्र मार्गाने सुदरबन, ओरिसा आणि आंध्र प्रदेशच्या किनारपट्टीवर अनेक वेळा उतरलेले आहेत. याशिवाय तामिळनाडूमधील स्फोटांमध्ये पकडण्यात आलेले दहशतवादी हे समुद्रमार्गे श्रीलंकेच्या बाजूने आलेले होते. थोडक्यात, समुद्राकडून होणारे धोके हे बहुआयामी आहेत. यामध्ये पाकिस्तान आणि आखाती देशांमधून होणार्या तस्करीचा प्रश्नही मोठा आहे. याशिवाय दक्षिण पूर्व आशियामधील अनेक गुन्हेगारी गट समुद्रमार्गे अशा प्रकारची तस्करी करत असतात.

**<u>समुद्राकडून रक्षण करण्याची जबाबदारी कोणाची?</u>**

ही तस्करी रोखण्याची जबाबदारी सरकारच्या अनेक खात्यांची आहे. यामध्ये भारतीय नौदल, तटरक्षक दल, पोलीस, कस्टम, एक्साईज खाते आणि वेगवेगळ्या गुप्तहेर संस्था यांचा समावेश आहे. सध्या वाढलेल्या जबाबदारीप्रमाणे किनार्यापासून १२ नॉटिकल माईलपर्यंतची जबाबदारी ही पोलीसांची आहे. १२ नॉटिकल माईलपासून २०० नॉटिकल माईलपर्यंतची जबाबदारी ही तटक्षरक दलाची आहे आणि त्यापुढील भागात घडणार्या घटनांची जाबदारी भारतीय नौदलाची आहे. समुद्र किनार्यावर असलेल्या पोलीस ठाण्यांची संख्या ही वाढलेली आहे. महाराष्ट्राच्या ७६० किनार्यावर ८ पोलीस ठाणी प्रस्थापित झाली आहेत.

२६/११ च्या तुलनेमध्ये भारतीय तटरक्षक दलाचे सामथ्र्य आता बर्यापैकी वाढलेले आहे. भारतामध्ये सध्या कोस्टगार्डची ४० सेंटर्स आहेत आणि त्यांच्याकडे टेहाळणी करणार्या ८० ते १०० बोटी आहेत.याशिवाय नौदलाकडे टेहाळणी करण्यासाठी असलेली विमाने आणि जहाजे यांची संख्याही वाढलेली आहे. गेल्या सहा वर्षांमध्ये आपल्याकडे असलेल्या बोटी आणि रडार यांची संख्याही वाढलेली आहे. याशिवाय सरकारने वेगवेगळ्या संस्थांना एका मुख्यालयाखाली आणण्याकरिता मुंबई, विशाखापट्टणम, कोची आणि पोर्ट ब्लेअर येथे जॉईंट ऑपरेशन सेंटर्स तयार केली आहेत. यामध्ये समुद्र सुरक्षेसाठी असलेले सर्व घटक एकत्र येऊन काम करतात. तसेच प्रत्येक आठवड्याला आणि महिन्याला वेगवेगळ्या गुप्तहेर संस्थांकडून गुप्तहेर माहिती गोळा करून ती एकत्रितपणे सर्वांना दिली जाते. याशिवाय दरवर्षी किमान दोन वेळा हे सर्व घटक एकत्र सराव करून आपल्या क्षमतेची चाचपणी करतात. थोडक्यात, गेल्या वर्षांत यात बरीच प्रगती झाली आहे.

**३० वर्षांत ९२० विदेशी मच्छिमारी बोटी आपल्या समुद्रामध्ये पकडण्यात यश**

गेल्या ३० वर्षांमध्ये तटरक्षक दलाने तस्करी थांबवण्यामध्ये थोडे यश

नक्कीच मिळवले आहे. गेल्या ३० वर्षांत ९२० विदेशी मच्छिमारी बोटी आपल्या समुद्रामध्ये आल्या होत्या. त्यांना पकडण्यात आले आहे आणि ९१४२ हून जास्त परकिय नागरिकांना त्यांनी पकडलेले आहे. त्यांच्याकडून पकडलेल्या तस्करी सामानाची किंमत ५०३ कोटींहून जास्त आहे. आपल्या समुद्रामध्ये सोमाली चाचे पोहोचलेले होते, त्यांच्या विरुद्ध गेल्या २० वर्षांमध्ये चार ऑपरेशन करण्यात आली. यामध्ये कोस्टगार्डला यश मिळालेले आहे.

असे असले तरी सागरी मार्गाने होणार्या घुसखोरीचा, दहशतवादी हल्ल्याचा, तस्करीचा धोका लक्षात घेता ही तयारी पुरेशी नाही. आज छोटी बंदरे आणि अनेक किनार्यावर असलेली अणुशक्ती निर्माण करणारी केंद्रे किंवा रिफायनरी यांची बाह्यसुरक्षा वाढवण्याची गरज आहे. याकरिता तटरक्षक दल आणि नौदल यांनी एकत्र मिळवून अशा किनार्यावर असलेल्या संस्थांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने एक सिक्युरिटी ऑडीट करण्याची गरज आहे. यातून ज्या ठिकाणी कमतरता असेल अशा ठिकाणी तातडीने उपाययोजना करणे आवश्यक आहे. याशिवाय सध्या आपले गुप्तहेर खाते सक्षम नाही. आज गुप्तचर माहिती एकत्र करण्याचे काम कोस्टगार्डला सांगण्यात आले आहे. सर्वांनी या क्षेत्रामध्ये आपल्या स्वत:चे इंटेलिजन्स तयार करण्याची गरज आहे.

**<u>संरक्षण लक्षद्विप आणि अंदमाननिकोबार द्विपसमुहाचे</u>**

आणखी एका मुद्दयाबाबत विचार करणे आवश्यक आहे. तो म्हणजे लक्षद्विप आणि अंदमान-निकोबार ही बेटांची सुरक्षा.  अंदमान-निकोबारमधील ८५० बेटांपैकी फक्त २८ बेटांवर नागरीक राहतात. अशा वस्ती नसलेल्या बेटांवर जर  दहशतवादी संघटना उतरल्या आणि त्यांनी तिथे शस्त्रांचे साठे करणे सहज शक्य आहे. त्यामुळे याकडेही लक्ष देण्याची गरज आहे. आपल्या किनारपट्टीजवळही अनेक अशी छोटी छोटी बेटे आहेत. त्यांवर आपले कोळी बांधव दिवसा राहतात आणि रात्रीच्या

वेळी तिकडून परत येतात. अशा किनारपट्टीजवळ असलेल्या छोट्या बेटांवर जर तस्करीचे सामान उतरवले आणि दिवसा तिथून घेऊन गेले तर ते थांबवण्याकरिता सध्या यंत्रणा नाही. थोडक्यात सुरक्षेमध्ये जिथे जिथे आपल्याला उणिवा दिसत आहेत, त्यांबाबत अभ्यास करून, नियोजन करून तात्काळ उपाययोजना करण्याची गरज आहे.

**२ ऑगस्ट २०१५धडा पंजाब हल्ल्याचा**

८० ते ९० च्या दशकामध्ये पंजाबमध्ये खलिस्तानी दहशतवाद्यांनी केलेल्या हिंसाचारात हजारोंच्या संख्येने निरपराध नागरिक मारले गेले होते. पंजाबमध्ये गुरुदासपूर जिल्ह्यातील दिनानगर भागात झालेल्या दहशतवादी हल्ल्यामुळे अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत. या भागात सीमासुरक्षा दलाचे जवान मोठ्या प्रमाणावर तैनात असतानाही अतिरेकी आतमध्ये घुसण्यात यशस्वी झाले हे बीएसएफचे अपयश आहे. त्याचबरोबर १९८०-९०च्या दशकात फोफावलेल्या खलिस्तानी चळवळीचा बिमोड करणार्या पंजाब पोलिसांना गेल्या २०-२५ वर्षांतील शांततेच्या काळात अतिरेक्यांशी लढण्याचे पुरेसे प्रशिक्षण दिले न गेल्याचेही या घटनेतून समोर येत आहे. आयएसआयकडून खलिस्तानी चळवळीचे पुनरुज्जीवन करण्याचे प्रयत्न अनेक वर्षांपासून सुरू आहेत. या दृष्टिकोनातून ताज्या हल्ल्याकडे पाहण्याची आणि येत्या काळातील घुसखोरी व इतर आव्हाने लक्षात घेऊन अतिशय सतर्क, सजग आणि सज्ज राहण्याची गरज आहे.

कारगिल विजय दिवस साजरा होऊन काही तास उलटतात ना उलटतात तोच देशाच्या सुरक्षा कवचाला आव्हान देणारा दहशतवादी हल्ला पंजाबमध्ये घडला. पंजाबमधील गुरुदासपूर जिल्ह्यातील दीनानगर भागातील पोलिस स्टेशनमध्ये हा हल्ला झाला. अलीकडील काळात दहशतवादी हल्ले जम्मू आणि काश्मीरमध्ये होत आहेत. नरेंद्र मोदी यांचे सरकार आल्यापासून जम्मू आणि काश्मिरमधील जम्मू भागात

दहशतवादी हल्ल्यांची संख्या वाढलेली आहे. याचे कारण जम्मू भागामध्ये हिंदूची लोकसंख्या जास्त आहे. त्यामुळे अशा हल्ल्यांमध्ये मारले जाणार्या नागरिकांमध्ये प्रामुख्याने हिंदूचा समावेश अधिक असतो. त्यामुळेच अतिरेकी जाणीवपूर्वक जम्मू भागाला टार्गेट करत आहेत.

**<u>पंजाबमध्ये पुन्हा दहशतवाद पसरवण्याचा प्रयत्न</u>**

पंजाब हे भारत आणि पाकिस्तान यांच्या सीमेवरचे राज्य आहे. १९९० च्या दशकात पंजाब हे राज्य खलिस्तानी दहशतवाद्यांच्या कारवायांमुळे धुमसत होते. या खलिस्तानी चळवळीचे कंबरडे मोडण्यात आपल्याला यश आल्यानंतर गेल्या २० ते २५ वर्षांमध्ये या राज्यामध्ये शांतता प्रस्थापित झाली होती. त्यामुळेच मागील काही वर्षांपासून आयएसआय ही पाकिस्तानची गुप्तहेर संस्था पंजबमध्ये पुन्हा दहशतवाद निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहे. पंजाबमधील काही दहशतवादी गट खलिस्तान कमांडो फोर्स किंवा खलिस्तानी लिबरेशन आर्मी या भारतविरोधी शक्तींना आयएसआय पुन्हा प्रोत्साहन देऊन, त्यांचे पुनरुज्जीवन करून पंजाबमध्ये पुन्हा दहशतवाद पसरवण्याचा प्रयत्न करत आहे. १९९० नंतर यामध्ये आयएसआयला अजिबात यश मिळालेले नव्हते. परंतु गुरुदासपूरमधील हल्ल्यामुळे हा मुद्दा आता गांभीर्याने विचारात घ्यावा लागणार आहे.

**<u>हा हल्ला या भागामध्ये का करण्यात आला? येणार्या काळामध्ये परिणाम?</u>**

दीनानगरमध्ये झालेल्या हल्ल्यात ज्या दहशतवाद्यांनी जम्मू आणि पंजाबच्या सीमातुन भारतामध्ये घुसण्यामध्ये यशस्वी झाले. या सीमारेषेवर सीमा सुरक्षा दलाचा बंदोबस्त असतो. ते नक्कीच सीमा सुरक्षा दलाचे (बीएसएफ) मोठे अपयश आहे. या भागामध्ये नदी-नाले मोठ्या प्रमाणात आहेत. तसेच आपल्या प्रदेशातले रस्ते हे सीमेपर्यंत पोहोचलेले आहेत.हा भाग मैदानी आणि सपाट आहे. यापूर्वी या भागातून एक दोन

वेळा घुसखोरी झाल्यानंतर नदीच्या पात्रातून लपत येऊन दहशतवाद्यांनी उधमपूर जिल्ह्यामधल्या दोडा पर्वतरांगाकडे आपला मोर्चा वळवला होता.नदीच्या पात्रातून गुपचूप येणे हे तुलनेने खूप सोपे असते. अशा प्रकारचे हल्ले कधीही चुकून वा तात्काळ नियोजन करून होत नाहीत तर ते पूर्ण नियोजन करून हेतूपूर्वक केले जातात.

या हल्ल्यातून पाकिस्तान आणि आयएसआयने एक प्रकारे आपल्याला इशारा दिला आहे.जी खलिस्तानी चळवळ पूर्णपणे नष्ट केली होती तिचे येत्या काळात पुनरुज्जीवन होऊ शकते. या दहशतवाद्यांना भारताच्या सीमेमध्ये आत येण्यामध्ये आणि आल्यानंतर  कोणी कशा प्रकारची मदत केली याबाबतची माहितीही समोर येणे आवश्यक आहे.

दहशतवाद्यांनी भारताच्या सीमेच्या आत प्रवेश केल्यानंतर तेथेच एक गाडी हायजॅक केली. या गाडीमध्ये बसून, महामार्गावरून प्रवास करत हल्लास्थळी आले. दहशतवादी नेहमीच सॉफ्ट टार्गेटवर हल्ला करत असतात. दीनानगरमधील हल्ल्यामध्येही अतिरेक्यांनी बसवर गोळीबार केला. बसवर फायरिंग करून प्रवाशांना मारणे यात कोणतेही शौर्य नाही; हल्ल्यांमध्ये सामान्य नागरिकांना विनाकारण मारून घटनेचे गांभीर्य वाढवणे आणि सरकारचे आपल्याकडे लक्ष आकर्षून घेणे हा या अतिरेक्यांचा हेतू असतो.

**<u>पंजाब पोलीस पुन्हा आपल्या प्रशिक्षणाचा दर्जा सुधारतील</u>**

गुरुदासपूरमध्ये मोठ्या प्रमाणावर भारतीय सैन्य तैनात आहे. त्यामुळे सैन्याने दहशतवाद्यांना एका भागामध्ये हेरून त्यानंतर त्यांच्यावर प्रतिहल्ला चढवणे आवश्यक होते. पण आलेल्या बातमीप्रमाणे पंजाब पोलिसांनी  स्वतःहून या दहशतवाद्यांवर प्रतिहल्ला करण्याचा प्रयत्न केला. त्यामध्ये आपले मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले . या सर्व शहीद

जवानांना श्रद्धांजली वाहणे आवश्यक आहे. ज्या पंजाब पोलिसांनी १९८० ते ९० च्या दशकामध्ये अतिशय चांगल्या पद्धतीने दहशतवाद्यांचा मुकाबला केला होता त्यांचे नंतरच्या काळात म्हणजे शांतता प्रस्थापित झालेल्या काळात पुरेसे प्रशिक्षण झालेले नाही. त्यामुळेच इतक्या मोठ्या संख्येमध्ये पंजाब पोलिस दलाचे अधिकारी आणि कॉन्स्टेबल मारले गेलेले आहेत. मला खात्री आहे की यापासून धडा शिकून पंजाब पोलीस पुन्हा आपल्या प्रशिक्षणाचा दर्जा सुधारतील आणि ९० च्या दशकाप्रमाणे अतिरेक्यांशी लढण्याचे सामर्थ्य आणि कौशल्य आत्मसात करतील.

अशा हल्ल्यामध्ये दहशतवाद्यांना एका कुठल्या तरी इमारतीमध्ये जाण्यास भाग पाडून त्यांची कोंडी करणे महत्त्वाचे असते. याचे कारण जोपर्यंत ते रस्त्यावर फिरत असतात तोपर्यंत त्यांना मारणे सोपे नसते. एखाद्या इमारतीमध्ये वा घरामध्ये ते एकवटल्यानंतर आपल्याकडे असलेल्या मोठ्या शस्त्रांचा वापर करून या दहशतवाद्यांचा नयनाट करता येतो.

**<u>वाहिन्यांच्या आततायीपणाची आणि बेजबाबदारपणाची प्रचिती</u>**

दहशतवादी हल्ल्याच्या वेळी अनेक वृत्तवाहिन्यांनी दहशतवादी मोठ्या प्रमाणात फायरिंग करत आहेत असे दाखवण्याचा प्रयत्न केला. वास्तविक, हे पूर्णपणे चुकीचे आहे. कारण येणारा कुठलाही दहशतवादी जास्तीत जास्त २०० बुलेट किंवा गोळ्या घेऊन येत असतो. यामुळे दहा ते पंधरा मिनिटांहून अधिक काळ फायरिंग करण्यासाठी त्याच्याकडे अशा प्रकारचा दारुगोळा नसतो. म्हणूनच जो गोळीबाराचा आवाज येत होता तो अर्थातच आपल्याच जवानांनी केलल्या गोळीबाराचा होता; परंतु वाहिन्यांनी ते समजून घेण्याचे सौजन्य दाखवले नाही. २६-११ च्या हल्ल्याच्या वेळीही वाहिन्यांच्या या आततायीपणाची आणि बेजबाबदारपणाची प्रचिती आली होती. अशा प्रकारांमुळे सामान्य माणसांच्या मनामध्ये अकारण दहशत निर्माण होत असते.

अशा प्रकारच्या प्रसंगामध्ये एखादा दहशतवादी ग्रुप सैन्याशी अथवा पोलीसांची बोलण्यामध्ये गुंतलेला असतो; तर दुसरा दहशतवादी ग्रुप इतरत्र लपलेला असतो. तेदेखील वेळेचा फायदा घेऊन आपल्या सैन्यावर प्रतिहल्ला करण्याचा प्रयत्न करतात. म्हणूनच पोलिस किंवा सैन्यान इमारतीमध्ये अडकलेल्या दहशतवाद्यांना लक्ष्य करतानाच  इतर भागांकडे दुर्लक्ष करता कामा नये.

**<u>काही महत्त्वाचे धडे</u>**

एकूणच या हल्ल्यापासून अनेक महत्त्वाचे धडे मिळालेले आहेत. आजपर्यंत पाकिस्तानच्या दहशतवाद्यांची घुसखोरी ही काश्मीरमधल्या एलओसीवरून होत होती. सीमारेषावरुन  कमी प्रमाणात घुसखोरी होते. येणार्या दिवसांमध्ये या सीमारेषेपासून घुसखोरी वाढण्याची शक्यता आहे. म्हणून या भागामध्ये असलेल्या सीमा सुरक्षादलाने डोळ्यांत तेल घालून अतिशय सजगपणे या सीमेचे रक्षण करणे आवश्यक आहे. अशा प्रकारच्या प्रसंगामध्ये सर्वांत पहिले पोलीस पोहोचतात. म्हणून सीमेजवळच्या प्रदेशामध्ये विशेष करून पंजाब आणि राजस्थान,गुजरातमध्ये(सिमेवरील राज्यात) पोलिसांचे प्रशिक्षण हे अतिशय उच्च दर्जाचे होणे गरजेचे आहे.

दहशतवादाचे माहेरघर असलेल्या पाकिस्तानला चीन आणि अमेरिकेकडून शस्त्रांची होणारी मदत थांबवण्यासाठी आता भारताने अधिक ठामपणाने आणि जोरकसपणे आवाज उठवणे गरजेचे आहे. या हल्ल्याचा वापर आपण आंतरराष्ट्रीय स्तरावर करून अमेरिका आणि इतर राष्ट्रांवर दबाव आणून पाकिस्तानला लक्ष्य केले पाहिजे आणि पाकिस्तानचा दहशतवादाचा बुरखा फाडला पाहिजे.

**<u>२० सप्टेंबर इसिसविरुद्धची ‘डिजिटल लढाईङ्क qजकण्यासाठी...</u>**

आज रणांगणामध्ये लढाई जिंकण्याबरोबरच नवीन सैनिक तयार

करण्याकरता नव्या युवकांचे मन जिंकणे महत्त्वाचे असते. यासाठी प्रचंड प्रमाणात पैसा लागतो, तसेच प्रचाराची साधनसामग्री लागते. अशा प्रकारची सामग्री तयार करण्यामध्ये आणि इंटरनेटचा खुबीने वापर करत ती पसरवण्यामध्ये इसिसने यश मिळवले आहे. अल् कायदा आणि तालिबानला जे शक्य झाले नाही ते इसिसने करून दाखविले आहे. प्रचाराच्या लढाईमध्ये इसिस आपल्या सुरक्षा व्यवस्थांच्या खूपच पुढे आहे. आज या संघटनेमध्ये जाणार्या आणि जाऊ इच्छिणार्या भारतीयांचे प्रमाण पाहता इंटरनेटद्वारे होणारा इसिसचा प्रचार रोखणे आवश्यक आहे. ही डिजिटल लढाई आपल्या देशाला जिंकावी लागेल. त्याचबरोबर समाजातील सगळ्या घटकांनी जागृत राहण्याची गरज आहे.

इसिस या दहशवादी संघटनेशी संबंध असल्याच्या संशयावरून ११ सप्टेंबर रोजी पोलिसांनी हैद्राबाद विमानतळावरून एका महिलेला ताब्यात घेतले. अप्शा जाबीन उर्फ निकोल जोसेफ असे या महिलेचे नाव आहे. इसिसमध्ये सामिल होण्याकरता मोहोद्दीन सलमान नावाच्या व्यक्तीला तिने मदत केल्याचा आरोप आहे.

**<u>मेहंदी मसरुर बिश्वासचे १८ लाख फॉलोअर्स</u>**

इसिसमध्ये सामिल होण्यासाठी निघालेल्या १७ भारतीयांना संयुक्त अरब अमिरात सरकारने सहा सप्टेंबर २०१५ला अटक केली. यातील एकाला भारतामध्ये परत पाठविण्यात आले असून इतरांची चौकशी पूर्ण झाल्यांनंतर त्यांनाही भारताच्या हवाली केले जाणार आहे. या भारतीयांवरती गेल्या अनेक महिन्यांपासून दुबई पोलीस लक्ष ठेवून होते. सोशल मीडियाच्या माध्यमातून हा गट इसिसचा प्रचार, समर्थन आणि माहिती प्रसारित करत होते. इसिसला आर्थिक मदत केल्याच्या आरोपातूनही त्यांना अटक करण्यात आली आहे. काही महिन्यांपूर्र्वी कर्नाटक पोलिसांनी बंगळुरूच्या मेहंदी मसनूर बिश्वास या तरुणाला अटक

केली होती. दिवसा नोकरी करून तो रात्री इसिसचे काम करत होता. रात्रभर अनेक वृत्तवाहिन्यांद्वारे इसिसची माहिती गोळा करून ती माहिती तो इतरांना पोहोचविण्याचा प्रयत्न करत असत. इसिसचा प्रचार करण्यामध्ये तो अग्रेसर होता. ट्विरवर त्याचे १८ लाख फॉलोअर्स होते. तब्बल २० लाख लोक त्याचे ट्विटर अकाऊंट बघत असत.

**<u>भारत सरकारची प्रतिबंधात्मक कारवाई</u>**

याआधी दहशतवादाचा होणारा प्रसार फारच मर्यादित होता. यासाठी भरती करण्याचे काम मदरसा, मशीदी अशा ठिकाणी केले जात असे. एखाद्याला आपल्या दहशतवादी संघटनेचा सदस्य बनविण्यातही खूप वेळ निघून जात होता. मात्र इंटरनेटच्या ताकदीमुळे,ऑनलाईन प्रचारामुळे इसिससारख्या संघटनेसाठी भारतासारख्या देशातही अनेक अनुयायी तयार झालेले आहेत. काही आठवड्यांपूर्वी इसिसमध्ये सामिल होण्यासाठी भारतातून बांगलादेशमध्ये जात असलेल्या चार युवकांना अटक करण्यात आली होती. महाराष्ट्र, तामिळनाडूसारख्या प्रगत राज्यांमधील काही तरुण इसिसमध्ये सामिल झाल्याचेही वृत्त मध्यंतरी आले होते. दोन तरुणांचा यात मृत्यूही झाला होता. इसिसच्या आवाहनाला भारतातील काही तरुणांकडून प्रतिसाद मिळत आहे.

दोन महिन्यांपूर्वी १७ हजार भारतीयांनी इराकमध्ये जाऊन लढण्यासाठी व्हिसा मिळावा यासाठी अर्ज केला होता. मात्र भारत सरकारने प्रतिबंधात्मक कारवाई करून त्यांचा व्हिसा नामंजूर केला.

**<u>इसिसचा आर्थिक स्त्रोत थांबवा</u>**

लष्कर-ए-तोयबा, अल् कायदा यासारख्या दहशतवादी संघटनांच्या तुलनेत इसिसचा प्रचार फ़ारच कमी वेळात मोठ्या प्रमाणात झाला आहे. . शस्त्रांचा अघोरी वापर, प्रचार साहित्यांचा भडिमार अशा प्रकारचे हल्ले इसिस अनेक देशांविरूद्ध करत आहे. अमेरिकेतील इंटेलिजंस अॅण्ड टेरर सेंटर या संस्थेने इसिसच्या प्रचार यंत्रणेचा अभ्यास करून जगासमोर एक

पूर्ण चित्र मांडले आहे. अल् कायदा आणि तालिबानला जे शक्य झाले नाही ते इसिसने करून दाखविले आहे. इसिस आर्थिकदृष्ट्या संपन्न आहे. खंडणी, देणग्या, लूट, खनिज तेलाचा काळाबाजार अशा प्रकारांमधून इसिसला मोठ्या प्रमाणावर पैसा मिळत आहे.

दहशतवादाला मदत होण्यासाठी सामान्य माणासाच्या हृदयात स्थान मिळवणे हे देखील महत्त्वाचे असते. यासाठी प्रचंड प्रमाणात पैसा लागतो, तसेच प्रचाराची साधनसामग्री लागते. अशा प्रकारची सामग्री तयार करण्यामध्ये इसिसने यश मिळवले आहे आणि अतिशय कुशल असे मनुष्यबळसुद्धा त्यांनी तयार केलेले आहे.इसिसच्या डावपेचांविरोधात भारताने लवकर कारवाई करण्याची गरज आहे.

**<u>इसिसच्या विरोधात सायबर लढाई</u>**

आज रणांगणामध्ये लढाई जिंकणे जेवढे महत्त्वाचे असते तेवढेच नवीन सैनिक तयार करण्याकरता नव्या युवकांचे मन जिंकणे महत्त्वाचे असते. इसिसचे प्रचार साहित्य अत्यंत उच्च दर्जाचे असते आणि ते इंटरनेट, सोशल नेटवर्कच्या माध्यामातून सगळ्यांच्या समोर आणले जाते. याशिवाय यु-ट्यूबवर असंख्य व्हीडिओज आणि फिल्म्स तयार केल्या गेल्या आहेत. त्यांच्या प्रचाराचे छापिल आवृत्याही अतिशय चांगल्या दर्जाच्या कागदावर छापलेल्या असतात आणि यामध्ये इस्लामिक खिलाफत स्थापन झाल्यावर तयार होणारे विश्व हे किती सुखद असेल याचे चित्र रेखाटलेले असते.तसेच धर्मिक दाखले, उदाहरणे असलेली मासिके अनेकांकडे पाठवली जातात आणि ती इंटरनेटवरून फ्री डाऊनलोडसुद्धा करता येतात. यामुळे जगभरातून तसेच भारतातूनही अनेक युवक इसिसमध्ये सामिल होण्यासाठी तयार आहेत.

पाश्चिमात्य देशांनी इसिसच्या विरोधात सायबर लढाई सुरू केलेली आहे. भारतात आपण त्यांच्या मागे पडलो आहे.

**<u>भारतासाठी धोका</u>**

यामध्ये भारतासाठी कोणता धोका आहे आणि भारताने संरक्षणात्मक काय उपाय करावेत ?. यापूर्वी आंतरराष्ट्रीय दहशतवादी संघटनांमध्ये भारतीयांचा सहभाग नव्हता, याबद्दल भारताला अभिमान होता. पण आता इसिसमुळे हे चित्र बदलते आहे . म्हणून समाजातील सगळ्या घटकांनी जागृत राहायची गरज आहे. इसिस आपला प्रचार इंटरनेट, सोशल मीडिया साईट्स, ट्विटर, फेसबुक, ई-मेल, व्हॉटस्अॅप, एसएमएसद्वारे करत असते. विशेषतः इंटरनेवरून चाललेला प्रचार आणि डिजिटल लढाई आपल्या देशाला जिंकावी लागेल.

**<u>कॉम्प्युटर तज्ज्ञांच्या मदतीन इसिसचा प्रचार थांबवा</u>**

इसिस ज्याप्रमाणे दहशतवाद पसरवण्यासाठी इंटरनेट आदी सोशल मीडियाचा वापर करून घेते त्याप्रमाणे या साधानांद्वारे आपण दहशतवाद रोखण्यासाठी तसेच आपली सुरक्षा यंत्रणा मजबूत करण्यासाठी याचा वापर करू शकू का? जर असे करता आले तरच दहशतवादी कारवायांना जरब बसेल आणि काट्याने काटा काढता येईल. त्याकरिता आपल्याला अनेक गोष्टी करता येतील.

प्रचार करणार्या भारताबाहेरच्या साईट, सोशल नेटवर्किंग साईट्स, यु-ट्यूबवरच्या फिल्मस् या ब्लॉक करून भारतातील लोकांना इसिसच्या प्रचारापासून आपल्याला दूर ठेवता येईल. त्याचप्रमाणे भारतात असणारे इसिसचे हस्तक इंटरनेट, सोशल मीडिया, फेसबुक किंवा ट्विटरवरून प्रचार करीत असतील तर त्यांना ताबडतोब पकडून त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करायला हवी. तसेच त्यांच्या पूर्ण डोमेनवरच बंदी घालण्यात यावी. इंटरनेटच्या ट्राफिकवर कायमचे लक्ष ठेवावे लागेल. यासाठी लागणारी सॉफ्टवेअर्स उपलब्ध आहेत. त्यात आवश्यक त्या सुधारणा करून ती अधिक कार्यक्षम करणे आवश्यक आहे. आपल्याकडे सायबर सिक्युरिटीकरिता पोलिसांचा सायबर सेल आहे. पण त्यात अजून शंभर पटीने वाढ करावी लागेल आणि कॉम्प्युटर तज्ज्ञांच्या मदतीने इसिसचा

प्रचार करणारे ब्लॉग, ई-मेल, ट्विटर्र्सवरील ट्विट कोठून आले हे शोधून काढावे लागेल. सध्या सुरू असलेल्या आंतरराष्ट्रीय साईट्स, गुगल, मायक्रोसॉफ्ट, ट्विटर हे आपल्याला इंटरनेटवर टाकलेल्या कुठलाही मजकूर कोठून अपलोड झालेला आहे हे सांगू शकतात. गुगल, फेसबुक, ट्विटर्स यांसारख्या आंतरराष्ट्रीय संस्थांना जर भारतात व्यवसाय करायचा असेल तर त्यांनी दहशतवाद पसरवणारा मजकूर कोठून आला याची माहिती भारताला देणे बंधनकारक केले पाहिजे.

**<u>दहशतवादाचा प्रचार साहित्य ब्लॉक करणे जरुरी</u>**

सर्व इंटनेट जायंटस् चीनच्या म्हणण्याप्रमाणे वागतात. मात्र, भारतातच त्यांना आपण जास्त स्वातंत्र्य दिलेले आहे. त्यासाठी आपण त्यांना सांगावे लागेल की जर तुम्हाला भारतात व्यवसाय करायचा असेल तर तुम्हाला दहशतवादाविरुद्ध आम्हाला मदत करावीच लागेल. आज भारतामध्ये इंटरनेट तसेच सोशल मीडियाच्या साईट्स वापरणारे कोट्यवधी लोक आहेत, सर्वांना भारताच्या संरक्षण व्यवस्थेचे कान आणि डोळे व्हावे लागेल. यासाठी आपल्याला आलेला कोणताही दहशतवादाचा प्रचार करणारे साहित्य आल्यास ते ब्लॉक करणे व त्याची माहिती ताबडतोब पोलिसांच्या सायबर सेलला द्यावी.

अशा पद्धतीने जर सगळ्या नागरिकांनी सुरक्षा यंत्रणेला मदत केली तरच आज आपण इसिसच्या दहशतवादी प्रचाराला आळा घालू शकतो. ज्यावेळी कुठलाही युवक भरकटतो आणि इसिससारख्या दहशतवादी संघटनेकडे जातो, त्यावेळी त्याच्याबरोबर त्याच्या पालकांची, नातेवाईकांची, कॉलेजमधील  किंवा शाळेमधील शिक्षकांची , याशिवाय त्या परिसरात काम करणार्या सामाजिक संस्थांची जबाबदारी असते. म्हणून या सगळ्यांचे प्रबोधन करणे हे अत्यंत गरजेचे आहे. सगळ्यांची मदत घेऊन, सदैव कान, डोळे उघडे ठेवूनच इसिससारख्या दहशतवादी भस्मासुराचा मुकाबला करू शकतो. मला खात्री आहे आपले सर्व नागरिक आपल्या

सुरक्षा यंत्रणेचे कान आणि डोळे बनून त्यांना मदत करतील.

## **१५ नोव्हेंबर अमली पदार्थांचा गोल्डन ट्रँगल आणि भारत**

भारतामध्ये शेजारच्या देशांमधून होणारी अमली पदार्थांची तस्करी नवी नाही. त्याचे देशातील युवापिढीवर किती गंभीर परिणाम होतात, याचे सर्वांत मोठे उदाहरण म्हणजे पंजाब. पंजाबमधील ७० टक्के युवक हे अमली पदार्थांच्या आहारी गेलेले आहेत. म्यानमार या देशामध्ये चरस, अफू, गांजा या अमली पदार्थांचे मोठे उत्पादन होते. म्यानमारमधील बंडखोर गटांचा हा एक महत्त्वाचा धंदा आहे. त्यांना भारतीय बंडखोर गट आणि इतर अनेक गुन्हेगारी टोळ्या मदत करत असतात. हे रॅकेट उद्ध्वस्त करण्यासाठी म्यानमारमधील बंडखोरांच्या प्रशिक्षण तळांवर हल्ले, सीमा सुरक्षा व्यवस्थापन अधिक चांगले करणे आणि अफू, गांजा, चरस यांचा भारतामध्ये येणारा ओघ थांबवणे गरजेचे आहे.

भारताच्या सुरक्षा व्यवस्थेवर परिणाम होणार्या एका महत्त्वाच्या घटनेकडे सध्या फारसे लक्ष जाताना दिसत नाहीये. अलीकडेच म्यानमार सरकारने त्यांच्या देशातील सात बंडखोर सेनांबरोबर एक करार केला. या करारामुळे आता त्या सातही बंडखोर संघटना म्यानमार सरकारविरुद्ध लढाई करणार नाहीत. यामुळे म्यानमारमध्ये शांतता प्रस्थापित व्हायला नक्कीच मदत मिळेल. भारताचे नॅशनल सिक्युरिटी ॲडव्हायझर अजित डोवल या समारंभाला म्यानमारची राजधानी यांगोनमध्ये हजर होते. या करारामुळे म्यानमारमध्ये पूर्ण शांतता प्रस्थापित होईल का? याचे उत्तर येणारा काळच देईल. शांतता प्रस्थापित होणे अजून तरी शक्य नाही. कारण म्यानमारमधील तीन मोठे आणि मुख्य बंडखोर गट युनायटेड वा स्टेट आर्मी, कोचीन इंडिपेंडन्ट आर्मी, शान स्टेट आर्मी नॉर्थ यांनी या करारावर सह्या केलेल्या नाहीत. याशिवाय म्यानमारचा मुख्य विरोधी पक्ष नॅशनल लिग फॉर डेमॉक्रॉसी यानेही या करारावर सही केली नाही.

## **म्यानमारमधील घटनांचा भारतावर परिणाम**

म्यानमारमध्ये शांतता किंवा तिथे चालणारे युद्ध याचा भारतावर परिणाम होतो. ईशान्य भारताची १६४३ किलोमीटरची सीमा आहे. ईशान्य भारतातील नागालँड, मणिपूर किंवा मेघालयमधले अनेक बंडखोर गटाची प्रशिक्षण केंद्रे आणि व्यवस्थापकीय तळ म्यानमाराच्या जंगलात आहेत. यापूर्वी असे तळ हे काही वेळा भूतानमध्ये, जास्त वेळा बांगलादेशमध्ये आणि म्यानमारमध्ये असायचे. सध्या भूतानमध्ये यांचे अस्तित्व कमी आढळते. त्याचप्रमाणे बांगला देशने भारताला मदत करण्यास सुरुवात केल्यापासून तेथेही अशा तळांची संख्या कमी झालेली आहे. म्हणून भारतातील बहुतेक सगळ्या बंडखोर गटांचे प्रशिक्षण, व्यवस्थापकीय तळ हे म्यानमारच्या जंगलांमध्ये आहेत. कारण म्यानमार सरकारचे त्यांच्या जंगलावर अजिबात ताबा नाही. या जंगलांमध्ये म्यानमारमधील बंडखोर गट आपले स्वतंत्र राज्य चालवत आहेत.याच गटाच्या मदतीने भारतातील बंडखोर गटांनी आपले प्रशिक्षण तळ तेथे स्थापन केले आहेत.

**<u>अमली पदार्थांचे भारतात स्मगलींग</u>**

या प्रशिक्षण केंद्रांची किंमत म्हणून भारतीय बंडखोर गटांना या म्यानमारच्या बंडखोर गटांना खंडणी द्यावी लागते. किंमत म्हणून म्यानमारमध्ये तयार होणारे अफू, गांज्या, चरस सारख्या अमली पदार्थांची भारतात विक्री करणे किंवा हे अमली पदार्थ बांगलादेशात पाठवणे हे पदार्थ भारताच्या उत्तर आणि पश्चिम सीमेवर पाठवून तिथून ते पाकिस्तान आणि इतर युरोपियन देशांमध्ये पाठवणे अशा स्वरुपाची असते. म्यानमारमधील बंडखोर गटांचा हा एक महत्त्वाचा धंदा आहे. यासाठी भारतीय बंडखोर गट आणि इतर अनेक गुन्हेगारी टोळ्या मदत करत असतात.

**<u>म्यानमारमध्ये अफू, गांज्या, चरसचे मोठ्या प्रमाणावर उत्पादन</u>**

गेल्या ५० वर्षांपासून म्यानमारमध्ये अफू, गांज्या, चरस आणि इतर अनेक अमली पदार्थांचे मोठ्या प्रमाणावर उत्पादन होते.  ५० वर्षांपूर्वी

म्यानमारमध्ये कम्युनिस्ट पक्षाची ताकद वाढत होती आणि यांच्या विरुद्‌ध लढण्यासाठी इतर म्यानमारी लोकांनी अफू, गांज्या, चरसचे उत्पादन सुरू केले. ज्यामुळे त्यांना शस्त्रास्त्रे खरेदी करण्यास मदत मिळाली. दक्षिणपूर्व आशियामध्ये खास करून थायलंडला अमली पदार्थांच्या गोल्डन टँगलध्ये सामिल केले गेले.

इथे तयार होणारे अफू, गांज्या आणि चरस हे अमली पदार्थ पाकिस्तान, अफगाणिस्तान आणि सर्व युरोपियन देश आणि अमेरिकेमध्ये पाठविण्याचा प्रयत्न केला जातो. २०१४ मध्ये म्यानमारच्या जंगलात ७७२ टन अमली पदार्थ तयार करण्यात आले. सध्या म्यानमारच्या जंगलात फक्त कच्चा अफू, गांज्या, चरसच तयार केले जात नाही तर गुन्हेगारी टोळ्यांच्या मदतीने या कच्च्या मालावर प्रक्रिया करण्यासाठी अत्याधुनिक असे कारखाने या जंगलात उभारले गेले आहेत. याद्‌वारे प्रक्रिया केलेले आणि तात्कळ वापरात आणता येण्यासारखे अमली पदार्थ तयार केले जात आहेत. अशा पद्‌धतीने प्रक्रिया केलेल्या अमली पदार्थांची किंमत फार मोठ्या प्रमाणात वाढते. यासाठी लागणारे ज्ञान आणि तंत्रज्ञान हे दहा वर्षांपूर्वी म्यानमारमध्ये नव्हते. पण म्यानमारच्या ड्रग माफियांनी हे ज्ञान आणि तंत्रज्ञान थायलंड आणि इतर दक्षिण आशियाई देशांमधील गुन्हेगारी टोळ्यांच्या मदतीने म्यानमारमध्ये आणले आहे.

**<u>अमली पदार्थ भारतभर पसरवण्याचे प्रयत्न</u>**

म्यानमारमधून आलेले अफू, गांज्या, चरस व इतर अमली पदार्थ ईशान्य भारतातून संपूर्ण भारतभर पसरवण्याचे काम भारतातील बंडखोर गट गुन्हेगारी टोळ्यांच्या मदतीने करत असतात. भारताच्या पंजाब प्रांतामधील ५० टक्के युवक हे अफू, गांज्या आणि चरससारख्या अमली पदार्थांच्या आहारी गेले आहेत, असे वक्तव्य राहुल गांधींनी केले होते आणि ते खरे आहे. एका पाहणीनुसार नागालँड, मणिपूर, मिझोराम या म्यानमाराच्या सीमेला लागून असणार्या राज्यांमधील तरुणांमध्येही व्यसनाधीनतेचे

प्रमाण खूपच वाढलेले आहे.

**<u>म्यानमार सरकारला ड्रग्ज माफियांचे अस्तित्व संपवणे अशक्य</u>**

या सगळ्या ड्रग्ज माफियांविरुद्‍ध म्यानमारच्या सैन्याने कारवाई सुरू केली होती आणि या कारवाईसाठी तोफखाना, हवाई दल आणि सैन्याच्या दहा बटालियन्स म्हणजे जवळजवळ १० हजार सैनिक वापरण्यात आले. यामुळे या भागात खूप मोठ्या प्रमाणावर हिंसाचार झाला. अनेक सामान्य नागरिकांना आपली घरेदारे सोडून इतर भागांमध्ये पळून जावे लागले. याचाच परिणाम म्हणून म्यानमारमधील काही बंडखोर गटांनी म्यानमार सरकारशी शांतता करार केला आहे. या करारात काही बंडखोर गट सहभागी झालेले नाहीत. त्यामुळे अफू, गांजा, चरससारख्या अमली पदार्थांचे उत्पादन कमी होईल का? यावर मोठे प्रश्नचिन्ह आहे. सध्या म्यानमारची अर्थव्यवस्था ही पूर्णपणे ढासळलेली आहे. असे असूनसुद्‍धा म्यानमारमधील मोठ्या शहरांमध्ये रिअल इस्टेट सेक्टर आणि इतर अनेक गोष्टींची निर्मिती मोठ्या प्रमाणावर होत आहे. यासाठी पैसा कुठून येत आहे? याचे उत्तर सरळ आणि साफ आहे की, हा पैसा केवळ ड्रग्ज माफियांनी विकलेल्या अफू, गांजा, चरस यांच्यामुळेच आहे. यामुळे म्यानमार सरकारला या ड्रग्ज माफियांचे अस्तित्व संपवणे हे अशक्य झालेले आहे.

**<u>भारताने काय करावे?</u>**

अशा परिस्थितीत भारताला काय करणे गरजेचे आहे? आपण भारतविरोधी काम करणार्या नागालँड, मणिपूर वगैरे बंडखोर गटांचे तिथे असणारे प्रशिक्षण तळ म्यानमार सैन्याच्या मदतीने उद्‍ध्ववस्त करायला पाहिजे आणि त्याबरोबरच म्यानमार आणि भारत यामधील सीमा सील करण्याचे प्रयत्न केला पाहिजे. सीमा सील झाल्या तर या सीमेवरून होणारी भारतीय बंडखोरांची घुसखोरी, अफू, गांजा, चरसची तस्करी यावर नियंत्रण आणण्यास मदत होईल. भारत आणि म्यानमारची सीमा ही

डोंगराळ आहे आणि इथे घनदाट जंगलेही आहेत म्हणून या सीमेचे रक्षण करणे हे इतके सोपे नाही.

काही महिन्यांपूर्वी भारतीय सैन्याने म्यानमारमध्ये जाऊन एका नॅशनल सिक्युरिटी कौन्सिल नागालँड (के) ग्रुपच्या प्रशिक्षण केंद्रावर हल्ला करून अनेक बंडखोरांना मारले होते. गुप्तहेरांकडून माहिती मिळवून अशाच प्रकारचे हल्ले करण्यासाठी आपण तयार राहिले पाहिजे. भारत-म्यानमार सीमेची सुरक्षा सध्या आसाम रायफलकडे आहे. आसाम रायफलच्या ३० बटालियन म्हणजे जवळजवळ ३० हजार सैनिक या सीमेवरून होणारी घुसखोरी थांबवण्याचा प्रयत्न करत आहेत. पण इतके सैनिकही यासाठी पुरेसे नाहीत. या क्षेत्रात आपल्या गुप्तहेर खात्याकडून मिळणारी माहिती म्हणजेच ॲक्शनेबल इंटेलिजन्स वाढवणे गरजेचे आहे. ज्या ज्या वेळेला आपल्याला भारतीय बंडखोर गटांच्या प्रशिक्षण केंद्रांची माहिती मिळेल त्या त्या वेळी म्यानमारमध्ये घुसून त्यांच्यावर हल्ला करावा लागेल.

बंडखोरांच्या प्रशिक्षण तळांवर हल्ले, सीमा सुरक्षा व्यवस्थापन अधिक चांगले करून आणि अफू, गांजा, चरस यांचा भारतामध्ये येणारा ओघ थांबवून आपल्याला ईशान्य भारताला सुरक्षित करण्यामध्ये मदत मिळेल. याकरिता आपल्याला आधुनिक तंत्रज्ञानाचा सुद्धा वापर करावा लागेल

## २२ नोव्हेंबर २०१५पॅरिसवरील हल्ला आणि भारत

आधुनिक विचारसरणीचा, व्यक्तीस्वातंत्र्याला महत्त्व देणारा आणि एक अतिशय सहिष्णू देश म्हणून ओळखल्या जाणार्या फ्रान्समध्ये वर्षभरात दुसर्यादा भीषण दहशतवादी हल्ला होणे ही बाब दहशतवाद्यांच्या ताकदीची प्रचिती देते. पॅरिसवर हल्ला झाल्यानंतर फ्रान्स सरकारने आणि तेथील माध्यमांनी व जनतेने जी भूमिका बजावली ती निश्चितच

भारतासारख्या देशाने अनुकरण करण्याजोगी आहे. फ्रान्समध्ये लाखो सीसी टीव्ही कॅमेरे, सॅटेलाईट, सव्हिलन्स, ड्रोन सव्हिलन्स यांचा वापर होत असूनही हा हल्ला रोखता आला नाही कारण, जमा झालेल्या माहितीचा अर्थ लावणे त्यांना जमलेले नाही. त्याचबरोबर टेक्निकल इंटेलिजन्सवर अवलंबून न राहता ह्युमन इंटेलिजन्सवर अधिक भर देण्याची गरज आहे. अतिरेक्यांच्या कंपूमध्ये आपली माणसे घुसवून, खबर्याकडून माहिती मिळाल्यास असे हल्ले रोखता येतील. या हल्ल्यातून अनेक गोष्टींचा धडा भारताने घेणे गरजेचे आहे.

**<u>निर्वासितांमध्ये इसिसने आपले प्रशिक्षित दहशतवादी घुसवले</u>**

पॅरिस येथे झालेला हल्ला हा दुसर्या महायुद्धानंतरचा फ्रान्सवर झालेला सर्वांत मोठा हल्ला समजला जातो. या हल्ल्यामध्ये १६० लोक मृत्यूमुखी पडले आणि ८० पेक्षा अधिक जखमी झाले.या हल्ल्यानंतर काही तासांतच तुर्कस्तानमध्येही दहशतवाद्यांनी पोलिसांवर हल्ला केला.  पंतप्रधान नरेंद्र मोदी हे जी-२० राष्ट्रांच्या शिखर परिषदेसाठी तुर्कस्तानमध्ये असतानाच हा हल्ला झाला. यामध्ये चार पोलिस जखमी झाले होते. हा हल्लाही इसिसने केला आहे. या हल्ल्यांची कारणमिमांसा करताना काही गोष्टी लक्षात घ्याव्या लागतील. सिरीयामध्ये सुरू असलेल्या दहशतवादाला आणि हिंसाचाराला कंटाळून लाखो नागरिक युरोपच्या दिशेने निघाले आहेत. याच निर्वासितांमध्ये इसिसने आपले प्रशिक्षित दहशतवादी घुसवले आहेत. हे निर्वासित संपूर्ण युरोपमधील वेगवेगळ्या देशांमध्ये आश्रयाला गेलेले आहेत. त्यामुळे युरोप व फ्रान्सवर असे हल्ले अजूनही पुन्हा होण्याची  अतिशय दाट शक्यता आहे. आज जगात अनेक दहशतवादी संघटना दहशत पसरवत आहेत. यामध्ये अल-कायदा, लष्कर-ए-तय्यबा, बोकोहराम, इसिस आणि तालिबान यांचा समावेश आहे; मात्र या सर्वांमध्ये इसिस ही सर्वांत क्रूर, हिंसक दहशतवादी संघटना समजली जाते.

**फ्रान्स एक सहिष्णू देश**

फ्रान्स हा एक आधुनिक विचारसरणीचा, व्यक्तीस्वातंत्र्याला महत्त्व देणारा एक अतिशय सहिष्णू देश मानला जातो. मात्र आता फ्रान्सची अतीसहिष्णुताच या हल्ल्यांकरिता जबाबदार होती का? फ्रान्समध्ये धर्माला महत्त्व दिले जात नाही. तिथे ख्रिश्चानिटी हा सर्वांत मोठा धर्म असला तरीही तिथली चर्चेस ओसाड पडली आहेत. त्याचप्रमाणे फ्रान्समध्ये आशियन देशांमध्ये होणारे जाती-पातीवरून आणि धर्मावरून होणारे गुन्हे कधी घडल्याचे ऐकिवात नाही. अशा या उदारमतवादी देशातही दहशतवादी हल्ले का झाले? त्याचे अर्थातच एक कारण निर्वासितांबरोबर आलेले दहशतवादी हे असले तरी, सध्या संपूर्ण युरोपमध्ये जो उग्रवाद पसरवण्यात येत आहेत, त्याचीच ही फलनिष्पत्ती आहे.

**२६/११ च्या हल्ल्याशी साम्य**

पॅरिसवर झालेल्या हल्ल्याची तुलना २६ नोव्हेंबर २००८ रोजी मुंबईवरील हल्ल्याशी किंवा न्यूयॉर्कमध्ये झालेल्या ९/११च्या हल्ल्याशी करता येईल. पॅरिसमध्ये दोन तासातच पाच ठिकाणी बॉम्बस्फोट करण्यात आले आणि तीन ठिकाणी गोळीबार करण्यात आला. हे हल्ले हॉटेल, खेळाचे स्टेडिअम आणि सांस्कृतिक कार्यक्रम सुरू असलेल्या हॉल्सवर करण्यात आले. ही सर्व ठिकाणे गर्दीची आहेत आणि अशा ठिकाणी संरक्षण व्यवस्था सांभाळणे महद्कठीण असते. या दहशतवाद्यांकडे एके ४७ रायफल्स आणि भरपूर स्फोटक पदार्थ होते. हे हल्ले तीन ते चार वेगवेगळ्या दहशतवादी गटांनी केले असावेत आणि प्रत्येक गटात पाच ते सहा दहशतवादी सामिल असावेत. या दहशतवाद्यांना फ्रान्समधील काही स्थानिक नागरिकांची मदत झाली असण्याची शक्यता आहे. यामधील आठ आतंकवादी मारले गेले आणि इतर आतंकवादी हे शस्त्रे लपवून आणि फ्रान्समधील नागरिकांत मिसळून गेलेले असण्याची शक्यता आहे. मारल्या गेलेल्या आठ दहशतवाद्यांपैकी सात दहशतवादी हे आत्मघाती

हल्ले करणारे होते. म्हणजेच ज्यावेळी त्यांना आपण येथून जीवंत परतू शकत नाही हे लक्षात आले त्यावेळी त्यांनी आपल्या कमरेला बांधलेल्या स्फोटक पदार्थांच्या बेल्टने स्वतःला उडवून घेतले. अशा प्रकारे ‘सर पे कफन बांधून म्हणजेच मरण्याच्या उद्देशाने आलेले दहशतवादी ते अधिकाधिक निरपराधांचे  बळी घेऊ शकतात.

**<u>फ्रान्सचे प्रत्युत्तर वाखाणण्याजोगे</u>**

दहशतवादी हल्ले जगात सर्वत्र होत आहेत. पण पॅरिसवर हल्ला झाल्यानंतर ज्याप्रमाणे फ्रान्सने त्याला प्रतिउत्तर दिले ते वाखाणण्याजोगे आहे. यातील अनेक मुद्दे भारतासारख्या देशालाही अमलात आणता येणे शक्य आहे. दहशतवादी हल्ला झाल्याबरोबर फ्रान्सच्या राष्ट्रपतींनी देशात तात्काळ राष्ट्रीय आणिबाणी जाहीर केली. यामुळे पोलिस व सैन्याला कुठल्याही संशयिताला ताब्यात घेऊन चौकशी करण्याचे अधिकार मिळाले. या शिवाय पोलिस आणि सैन्याला कुठल्याही भागामध्ये दहशतवाद्यांविरुद्ध शोधमोहिम करण्याची संधी मिळाली. त्याचबरोबर फ्रान्सचे सर्व नागरिक व सरकार यांनी, आम्ही दहशतवादाविरूद्ध एकत्रपणे लढू असे जाहीर केले. भारतात असे घडते का? आपल्याकडे स्फोट अथवा दहशतवादी  हल्ला झाला की वेगवेगळ्या राजकीय पक्षात आपापसात वाद होतात.

**<u>काही टीव्ही चॅनेल्स टीआरपी वाढवण्यासाठीही राजकीय पक्षात भांडणे लावतात</u>**

काही टीव्ही चॅनेल्स टीआरपी वाढवण्यासाठीही राजकीय पक्षात भांडणे लावून देतात.पॅरिसमध्ये जिथे स्फोट झाले होते, तो भाग तात्काळ रिकामा करण्यात आला. तिथे सुरक्षा व्यवस्था आणि तपास यंत्रणांना त्यांचे काम करण्याची पूर्ण मोकळीक दिली. आपल्या देशात मात्र याच्या नेमके उलटे होते. स्फोट झालेल्या ठिकाणी बघ्यांची मोठी गर्दी होते. माध्यमांचे कॅमेरामन आणि प्रतिनिधी तेथे गर्दी करतात. त्यामुळे तपास

यंत्रणा, संरक्षण यंत्रणांना यांना त्यांचे काम करण्यास फार मोठा अडथळा येतो. या शिवाय ब्रेकिंग न्यूजच्या हट्टापायी दहशतवाद्यांनाच जास्त महत्त्व दिले जाते.

हा हल्ला झाल्यानंतर मी पाच-सहा फ्रेंच वृत्तवाहिन्यांचे वार्तांकन पाहिले. त्यात मला असे दिसून आले की, पोलिस खात्याचा फक्त जनसंपर्क अधिकारीच माहिती देत होता. उर्वरित सर्व पोलिस यंत्रणा आपापले काम करण्यात गुंतलेली होती. याउलट आपल्या देशात पोलिस व सुरक्षा यंत्रणांना अडथळा केला जातो आणि त्यांच्यावर अनेक प्रश्नांची सरबत्ती केली जाते.

**<u>वृत्तवाहिन्यांचे संयमित वृत्तांकन</u>**

तसेच तिथल्या वृत्तवाहिन्यांनी दिलेले वृत्त हे अत्यंत संयम राखून दिलेले होते. असे म्हटले जाते की, दहशतवादी दहा लोकांना मारतात तेव्हा त्यांचा प्रयत्न हा लाखो लोकांच्या मनात भीती उत्पन्न करणे हा असतो. म्हणून दहशतवाद्यांना विनाकारण प्रसिद्धी देणे हे टाळले पाहिजे. फ्रान्समधील माध्यमांनी ते केले. त्यांचे सर्व लक्ष त्यांच्या सुरक्षा यंत्रणांच्या कामाला जास्त प्रमाणात प्रसिद्धी देणे हे होते. तेथील सर्व नागरिक, प्रशासन व सरकार हे सर्व एकत्रपणे या दहशतवादी हल्ल्याला सामोरे गेल्याचे चित्र जगासमोर आले. त्यामुळे त्यांच्यावर झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा बिमोड ते फक्त तीन तासात करू शकले. हे त्यांचे यश आहे.

**<u>फ्रान्सच्या काही चुका</u>**

आज फ्रान्समध्ये दहशतवाद पसरतो आहे. सरकार अतिरेकी विचारसरणीविरुद्ध प्रचार करत आहे; पण हे प्रयत्न कमी पडत आहेत. अतिरेकी विचारसरणी पसरवली जाते, सोशल मीडियाद्वारे किंवा इतर प्रसारमाध्यमांचा वापर करून. त्यामुळे अशा मीडियावर लक्ष ठेवून जिथे जिथे दहशतवादाला खतपाणी देणारे प्रयत्न दिसून येतील ते तिथल्या

तिथे थांबवणे फार महत्त्वाचे आहे.फेसबुक या संकेतस्थळाचा वापर करून दहशतवादाला खतपाणी घालण्याचे काम मोठ्या प्रमाणावर होत असते. अशा प्रकारच्या माहितीबाबत तक्रार नोंदवल्यास तो काढून टाकला जातो. यासंदर्भातील आकडेवारी पाहिली तर भारताने सर्वांत जास्त प्रमाणात दहशतवादाला खतपाणी देणारा मजकूर फेसबुकवरून डिलिट केला आहे. जगभरातील देशांनी याबाबत  सोशल मीडियावर लक्ष ठेवणे गरजेचे आहे. जिथेजिथे असे प्रयत्न दिसतील ते ताबडतोब थांबवले पाहिजेत. त्याचबरोबर अशा प्रकारे प्रचार करणार्या व्यक्ती किंवा संस्थांना अटक करण्याचे कसोशीने प्रयत्न झाले पाहिजेत.

**अतिरेकी विचारसरणी थांबवण्याची जबाबदारी सर्वांचीच**

अतिरेकी विचारसरणी ही कशी थांबवायची यासाठी अनेक उपाय योजना सुचवण्यात आल्या आहेत. पण त्यावर अंमलबजावणी करणे हे जास्त महत्त्वाचे आहे. मुंबईमधील काही युवक हे इसिसमध्ये सामिल होण्यासाठी गेले होते. ते सर्व उच्चशिक्षित व चांगल्या कॉलेजातून शिक्षण घेतलेले सुशिक्षित तरुण होते. तरीही ते दहशतवादाकडे वळले होते. म्हणून अशा दहशतवादाला थांबवण्याची जबाबदारी तरुणांचे आई-वडील, त्यांचे नातेवाईक, शाळा-कॉलेजेस, सामाजिक संस्था,  शेजारी  आणि माध्यमे म्हणजेच सर्वांचीच आहे. दहशतवाद थांबवण्यासाठी आपल्या प्रत्येकालाच आपापल्या स्तरावर प्रयत्न करावे लागतील.

फ्रान्सची  दुसरी चूक म्हणजे, गुप्तहेर माहितीसाठी ते पूर्णपणे टेक्निकल इंटेलिजन्सवर अवलंबून राहीले होते. फ्रान्समध्ये लाखो सीसी टीव्ही कॅमेरे, सॅटेलाईट, सव्हिलन्स, ड्रोन सव्हिलन्स यांचा वापर होत आहे. युरोपमधील सरकार त्यांच्या नागरिकांच्या प्रत्येक हालचालीवर लक्ष ठेवते. तरीही त्यांना असा दहशतवादी हल्ला रोखता आला नाही. याचे कारण त्यांच्याकडे फार मोठ्या प्रमाणात माहिती जमा होते खरी; पण त्या माहितीचा अर्थ लावणे त्यांना जमलेले नाही. आपल्याकडील उदाहरण

द्यायचे झाले तर, आपल्याकडील काही मोठ्या मंदिरांत सीसीटीव्ही कॅमेरे बसवलेले आहेत, पण त्या सीसीटीव्हीच्या फुटेजचे ॲनालिसिस करण्यासाठी कोणीही नसते. फक्त माहिती गोळा करणे निरर्थक आहे. त्या माहितीतून काय अर्थ निघतो आहे तो सातत्याने काढत राहणे गरजेचे आहे. यासाठी आज जगभरात तंत्रज्ञान उपलब्ध आहे. फेस रेकग्निझेशन सॉफ्टवेअर, सिग्नेचर रेकग्निझेशन सॉफ्टेवेअर, व्हॉईस रेकग्निझेशन सॉफ्टवेअर अशा प्रकारची अनेक तंत्रज्ञाने विकसित करण्यात आलेली आहेत. भारताने ही सगळी तंत्रज्ञाने युरोपियन देश, अमेरिका, इस्त्राईल यांच्याकडून घेतली पाहिजेत. फ्रान्समध्ये जी चूक झाली ती सुधारून ,भारताने आपल्या टेक्निकल इंटेलिजन्सचा दर्जा वाढविला पाहिजे.

**<u>ह्युमन इंटेलिजन्स सर्वांत महत्वाचे</u>**

त्याचबरोबर ह्युमन इंटेलिजन्स सर्वांत महत्त्वाचे आहे. यासाठी आपल्या खबर्याचे जाळे पसरवून त्याद्वारे अशा कारवायांची, हल्ल्यांची पूर्वमाहिती उपलब्ध होणे आवश्यक ठरते. कारण आज तरी एखाद्या दहशतवाद्याच्या मनात प्रवेश करून त्याच्या मनात काय चालले आहे ते शोधू शकेल, असे तंत्रज्ञान नाही. त्यामुळेच आपल्याला दहशतवाद रोखायचा असेल तर या सर्व दहशतवादी गटांमध्ये आपले डमी दहशतवादी घुसवायला पाहिजेत. यामुळे हल्ला होण्या आधीच आपल्याला तो थांबवता येईल. अर्थात हे काम सोपे नाही. यासाठी फार उच्च कौशल्यांची गरज आहे. पण अशा प्रकारची कोव्हर्ट ऑपरेशन्स भारतीय सैन्याने अनेक वेळा केलेली आहेत. आगामी काळातही ती करावी लागतील.

या शिवाय दहशतवादाच्या मुद्यावरून सगळ्या जगाला एकत्र आणून आपल्याला संपूर्ण जगाची मदत घ्यावी लागेल. कारण दहशतवादी अनेक वेळा पाकिस्तान, अफगाणीस्थान, श्रीलंका, बांगलादेश, नेपाळ अशा परदेशांतून येत असतात. त्यामुळे त्या देशांवरही आपल्याला लक्ष ठेवावे

लागेल. थोडक्यात दहशतवादाविरुद्धची लढाई ही फार काळ चालणार आहे. त्यामुळे इतर देशात होणार्या दहशतवदी हल्ल्यांवरून आपण धडे घेऊन आपली दहशतवादविरोधी कारवाई उच्च दर्जाची करणे गरजेचे आहे. यासाठी आपल्याला आपल्या सर्व सीमा सुरक्षित कराव्या लागतील. जे दहशतवादी किंवा दहशतवाद्यांचे स्लीपर सेल भारतात लपले आहेत, अशांना गुप्तहेर खात्याच्या माहितीवरून शोधून काढावे लागेल. तसेच पाकिस्तान, श्रीलंका, बांगलादेश, म्यानमार अशा देशांमध्ये जाऊन या दहशतवाद्यांची पाळेमुळे कापावी लागतील. अशा प्रकारे बहुआयामी उपाय केले तरच आपण दहशतवादी हल्ला थांबवू शकतो. पॅरिसवरील हल्ल्यानंतर आपल्याकडील सुरक्षा यंत्रणांनी धडा घेतला असेल, अशी अपेक्षा करायला हरकत नाही.

**...हेडली की जबानी! -**

मुंबईवरच्या हल्ल्यातील प्रमुख आरोपी डेव्हिड हेडली हा माफीचा साक्षीदार बनला आहे. त्याच्या साक्षीमुळे मुंबईवरच्या दहशतवादी हल्ल्यामागचा पाकिस्तानचा नापाक आणि हिंस्र चेहरा जगासमोर उघडा पडणार आहे. इशरत जहाँ प्रकरणी त्याने दिलेल्या माहितीबाबत आपल्याकडील माध्यमांनी सोयीस्कर मौन बाळगले आहे. पण येत्या काळात हेडलीकडून उघड होणार्या माहितीतून या देशात राहून स्वार्थासाठी देशद्रोह करणार्या अनेकांचा बुरखा फाटणार आहे. अमेरिकेने मोठ्या मुत्सद्दीपणे हे प्रकरण हाताळले. आपले सहा नागरिक मुंबई हल्ल्यात मारले गेल्यानंतर ज्या गतीने अमेरिकेने हेडली आणि राणा यांना अटक केली, त्यावरून या देशांची गुप्तचर यंत्रणांची ताकद किती आहे ते दिसून आले. भविष्यात अमेरिकेच्या यंत्रणांचा अभ्यास करून त्याचा आदर्श भारतानेही ठेवली पाहिजे.

**२६/११हल्ल्यातील माफीचा साक्षीदार**

डेविड हेडली हा लष्कर-ए-तयब्बाचा या दहशतवादी संघटनेचा सदस्य

असून मुंबईतील २६/११ दहशतवादी हल्ल्याप्रकरणी अमेरिकेतील तुरुंगात तो ३५ वर्षांची शिक्षा भोगत आहे. अलीकडेच म्हणजे १० डिसेंबर २०१५ रोजी मुंबईतील २६/११ दहशतवादी हल्ल्यातील प्रमुख सुत्रधार डेव्हिड हेडलीची व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे कोर्टात साक्ष नोंदविण्यात आली. यावेळी त्याने शिक्षा माफ झाली तर माफीचा साक्षीदार होण्यास तयार असल्याचे कोर्टात सांगितले. याप्रकरणी विशेष सरकारी वकील उज्ज्वल निकम यांनी तपास अधिका-यांसोबत सल्ला-मसलत करण्यासाठी काही वेळ मागितला. त्यानंतर त्याला कोर्टाने माफी देऊन माफीचा साक्षीदार बनविण्याचा निर्णय घेतला.

त्याच्या साक्षीने पाकिस्तानचा खरा चेहरा उघड होणार आहे. मुंबईवर झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या कटाची  माहिती जगासमोर येणार असून पाकिस्तान आणि आयएसआयचं पितळ उघड पडणार आहे. हा हल्ला कोणी आणि कसा केला ? त्याचं षड्यंत्र कोणी रचलं होतं? हे सगळं काही उघड़ होणार आहे.  अमेरिकेच्या ताब्यात असलेला हेड़ली याविषयीची सर्व माहिती भारतीय न्यायालयाला देणार आहे. जकीउर रेहमान लखवी, अबू जुंदाल आणि डेव्हिड हेडली हे तिघेजण २६/११च्या हल्ल्याचे मुख्य सूत्रधार असल्याचं तपासात उघड झालं आहे. भारतानं अमेरिकेकडं डेव्हिड हेडलीला  भारताच्या ताब्यात देण्याची मागणी केली होती. पण तो अमेरीकन नागरीक असल्याने आणि त्यानं स्वत: गुन्हे कबूल केल्यानं अमेरिकेनं हेडलीला भारताच्या स्वाधीन करण्यास नकार दिला.

मात्र भारत सरकारच्या पाठपुराव्यामुळे त्याची व्हिडिओ कॉन्फन्सिंगद्वारे साक्ष घेणं शक्य झालं. हेडलीच्या जबानीतून लखवीचे पाकिस्तान सरकार, आयएसआय आणि लष्कर ए तैय्यबाशी असलेले संबंध उघड होणार आहेत. या दहशतवादी हल्ल्यातील फरार आणि संशयित आरोपींची माहिती मिळणार आहे. हेडलीच्या साक्षीचे अनेक फायदे या खटल्यासाठी

होणार आहेत.

**<u>हेडली ४ अटींवर माफीचा साक्षीदार बनला</u>**

मुंबई सत्र न्यायालयात सुरु असलेल्या या खटल्यात हेडली ४ अटींवर माफीचा साक्षीदार बनला आहे. काय आहेत या चार अटी?

१) मुंबईवर झालेल्या २६/११ या दहशतवादी हल्ल्यासंदर्भातील सर्व माहिती तुला सांगावी लागणार.

२) या दहशतवादी हल्ल्यातील तुझी काय भूमिका होती

३) तू अमेरिका न्यायालयाला दिली आहेस ती सर्व माहिती आणि या हल्ल्यातील सर्व संशयितांबद्दलची माहिती तू विशेष न्यायालयाला सर्व माहिती देणे आवश्यक आहे.

४) माफीचा साक्षीदार झाल्यास तुला विशेष सरकारी वकील सुनावणी दरम्यान जे प्रश्न विचारतील त्याची सर्व खरी आणि स्पष्ट उत्तरे द्यावी लागतील.

**<u>इशरत जहाँबाबत स्पष्टोक्ती</u>**

गुजरात पोलिसांच्या एन्काउंटरमध्ये मारली गेलेली इशरत जहाँ ही लष्कर ए तोयबाची आत्मघातकी दहशतवादी हल्लेखोर होती. इशरत हिला लष्करच्या मुजामिल यानं आपल्या ग्रुपमध्ये सामील केलं होतं. मुंबई दहशतवादी हल्याचा मास्टरमाईंड डेव्हिड हेडली यानं एनआयए आणि विधी विभागाच्या टीमला शिकागोमध्ये ही माहिती दिली आहे. हेडलीच्या या खुलाशानंतर गुजरात पोलीस आणि केंद्राच्या भूमिकेला पुष्टी मिळाली आहे. इशरत १५ जून २००४ रोजी जावेद शेख ऊर्फ प्रणेश पिल्लई आणि पाक तरुण अमजद अली आणि जीशान जोहर अब्दुल गनी यांच्यासोबत एन्काऊंटरमध्ये मारली गेली होती.

इशरत जहॉ ही कॉलेज तरुणी होती, सेल्समन होती. निरपराध होती. तिला विनाकारण पोलिसांनी बनावट चकमक करून मारले. तिचा खून केला, असा कांगावा करून प्रचंड गदारोळ माजविला गेला. काही

आमदारांनी आमदारनिधीतून इशरत जहॉच्या कुटुंबियांना मदतही केली होती. वास्तविक इशरत जहॉ ही अतिरेकी होती हे आता स्पष्ट झाले आहे. वास्तविक, ही घटना घडली त्यावेळी दहा वर्षांपूर्वीही याबाबत पुष्टी करणारे अनेक मुद्दे पुढे आले होते. मात्र, या माहितीकडे सोयीस्कर दुर्लक्ष केले गेले.

तपास यंत्रणेचे अधिकारी कॉंग्रेसचे केंद्रात सरकार असताना जेव्हा अमेरिकेत हेडलीचा जबाब घेण्यासाठी गेले होते, तेव्हा त्यांनाही हेडलीने इशरत जहॉ लष्कर ए तोयबाच्या आत्मघातकी पथकाची सदस्य होती हे सांगितले होते. मात्र, या हेडलीच्या दाव्याला सिद्ध करणारे पुरावे नाहीत, असे कारण सांगून त्याच्या जबाबातील हा भाग काढून टाकण्यात आला. अनेक प्रसारमाध्यमांची विश्वाससार्हताही या इशरत प्रकरणात पूर्णपणे मोडीत निघाली आहे. हेडलीने जबाब दिल्यावरही एरवी दिवसरात्र एकच विषय घोळविणारी प्रसारमाध्यमे या विषयावर मूग गिळून गप्प आहेत. चर्चेचे रतीब घालणारे हेडलीच्या या जबाबावर चकार शब्द बोलायला तयार नाहीत.

हेडलीच्या जबानीतून अशा अनेक गुप्तरहस्यांवर प्रकाशझोत पडणार आहे. ८ फेब्रवारी २०१६ रोजी हेडलीचा जबाब रेकॉर्ड केला जाईल. या खटल्याची पुढील सुनावणी ८ फेब्रुवारी रोजी ठेवण्यात आली आहे.

**<u>हेडली आणि २६/११: अमेरिकेचे धूर्त कारस्थान!</u>**

असे असले तरी हेडली हा डबल नव्हे चौघांचा हा एजंट होता, तो अमेरिकेच्या डड्ढग इनफोर्सेंट ॲडडमिनीस्ट्रेशन (डीइए), द फेडरल ब्युरो ऑफइनव्हेस्टिगेशन (एफबीआय), द सेंटरल इन्टेलिजन्स एजन्सी (सीआयए) आणि लष्कर-ए-तोयबा (एलइटी)यांच्यासाठी काम करत होता. त्याचे अमेरिकेच्या गुप्तहेर खात्याशी असणारे संबंध न्यायालयात समोर येऊ नयेत यासाठी सर्व पुरावे नष्ट करण्याचा करार एफबीआयने त्याच्या बरोबर आधीच केला होता. एफबीआय त्याला भारताच्या हवाली करणार

नाही आणि त्याचे अमेरिकेच्या व पाकिस्तानच्या गुप्तहेरखात्या बरोबर असणार्या संबंधांबाबत भारतीय एजन्सीज्ने त्याला कोणतेही प्रश्न विचारू नयेत, यासाठी भारतीय एजन्सीला त्याची चौकशी करण्याची परवानगी अमेरिका कधीही देणार नाही. त्याच्या विरोधात कोणतीही उलट तपासणी होणार नाही. एफबीआयला हे महत्वाचे आहे की लष्कर-ए-तोयबाला मुंबईवरील हल्ल्यासाठी जबाबदार धरावे ज्यामुळे त्यावर पाकिस्तानला कारवाई करावी लागेल.

**दहशतवादी तहव्वूर हुसेन राणाशी संपर्क साधा**

भारताला आणखी एक उत्तम पर्याय उपलब्ध आहे. तो म्हणजे या प्रकरणातील सहआरोपी म्हणून स्वतंत्र गुन्हा नोंदविण्यात आलेल्या तहव्वूर हुसेन राणा या दुसर्या दहशतवादाशी संपर्क साधणे होय. त्यालाही या हल्याबाबत तेवढीच माहिती आहे. राणाच्या विरोधात एफबीआयने न्यायालयात दाखल केलेल्या अहवालानुसार तो नोव्हेंबर २००८ च्या तिसर्या आठवड्यात भारतात होता. २१ नोव्हेंबर २००८ रोजी तो मुंबईवरून दुबईला गेला. त्यानंतर त्याच एअरलाइन्सने तो २४ नोव्हेंबर २००८ रोजी दुबईवरून चीनला गेला आणि तेथून २६ नोव्हेंबर २००८ रोजी सीओलमार्गे शिकागोला परत गेला. राणाने एफबीआय समोर हे मान्य केले आहेकी, २१ ते २४ नोव्हेंबर २००८ च्या काळात जेव्हा तो दुबईत होता तेव्हा तो मेजर अबदुर रेहमान उर्फ पाशाला भेटला होता. तो हेडलीच्यावतीने इलियास काश्मिरीच्या संपर्कात होता आणि तेव्हा त्याला लष्करे तैय्यबा मुंबईवर हल्ला करणार असल्याचे पाशाकडून कळाले. राणा मेजर रेहमानला वैयक्तिकरित्या ओळखतो हे एफबीआयने न्यायालयात दाखल केलेल्या अहवालावरून स्पष्ट होते आणि तो एलईटीच्या कार्यकत्र्याला ओळखतो. एलईटी भारतात आणखी चार हल्ले करणार असल्याची कल्पनाही राणाला होती. हेडली आणि राणा यांच्यात एका कारमध्ये भारतावर हल्ला करण्यासंबंधी झालेला संवाद गुप्तपणे नोंदवून तो

एफबीआयने न्यायालयाला सादर केला. त्यामुळेभारतासाठी हेडलीप्रमाणे राणाचीही चौकशी महत्त्वाची आहे. हेडली हा अमेरिकेचा तर राणा हा कॅनडाचा नागरिक असून तो १९९८ पासून शिकागो मध्ये रहातो. हेडली अमेरिकेचा एजंट आहे, पण राणा आणि अमेरिका गुप्तहेर खाते यांच्यात काही संबंध असल्याचा कोणताच पुरावा नाही.

**हेडलीची जीवनकथा**

एखाद्या थरारक इंग्रजी चित्रपटाला शोभेल अशी हेडलीची जीवनकथा आहे. तो वॉशिंग्टनमध्ये जन्मला. त्याचे वडील सय्यद सलीम गिलानी व्हॉईस ऑफ अमेरिका या प्रसारण संस्थेत कामाला होते. तेथेच त्याची आई सेरील हेडली ही सचिव म्हणून कार्यरत होती. पुढे तिने सय्यद गिलानी यांच्याशी घटस्फोट घेतला. त्यानंतर सय्यद गिलानी दाऊद आणि त्याच्या दोन बहिणींना घेऊन पाकिस्तानात गेले. तेथे हसन अब्दल या सैनिकी शाळेत दाऊदने प्रवेश घेतला. १९७७ मध्ये सेरील हेडली पाकिस्तानात आली. जाताना तिने दाऊदला आपल्यासोबत अमेरिकेत नेले.१९८५ मध्ये दाऊदने पेनसिल्वानिया विद्यापीठात शिकत असलेल्या एका युवतीशी विवाह केला. पण दोन वर्षांतच तो संपुष्टात आला. त्यानंतर गिलानी फिलाडेल्फियामध्ये व्हिडिओ पार्लर चालवू लागला. याच दरम्यान त्याचा संबंध अमली पदार्थांच्या तस्करांशी आला.

जगातील वेगवेगळ्या देशांमध्ये फिरणे सोपे व्हावे याच हेतूने त्याने आपले नाव डेव्हिड हेडली असे बदलून घेतले. काही काळानंतर त्याने आपले कुटुंब शिकागोला हलवले. तेथेच त्याचा संबंध तहव्वुर हुसेन राणाच्या पासपोर्ट बनवून देणार्या कंपनीशी आला. राणा हा देखील दाऊदने शिक्षण गेतलेल्या हसन अब्दल या शाळेचा विद्यार्थी होता. दरम्यानच्या काळात २००३ मध्ये किमान तीन वेळा हेडलीने लष्करे तैय्यबाच्या पाकिस्तानातील दहशतवादी तळावर प्रशिक्षण घेतले होते. जगातील वेगवेगळ्या देशांमध्ये अस्तित्वात असलेल्या दहशतवादी गटांच्या

कारवायांचा हेडलीने बारकाईने अभ्यास केला होता.

हेडलीची पत्नी असलेली मोरोक्कोची फईजा कोताईला हिनेदेखील त्याच्यासमवेत जगभरात अनेक ठिकाणी वास्तव्य केले होते. मुंबईतील ताजमहल आणि ओबेरॉय या पंचतारांकित हॉटेलमध्ये या जोडप्याने काही काळ काढला होता. मुंबई हल्ल्यावेळी ही दोन्ही हॉटेल्स दहशतवाद्यांच्या कारवायांना बळी पडली होती.

पुण्यात झालेल्या जर्मन बेकरीतील बॉम्बस्फोटामध्येही हेडलीचा हात असल्याचा दावा करण्यात आला आहे. त्याने जुलै २००८ आणि मार्च २००९ मधील पुण्याला भेट दिली होती. लष्करे तैय्यबाच्या माध्यमातून त्याने हा दौरा केल्याचे गुप्तचर यंत्रणेचे म्हणणे आहे. याशिवाय अल कायदाचा कमांडर म्हणवला जाणारा ईलियास काश्मिरीचे हेडली आणि राणाशी जवळचे संबंध होते असा निष्कर्ष एफबीआयने काढला आहे.

**<u>हेडली प्रकरणी राहुल भट साक्षीदार</u>**

दहशतवादी डेव्हिड हेडलीप्रकरणात हिंदी चित्रपट निर्माते महेश भट यांचा मुलगा राहुल भट हा साक्षीदार होता. भारत आणि अमेरिकेत दहशतवादी हल्ले घडवून आणण्याचा आरोप असलेला डेव्हीड हेडली २००६ ते २००९ या काळात भारतात आला असताना त्याच्याशी राहुलचा संबंध आला होता. राहुलची हेडलीशी ओळख करून देणारा व्यायामशाळेतील प्रशिक्षक विलास वराक याने, मारिया यांना आपण हेडलीबाबत असलेली सर्व माहिती दिल्याचे तसेच आपण हेडलीला भेटायला कधीच गेलो नव्हतो तर तोच आपल्याकडे आला होता असे सांगितले.

**<u>अमेरिकेच्या यंत्रणांचा अभ्यास करा</u>**

२६/११ चा हल्ला आणि त्यातील पाकिस्तानचा सहभाग उघड होऊनही अमेरिकेने लष्कर-ए-तोयबाविरुद्ध कारवाई करण्यासाठी पाकिस्तानवर फारसा दबाव आणला नाही. त्याचे कारण हेडलीच्या अमेरिकेसाठीच्या हेरगिरीत दडले आहे. थोडक्यात हेडली हा डबल एजंट होता. उद्या

हेडलीची खरीखुरी माहिती जगापुढे आली तर अमेरिकेचा दुटप्पीपणा जगापुढे येईल, अशी शक्यता होती. पण अमेरिकेने मोठ्या मुत्सद्दीपणे हे प्रकरण हाताळले. अमेरिकेच्या या प्रकरणातील एकंदर वागण्यावरून भारतीय यंत्रणेने बोध घ्यायला हरकत नाही. यापूर्वी भारतात झालेल्या अनेक घातपातांचे धागेदोरे हाती आलेले नाहीत. याउलट आपले सहा नागरिक मुंबई हल्ल्यात मारले गेल्यानंतर ज्या गतीने अमेरिकेने हेडली आणि राणा यांना अटक केली, त्यावरून या देशांची गुप्तचर यंत्रणांची ताकद किती आहे ते दिसून आले. भविष्यात अमेरिकेच्या यंत्रणांचा अभ्यास करून त्याचा आदर्श ठेवण्यात भारताला हरकत नसावी.

## प्रकरण-4 ईशान्येचे बांगलादेशीकरण-5386

**१५ मार्च २०१५- बांगला देशींची घुसखोरी बाबत हवे गांभीर्य**

**१७ मे २०१५ भारत आणि बांगलादेश भू-सीमा कराराचे महत्त्व**

**७ जून २०१५ नरेंद्र मोदी बांग्लादेश दौरा ठरणार ऐतिहासिक?**

**१४ जून २०१५ बांगलादेश दौर्याची फलनिष्पत्ती**

**९ ऑगस्ट २०१५नॅशनल रजिस्टर ऑफ सिटीझन्सचा वापर करून बांगलादेशी घुसखोरी रोखण्यासाठी सरकारचा प्रयत्न**

थोडीही राजकीय इच्छाशक्ती असेल तर जम्मू-आणि-काश्मीरचे व्यवस्थापन केले जाऊ शकेल,

मात्र ईशान्येची प्रादेशिक अभंगता राखणे सर्वात अवघड ठरू शकेल. वस्तुतः अनेक मुद्दयांवर, संपूर्ण ईशान्य भारत केंद्रिय सत्तेपासून अलग केला जाऊ शकतो. ईशान्येत कमी लोकसंख्या असलेले भूप्रदेश आहेत, जे सर्वात दाट लोकवस्ती असलेल्या आणि लोकसंख्येच्या दृष्टीने जगात सर्वात आक्रमक असलेल्या बांगलादेशाशी चिकटूनच आहेत. बांगलादेश इस्लामिक मूलतत्त्ववादाचा प्रमुख स्त्रोत म्हणूनही उदयास येत आहे, ज्याचा धक्का ईशान्य भारतास बसू शकतो.

ह्यात भर म्हणूनच की काय, केवळ मतपेटीच्या राजकारणामुळे नवी दिल्लीने गेली २२ वर्षे, अनधिकृत स्थलांतरांना, "अनधिकृत-स्थलांतरितांकरताचा-कायदा-१९८३, लवादाद्वारे-निर्धारण (इल्लिगल-मायग्रंटस-ऍक्ट-१९८३, डिटरमिनेशन-बाय-ट्रिब्युनल्स)" अनुसार अधिकृतता प्रदान केली आहे. अनेक सीमावर्ती जिल्ह्यांत आता बांगलादेशी अनधिकृत स्थलांतरित बहुसंख्य झालेले आहेत. नजीकच्या भविष्यात, (काश्मीर) खोऱ्याप्रमाणेच ह्या तरफेचा उपयोग केंद्राविरोधात गदारोळ निर्माण करण्यासाठी केला जाईल. बांगलादेशी मुस्लिमांच्या पक्षाने आसाम विधानसभा निवडणुकांत १७ जागा जिंकल्या आहेत. लढायांनी जे शक्य होत नाही, ते घुसखोरीने आणि त्यानंतरच्या देशद्रोही कारवायांनी साध्य केलेले आहे.

ईशान्येचा प्रश्न योग्य रीतीने न हाताळल्यास, सिलिगुडी भूपट्ट्याची (कॉरिडॉर) टोकाची धोकाप्रवणता, ईशान्येस केंद्रापासून विलग करू शकते. सिलिगुडी भूपट्टा, हा १० ते २० किलोमीटर रुंदीचा आणि २०० किलोमीटर लांबीचा भूमी-पट्टाच भारताच्या मुख्य भूमीला, ईशान्य भारतास जोडणारा दुवा आहे. जर हा क्रांतिक पट्टा अवरुद्ध झाला, अवनत झाला किंवा जबरदस्तीने परवश झाला तर, केंद्र सरकारला ईशान्य भारत केवळ आकाशमार्गेच सांभाळता येऊ शकेल. कुप्रशासनाखातर विख्यात असलेल्या देशात, स्थानिक लोकसंख्या इतर प्रादेशिक सत्तांकडे आकर्षिली जाऊ शकेल.

अरुणाचलवरील चीनचा दावा अधिक जोमाने होत असल्याने, सिलिगुडी पट्ट्याचा धोका आणखीनच वाढतो. त्यामुळे विपक्षाचे तात्पुरते तुष्टीकरण होत असले तरीही, नवी दिल्लीची, पूर्ण विचार न करता विधाने करत जाण्याची प्रवृत्ती, अतिशय चिंतेचा विषय झाली आहे.

## १५ मार्च २०१५- बांगला देशींची घुसखोरी बाबत हवे गांभीर्य

भारतात होणारी बांगला देशींची घुसखोरी आणि त्यामुळे उद्‌भवणारे कायदा-सुव्यवस्थेचे प्रश्न याविषयी सातत्याने लिहिले-बोलले गेले आहे. हा

प्रश्न सोडवण्यासाठी आणि नवी घुसखोरी रोखण्यासाठी या सीमाप्रश्नाकडे गांभीर्याने पाहण्याची गरज आहे. या भागात तैनात असलेल्या सीमासुरक्षा दलाला अधिकार देण्यापासून ते प्रगत तंत्रज्ञानाचा वापर करण्यापर्यंतचे सर्व पर्याय वेगाने अंमलात आणले गेले पाहिजेत. या सीमाभागातील रस्त्यांचा विकास तातडीने होणे गरजेचे आहे. तसेच दोन्ही देशांदरम्यान प्रलंबित असलेला भूभाग हस्तांतरणाचा विषयही लवकरात लवकर निकालात निघाला पाहिजे. यासाठी या भागातील राज्य सरकारांनी मदत करण्याची गरज आहे.

भारत-बांगलादेश सीमेची पश्चिम बंगालमधील लांबी २२१६ किमी, आसाममधील लांबी २६३ किमी, मेघालयमधील लांबी ४४३ किमी त्रिपुरामधील लांबी ८५६ आणि मिझोराममधील लांबी ३१८ किमी आहे. ही सीमा बंदिस्त करणे फार कठिण आहे. कारण काही ठिकाणी डोंगराळ भाग आहे, त्याची उंची १००० फुटांपासून ३५०० हजार फुटांपर्यंत आहे. काही ठिकाणी घनदाट जंगले आहेत. तसेच एक तृतियांश सीमा नदी, नाले आणि ओढ्यांनी भरलेली आहे. म्हणजे या सिमेवर कधी पाणी तर कधी जमीन असे असते. पावसाळा ऋतु हा या भागामध्ये तीन ते चार महिने चालतो. नदी आणि नाल्याचा भाग पाणीमय होऊन जातो. त्यामुळे या भागामध्ये पायी पेट्रोलिग करणे शक्य नसते.

**सीमारक्षणाबाबत गोडबोले समिती अहवाल**

१९९९ च्या कारगील युद्धानंतर भारत सरकारने सीमेचे रक्षण कसे करावे याकरिता एक समिती तयार केली होता. त्यावेळचे गृहविभागाचे सचिव माधव गोडबोले या समितीचे अध्यक्ष होते. दोन वर्षांनंतर या समितीने ही सीमा कशी सुरक्षित ठेवावी यावर सरकारला अहवाल दिला होता.

त्यानुसार, असे ठरवण्यात आले की या सीमेच्या रक्षणाची जबाबदारी ही केवळ सीमा सुरक्षा दलाकडेच दिली जाईल. भारत-म्यानमार सीमा ही आसाम रायफलकडे दिली जाईल. भारत नेपाळ आणि भारत भूतान सीमा

ही अर्थात सीमा सुरक्षा बल (एसएसबी) यांच्याकडे दिले जाईल. पाकिस्तान आणि चीनची सीमा अर्थातच भारतीय सैन्याकडे असेल. फक्त पाकिस्तान सिमेचा आंतरराष्ट्रीय सीमेचा भाग हा सीमा सुरक्षादलाकडे देण्यात आला आहे. या समितीने एक तत्त्व वापरले ते म्हणजे एका सीमेवर एकच संरक्षण दल असले पाहिजे. ज्यामुळे त्या सीमेचे रक्षण करणे जास्त सोपे जाईल. या समितीने दिलेल्या अहवालाप्रमाणे जवळ जवळ दीड ते दोन कोटी बांगलादेशी वर्षे २००१  भारतामध्ये आलेले होते.

**<u>कारणे देणे कधी संपणार ?</u>**

बांगला देशींच्या या प्रचंड घुसखोरीमागे अनेक कारणे होती, यामध्ये मतपेटीच्या राजकारणामुळे सीमा सुरक्षा दलाला आपले काम नीट न करता येत नाही, अशी कारणे दिली होती. त्यानंतर या सिमेवर तारेचे कुंपण लावण्याचा प्रस्ताव पुढे करण्यात आला. वास्तविक,  कुंपण घालण्याचे काम १९६० मध्ये सुरु झाले होते. पण दुर्दैवाची गोष्ट म्हणजे पंच्चावन्न वर्षांनंतरही ते  पूर्ण झालेले नाही. गृहविभागाच्या वार्षिक अहवालाप्रमाणे एकूण ३४३६ किमी सीमेवर कुंपण लावायचे होते. त्यामधील फक्त २७६० किमीवरील कुंपण आतापर्यंत लावण्यात आलेले आहे. म्हणजे  आजही ७०० किमी सिमेवर कुंपण लावण्यात आलेले नाही. याशिवाय या सीमेवर सीमा सुरक्षा दलाला पेट्रोvलग करण्यासाठी रस्त्यांची गरज असल्याने त्यासाठी ४४२६ किमीचे रस्ते तयार करण्याचे काम हे ३० वर्षांपूर्वी मंजूर करण्यात आले होते. पण आजपर्यंत ३६०० किमीचे रस्ते  बांधण्यात आलेले आहेत. म्हणजे ८०० किमीचे रस्ते अपूर्णावस्थेत आहेत. रात्रीच्या वेळी घुसखोरी केलेली दिसावी म्हणून या पूर्ण सीमेवर दिवे बसवण्याची योजना आखली गेली; परंतु ढिसाळपणामुळे हे कामही ५० टक्के अपूर्णावस्थेत आहे. याशिवाय या भागामध्ये सीमा सुरक्षा दलाच्या ५० बटालीयन्स्ना तैनात करण्यात आले आहे. एका बटालीयन्सची संख्या १००० ते ११०० सैनिक ऐवढी असते. आज या

पश्चिम बंगाल सिमेवर ३९ बटालियन्स, आसाम सिमेवर १०, मेघालय सिमेवर ९, त्रिपूरा सिमेवर १७ आणि मिझोराम सिमेवर तीन बटालियन्स् तैनात करण्यात आलेल्या आहेत. पण तरीही घुसखोरी थांबलेली नाही.

**<u>बॉर्डर आऊट पोस्ट, होवर क्रॉप्टची कमी</u>**

या पाश्र्वभूमीवर आणखी एक निर्णय घेण्यात आला. त्यानुसार, सीमेवर टेहळणीसाठी पोलिस ठाणी तयार करण्याचे ठरवण्यात आले. यासाठी ११८५ बॉर्डर आऊट पोस्ट तयार करण्याचा निर्णय घेण्यात आला; पण आजतागायत केवळ ९८७ बॉर्डर आऊट पोस्टस् तयार करण्यात आलेल्या आहेत. उर्वरित पोस्टस्चे काम बाकी आहे. याशिवाय नदी, नाले असलेल्या भागामध्ये जमिनीवर पेट्रोलिग करणे हे अवघड असल्यामुळे या भागामध्ये नौकांनी पेटोqलग करणे किंवा होवर क्रॉप्टने पेटोqलग करणे असे उपाय सुचवण्यात आले होते. कारण होवर क्रॉप्ट जमिनीवर आणि पाण्यात असे दोन्ही ठिकाणी चालू शकते. पण दुर्दैवाने अजूनही तिथे होवर क्रॉप्ट आलेली नाहीत. पावसाळ्यात जवळ जवळ एक तृतियांश सीमा पाण्याखाली जाते. हे लक्षात घेऊन छोट्या जहाजांवर आऊट पोस्ट तयार करण्याचे ठरवण्यात आले होते. अद्याप तेही पूर्ण झालेले नाही यामुळे घुसखोरी थांबवण्यात आपल्याला यश मिळत नाही.

**<u>पावसाळ्यानंतर नद्यांच्या भागात नवे कुंपण</u>**

पावसाळ्यात तारेचे कुंपण खराब होते किंवा काही ठिकाणी वाहून जाते. म्हणजे पावसाळा संपला की या भागामध्ये लगेच नवीन कुंपण लावावे लागते. त्यामुळे कुंपणाचा खर्च हा वाढतच जातो. याशिवाय सिमेवर राहणारे बांगलादेशी आणि काही भारतीयांचा स्मगqलग हा परंपरागत व्यवसाय बनला आहे. त्यामुळे रात्रीच्या वेळी कुंपण कापूनही अनेक ठिकाणी घुसखोरी केली जाते. हे टाळण्यासाठी बॉर्डर आऊट पोस्टमधील अंतर कमीत कमी असणे आवश्यक आहे. त्यामुळे पेट्रोqलग अधिक सूक्ष्म पातळीवर होऊन कोणालाही आत येणे थांबवता येईल. सध्या हे अंतर

दोन ते चार किलोमीटर इतके आहे. त्यामुळे दोन बॉर्डर आऊट पोस्टच्या मधून घुसखोरी होऊ शकते. कुंपण पूर्ण न होण्याची दोन मुख्य कारणे आहेत. एक म्हणजे या सीमेवरील जनता अथवा राज्य सरकारे कुंपण बांधण्यासाठी जमीन विकत देण्यास तयार होत नाहीत. बरेचदा हे जाणीवपूर्वक केले जाते. कारण कुंपणामुळे स्मग्लिंगसारख्या गोष्टींना लगाम बसू शकतो.

**भारत-बांगला देश एनक्लेव्हसची आपआपसात बदली करण्याची गरज**

यासाठी गरज आहे ती सरकारने एक अध्यादेश काढून देशाच्या सुरक्षेकरिता जरुर असलेली जमीन ताब्यात घ्यावी. यामुळे सुरक्षेचा धोका आपल्याला कमी करता येईल. अनेक वेळा बांधलेले कुंपण हे बरोबर सीमेवर नाही तर सीमेपासून एक ते दीड किलोमीटर मागे आहे. भारत-बांगलादेश सीमेवर सिमेंटचे खांब (Boundary Pillars) लावून ही सीमा तिथे नियुक्त करण्यात आलेली आहे. या भागातले शेतकरी पूर्ण सीमेपर्यंत शेती करतात. शेतीच्या नावाखाली दिवसाच्या वेळेला कुंपण पार कडून पुढच्या भागात जातात. अशा वेळी जे स्मगलिग केले जाते त्यावर लक्ष ठेवणे हे अतिशय कठीण बनले आहे.

आज भारत आणि बांगलादेश सीमेवरील अनेक भारतीय भाग हे मध्ये नदी आल्यामुळे बांगलादेशला (Adverse Possession Enclaves) अधिक जवळचे आहेत. या भागात नदीपलीकडे असणार्या भारतीय खेड्यांमध्ये जाण्याकरिता नदीवर पूल नाहीत. यामुळे या भागातील लोक रोजच्या दामाकरिता भारतात येण्यापेक्षा बांगला देशात जाण्याला प्राधान्य देतात. परिणामी, भारतीय असूनही त्यांचे भारतावर अवलंबित्त्व कमी असते. अशाच प्रकारे नद्यांमुळे अनेक बांगलादेशचे भाग भारतावर अवलंबून आहेत. याला इंग्लिशमध्ये ॲडव्हर्स पझेशन असे म्हटले जाते. अशी खेडी अथवा वस्ती यांची अदलाबदल करण्याबाबत प्रयत्न सुरू आहेत. यामध्ये भारताजवळ असलेली खेडी भारताकडे यावीत आणि

बांगलादेश जवळ असलेली खेडी त्यांच्याकडे जावीत, असा प्रस्ताव विचाराधीन आहे. पण यासाठी पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी तयार नाहीत. अलीकडेच ममता बॅनर्जी या यासंदर्भात बांगला देश दौर्यावर जाऊन आल्या; परंतु हा प्रश्न इतक्या सहजपणाने आणि लगेच निकालात निघण्याची शक्यता नाही.

**<u>मानवतावादी संस्थांचा दबाव</u>**

बांगलादेश सीमेवर असलेल्या बॉर्डर सिक्युरिटी फोर्सच्या बटालियन्सना घुसखोर दिसले तरीही त्यांच्यावर गोळीबार केला जाऊ नये असे आदेश देण्यात आले होते. याचे प्रमुख कारण म्हणजे, भारतातल्या अनेक मानवतावादी संस्था. सीमासुरक्षा दलाकडून होणार्या गोळीबारात दरवर्षी ३० ते ४० बांगलादेशी मारले जातात, अशी आकडेवारी या मानवतावादी संस्थांनी पुढे आणली आहे. वास्तविक, हे घुसखोर अथवा स्मग्लर असतात. पण ही बाब या संस्था लक्षात घेत नाहीत. या संस्थांचा भारताच्या परराष्ट्र धोरणावर प्रभाव होता. त्यामुळे त्यांच्या दबावाला बळी पडत सरकारने घुसखोरांवर गोळीबार न करण्याचा आदेश दिला गेला . परंतु याचा गैरफायदा घेतला गेला. त्यातून हे स्मग्लर सीमासुरक्षा दलाच्या जवानांवर गोळीबार करू लागले आहेत. मागील महिन्यामध्ये अशा गोळीबारामध्ये दोन जवान मारले गेले होते. त्यामुळे सध्याच्या सरकारने या आदेश बदली केला.

**<u>अत्याधुनिक तंत्रज्ञानाची गरज</u>**

या भागामध्ये घुसखोरी थांबवण्यासाठी तंत्रज्ञानाचा आधार घेण्याची गरज आहे. रात्रीच्या अंधारामध्ये घुसखोरी करणार्या घुसखोरांना, स्मग्लरांना पकडण्यासाठी एचएचपीआय नावाच्या दुर्बिणी आणण्यात आलेल्या आहेत. या दुर्बिणींच्या साहाय्याने अंधारातही स्पष्टपणाने पाहता येते. याशिवाय रडार आणि इतर काही तंत्रज्ञानही या भागात तैनात करण्यात आले आहे. अर्थातच हे प्रयत्न अत्यल्प आणि तोकडे आहेत. वास्तविक, अशा

प्रकारचे तंत्रज्ञान आपण इस्त्रायलकडून आणण्याची गरज आहे. इस्त्रायल या देशाने त्यांच्या सिमेवर एक इलेक्ट्रॉनिक कुंपण तयार कलेले आहे. या कुंपणामुळे या भागातून कोणीही आत येण्याचा प्रयत्न केल्यास त्याबाबत सुरक्षा दलांना आपोआप माहिती अथवा सूचना मिळते. अशा प्रकारचे कुंपण वा तंत्रज्ञान या सीमेवर बसवण्याची गरज आहे. तरच बांगला देशींच्या या घुसखोरीला आळा घालण्यात यश येऊ शकेल. स्वातंत्र्य मिळून ६६ वर्षे होऊनही आपण  बांगला देशींची घुसखोरी रोखू शकलेलो नाही.  मोदी सरकार याबाबत सकारात्मक  करते का ते पहायचे.

**<u>१७ मे  २०१५ भारत आणि बांगलादेश भू-सीमा कराराचे महत्त्व</u>**

भारत आणि बांगलादेश यांच्यातील सीमाप्रश्नाविषयीचे अत्यंत महत्त्वाच्या लँड बॉर्डर ॲग्रीमेंट बिल अर्थात भूसीमारेषा करार विधेयकाला केंद्रीय मंत्रीमंडळाने नुकतीच मंजुरी दिली आणि त्यापाठोपाठ राज्यसभेनेही हे विधयेक मंजूर केले. हे घटनादुरुस्ती विधेयक असल्यामुळे त्यासाठी अध्र्या राज्यांच्या मंजुरीची गरज आहे. या करारानुसार भारत आणि बांगलादेश यांच्यामध्ये काही भूखंडांची अदलाबदल होणार आहे. या करारामुळे भारताला लागलेला बांगलादेशी घुसखोरीचा कर्करोग कमी करण्यासाठी सरकारने प्रयत्न करण्याची गरज आहे.

या करारानुसार भारत आणि बांगलादेश यांच्यामध्ये काही भूखंडांची अदलाबदल होणार असून त्यामध्ये बांगलादेशाशी जोडल्या गेलेल्या भारतातील पश्चिम बंगाल, आसाम, त्रिपुरा आणि मेघालय या राज्यांचा समावेश आहे. या कराराला काँग्रेसनेही पाठिंबा असल्यामुळे हा करार पूर्णत्त्वास जाण्यास कोणताही अडसर येणार नाही. यासाठी गरज आहे ती सरकारने एक अध्यादेश काढून देशाच्या सुरक्षेसाठी आवश्यक असणारी जमीन ताब्यात घेण्याची.  यामुळे सुरक्षेचा धोका आपल्याला कमी करता येईल. याआधी २०११ मध्ये भारत आणि बांगलादेश यांच्यामध्ये करार होऊन एकमेकांकडे असलेले भूखंड पुन्हा हस्तांतरीत करण्याकरिता संमती

दर्शवण्यात आली. परंतु तरीही या करारावर अमंलबजावणी होत नव्हती.

**<u>भूखंडांची आपापसांत बदली करा</u>**

बांगलादेश आणि भारताच्यामध्ये ब्रम्हापुत्रा नदी आणि तिची इतर पात्रे आल्यामुळे अनेक ठिकाणी बांगला देशी नागरिकांची लोकवस्ती असलेले भूभाग हे भारताच्या हद्दीमध्ये आहेत; याउलट भारतीय नागरिकांची वस्ती असणारे भूभाग, खेडी, वस्त्या, बेटे हे बांगलादेशमध्ये आहेत. नदीवर पुल नसल्यामुळे बांगला देशच्या बाजूला असणार्या भारतीय भूखंडांवर भारताचे वर्चस्व असण्याऐवजी तेथे बांगला देशच्या गुन्हेगारी प्रवृत्तींच्या लोकांचे जास्त वर्चस्व आहे. तसेच बांगला देशची काही बेटे नदीपलीकडे भारताच्या बाजूला असल्यामुळे तक्ते बांगला देशमधून येणे हे जवळजवळ अशक्य होते.

बांगला देशला लागून व नदीच्या पार असलेल्या भारतीय खेड्यांमध्ये ये-जा करण्यासाठी नदीवर पूल नसल्याने तेथील नागरिक आपल्या रोजच्या कामाकरिता बांगलादेशवरच अधिक अवलंबून आहेत. तसाच प्रकार भारतीय हद्दीत येणार्या बांगला देशी खेड्यांबाबतही पाहायला मिळतो. ॲडव्हर्स पझेशन असे म्हटले जाते. भारतीय भागामध्ये पूल किंवा रस्ते नसल्यामुळे आपण जाऊ शकत नाही आणि त्याच प्रमाणे बांगलादेश त्यांच्या भागात जाऊ शकत नाही. अशा खेड्यांची अदलाबदल करून, भारताजवळ असलेली खेडी/वस्ती भारताकडे यावीत आणि बांगलादेश जवळ असलेली खेडी/वस्ती त्यांच्याकडे जावीत यासाठी केंद्र सरकार प्रयत्न करत होते. पण त्यासाठी त्यांना पश्चिम बंगालमधील ममता बॅनर्जी यांचे सरकार मदत करण्यास तयार नव्हते. म्हणूनच सरकारने इतिहासात पहिल्यांदाच पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांना फेब्रुवारी २०१५ मध्ये बांगलादेश दौर्यावर पाठवले. यामुळे अशा अडव्हर्स पझेशन असलेल्या लोकसंख्येची बेटे/ भागाची बदली होऊ शकेल. यामुळे आपल्या सीमेवर आपल्याला लक्ष ठेवणे जास्त सोपे जाईल. भारतात

बांगलादेशचे ५१ /लोकसंख्येची बेटे,(७११० एकर जमिन) आहेत. बांगलादेशममध्ये भारताचे १११/लोकसंख्येची बेटे(१७,१५८.१ एकर जमिन) आहे. यांची आपआपसात बदली व्हयायला पाहिजे.

ईशान्य भारतातील पश्चिम बंगाल, आसाम, त्रिपुरा, मेघालय आणि मिझोराम अशा पाच राज्यांच्या सीमा रेषा बांगलादेशाशी जोडलेल्या आहेत. या पाचही राज्यांचा विकास हा भारत-बांगलादेश संबंधांवर अवलंबून आहे. भारत-बांगलादेश भू-सीमा करार झाल्यानंतर सीमेवर कुंपण लावता येणार आहे. हे कुंपण भारतासाठी अतिशय गरजेचे आहे. कारण आतापर्यंत ५-६ कोटी बांगलादेशी बेकायदेशीररित्या भारतात स्थलांतरीत झालेले आहेत. आत्तापर्यंत भूखंडांची अदलाबदल होऊ शकली नसल्याने ते कुंपण घातले जात नव्हते. आता कुंपण घातल्यानंतर बेकायदेशीर स्थलांतर थांबवता येईल. या सर्व कारणांसाठी भारत-बांगलादेश भू-सीमा करार पूर्णत्त्वाला जाऊन त्यानुसार कार्यवाही होणे अत्यंत गरजेचे आहे.

**<u>बीलामुळे भारताला काय फायदा होईल</u>**

ॲडव्हर्स पजेशनमुळे या बेटांवर आपण आजही तारेचे कुंपण लावू शकलेलो नाही. तारेचे कुंपण लावले तर बांगलादेशी घुसखोरी थांबवण्याकरिता नक्कीच मदत होईल. तसेच सीमाभागात चालू असलेली तस्करी, गुन्हेगारी थांबवण्यात मदत मिळेल.  ज्यावेळेस अशा प्रकारच्या जमिनींचे हस्तांतर होईल, त्यावेळी  त्या भागात राहणार्या लोकांना बांगला देशमध्येच राहावे की तेथून भारतामध्ये परत यावे हे ठरवता येईल. आकारमानाच्या दृष्टीने भारताला१७१६० एकर एवढी जमीन ही बांगलादेशला द्यावी लागेल आणि ७११० एकर जमीन ही बांगलादेशकडून भारताला मिळेल.

**<u>भारतामध्ये घुसखोरी थांबवण्यासाठी मदत गरजेची</u>**

सध्या बांगलादेशमध्ये असलेले श्रीमती हसीना वाजद यांचे सरकार

भारताशी मित्रत्व राखून आहे. यामुळे भारत आणि बांगलादेशमध्ये अनेक वर्षांपासून प्रलंबित असणारे मुद्दे निकालात निघाले तर बांगलादेशशी आपले संबंध सुधारू शकतील. आज ५-६ कोटी बांगलादेशी भारतात असूनही बांगलादेश हे मान्य करायला तयार नाही. प्रत्येक वर्षी भारतीय पोलीस २ ते ३ हजार बांगलादेशी घुसखोरांना भारतात पकडतात. त्यांना त्यानंतर बांगलादेश सरकारकडे सोपवणे आवश्यक असते. पण बांगलादेश सरकार त्यांना परत घेण्यास तयार नसते. त्यामुळे या घुसखोरांना पकडून काहीही फायदा होत नाही. त्यांना आपल्याला तुरुंगात ठेवावे लागते. आता सर्व राजकीय पक्षांची मदत घेऊन या भूसीमारेषा कराराबाबत बांगला देशला सांगणे आवश्यक आहे. १९७४ नंतर इतकी वर्षे हे विधेयक लोकसभेमध्ये आणि राज्यसभेमध्ये पारित होऊ शकलेले नव्हते. नव्या सरकारने मुत्सद्देगिरी आणि राजकीय कूटनीती दाखवत हे विधेयक पारित करून घेण्यात यश मिळवले आहे. हा एक ऐतिहासिक क्षण आहे. आगामी काळात या कराराचा फायदा घेत भारताला लागलेला घुसखोरीचा कर्करोग दूर करणे आवश्यक आहे.

**दहशतवादी प्रशिक्षण कँप बंद करा**

याशिवाय आज बांगला देशात भारताविरुद्ध नेक दहशतवादी संघटनांचे प्रशिक्षण कॅम्प आहेत. यामध्ये उल्फा एमएससीएन(के), एमएससीएन(आयएम) अशा प्रकारच्या बंडखोरांच्या तळांचा समावेश आहे. हे कॅम्प आपण बंद करू शकलो तर नागालँडसारख्या भागात होणार्या हिंसाचाराच्या घटनांवर नियंत्रण ठेवता येईल. त्याचप्रमाणे जमाते इस्लामिक बांगलादेश या दहशतवादी संघटनेचे आसाम आणि पश्चिम बंगालमध्ये प्रशिक्षणाचे कँप आहेत. ही दहशतवादी संघटना सध्या बांगलादेशच्या सरकारच्या विरुद्ध उठाव करण्याचा प्रयत्न करत आहे. गेल्या ५-६ महिन्यांपासून या संघटनेच्या अनेक दहशतवाद्यांना पकडण्यामध्ये यश मिळाले होते. त्यामुळे सध्याच्या बांगलादेश सरकारला

दहशतवाद्यांपासून असलेला धोका कमी झालेला आहे. हे आपण बांगलादेशच्या लक्षात आणून देणे गरजेचे आहे. आपण जर बांगलादेश विरुद्ध काम करणार्या दहशतवाद्यांच्या विरुद्ध कारवाई करु शकतो तर बांगलादेशनेही भारताविरुद्ध काम करणार्या दहशतवादी संघटनांविरुद्ध कारवाई करणे अपेक्षित आहे. यासाठी भारताने त्यांच्यावर दबाव आणणे गरजेचे आहे.

२०११ च्या जनगणनेमधील आकडेवारीनुसार बांगलादेशमध्ये हिंदूची संख्या ही अतिशय कमी होत आहे. तसेच त्यांच्यावर अत्याचार होत आहेत. तेथे हिंदुच्या जमिनी बळजबरीने घेऊन त्यांना भारतामध्ये जाण्यास भाग पाडत आहेत. हे प्रकार थांबवण्याबाबत भारताने बांगला देशवर दबाव आणणे आवश्यक आहे.  भू सीमारेषा करार झाल्यामुळे याचे अनेक फायदे भारताला आणि बांगलादेशला होणार आहेत. त्याचा वापर करून बांगलादेशशी चांगले संबंध तयार करून आपण भारतामध्ये होणारी बांगलादेशी घुसखोरीचा थांबवण्यामध्ये आपल्याला नक्कीच यश मिळू शकेल.

**७ जून २०१५ नरेंद्र मोदी बांग्लादेश दौरा ठरणार ऐतिहासिक?**

पंतप्रधान नरेंद्र मोदी येत्या ६ जून रोजी बांग्लादेश दौर्यावर जात आहेत. संसदेत नुकत्याच मंजूर झालेल्या भूसीमारेषा करारारने भारत आणि बांग्लादेशची आंतरराष्ट्रीय सीमा सरळ करण्यात मदत मिळणार आहे. या दौर्यात प्रमुख मुद्दा हाच असला तरी ‘तिस्ता नदी पाणीकरार, बांग्लादेशमधून होणारी घुसखोरी रोखणे तसेच कोलकात्यावरून ईशान्य भारताकडे जाण्यासाठी बांग्लादेशमार्गे रेल्वे आणि रस्त्याच्या प्रश्नावरही चर्चा होणार आहे. तसेच अतिरेकी संघटनांची नाकेबंदी आणि बांग्लादेशमधून होणार्या बनावट नोटा आणि अंमली पदार्थांची तस्करी यासंदर्भात या दौर्यामध्ये यशस्वी बोलणी होऊन त्यासंदर्भातील करार झाल्यास भारतासाठी हा दौरा ऐतिहासिक_ठरणार आहे.

**‘लँड बॉर्डर अॅग्रीमेंट एक ऐतिहासिक विधेयक**

भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे सहा ते आठ जून बांग्लादेशाच्या दौर्यावर जाणार आहेत. या भेटीला एक ऐतिहासिक महत्त्व आहे. याची दोन कारणे आहेत. पहिले म्हणजे या भेटीआधी नुकतेच भारताने ‘लँड बॉर्डर अॅणग्रीमेंट हे विधेयक मंजूर केले आहे. या विधेयकामुळे भारत आणि बांग्लादेश यांच्यातील सीमा सरळ करण्यात मोठी मदत मिळणार आहे. १९७४ मध्ये दोन्ही देशांची सीमा सरळ करण्याचा करार झाला होता. पण याकरीता दोन्ही देशांच्या संसदेची मंजुरी न मिळाल्याने या करारावरती १९७४ पासून अंमलबजावणी करता आली नव्हती. आता हे विधेयक मंजूर झाल्यामुळे भारत सरकार याच्यावर अंमलबजावणी करू शकणार आहे. यामुळे दोन्ही देशांमध्ये प्रदीर्घ काळापासून प्रलंबित असलेल्या एका महत्त्वाच्या आणि मोठ्य  समस्येचे निराकरण होणार आहे. याचा फायदा दोन्ही देशांना आहे. यामुळे दोन्ही देश एका नदीच्या दुसर्या बाजूला असलेल्या आपल्या लोकसंख्येच्या बेटांचे हस्तांतरण करून सीमा सरळ करण्याचा प्रयत्न करतील. यामुळे भारतामध्ये होणारी बांग्लादेशी घुसखोरी रोखण्यास मदत होणार आहे. ज्या ठिकाणी नद्यांची पात्रे आहेत अशा ठिकाणी सीमेचे रक्षण करणे कठीण असते. त्यामुळे याच भागामधून सर्वाधिक घुसखोरी होते.

**तीस्ता नदी पाणीवाटप आणि बांग्लादेशमधून दळणवळण**

मोदी यांच्या दौर्यामध्ये दुसरा महत्त्वाचा विषय असणार आहे तो तिस्ता नदी पाणीवाटपाचा. भारत आणि बांग्लादेशमध्ये तिस्ता नदीच्या पाण्याच्या वाटपावरून अनेक वर्षांपासून भांडण आणि वाटाघाटी सुरू आहेत. तिस्ता नदीचा कराराला पश्चिम बंगाल सरकारकडून होकार मिळणे गरजेचे असल्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी आपल्याबरोबर पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनाही घेऊन जाणार आहेत. त्यामुळे या भेटीत तिस्ता नदीच्या करारावर स्वाक्षर्या होण्याची शक्यता आहे.

याशिवाय या भेटीमध्ये काही मोठे करार होण्याची शक्यता आहे. यातील सर्वांत मोठा करार भारताला बांग्लादेशमधून ईशान्य भारतातल्या राज्यांमध्ये जाण्यासाठीच्या रस्ता आणि रेल्वेमार्गांसंदर्भातील आहे. उदाहरणार्थ, भौगोलिक रचनेमुळे कोलकाता आणि त्रिपुराची राजधानी असलेल्या अगरतळा यांच्यातील सध्याचे अंतर १६५० किलोमीटर आहे. भारताला बांग्लादेशमधून रस्ता मिळाला तर हेच अंतर ३५० किलोमीटर होणार आहे. यामुळे त्रिपुरा आणि इशान्य भारतातल्या नागालँड, मिझोरम या राज्यांमध्ये जाण्यासाठीचे अंतर कमी होईल आणि दळणवळणाचा वेग वाढेल. यामुळे त्या राज्यांची आर्थिक प्रगती होण्यासाठी मदत मिळेल. आजवर बांग्लादेश हा भारताला आपल्या देशातून रस्त्याने जाण्याची परवानगी देण्यासाठी तयार नव्हता.

सध्या शेख हसिना वाजिद या बांग्लादेशच्या पंतप्रधान आहेत. त्यांचा अवामी लिग हा पक्ष पाच वर्षांपासून सत्तेवर आहे. बांग्लादेशमधील इतर राजकीय पक्षांपेक्षा वाजिद यांच्या पक्षाला भारताचा जवळचा मित्र मानले जाते. हसिना वाजिद या बांग्लादेशचे पहिले पंतप्रधान मुजीब-ऊर-रहमान यांच्या  कन्या आहेत. त्यामुळे अवामी लिगचे भारतासोबतचे संबंध खूपच चांगले आहेत. याचा फायदा घेऊन बांग्लादेशकडून होणार्या घुसखोरीसारख्या प्रश्नांबाबत मार्ग काढण्याची मोठी संधी भारताकडे आहे. बांग्लादेशी नागरिकांची भारतात होणारी घुसखोरी ही सातत्याने चर्चिली गेली आहे. आजमितीला तब्बल पाच ते सहा कोटी बांग्लादेशी नागरीक भारतात असण्याची शक्यता आहे. मात्र बांग्लादेश हे मान्य करण्यासाठी तयार नाही. भारताने ‘लँड अॅग्रीमेंट करार आणि तिस्ता पाणीवाटप करार करून बांग्लादेशच्या दिशेने मैत्रीसाठी आणि जुने प्रश्न संपवून संबंध दृढ करण्याच्या दिशेने हात पुढे केला आहे. आता या दोन्ही करारांच्या जोरावर आपण पकडलेल्या बांग्लादेशी नागरीकांना परत घ्यायला त्या देशाला भाग पाडणे आवश्यक आहे. तसे झाले तर या घुसखोरीला मोठ्या प्रमाणावर

आळा बसेल. तसेच दोन्ही देशांचे संबंध सुधारण्यासही मदत होऊ शकते.

**<u>बांग्लादेशी हिंदूंचे भारतामध्ये होणारे पलायन</u>**

बांग्लादेशमध्ये आजही हिंदूंची संख्या मोठी आहे. ज्यावेळी बांग्लादेश म्हणजे पूर्व पाकिस्तान भारतापासून वेगळा झाला, त्यावेळी बांग्लादेशच्या एकूण लोकसंख्येपैकी २९ टक्के हिंदू  होते. पण गेल्या अनेक वर्षांमध्ये तेथील सरकार, सैनिक, गुप्तचर संस्था आणि नागरीकांनी अत्याचार केल्यामुळे अनेक हिंदूनी बांग्लादेशमधून पलायन करून भारतात आश्रय घेतला आहे. सध्याच्या जनगणनेनुसार बांग्लादेशातील हिंदूंची संख्या ८ ते ९ टक्क्यांवर आली आहे.  ती संख्या दिड ते पावणेदोन कोटी असण्याची शक्यता आहे. बांग्लादेशमध्ये आजही हिंदूंवर अत्याचार होत आहेत. बांग्लादेश सरकारने जमात-ए-इस्लामींवर खटले दाखल करून १९७१च्या लढाईमध्ये केलेल्या अत्याचारांच्या  आरोपांवरून त्यांच्या अनेक नेत्यांना फासावर लटकावले आहे. याचा परिणाम म्हणून तिथल्या हिंदूंवर मोठ्या प्रमाणावर हल्ले झाले आहेत. हिंदूंच्या जमिनींवर तेथील अनेक राज्यकर्त्यांनी कब्जा केलेला आहे. १९७१ पासूनच्या, हिंदूंच्या जमिनींच्या चोरीचा प्रा. अब्दुल बरकत ह्यांनी अभ्यास केला. त्यानुसार हिंदूच्या ७५ टक्के जमिनींवर बंग्लादेशमधील वेगवेगळ्या पक्षांच्या नेत्यांनी अतिक्रमण केले आहे. यात अवामी लिग-४४ टक्के, बांग्लादेश नॅशनलिस्ट पार्र्टी ३१ टक्के आणि इतर अनेक पक्ष सामिल आहे्त. हिंदूना तेथे आर्थिक साधन न राहिल्यामुळे ते भारतात पलायन करत आहेत. हिंदूवर होणार्या अत्याचारांचा मुद्दा लावून धरून, त्यासंदर्भात बोलणी करून तेथील हिंदूंवर होणारे अत्याचार कमी करता आले तर त्यांचे भारतामध्ये होणारे पलायन थांबविणे शक्य होणार आहे.

**<u>बांग्लादेशात असणारे कॅंप बंद करा</u>**

ईशान्य भारतातील बंडखोर आणि अतिरेकी संघटनांना बांग्लादेशकडून मदत मिळत आहे. बांग्लादेशच्या मागच्या सरकारच्या तुलनेत ही मदत

कमी झाली असली तरी ईशान्य भारतातल्या अनेक जिहादी संघटनांना बांग्लोदशची गुप्तहेर संस्था आजही मदत करीत आहे. दहशतवादी संघटनांची अनेक प्रशिक्षण शिबीरे बांग्लादेशमध्ये आहेत. ही शिबीरे बंद करून त्यांना पकडता आले तर ईशान्य भारतामध्ये शांतता प्रस्थापित होऊ शकते. यासंदर्भात या दौर्यामध्ये बोलणी होणे आवश्यक आहे. बांग्लादेशने या दहशतवादी संघटनांचे कॅंप उद्ध्वस्त केले तर त्यांना त्यांचे कॅंप म्यानमार अथवा चीनमध्ये सुरू करावे लागतील. अनेक अतिरेकी संघटनांची बॅंक खातेही बांग्लादेशात आहेत. बांग्लादेश सरकराने ही सर्व खाती बंद केली तर त्या संघटनांचे अर्थकारण कोलमडून त्यांचे कंबरडे मोडणे शक्य होईल. गुन्हेगारांचे हस्तांतरण करणे, दहशतवाद्यांचे टड्ढेनिंग कॅंप थांबविणे, त्यांची बॅंक खाती गोठवणे यासंदर्भात यशस्वी बोलणी झाल्यास आणि त्यासंदर्भातील करारावर स्वाक्षर्या झाल्यास भारतासाठी ती एक मोठी उपलब्धी ठरणार आहे.

पाकिस्तानची गुप्तहेर संघटना आयएसआय बांग्लादेशमध्ये आजही कार्यरत आहे. ही संघटना बांगला देशच्या सीमेवरून मोठ्या प्रमाणावर बनावट नोटा भारतात पाठवत आहेत. यासंदर्भात पकडल्या गेलेल्या आरोपींमध्ये बांग्लादेशमधील घुसखोरांची संख्या अधिक आहे. याशिवाय बांग्लादेशमधून अफू, गांजा, चरसचीही तस्करी भारतात केली जात आहे. या दौर्यामध्ये बांग्लादेश सरकारच्या मदतीने भारतात होणारी तस्करी रोखण्यासंदर्भात बोलणी होऊन त्यासंदर्भात कारवाईबाबत त्या सरकारवर दबाव आणता आल्यास ते एक मोठे यश मानता येइल.

नेपाळ आणि भूतानही भारतामार्गे बांग्लादेशमधल्या चितगाव बंदरापर्यंत रस्तामार्ग तयार करण्याची मागणी करत आहेत. हा रस्ता झाल्यास भारत, नेपाळ आणि भूतानलाही एक मोठे आर्थिक क्षेत्र खुले होणार आहे. ईशान्य भारतातल्या सर्व राज्यांना लागणारी सामग्री चितगाव बंदरावरून आयात-निर्यात करता आले तर हे सामान कमी किमतीत उपलब्ध होऊ

शकते. यामुळे ईशान्य भारतात आर्थिक प्रगती होण्यास मदत मिळेल.

**तिस्ता पाणीवाटपाबाबत सौदेबाजी**

तिस्ता पाणीवाटप करारात आपल्या हक्काचे थोडे पाणी बांग्लादेशला द्यावे लागणार आहे. याशिवाय त्रिपुरातील तपाईमुख  नदीचे पाणीही बांग्लादेश आपल्याकडे मागत आहे. ते पाणी देण्याने भारताचे काहीसे नुकसान होणार असले तरीही त्याच्या बदल्यात भारताने वर उल्लेख केलेल्या इतर मुद्दयांबाबत बांगला देशचे मनपरिवर्तन करणे आणि त्यांना भाग पाडणे अशी नीती अवलंबल्यास मोदी यांचा दौरा ऐतिहासिक ठरेल, यात शंका नाही.

**१४ जून २०१५ बांगलादेश दौर्याची फलनिष्पत्ती**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ६ते ७ जून दोन दिवसांचा बांगलादेश दौरा केला. त्यांचा हा दौरा भारत-बांगलादेशचे संबंध चांगले करण्याकरता महत्त्वाचा मानला पाहिजे. बांगलादेशची निर्मिती झाली त्यावेळी ते एक धर्मनिरपेक्ष राष्ट्र होते, पण काही वर्षांनी बांगलादेशने स्वत:ला निधर्मी राष्ट्राऐवजी इस्लामिक राष्ट्र म्हणून प्रस्तूत केले. यानंतर बांगलादेशमधून पाकिस्तानची गुप्तहेर संस्था आयएसआयने बांगलादेशची गुप्तहेर संघटना डीजीएफआयसोबत मिळून भारतविरोधी कारवाया सुरू केल्या होत्या. बांगलादेशमधून मोठ्या प्रमाणावर भारतामध्ये घुसखोरी वाढली. आज पाच ते सहा कोटी बांगलादेशी नागरिक अवैधरित्या भारतामध्ये घुसलेले आहेत. यामुळे आसाम, पश्चिम बंगाल आणि ईशान्य भारतातील काही राज्य बांगलादेशी मुस्लीम बहुसंख्य होतील की काय अशी भीती निर्मान होत आहे. नरेंद्र मोदी यांच्या भेटीमुळे या प्रलंबित प्रश्नांची उत्तरे मिळण्याकरीता किती यश मिळाले याचे अवलोकन करणे महत्त्वाचे आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नुकत्याच पार पडलेल्या बांगला देश दौर्यामध्ये लॅंड बॉर्डर ॲग्रीमेंट या करारवर उभय देशांच्या स्वाक्षर्या झाल्या. यामुळे ४१ वर्ष प्रलंबित असलेला प्रश्न निकाली निघाला आहे.

भारतीय संसदेने गेल्या महिन्यातच या विधेयकाला मंजुरी दिली होती. त्यामुळे आता एकमेकांच्या हद्दीत असलेल्या गावांची अथवा बेटांची अदलाबदल करणे शक्य होईल. त्यामध्ये भारताला ५०० एकर जमीन आणि ५१ गावे मिळणार आहेत, तर बांगलादेशला दहा हजार एकर जमीन आणि १११ गावे मिळतील, यामुळे बांगलादेशमधून या गावांमधून होणारी घुसखोरी थांबविण्यात नक्की यश मिळेल. सुधारलेल्या संबंधामुळे भारत-बांगलादेश सीमेवरती होणारी गुन्हेगारी  रोखून सीमावर्ती भागात राहणार्या भारतीयांना होणारा त्रास कमी होण्यामध्ये मोठी मदत होणार आहे.
भारतात दहशतवादाला पाकिस्तान प्रोत्साहन देत आहे तसेच प्रोेत्साहन अथवा मदत बांगलादेशमधूनही मिळत होती. बांगलादेशमधील जमात-ए-इस्लामी या कट्टर दहशतवादी संघटनेवर बांगलादेशमध्येच १९७१ मधील लढाईमध्ये सर्वसामान्य नागरिकांवर अत्याचार केल्याचे अनेक खटले चालू आहेत. जमात-ए-इस्लामच्या अनेक महत्त्वाच्या नेत्यांना फाशीची शिक्षा देण्यात आलेली आहे. येत्या काही दिवसांत अनेक दहशतवाद्यांना अशीच शिक्षा मिळण्याची शक्यता आहे. यामुळे बांगलादेशमध्ये हिंसाचार वाढलेला आहे. मात्र बांगलादेशच्या पंतप्रधान हसिना वाजद या जमात-ए-इस्लामींवर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न करत आहेत. परंतु यामुळेच बांगलादेश सरकारविरोधात बदला घेण्यासाठी त्यांच्या समर्थकांवर आणि बांगलादेश हिंदुंवर अत्याचार वाढले आहेत. यामुळे त्यांची भारतामध्ये घुसखोरी वाढण्याची शक्यता जास्त वाढली आहे.

**-ए-इस्लामी दहशतवाद्यांचे पश्चिम बंगालमध्ये  ट्रेनिंग कँप**

अलीकडील काळात बांगलादेशमध्ये कट्टरतावादी मुस्लीम दहशतवादी सक्रिय आणि वरचढ होण्याचा प्रयत्न करत आहेत.  जमात-ए-इस्लामीने पश्चिम बंगालमध्ये आपल्या दहशतवाद्यांचे ट्रेनिंग कँप सुरू केले होते. गेल्या तीन-चार महिन्यांमध्ये पश्चिम बंगालमध्ये झालेल्या बॉंबस्फोटांनाही जमात-ए-इस्लामीच जबाबदार असल्याचेही पुढे आले आहे.

शेख हसिना वाजद यांचे सरकार उलथवून लावायचे हे त्यांचे मुख्य उद्दीष्ट आहे. आपण जमात-ए-इस्लामी यांच्यावरती एनआयए आणि पोलीसांनी केलेल्या कारवाईमुळे त्यांच्या दहशतवादी कारवाया कमी होण्यात मदत झाली आहे. भारतातून बांगलादेश सरकारविरोधात होणार्या कारवाया रोखण्याची गरज आहे . बांगलादेशची गुप्तहेर संस्था डीजीएफआय आणि पाकिस्तानची गुप्तहेर संघटना आयएसआय यांचे अतिशय घनिष्ट संबंध होते. ईशान्य भारतामध्ये दहशतवाद वाढविण्यासाठी या दोन्ही संघटना मोठ्या प्रमाणावर मदत करत होत्या. मोदींच्या भेटीमुळे पाकिस्तान आणि बांगलादेशचे दहशतवाद वाढविण्याचे प्रयत्न कमी होण्यास मदत होईल, अशी आशा आहे.

भारतातील उल्फासारख्या दहशतवादी संघटनांचे प्रशिक्षण कँप बांगलादेशमध्ये होते. सध्या ते उघडपणे चालू नसले तरी चितगावमधील पहाडी भागात अजूनही ते कँप सुरू असल्याची माहिती आहे. सुधारलेल्या संबंधांमुळे हे कँपही बंद होतील अशी अपेक्षा आहे. भारत आणि बांगलादेशच्या सीमेवरून घुसखोरी होतच आहे. शिवाय हत्यारे, दारूगोळा आणि बनावट नोटा यांचीही तस्करी मोठ्या प्रमाणावर होताना दिसते. सीमा करारामुळे यावरही नियंत्रण येणार आहे. याउलट भारतामधून हजारो कोटी रुपयांच्या गायी आणि म्हशींची तस्करी बांगलादेशमध्ये केली जाते. या तस्करीमधून मिळणार्या पैशांचा वापर दहशतवादी गटांना आर्थिक मदत करण्यासाठी केला जातो. सुधारलेल्या संबंधांमुळे यावरही नियंत्रण येते का हे पहावे लागणारआहे.

**<u>चितगाव मोंगला बंदरांचा भारतीय जहाजांना वापर करू देण्याबाबत करार</u>**

मोदींच्या दौर्यामध्ये सुमारे २० करार करण्यात आले आहेत. त्याचबरोबर बांगलादेशने भारताला चितगाव बंदरामध्ये भारतीय जहाजांना येण्याजाण्याची परवानगी दिली आहे. या चितगांव बंदारचा चीनने विकास केला आहे. चीनच्या ‘स्टि ऑफ पर्ल्सचा एक टेहाळणी केंद्र म्हणून तो

एक भाग आहे. चितगाव आणि मोंगला बंदरांचा भारतीय जहाजांना वापर करू देण्याबाबत या दौर्यात झालेला करार भारतासाठी लाभदायक आहेच; पण त्याला व्यूहात्मकदृष्ट्याही महत्त्व आहे.

मागील काळापासून चीन आणि पाकिस्तान बांगलादेशला भारतविरोधी करण्याचा प्रयत्न करत आहे. त्यामुळे बांगलादेशसोबत संबंध सुधारून या देशाला आपल्या बाजूने वळविणे गरजेचे होते. मोदींच्या दौर्याने ही गोष्ट साधली गेल्याचे  दिसत आहे. बांगलादेशमधील बांगलादेश नॅशनलिस्ट पार्टीच्या प्रमुख आणि प्रमुख विरोधी पक्षनेत्या खलिदा झिया या पूर्णपणे भारतविरोधी होत्या. त्यांचा कल आयएसआय आणि चीनच्या बाजूने होता. त्यांनीही मोदी यांच्या बांगलादेश दौर्याचे कौतुक केलेले आहे. यामुळे बांगलादेशमधील इतर राजकीय पक्ष आणि जनतेबरोबरही भारताचे संबंध सुधारण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे.

भारतातील अदानी आणि अंबानी या उद्योजकांनी बांगलादेशमध्ये वीजनिर्मिती करण्यासाठी आणि तिथल्या स्पेशल इकॉनॉमिक झोनमध्ये वीजनिर्मीती केंद्रे बांधण्यासंदर्भात करार केले आहेत. बांगलादेशमध्ये मोठ्या प्रमाणावर नैसर्गिक वायू मिळतो. त्याची भारताला गरज आहे. यापूर्वीच्या काळात भारताचे बांगलादेशबरोबरचे संबंध चांगले नसल्यामुळे या नैसर्गिक वायूचा वापर भारताला करता आला नाहीत. त्या काळात चीनने बांगलादेशसोबत करार करून तिथून गॅस आयात करणे सुरू केले आहे. आता भारतीय उद्योगपती बांगलादेशमध्ये गॅसचा वापर करून वीजनिर्मिती करणार आहेत. वीजनिर्मिती वाढल्यानंतर जास्तीची वीज भारतात पश्चिम बंगालसह इतर राज्यांमध्येही निर्यात होण्याची शक्यता आहे. तसेच अतिरिक्त गॅस पाईपलाईनद्वारे भारतात आणण्याचीही शक्यता आहे. भारतीय कारखानदारांना बांगलादेशमध्ये कारखाने सुरू केल्यानंतर तेथे मिळणार्या स्वस्त वीजेचा आणि स्वस्तात मिळणार्या कामगारांचा मोठा फायदा होणार आहे. यामुळे आपल्याला तिथे उद्योगधंदे

वाढविण्यास मदत मिळेल.

**<u>बांगलादेशमधून रस्ते आणि रेल्वेमार्ग मिळणार</u>**

याशिवाय कोलकात्त्यापासून ढाकामार्गे आगरतळा येथे रस्ते आणि रेल्वेमार्ग मिळणार आहे. त्रिपुरातील आगरतळा हे शहर फाळणीपूर्वी कोलकत्त्याहून ३५० कि.मी. अंतरावर होते. सध्या हे अंतर ७०० कि.मी. झाले आहे. पण आता नव्या ! आता हे अंतर कमी होईल. चितगाव बंदर ईशान्य भारताचे सर्वांत जवळचे बंदर आहे. याचे दोन मोठे फायदे होतील, पहिला म्हणजे ईशान्य भारतात जाण्यासाठी आपल्याला एक जवळचा मार्ग उपलब्ध होणार आहे. त्यामुळे ईशान्य भारताचा आर्थिक विकास होण्याकरता नक्कीच मदत होईल. बांगलादेशमधील रेल्वेव्यवस्था सुधारण्यासाठी भारत २०० कोटी रूपयांची मदत देणार आहे. याचा फायदा ईशान्य भारताच्या राज्यांना होणार आहे.

**<u>तिस्ता नदीच्या पाणीवाटपाचा प्रश्न आणि घुसखोरी</u>**

या दौर्यादरम्यान तिस्ता नदीच्या पाणीवाटपाचा प्रश्न मात्र सोडविता आला नाही. याचे मुख्य कारण पश्चिम बंगलाच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी या होत्या. कारण तिस्ता नदीचे पाणी बांगलादेशला दिले तर पश्चिम बंगालला पाणी कमी पडणार आहे. पण तिस्ता नदीवर धरण बांधून पाणी अडवले गेले तर हा प्रश्न सुटू शकेल. याला वेळ लागणार आहे. पश्चिम बंगालमध्ये आगामी वर्षांत होऊ घातलेल्या निवडणुकांमुळे ममता बॅनर्जी हा प्रश्न प्रलंबित ठेवू इच्छित आहेत. मात्र, या दौर्यातून हा प्रश्न सुटण्याबाबतची आशा निर्माण झाली आहे, हे नक्की.

बांगला देशात सध्या सत्तेत असलेल्या हसिना वाजद सरकारची अजून चार वर्षे शिल्लक आहेत. त्यांनी याचप्रकारे भारताला सहकार्य केले तर बांगलादेशमधून होणारी घुसखोरी आणि तेथील हिंदूंवर होणारे अत्याचार थांबविता येणार आहेत. याशिवाय याच सीमेवरून होणारी हत्यारांची आणि बनावट नोटांची तस्करी थांबविण्यात मदत मिळेल.

**वर्क परमिटच्या मुद्दयाबाबत संदिग्धता**

बांगलादेशमधून रोज भारतात येणार्यांना वर्क परमिट देऊन त्यांच्यावर निर्बंध लावू शकतो. रोज सकाळी हजारो बांगलादेशी सीमेजवळ असणार्या त्रिपुरा, मेघालय, नागालँड आणि मणिपूर येथे येऊन कनिष्ठ दर्जाची कामे करतात आणि संध्याकाळ झाली की परत बांगलादेशमध्ये परततात.
त्यांना वर्क परमिट देऊन भारतामध्ये येण्याची परवानगी देण्यात आली तर त्यांच्यावर लक्ष ठेवता येणार आहे. कारण प्रत्येक महिन्यात दहा ते बारा टक्के बांगलादेशी परत जाण्याऐवजी भारतातच राहतात. वर्क परमिट भारताच्या दृष्टीने खूप महत्त्वाचे आहे. या विषयावर चर्चा झाली की नाही हे कळू शकले नाही.

दरवर्षी अवैधरीत्या भारतात राहणार्या हजारो बांगलादेशी नागरीकांना पकडण्यात येते. अशांना परत बांगलादेशमध्ये पाठवायचे म्हटले तर त्यातल्या दहा टक्के नागरिकांनाही ते स्वीकारत नाहीत. आता सुधारलेल्या संबंधामुळे या पकडलेल्या नागरिकांना बांगलादेश सरकार परत घेईल अशी शक्यता आहे. अर्थात हे करार झाल्यास तात्काळ घुसखोरी कमी होईल असे नाही. या करारांवर अतिशय चांगल्या पद्धतीने काम करण्याची गरज आहे. येणार्या काळामध्ये पाणीवाटपाचे गाजर बांगलादेशसमोर ठेवून घुसखोरी थांबविण्यासची मागणी आपण केली पाहिजे.

थोडक्यात, नरेंद्र मोदी यांचा हा दौरा ऐतिहासिक मानता येईल. मात्र नुसत्या स्वप्नरंजनामध्ये न राहता या करारांची अंमलबजावणी कशी होते हे पाहणेही गरजेचे आहे. बांगलादेशी घुसखोरी कमी झाली तरच ही भेट खर्या अर्थाने ऐतिहासिक मानता येईल.

**९ ऑगस्ट २०१५नॅशनल रजिस्टर ऑफ सिटीझन्सचा वापर करून बांगलादेशी घुसखोरी रोखण्यासाठी सरकारचा प्रयत्न**

सातत्याने केले जाणारे मतपेट्यांचे राजकारण आणि याआधीच्या कचखाऊ

सरकारमुळे भारतात आजमीतीला तब्बल पाच ते सहा कोटी बांगलादेशी नागरिक अवैधरित्या राहत आहेत. मात्र आता केंद्र सरकारने याबाबत ठोस पावले उचलली आहेत. १९७१ च्या नॅशनल रजिस्टर ऑफ सिटीझन्सचा वापर करून अशा बांगलादेशी घुसखोरांना शोधण्याचे काम सरकाकडून सुरू करण्यात आले आहे. मात्र या मोहिमेत पारदर्शिपणा असण्याची गरज आहे. आसाममधील चहाच्या मळ्यांमध्ये काम करणार्या बंगाली आणि बिहारी नागरिकांच्या सुरक्षेबरोबरच ‘उल्फाङ्कसारख्या दहशतवादी संघटनांचे अस्तित्व संपविण्याचीही गरज आहे.

पाच ते सहा कोटी अवैध बांगलादेशी नागरिक भारतामध्ये असावे असा अंदाज आहे. आसामाच्या एकूण लोकसंख्येपैकी ३५ टक्के  तर पश्चिम बंगालच्या एकूण लोकसंख्येपैकी २९ टक्के घुसखोर बांगलादेशातून आलेले आहेत. याशिवाय भारतातल्या इतर अनेक राज्यातही मोठ्या प्रमाणावर घुसखोरी झालेली आहे. मतपेटीच्या राजकारणामुळे गेले ६६ वर्ष एकही राजकीय पक्ष वा मीडिया या घुसखोरीविषयी बोलण्यास तयार नाही. नरेंद्र मोदी यांनी निवडणूकीपुर्वी सत्तेमध्ये आल्यानंतर बांगलादेशी घुसखोरांना शोधून त्यांना भारताबाहेर काढण्याचा प्रयत्न करण्याचे आश्वासन दिले होते. गेल्या महिन्यातच मोदी यांनी बांगलादेशला भेट दिली. यात एकमेकांकडील लोकसंख्येची असणारी बेटे हस्तांतरीत करण्याचा करार झाला आहे. यालाच ऐतिहासिक ‘लॅंड अग्रीमेंट बिल म्हटले जाते. यामुळे भारत आणि बांगलादेशची सीमा सरळ होऊन घुसखोरी थांबविण्यास नक्कीच मदत मिळेल.

नुकत्याच आलेल्या बातमीनुसार आसाम आणि पश्चिम बंगालमधील सुपरिटेंडंट ऑफ पोलीस आणि डिस्टिक्ट मॅजिस्ट्रेट बांगलादेशमधील त्यांच्या जवळच्या जिल्ह्यांमधील पोलीस आणि डिस्टिक्ट मॅजिस्टना भेटून सीमावर्ती भागात होणारी गुन्हेगारी रोखण्यासंदर्भात चर्चा करण्यासाठी पुढच्या महिन्यात दिल्ली येथे भेटणार आहे. यामुळे

सीमेपलिकडून होणारी गुन्हेगारी, अंमली पदार्थांची, जनावरांची तस्करी, दहशतवाद्यांची घुसखोरी यावरती लक्ष ठेवता येणार आहे.
याशिवाय प्रत्येक वर्षी पाऊस आल्यामुळे सीमेवरती लावलेले तारेचे कुंपण वाहून जाते. बांगलादेश सीमेवरती असणारे बांगलादेशी सैन्य अशा कुंपणाच्या दुरूस्तीसाठी परवानगी देत नव्हते. त्यामुळे घुसखोरी वाढण्यास मदत होत होती. आता अशा प्रकारची दुरूस्ती करण्यासाठी बैठका झाल्यानंतर कुंपणांची दुरुस्ती पुन्हा सुरू झाली आहे. यामुळे गुन्हेगारी आणि घुसखोरी थांबविण्यासाठी नक्कीच मदत मिळणार आहे.

**<u>नॅशनल रजिस्टर ऑफ सिटीझन्स</u>**

मात्र भारतात आता पर्यंत शिरलेल्या बांगलादेशी घुसखोरांची ओळख पटवून त्यांना बाहेर कसे काढायचे हा मोठा प्रश्न आहे. यासाठी नॅशनल रजिस्टर ऑफ सिटीझन्स (एनआरसी)नुसार १९७१ नंतर ज्या बांगलादेशींनी भारतामध्ये घुसखोरी केली त्यांना शोधून काढता येणार आहे. देशात जनगणना होते त्यावेळी देशातील प्रत्येक व्यक्तीचे आणि त्याच्या कुटुंबियांचे नाव आणि इतर माहिती एनआरसीमध्ये नोंदविली जाते. यामुळे ज्यांची नावे १९७१च्या एनआरसीमध्ये नसेल त्यांना बांगलादेशी घुसखोर मानले जाईल. यासाठी सरकारने एक मोठी संस्था निर्माण केलेली आहे. आयएएस दर्जाच्या अधिकार्याच्या देखरेखीखाली हे काम होत आहे.
आसाममध्ये २५०० एनआरसी सेवा केंद्रे तयार करण्यात आली आहेत. यामुळे ज्यांची नावे या रजिस्टरमध्ये नसतील त्यांना आपले आईवडील भारतामध्ये जन्मले होते याचा पुरावा सादर करावा लागणार आहे. भारत सरकारकडे असणार्या १९७१पर्यंतच्या एनआरसीलाच पुरावा मानले जाणार आहे. कारण त्यानंतर प्रत्येक दहा वर्षांनी होणार्या एनआरसीमध्ये आसाम आणि पश्चिम बंगालमधल्या भ्रष्ट अधिकार्यांनी लाखो चुकीची नावे समाविष्ट केली आहेत. मात्र जे रजिस्टर केंद्र सरकारकडे आहे त्यात अशी

नावे समाविष्ट करण्यात त्यांना यश मिळाले नव्हते. म्हणून १९७१च्या एनआरसीमध्ये नावे नसलेल्यांना आपले आईवडील भारताचेच नागरिक होते हे सिद्‌ध करावे लागणार आहे. यासाठी त्यांना त्यावेळचे जमिनीची कागदपत्रे, जन्मदाखला, पासपोर्ट, भारत सरकारकडून दिला जाणारा कोणताही दाखला, बँकेचे पास बुक अशा प्रकारच्या १४ कागदपत्रांना मान्यता देण्यात आली आहे. एनआरसीप्रमाणे आसाममधल्या लोकांची नोंदणी तपासण्यासाठी २००५ मध्ये एक प्रयत्न झाला होता. मात्र आसाममधल्या देशद्रोही संघटनांच्या आंदोलनांमुळे तो प्रयत्न थांबविण्यात आला. २०१० मध्ये सुद्‌धा उच्च न्यायालयाने दिलेल्या निकालामुळे आसामचे मुख्यमंत्री तरुण गोगोई यांनी पुन्हा तसा प्रयत्न सुरू केला होता. मात्र पुन्हा देशद्रोही संस्थांनी मोठ्या प्रमाणावर आंदोलने केल्यामुळे तो प्रयत्न थांबविण्यात आला होता. आता पुन्हा अशा प्रकारच्या धमक्यांना भीक न घालता असा प्रयत्न सुरू करण्यात आलेला आहे.

**<u>बांगलादेशी घुसखोरांचा शोध कसा घेणार?</u>**

यामुळे बांगलादेशी घुसखोरांना शोधता येईल का? असा प्रश्न निर्माण होतो. आसामचे मुख्यमंत्री गोगोई हे शक्य होईल यावर ठाम आहे. मात्र आसाममधील भ्रष्ट अधिकारी अशा बांगलादेशी घुसखोरांकडून पैसे घेऊन त्यांना वेगवेगळे दाखले देऊन त्यांची नावे या रजिस्टरमध्ये कायमची नोंद करतील, अशी भीती अनेकांना वाटते. यासाठी सर्वोच्च न्यायालयाने याकडे लक्ष ठेवण्याची गरज आहे.

**<u>बिहारी, बांगाली नागरिकांचा प्रश्न</u>**

बांगलादेशी घुसखोरांशिवाय अनेक बिहारी आणि बंगाली नागरिक आसामच्या चहांच्या मळ्यात पन्नास ते साठ वर्षांपासून काम करत आहेत. अशा अडाणी लोकांना सरकारी कागदपत्रे त्यांच्या राज्यातून आणणे शक्य होणार नाही. त्यामुळे चहाच्या मळ्यांमध्ये काम करणार्या या बिहारी आणि बंगाली नागरिकांना त्रास होणार नाही याची सरकारने

दक्षता घेण्याची गरज आहे.

'उल्फा ही दहशतवादी संघटना अनेक वर्षांपासून आसाममध्ये कार्यरत आहे. बांगलादेशी घुसखोरांना रोखण्यासाठी 'आसू या प्रादेशिक पक्षाने 'उल्फा संघटनेची स्थापना केली होती, पण सध्या 'उल्फा आसाममध्ये घुसलेल्या बांगलादेशी घुसखोरांवर कारवाई करण्याऐवजी चहाच्या मळ्यांमध्ये काम करणार्या बंगाली आणि बिहारी लोकांविरूद्धच काम करत आहे. गेल्याच आठवड्यात तिनसुखीया जिल्ह्यात दोन बिहारी नागरिकांना ठार मारण्यात आले. याचप्रमाणे गेल्या पाच ते सहा वर्षांत 'उल्फाने आसाममध्ये काम करणार्या अनेक बिहारी कामगारांना ठार मारले आहे. जी संघटना बांगलादेशी घुसखोरांविरूद्ध कारवाई करण्यासाठी बनविण्यात आली होती, ती त्यांच्याविरूद्ध कारवाई करण्याऐवजी आसाममध्ये इतर राज्यांतून आलेल्या भारतीयांवरच कारवाई केली जात आहे. याचे मुख्य कारण म्हणजे 'उल्फा या दहशतवादी संघटनेचे बँक खाते बांगलादेशमध्ये आहे. याशिवाय बांगलादेशची गुप्तहेर संघटना 'उल्फाला आर्थिक मदत करण्याबरोबरच शस्त्रास्त्रे पुरवित आहे.

**'उल्फाचे अस्तित्व संपविण्याची गरज**

सध्या भारत आणि बांगलादेशमध्ये सुधारलेल्या संबंधांमुळे 'उल्फाचे प्रशिक्षण तळ म्यानमारमध्ये स्थलांतरीत करण्यात आलेले आहेत. पण बांगलादेश सरकारने त्यांच्यावरती केलेल्या उपकारामुळे बांगलादेशी घुसखोरांविरूद्ध न लढता आसाममध्ये असणार्या इतर भारतीयांविरूद्ध उल्फा लढत आहे. या हिंसाचारामुळे अनेक वर्षांपासून आसाममध्ये राहणारे बिहारी, बंगाली आपल्या राज्यात पळून जाण्याची शक्यता आहे. त्यानंतर अशा जागांवर बांगलादेशी घुसखोर वसविण्याचे काम 'उल्फाङ्कला करावयाचे आहे. त्यामुळे केंद्र सरकारने 'उल्फा विरोधात दहशतवादविरोधी मोहिम राबवून त्यांचे अस्तित्व संपविण्याची गरज आहे. 'उल्फाचे म्यानमारमधील दहशतवादी प्रशिक्षण तळ खूप आत आहेत. या

आठवड्यात म्यानमारचे लष्करप्रमुख भारतभेटीवर येत आहेत. त्यांची मदत घेऊन आपण 'उल्फाङ्कच्या म्यानमारमधील तळांवर हल्ले करून त्यांची ताकद कमी करायला हवी.

थोडक्यात, केंद्र सरकारने बांगलादेशी घुसखोरी रोखण्यासाठी नॅशनल रजिस्टर ऑफ सिटीझनचा वापर करण्याचे ठरविले आहे. यासाठी खूप वेळ लागणार आहे. हे काम यशस्वी होईल की नाही हे येणारा काळच सांगणार आहे. हे काम सुरू  केल्यामुळे सरकारचे कौतुक करायाला हवे.

आसाममध्ये असणार्या बिहारी आणि बंगाली नागरिकांना शोधून त्यांना हाकलण्यासाठी नाही, तर बांगलादेशी घुसखोरांना शोधण्यासाठी हे प्रयत्न केले जावेत.

आसाममध्ये मतपेटीचे राजकारण मोठे असल्यामुळे बांगलादेशी घुसखोरांनाच शोधण्यावरती लक्ष केंद्रित केले जाऊन इतर भारतीयांना बाहेर काढले जाणार नाही, यावरती केंद्रीय गृहमंत्रालय आणि सर्वोच्च न्यायालयाने लक्ष ठेवण्याची गरज आहे. अन्यथा बांगलादेशी घुसखोर शोधण्याऐवजी अवैध बांगलादेशी घुसखोरांना वैध केले जाण्याची शक्यता असून बंगाली आणि बिहारी नागरिकांनाच आसाममधून बाहेर काढले जाण्याची शक्यता आहे.  अशा अनेक बाबी आसाममधल्या काही वृत्तपत्रांनी बाहेर काढल्या होत्या. त्यामुळे माध्यमांनीही या प्रक्रियेवर लक्ष ठेवल्यास बांगलादेशी घुसखोरी रोखणे शक्य होणार आहे. २०२१ च्या निवडणुकीत एक बंगलादेशी आसामचा मुख्यमंत्री बनु नये म्हणून अवैध बांगलादेशी शोधण्यात मोदी सरकारला यश मिळावे हिच ईश्वर शरणी प्रार्थना.

## प्रकरण4 - माओवाद/ नक्षलवाद/ डावा दहशतवाद-माओवादी, ४०% देशाचे नियंत्रण करत आहेत

४०% केंद्रिय भूप्रदेशावरील, नवी दिल्ली आणि राज्यांच्या राजधान्यांचे

प्रशासकीय नियंत्रण सुटून, ते माओवाद्यांकडे गेलेले आहे. पशुपती, नेपाळपासून तर तिरुपती, आंध्रापर्यंतच्या पट्ट्यातील, नक्षलवाद्यांना त्या त्या क्षेत्रातील गुन्हेगारी विश्व मदत आणि पाठिंबा पुरवत असतात. देश अक्षरशः दोन भागांत विभागला गेला आहे.

पाकिस्तान, बांगलादेश आणि माओवादी नेपाळ ह्यांसारख्या परदेशांचे, नक्षलवाद्यांशी घट्ट संबंध प्रस्थापित झालेले आहेत. माओवादी, गुन्हेगारी विश्व आणि अंमली पदार्थांचे व्यापारी ह्यांतील घनिष्ट संबंध देशासाठी स्फोटक झालेले आहेत. असेही अहवाल आहेत की, आय.एस.आय.ने नक्षलवादी उतरंडीत जिहादी तत्त्वे (जिहादी दहशतवादी) घुसवलेली आहेत. जी त्यांना नेतृत्व, शस्त्रास्त्रे आणि अर्थपुरवठा करत असतात.

## प्रकरण ५- दहशतवाद थांबण्याकरता आक्रमक परराष्ट धोरण

**९ ऑगस्ट २०१५ संपूर्ण जगाला हवी दहशतवादाविरुद्ध एकजूट**

**२२ मार्च २०१४अफगाणिस्तानमधील सत्ताबदल भारताला घातक**

**२३ ऑगस्ट २०१५युएई दौर्‍याचे दहशतवादाविरुद्ध एकमेकांना मदत**

**१ फेब्रुवारी २०१५-दहशतवादाचे बदलते स्वरुप आणि भारत अमेरिका संबंध**

**१ मार्च २०१५भारत-इस्त्रायल संबंध वेगळ्या वळणावर**

### ९ ऑगस्ट २०१५ संपूर्ण जगाला हवी दहशतवादाविरुद्ध एकजूट

भारतात होणारा दहशतवाद हा पाकिस्तान पुरस्कृत आहे, ही गोष्ट संपूर्ण जगाला ठाऊक आहे. परंतु अमेरिका, रशिया आणि चीन या जगातील तीन महासत्ता याबाबत भारताच्या बाजूने उभे राहात नाहीत. याचे कारण

त्यांचे राजकीय हितसंबंध पाकिस्तानशी अधिक प्रमाणात निगडित आहेत. यासाठी अफगाणिस्तानातील परिस्थिती कारणीभूत आहे. त्यामुळे आता जगातील इतर राष्ट्रांवर अवलंबून न राहता भारतातील सर्व पक्षांनी एकत्र येऊन दहशतवादाविरुद्धचे धोरण आखले पाहिजे. परस्परांमध्ये न भांडता देशाच्या संरक्षणासाठी एकोप्याने पुढे आले पाहिजे. त्याला भारतीय जनतेचीसुद्धा मोठी साथ गरजेची आहे. कारण येत्या काळात दहशतवादाचा धोका  वाढणार आहे. त्याचा सामना हा एकजुटीनेच करावा लागेल.

**<u>पाकिस्तानचे भारताविरोधी धोरण बदलण्याची शक्यता नाही</u>**

पाकिस्तानची गुप्तहेर संस्था असलेल्या फेडरल इनव्हेस्टिगेशन एजन्सीचे माजी प्रमुख तारिक खोसा यांनी मुंबईवर झालेल्या २६/११ च्या दहशदवादी हल्ल्यामागे पाकिस्तानचाच हात असल्याची जाहीर कबुली दिली. ही कबुली त्यांनं पाकिस्तानच्या डॉन या महत्त्वाच्या वर्तमानपत्रामध्ये दिलेल्या एका लेखामधून समोर आली. तारिक खोसा यांनी जे काही सांगितले त्यात नवे असे काही नाही. हे सत्य भारतातील अधिकारी, तज्ज्ञ, एवढेच नाही तर सामान्य नागरिकालाही ज्ञात आहे. मात्र या लेखामुळे पाकिस्तान हा भारतामध्ये दहशदवाद कसा वाढवतो आहे हे पुन्हा एकदा जगापुढे अधोरेखित होणार आहे आणि गेल्या काही वर्षांपासून भारत यासंदर्भात करत असलेल्या दाव्याला यामुळे पुष्टी वा बळकटी मिळणार आहे. पाकिस्तानकडून दहशतवादाला दिले जाणारे खतपाणी वा प्रोत्साहन हे पूर्णपणे चुकीचे आहे, असे मत तेथील काही उदारमतवादी मांडत आहेत. पण त्यांना पाकिस्तानच्या धोरणांमध्ये फारसे महत्त्व दिले जात नाही. पाकिस्तानचे भारताविषयी धोरण ठरवण्याची पूर्ण ताकद ही पाकिस्तानचे सैन्य आणि पाकिस्तानची गुप्तहेर संस्था आयएसआय यांच्याकडे आहे. त्यामुळे उदारमतवादी किंवा तेथील चांगल्या लोकांनी जरी भारताच्या समर्थनार्थ कितीही लिखाण केले तरी त्यामुळे पाकिस्तानचे भारताविरोधी

असलेले धोरण बदलण्याची शक्यता नाही. पंजाबमधील दहशतवादी हल्ला असो किंवा उधमपूरमध्ये झालेला दहशतवादी हल्ला असो यातून ही बाब स्पष्ट झाली आहे.दहशदवाद्यांना पकडून त्यांच्या विरुद्ध खटले उभे करणे हे सुद्धा पाकिस्तानमध्ये अशक्य आहे. कारण गेल्या दहा वर्षांपासून भारताने हजारो पुरावे दिल्यानंतरही पाकिस्तानमध्ये हाफिज सईद आणि झकी उल रहमान लखवी  यांच्याविरुद्ध खटले सुरू असूनही ते काही ना काही कारणे देऊन पुढे सरकवले जातात. त्यामुळे भारतात दहशतवाद पसरवणार्यांना पाकिस्तानात शिक्षा होण्याची शक्यता जवळपास धुसरच आहे.

**<u>दहशतवादी हल्ल्याचे मूळ   नेहमी पाकिस्तानमध्ये</u>**

गुरुदासपूरमध्ये झालेल्या हल्ल्यात वापरलेली जीपीएस यंत्रणेवरून कळून आले की, हल्ला करणारे दहशतवादी हे पाकिस्तानमधून आले होते. अशा प्रकारचे अनेक पुरावे आज भारताजवळ आहेत. याचा वापर थोड्या प्रमाणात आंतरराष्ट्रीय मत आपल्याबाजूने करण्याकरिता जरूर करता येईल. दुर्दैवाने आज अशी स्थिती आहे की, पाकिस्तान हे दहशतवाद पसरवणारे राष्ट्र आहे हे सगळ्या जगाला माहित आहे. इतकेच नाही तर ज्या-ज्या वेळी जगामध्ये कुठेही दहशतवादी हल्ला होतो, त्या दहशतवादी हल्ल्याचे मूळ हे नेहमी पाकिस्तान किंवा अफगाणिस्तानमध्ये असते. पण इतर देश पाकिस्तानविरुद्ध या हल्ल्यांबाबतच्या पुराव्यांचा  वापर करत नाहीत आणि पाकिस्तानवर दबावही टाकला जात नाही.

**<u>तात्पुरत्या फायद्यासाठी अमेरिकेच्या दृष्टीने पाकिस्तान अधिक महत्त्वाचे</u>**

असे का होते? याचे कारण आहे अफगाणिस्तान. सध्या अफगाणिस्तानात परिस्थिती बदलत आहे. बहुतेक अमेरिकन सैन्य हे अफगाणिस्तानातून मागे जाऊ लागले आहे. अमेरिकन आणि नाटोच्या फौजा गेल्यानंतर तेथे एक मोठी राजकीय पोकळी निर्माण होणार आहे. यापुढील काळात अफगाणिस्तानमध्ये  शांतता निर्माण करण्यासाठी अमेरिकेला पाकिस्तान

सरकार, पाकिस्तान सैन्य आणि आयएसआयची गरज भासणार आहे. त्यामुळेच भारताबरोबर कितीही  मैत्रीसंबंध असले तरीही तात्कालिक किंवा तात्पुरत्या फायद्यासाठी अमेरिकेच्या दृष्टीने पाकिस्तान अधिक महत्त्वाचे आहे. परिणामी, पाकपुरस्कृत दहशतवादाबाबत त्यांच्यावर अमेरिकेकडून कोणताही दबाव टाकला जाण्याची वा कारवाई होण्याची शक्यता नजिकच्या कालावधीत तरी दिसत नाही.

**<u>अमेरिका, रशिया, चीनला पाकिस्तान हा भारतापेक्षा जास्त महत्त्वाचा</u>**

दुसरीकडे रशिया हे चीनशी मैत्री करण्यात गुंतलेले आहे. चीनची आणि पाकिस्तानची मैत्री जगजाहीर आहे. चीन हा पाकिस्तानचा नेहमीच मित्र होता आणि पुढच्या पाच वर्षांत जगातील सर्वाधिक गुंतवणूक चीन पाकिस्तानात करणार आहे. पाकिस्तानने भारताला सतत उपद्रव करत राहावा, असे  चीनला नेहमी वाटते. भारताचे लक्ष स्वतःचे रक्षण करण्यामध्ये गुंतलेले राहील आणि त्यांना भारतीय उपखंडाच्या बाहेर यायला वेळच मिळणार नाही. त्यामुळे भारत चीनशी कधीही स्पर्धा करणार नाही, अशी यामागची चीनची व्यूहरचना आहे. एकूणच अमेरिका, रशिया आणि चीन या जगातील तीन महासत्तांना पाकिस्तान हा भारतापेक्षा जास्त महत्त्वाचा वाटत आहे. तसेच अफगाणीस्तानातील सरकारचीही अशी समजूत आहे की, त्या देशामध्ये शांतता निर्माण करण्यासाठी पाकिस्तान प्रचंड मदत करू शकतो. येणार्या काळात जगातील सर्व महाशक्तींना पाकिस्तानची गरज आहे, ही गोष्ट पाकिस्तानला माहित असल्यामुळे गेल्या काही महिन्यांपासून पाकिस्तानची भारताविरुद्धची दादागिरी वाढलेली आहे.

**<u>आंतरराष्ट्रीय सीमेवरून घुसखोरी</u>**

गेल्या काही महिन्यांपासून पाकिस्तानने भारताविरुद्ध चालवलेल्या दहशतवादामध्ये बराचसा फरक केलेला आहे. सुरुवातीला काश्मीर खोर्यात जास्त हिंसाचार व्हायचा. आता बदलत्या धोरणाप्रमाणे जम्मू, उधमपूर

यांसारख्या भागात पाकिस्तान अधिक हिंसाचार करत आहे. पाकिस्तान, भारत सीमेदरम्यानच्या एलओसी पासुन होणारी पाकिस्तानची घुसखोरी जवळजवळ बंद झालेली आहे. परंतु जम्मूपासून गुजरातपर्यंत भारत आणि पाकिस्तानच्या आंतरराष्ट्रीय सीमेवर भारतीय गृहमंत्रालयाचे सीमा सुरक्षा दलाचे जवान संरक्षणाचे काम करत आहेत. गेल्या काही महिन्यांत जम्मू-उधमपूर येथे झालेले सगळे हल्ले ज्या दहशतवाद्यांनी केले त्यांनी आंतरराष्ट्रीय सीमेवरून घुसखोरी केली होती. तसेच पंजबामध्ये झालेला हल्लासुद्धा जिथून घुसखोरी करणे सोपे असते, तिथून झाला होता. नव्वदच्या दशकात ज्या दहशतवादाचे कंबरडे मोडण्यात आले होते तो खलिस्तानी दहशतवाद पुन्हा एकदा जागृत करून भारताला त्रास देणे हा सुद्धा येत्या काळात पाकिस्तानचा प्रयत्न राहणार आहे.

उधमपूरमध्ये झालेल्या हल्ल्यामागे कोणता उद्देश होता हे अद्याप समोर आलेले नाही. आपल्या गुप्तहेर संस्थांनी अमरनाथ यात्रेवर अशा प्रकारचे दहशतवादी हल्ले होऊ शकतात, असा इशारा दिला होता. वास्तविक, अशा प्रकारचे इशारे गुप्तहेर संघटना नेहमीच देत असतात. पण त्यात नेमकेपणा नसतो. अलीकडचा हल्लासुद्धा अमरनाथ यात्रेवर झाला नसून सीमा सुरक्षा दलाच्या गाड्यांवर झालेला आहे. त्यामुळे गुप्तहेर संघटनांच्या अशा इशार्याची फारशी मदत मिळत नाही. गुप्तहेर संघटनांकडून नेमकी माहिती मिळाली तर होणारे हल्ले थांबवणे शक्य आहे.

**<u>भारताच्या परराष्ट्र धोरणावर उदारमतवादी, शांततावादी याचा फार मोठा पगडा</u>**

उधमपूर असो वा गुरुदासपूर; हे हल्ले म्हणजे पाकिस्तानच्या दादागिरीचे लक्षण आहेत. आतापर्यंत भारताच्या परराष्ट्र धोरणावर उदारमतवादी, शांततावादी याचा फार मोठा पगडा होता. माध्यमांद्वारे शांततावादी नेहमी सांगण्याचा प्रयत्न करत असतात की, पाकिस्तान हा फार चांगला देश

आहे. एखादा मोठा भाऊ ज्याप्रमाणे लहान खोडकर भावाचे शंभर गुन्हे माफ करून त्याच्याशी चांगले वागतो, तसेच आपण पाकिस्तानशी वागायला पाहिजे. पण ६७ वर्षांच्या भारत-पाकिस्तान संबंधातून आपल्याला कळून चुकते की, आतापर्यंतच्या सर्वच पंतप्रधानांनी पाकिस्तानशी मैत्री करण्याचा प्रयत्न केला, पण या सगळ्यांनाच अपयश आले. कारण भारताच्या मित्रत्वाची पाकिस्तानला मुळीच गरजच नाही आणि पाकिस्तानचे अस्तित्वच मुळी भारतद्वेषावर अवलंबून आहे. गेल्या काही वर्षांमध्ये पाकिस्तानमध्येसुद्धा सध्या दहशतवाद मोठ्या प्रमाणावर पसरलेला आहे. पाकिस्तानातील सिंध आणि बलुचिस्तान प्रांतात अलगतावादी चळवळ जोर पकडत आहे. कराचीच्या भागात एमक्युएमचा प्रभाव वाढत आहे. वझिरिस्तान आणि फ़ाटा या भागात पाकिस्तानी तालिबान हे पाकिस्तानी सैन्यावर मोठ्या प्रमाणात हल्ले करत आहेत. त्यामुळे पाकिस्तानातील अंतर्गत दहशतवादाचा विस्तार हा भारतात सुरू असलेल्या दहशतवादाच्या तुलनेत दहा पटीने जास्त आहे. पण पाकिस्तान आतून पोखरला गेलेला आहे, त्यावेळी भारतात दहशतवादी कारवाया करून पाकिस्तानी जनतेचे लक्ष त्याकडे वळवून अंतर्गत दहशतवादावरून त्यांचे लक्ष दूर करण्याचा पाकिस्तानचा प्रयत्न आहे. थोडक्यात आपल्या देशाचे अस्तित्व टिकण्यासाठी पाकिस्तान भारतावरती येणार्या काळामध्ये अशा प्रकारचे दहशतवादी हल्ले करतच राहील.

त्यातच अफगाणिस्तानातील बदलत चाललेली स्थिती ही आपल्यासाठी काळजीचे कारण ठरणार आहे. कारण अमेरिकन सैन्य अफगाणिस्तानातून पूर्णपणे जाईल तेव्हा ५० टक्के अफगाणिस्तान भागात तालिबान्यांचे म्हणजेच पाकिस्तानचे वर्चस्व राहील. त्यामुळे सध्या अमेरिकी सैन्याविरुद्ध लढण्यात गुंतलेले हजारो तालिबानी, अल-कायद्याचे दहशतवादी किंवा इसिसचे दहशतवादी यांना मोकळे रान मिळेल आणि

पाकिस्तान त्यांना भारतीय सीमेमध्ये घुसवण्याचा प्रयत्न करेल.  त्यामुळे येणार्या काळात भारतात दहशतवाद वाढण्याची शक्यता आहे.

**<u>पाकिस्तानशी चर्चा करावी की नाही?</u>**

अलीकडेच पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि पाकिस्तानचे पंतप्रधान नवाझ शरीफ यांची भेट झाली होती. या वाढत्या हल्ल्यांच्या पार्श्वभूमीवर भारत सरकारने पाकिस्तानशी शांतता चर्चा सुरू ठेवली पाहिजे का, असा एक प्रश्न उपस्थित होतो. याचे सरळ आणि स्वच्छ उत्तर म्हणजे, सध्या पाकिस्तानशी चर्चा करण्यात काही अर्थ नाही. दुर्दैवाने आपल्याला अमेरिकेच्या आणि आंतरराष्ट्रीय दबावामुळे पाकिस्तानशी चर्चा करण्यासाठी भाग पाडले जाते. परंतु यातून काहीही साध्य होणार नाही. उलट आता अमेरिका आणि इतर राष्ट्रांना सांगण्याची वेळ आलेली आहे की, तुमच्यामुळे आम्ही पाकिस्तानशी चर्चा करत आहोत, पण त्यामुळे पाकिस्तानद्वारे भारतावर होणारे दहशतवादी हल्ले अधिक वाढले आहेत. यासाठी तुम्ही जबाबदार आहात. तुम्ही  पाकिस्तानला नियंत्रित करू शकत नसाल तर ही चूक तुमची आहे. यामुळे भारतीयांचा व्यर्थ बळी चालला आहे. या राष्ट्रांनी पाकिस्तानातील दहशतवादाचे कारखाने बंद करण्याचा प्रयत्न करावा याबाबत आपण आग्रही भूमिका मांडली आहे. अर्थातच, अमेरिका, रशिया, चीन हे आपल्याला तोंडदेखली आश्वासने जरूर देतील. पण प्रत्यक्षात पाकिस्तानला नियंत्रित करणे, हे यापैकी कुठल्याही राष्ट्राला जमणार नाही. मात्र तरीही भारताने प्रयत्न करणे थांबवता कामा नये. उधमपूरमधील हल्ल्यामध्ये पकडण्यात आलेल्या अतिरेक्याचा वापर आंतरराष्ट्रीय मतपरिवर्तन करण्याकरिता करायला पाहिजे. त्याच्याकडून मिळालेली सर्व माहिती आणि त्याचा पाकिस्तानशी असलेला संबंध आपण सर्व माध्यमांच्याद्वारे मांडला पाहिजे.

दुसरीकडे, तुमच्या देशातील ४० ते ५० दहशतवादी प्रशिक्षण छावण्या बंद झाल्या तरच आम्ही चर्चा करू, असे पाकिस्तानला ठणकावून सांगितले

पाहिजे. सध्या भारत-पाकिस्तान सीमेजवळ जवळपास दोन हजार दहशतवादी भारतात घुसखोरी करण्याकरता पाकिस्तानने तैनात ठेवलेले आहेत. तसेच भारतात पाकिस्तानने २०० ते २५० छुपे दहशतवादी सेल तयार केले आहे. त्यामुळे  भारताविरुद्ध होणारे दहशतवादी हल्ले  थांबले नाहीत तर आम्हीसुद्धा  प्रतिउत्तर देऊ, याची जबाबदारी सगळ्या जगावर पडेल, असा सज्जड इशारा पाकिस्तान आणि जगातील इतर देशांना भारताने देण्याची वेळ आता आलेली आहे.

**देशाची मानिसकता बदलण्याची गरज**

पाकिस्तान पुरस्कृत दहशतवाद हा अनेक वर्षे चालणार आहे. त्यासाठी आपण  देशाची मानसिकता तयार करायला पाहिजे. भारत सरकारने सर्व राजकीय पक्षांना विश्वासात घेऊन पाकिस्तानशी आपण कसे वागावे, यासंबंधी केलेले नियोजन सगळ्या पक्षांसमोर मांडले पाहिजे. तसेच सर्व राष्ट्रीय पक्षांना शत्रुविरुद्ध लढताना देशाने एक होऊन लढण्याचे आवाहन केले पाहिजे. उधमपूरच्या प्रकरणात भारतातील काही शूर नागरिकांनी आपल्या जीवाची पर्वा न करता एका दहशतवाद्याला पकडून दिले. अशा नागरिकांचे आपण नक्कीच कौतुक केले पाहिजे. यामुळे पूर्ण देशाला धडा मिळतो. सामान्य नागरिकांनी आपले डोळे आणि कान उघडे ठेवले आणि देशभक्तीची भावना जोपासली तर निशस्त्रधारी भारतीय नागरिकसुद्धा शस्त्रधारी दहशतवाद्यांशी लढू शकतात आणि ही लढाई जिंकू शकतात. यासाठी सगळ्याच भारतीय नागरिकांनी सुरक्षा दलांना मदत केली पाहिजे. पण दुर्दैवाने देशभक्त नागरिक पाकिस्तानी दहशतवाद्यांना पकडत होते,त्याचवेळी आपले राजकीय पक्ष एकमेकांशी भाडण्यात गुंतलेले होते. भारतीय नागरिकांनी राजकीय पक्षांना एक इशारा देण्याची गरज आहे की, तुम्ही जर देशाच्या सुरक्षेला धोका निर्माण कर असाल तर तुमची राजकीय नीती आम्हाला मान्य नाही. आमच्या मतदानाचा वापर करून पुढच्या निवडणुकीत आम्ही तुम्हाला पायउतार करू. दहशतवाद आणि

सुरक्षिततेच्या कुठल्याही मुद्यावर कुठल्याही प्रकारचे राजकारण होता कामा नये. थोडक्यात दहशतवादाचा सामना करण्याकरता संपूर्ण भारताने एकत्र येणे गरजेचे आहे. त्यासाठी आपल्या सीमा अधिक सुरक्षित करणे गरजेचे आहे. भारतात घुसलेल्या दहशतवाद्यांना शोधून त्यांच्याविरुद्ध कारवाया देखील कराव्या लागतील. दहशतवादाची मुळे पाकिस्तान, बांगलादेश, चीन या देशांमध्ये असल्यामुळे आपल्याला कोव्हर्ट ऑपरेशनचा वापर करून ही मुळे कापावी लागतील. तरच भारतासमोर असलेला हा दहशतवाद थांबू शकतो.

**२२ मार्च २०१४अफगाणिस्तानमधील सत्ताबदल भारताला घातक**

भारत आणि अफगाणिस्तान यांच्यातील मैत्रीचे पर्व गेल्या काही वर्षांपासून सुरू आहे. अफगाणिस्तानातील पायाभूत सुविधांच्या क्षेत्रामध्ये भारताने मोठे योगदान दिले आहे. परंतु अलीकडेच अफगाणिस्तानमध्ये निवडणुका होऊन तेथे सत्ताबदल झाला असून अश्रफ गनी हे नवे अध्यक्ष बनले आहेत. अध्यक्षपदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर त्यांनी भारताकडे दुर्लक्ष करत पाकिस्तानशी जवळीक साधली आहे. याचबरोबर अफगाणिस्तानातील तालीबान्यांना सत्तेत सहभागी करून घेण्याच्या हालचालीही सध्या सुरू आहेत. डिसेंबर २०१५ मध्ये अमेरिकेचे सैन्य अफगाणिस्तानातून माघारी जाणार आहे. सध्याच्या घडामोडी पाहता डिसेंबरनंतर अराजकसदृश परिस्थिती उद्‌भवण्याची शक्यता आहे. त्यातून भारतात विशेषतः काश्मीर भागात दहशतवादाचा उद्रेक वाढण्याची भीती आहे.

अफगाणिस्तानमध्ये सध्या ज्या घडामोडी घडत आहेत त्या भारताच्या दृष्टीने अतिशय धोकादायक आहेत. काही महिन्यांपूर्वीच अफगाणिस्तामध्ये सत्तांतर झाले. पूर्वीचे अध्यक्ष हमिद करझाई यांचा पराभव झाला आणि नवीन अध्यक्ष अश्रफ गनी हे सत्तेवर आले. हे सत्तापरिवर्तन होईपर्यंत करझाईंना भारताचे मित्र मानले जायचे. अफगाणिस्तानच्या सैन्याला आणि त्यांच्या अधिकार्यांना भारतातल्या

सैनिकी शाळेमध्ये प्रशिक्षण देण्यात येत होते.  याशिवाय अफगाणिस्तानमध्ये रस्ते बनवणे आणि इतर पायाभूत सुविधा पुरवण्याकरिता भारताने मोठ्या प्रमाणात मदत केलेली होती.
मे २०१२ मध्ये नाटो (NATO) च्या शिखर परिषदेत अफगाणिस्तानमधून नाटो तसेच अमेरिकन सैन्य माघारी घेण्याबाबत निर्णय झाला. त्याच महिन्यात अमेरिका आणि अफगाणिस्तानदरम्यान एक सामरिक पातळीवर सहकार्य करण्याबाबत करार झाला. नाटो तसेच अमेरिकन सैन्य आता टप्प्याटप्प्याने परत घेतले जाईल आणि डिसेंबर २०१५ पर्यंत सर्व सैन्य काढून घेतले जाईल व अफगाणिस्तानच्या लष्कराकडे स्थानिक सुरक्षिततेचे कार्य सोपविले जाईल असे ठरवण्यात आले. त्यामुळे डिसेंबर २०१५ नंतरचा अफगाणिस्तान हा एक गुंतागुंतीचा प्रश्न बनणार आहे.

**पाकिस्तान हा आमचा सर्वांत जुना मित्र**

अफगाणिस्तानचे अध्यक्ष अश्रफ गनी यांनी पहिल्या भाषणामध्ये पाकिस्तान हा आमचा सर्वांत जुना मित्र आहे, असे म्हटले होते. त्यांच्या भाषणामध्ये भारताचा उल्लेख देखील केला नव्हता. यानंतर त्यांनी लगेच पाकिस्तानला भेट देऊन नवाझ शरीफ यांच्याशी चर्चा करून पाकिस्तानशी जवळीक करण्याचा प्रयत्न केला. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे अफगाणिस्तानने आता सैन्याचे प्रशिक्षण पाकिस्तानच्या सैनिकी शाळेत करण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे पूर्वी भारतप्रेमी असलेले अफगाणिस्तानचे सैनिक आता भारताविरोधात जाणार आहेत. याशिवाय त्यांनी पाकिस्तानचे सैनिक प्रमुख जनरल शरीफ यांचीही भेट घेऊन पाकिस्तानचे सैन्य आणि अफगाणिस्तानचे सैन्य यांच्यामध्ये सहकार्य वाढवण्याचे ठरवलेले आहे. यापूर्वी अफगाणिस्तानच्या सरकार विरोधात असणार्या अफगाणि तालिबानला पाकिस्तानचे सैन्य आणि आयएसआयकडून मदत केली जाते अशी तक्रार  अफगाणिस्तानचे सरकार आणि तेथील गुप्तचर यंत्रणांकडून केली जात होती. पण आता अशी

तक्रार करणे बंद झाले आहे आणि उलट त्यांनी पाकिस्तान सैन्याशी सहकार्य करण्याचे ठरवले आहे.

**<u>पाकिस्तानी तालिबान विरुद्ध लष्करी कारवाई</u>**

आजवर अफगाणिस्तानचे सैन्य हे दोन महत्त्वाच्या कामासाठी वापरले जायचे. एक म्हणजे पाकिस्तानी तालिबान आणि अल् कायदा यांच्यापासून  अफगाणिस्तानची सुरक्षा करणे आणि दुसरे अल् कायदा आणि अफगाणि तालिबान विरुद्ध सैनिकी कारवाई करणे. आता मात्र तालिबानच्या विरुद्धची सैनिकी कारवाई  पूर्णपणे थांबवण्यात आलेली आहे. पाकिस्तानला मदत व्हावी म्हणून त्या सरकारच्या विरोधात असलेल्या तालिबान्यांविरुद्धची कारवाई मात्र अफगाणी सैन्यांनी सुरू ठेवलेली आहे. याद्वारे अफगाणिस्तान हे पाकिस्तानला मोठी मदत करत आहे. पण त्यामुळे त्यांच्याच देशात आता हिंसाचार वाढणार आहे. मात्र त्यांना याची फारशी काळजी वाटत नाही. याचे प्रमुख कारण आजवर शत्रू असणार्या अफगाणि तालिबान्यांना मित्र बनवण्याची योजना नव्या अध्यक्षांनी आखली आहे. यासाठी त्यांनी पाकिस्तानची मदत घेण्याचे ठरवले आहे. या तालिबान्यांना अफगाणिस्तानच्या सरकारमध्ये आणि सत्तेमध्ये सामिल करुन घ्यायचे आहे. याकरिता ते पाकिस्तानला फार मोठ्या प्रमाणात मदत करत आहेत.

**<u>चीन अफगाणिस्तानमध्ये प्रभाव वाढवत आहे</u>**

अजून एक महत्त्वाची घटना म्हणजे चीनसुद्धा अफगाणिस्तानमध्ये आपला प्रभाव वाढवण्याचा प्रयत्न करत आहे. त्यामध्ये अफगाणिस्तानमध्ये असलेले तेल आणि धातूंच्या खाणी विकत घेण्याचा प्रयत्न करत आहे. याकरिता त्यांना पाकिस्तानच्या अधिपत्याखाली असलेल्या अफगाणिस्तानचा फायदा होईल आणि त्यामुळे तिथे काम करणार्या चीनी कामगारांना संरक्षण मिळेल. अर्थातच हे भारताकरिता धोक्याचे आहे. अमेरिकाही अफगाणि तालिबानच्या विरुद्ध  करार करून

त्यांना सत्तेमध्ये आणण्याच्या प्रयत्नाला पाठबळ देत आहे. कारण त्यांना तेथून लवकरात लवकर आपले सैन्य माघारी न्यायचे आहे.

**<u>अफगाणि सैन्य पाकिस्तानचे रक्षण करू शकेल का?</u>**

सध्या अफगाणि सैन्याची संख्या ही एक लाख ७० हजार आहे. हे सैन्य आता अमेरिकन सैन्याला तेथून बाहेर काढण्याकरिता मदत करत आहे. पण यामुळे मारल्या जाणार्या अफगाणि सैनिकांची संख्या ही प्रत्येक वर्षी २५०० ते ३००० आहे. प्रश्न असा निर्माण होतो की जर एवढ्या मोठ्या प्रमाणात अफगाणि सैनिक मारत असतील तर अफगाणि तालिबानी आणि इतर दहशतवाद्यांशी ते किती काळ लढू शकतील? काही वर्षांपूर्वी तालिबानने अफगाणिस्तानमध्ये पूर्ण सत्ता मिळवली होती त्यावेळेला लाखो अफगाण सैनिक न लढताच पळून गेले होते. तशाच प्रकारचा धोका सध्या अफगाणिस्तानमध्ये वाढतो आहे.

**<u>भारतावर काय परिणाम होणार?</u>**

सामरिकदृष्ट्या विचार केला तर अफगाणिस्तानमध्ये भारताचे अनेक हितसंबंध आहेत. यामध्ये प्रामुख्याने दहशतवादाचा प्रश्न आहे. दहशतवाद्यांना प्रशिक्षण देण्यासाठी किंवा तेथे आश्रय घेण्यासाठी अफगाणिस्तानचा वापर केला जात आहे आणि तो थांबवण्याची गरज आहे. आजवर भारताने अफगाणिस्तानला केलेल्या सहकार्याचे मोजमाप हे त्या राष्ट्राने भारतविरोधी दहशतवादी संघटनांना आश्रय मिळणार नाही हे साध्य करण्यात राहील. त्यासाठी दोन्ही देशांना गुप्त माहिती आदानप्रदान करावी लागेल. तसेच एक शेजारी राष्ट्र म्हणून अफगाणिस्तानला मदत करणे, तिथे स्थैर्य नांदेल, विकास होईल हे पाहणे आणि त्यातून मैत्रीचे संबंध निर्माण करणे अशी भूमिका भारताने घेण्याची आवश्यकता आहे.

अफगाणिस्तानचा वापर हा मध्य आशियाई राष्ट्रांशी संपर्क साधण्यासाठीचा आहे. त्यामुळे अफगाणिस्तानचे सार्वभौमत्व व राष्ट्रीय

एकात्मता राखण्यासाठी तसेच इतर आशियाई राष्ट्रांनी अफगाणिस्तानला साथ देण्यासाठी भारताला प्रयत्न करावे लागतील. आजपर्यंत भारताने अफगाणिस्तानला जी मदत केली ती मुख्यत: तेथील मुलभूत साधनसुविधा सुधारण्यासाठी. त्याचबरोबर लष्करी व पोलिसी क्षेत्रातही महत्त्वाची मदत केली आहे. ही मदत साधनसामग्री तसेच प्रशिक्षणाच्या संदर्भात केली जात आहे. अफगाणिस्तानमधून बाहेर पडणारे दहशतवादी हे पाकिस्तानमार्गे भारतात येतात, हे आता उघड सत्य आहे. त्याचे पडसाद काश्मीरमध्ये दिसतात. म्हणूनच भारताला अफगाणिस्तानमधील राजकीय व्यवस्थेत तालिबानचा प्रभाव कमी करण्याचा प्रयत्न करावा लागेल.

भारताने मोठ्या प्रमाणात अफगाणिस्तानमध्ये पैसा गुंतवलेला आहे. पण आता त्याचा फारसा उपयोग होणार नाही. उलट जे भारतीय अफगाणिस्तानमध्ये काम करत आहेत त्यांची सुरक्षाही आता धोक्यात येऊ लागली आहे. अफगाणिस्तानातील भारतीय वकिलातीवर अफगाण तालिबानने पाकिस्तानच्या मदतीने आतापर्यंत अनेक वेळा हल्ले केलेले आहेत. यातील एका हल्ल्यामध्ये भारताचे ब्रिगेडियर शर्मा मारले गेलेले होते. अफगाणिस्तानात तालिबान सत्तेमध्ये आल्यास तेथील मोठा भाग हा पाकिस्तानच्या दबावाखाली येईल. तसेच अफगाणि तालिबानचे आणि अल् कायदाचे हजारो दहशतवादी मोकाट सुटतील आणि त्यामुळे भारताला धोका संभावतो. कारण या दहशतवाद्यांना काश्मिर किंवा इतर भागामध्ये घुसवण्याचा प्रयत्न पाकिस्तानकडून केला जाण्याची शक्यता आहे. परिणामी, भारतात येणार्या काळामध्ये दहशतवाद वाढू शकतो.

**<u>काश्मिरमध्ये परदेशी दहशतवादी वाढणार ?</u>**

सध्या काश्मिरमध्ये जे २५० ते ३०० दहशतवादी काम करत आहेत त्यामध्ये काश्मिरी दहशतवाद्यांचे प्रमाण फारच कमी झालेले आहे. तेथे अफगाणि आणि पाकिस्तानी व इतर परदेशातून आलेले दहशतवादी

अधिक आहेत. म्हणूनच येणार्या काळामध्ये भारताला अल् कायदा, तालिबानी, पाकिस्तानी केंद्रीत दहशतवादी गट, लष्करे तोयबा किंवा जैश ए महमंद यांसारख्या अतिरेकी संघटनांकडून मोठ्या प्रमाणात धोका निर्माण होणार आहे. या पाश्र्वभूमीवर ल्कायदा आणि तालिबानी दहशतवाद्यांचा पूर्णपणे नायनाट होत नाही तोपर्यंत सैन्य माघारी घेऊ नका, अशी आग्रही मागणी भारताने अमेरिकेकडे केली पाहिजे. याशिवाय अफगाणिस्तानमध्ये असलेल्या आपल्या गुप्तहेर यंत्रणा सक्षम करुन तेथील परिस्थितीवर नजर ठेवण्याची गरज आहे.

**अफगाणिस्तानवर लक्ष ठेवा**

अफगाणिस्तानमध्ये आल्यानंतर अमेरिकन सैन्याचे मुख्य ध्येय तिथे असलेले तालिबानी, अल् कायदा आणि इतर आंतरराष्ट्रीय दहशतवाद्यांचा पूर्ण नाश करणे  आणि जगाला दहशतवाद्यापासून मुक्त करणे हे होते; पण यातील कोणतेही ध्येय अमेरिकन सैन्याला पूर्ण करता आले नाही. उलट आता अफगाणिस्तानमध्ये घुसलेल्या शस्त्रधारी तालिबानी, अल्कायदा आणि इतर दहशतवाद्यांची संख्या वाढलेली आहे. त्यांची शस्त्रसिद्धता किंवा त्यांची लढण्याची क्षमता हीदेखील वाढलेली आहे. या पाश्र्वभूमीवर अल्कायदा आणि इतर दहशतवादी संघटनांविरुद्ध अमेरिका, इस्त्रायल आणि इतर राष्ट्रांंनी चालवलेल्या कारवाईमध्ये भारताने सहभागी होणे आवश्यक आहे.

**२३ ऑगस्ट २०१५युएई दौर्याचे दहशतवादाविरुद्ध एकमेकांना मदत**

भारत आणि युएईमध्ये झालेल्या करारामध्ये दहशतवादाविरुद्ध दोन्हीही देश एकमेकांना मदत करतील, असे ठरवण्यात आले आहे.  अर्थातच हा इशारा पाकिस्तानविरुद्ध होता. म्हणजे युएईने आता आपले केवळ पाकिस्तानच्या बाजूने चाललेले धोरण बदलून आता भारतालाही महत्त्व द्यायला सुरुवात केलेली आहे. सुरक्षेच्या विविध पैलूंमध्ये दोन्ही देश

एकमेकांना मदत करणार आहेत. दोन्ही देशांनी दिलेल्या संयुक्त निवेदनानुसार, कुठल्याही देशाने धर्माचा उपयोग दहशतवादाकरिता करू नये. कुठलाही देश आपल्या भूमिवर दहशतवाद्यांना प्रशिक्षण देण्याकरिता प्रशिक्षण केंद्रे ठेऊ शकत नाही. कोणाही देशाचे नागरिक दुसर्या देशाविरुद्ध दहशतवाद पसरवू शकत नाहीत. अर्थातच या सगळ्यांचा रोख पाकिस्तानमध्ये असलेल्या दहशतवादी ट्रेनिंग कॅम्पस् आणि पाकिस्तानच्या भारताविरुद्धच्या दहशतवादी कारवायांकडे होता.

एक काळ असा होता की हा देश केवळ पाकिस्तानच्या बाजूने होता. पण आता केवळ पाकिस्तानच्या बाजूने राहून चालणार नाही, हे त्यांना कळून चुकले आहे. याचे कारण काही वर्षांपासून मध्य पूर्व देशांमध्ये लिबिया, सिरिया, इराक या मुस्लिम देशातच गृहयुद्ध सुरू आहे. याशिवाय शिया विरुद्ध सुन्नी हा वादही आता हिंसक झालेला आहे. इराण हा शिया देश आहे. या देशावर लागलेले आर्थिक निर्बंध काढल्यामुळे हा शियाबहुल देश त्यांच्या विरुद्ध कारवाई करेल, अशी भीती या देशांना वाटते आहे. याशिवाय इसिसचा उदय सिरीया आणि इराकमध्ये होतो आहे. त्यामुळे हा देश आणि इतर अरब देश घाबरलेले आहेत.अशा बदलणार्या राजकीय आणि सामरिक परिस्थितीमध्ये त्यांना भारतासारख्या इतर देशांची आता गरज आहे.

भारताला हवा असलेला दाऊद इब्राहिम आणि मुंबईच्या अंडरवल्डमधील अनेक कुख्यात गुंड यूएईतूनच सक्रिय होते. त्यामुळे या देशाबरोबरील संबंध अधिक दृढ होण्याची गरज आहे. मोदी यांच्या  दौर्यात त्यासाठीचा प्रयत्न झाला असून, यूएईचे युवराज शेख महंमद बिन झायेद अल नहायन यांच्याबरोबर त्यांनी दहशतवादाच्या विरोधात लढण्याबाबत केलेले निवेदन या अर्थाने महत्त्वाचे आहे. या निवेदनाने थेट पाकिस्तानला संदेश दिला गेला आहे. दहशतवाद, मूलतत्त्ववाद आणि संघटित गुन्हेगारी यांच्या विरोधात लढण्यासाठी भारताला मदत करण्याचे आश्वासन यूएईने दिले

आहे. त्यानुसार कृती झाल्यास दाऊद किंवा लष्करे तैयबा आणि अन्य दहशतवादी संघटनांना भारताच्या विरोधात कारवाया करण्यासाठी यूएईची भूमी वापरता येणार नाही. तसेच कट्टरपंथियांना मिळत असलेली मदत, त्यांना होत असलेला वित्तपुरवठा, त्यांच्या कारवाया यांबाबतची माहिती यामुळे उपलब्ध होऊ शकेल. या करारातून यूएईने पाकिस्तानला मोठाच धक्का दिला आहे.

**दहशतवादाविरुद्धच्या निवेदनाबाबत यूएई किती प्रामाणिक राहणार ?**

दोन्ही देशांनी अनेक महत्वाचे करार केलेले आहेत. हजारो लाखो कोटींची गुंतवणूक भारतामध्ये होण्याची शक्यता आहे. उद्योगांना जमिनी मिळण्यापासून ना-हरकत प्रमाणपत्र मिळेपर्यंत अनेक अडचणींमुळे गुंतवणुकीचे प्रमाण कमी होत आहे. ही स्थिती बदलण्यात मोदींना यश आले तरच गुंतवणुकीचे चित्र बदलेल. ज्यामुळे आपल्या आर्थिक प्रगतीला वाढ होण्याकरिता नक्कीच मदत मिळेल. तसेच या दौर्यात दहशतवादाला थारा न देण्याचे ठरलेले आहे आणि सुरक्षा संबंध सुद्धा मजबूत होणार आहे. मात्र या सगळ्या झालेल्या करारांवर अमलबजावणी करणे गरजेचे आहे. युएई आणि भारत यांच्यांत झालेल्या अनेक सुरक्षा करारामुळे मुस्लिम बहुल अरब राष्ट्रांमध्ये भारताचे महत्त्व वाढेल. मोदी यांनी सौदी अरेबिया आणि संयुक्त अरब अमिराती (यूएई) या देशांचा नुकताच केलेला दौरा पश्चिम आशियाच्या धोरणांसाठी महत्त्वाचा होता. अर्थात, दहशतवादाविरुद्धच्या निवेदनाबाबत यूएई किती प्रामाणिक राहणार यावरच त्याचे यश अवलंबून आहे. तरीही या भेटीकडे एक ऐतिहासिक भेट म्हणून बघितले पाहिजे. कारण यामुळे भारत आणि अरब राष्ट्रांचे संबंध चांगले होण्याकरिता अधिक मदत मिळणार आहे. एकंदर मुत्सद्देगिरी आणि अर्थकारण या दोन्ही आघाड्यांवर मोदींचा हा दौरा फलदायी ठरला आहे.

**१ फेब्रुवारी २०१५-दहशतवादाचे बदलते स्वरुप आणि भारत अमेरिका**

**संबंध**

अलीकडील काळात दहशतवादाचे स्वरुप कमालीचे बदलले आहे. तंत्रज्ञानाचा आधार घेत दहशतवादाचे जाळे विस्तारत आहे. तसेच एकट्याने दहशतवादी कृत्ये करण्याचा नवा प्रकार उदयास येत आहे. या प्रकारच्या दहशतवादाचा सामना करणे हे कठीण असते. त्यामुळे अशा दहशतवाद्यांच्या कारवायांचा पूर्ववेध घेणे आवश्यक असते. यासाठी आपल्याला तंत्रज्ञानाची आणि प्रगत गुप्तचर माहितीची मोठी मदत होऊ शकते. अमेरिकेकडे अशा प्रकारचे तंत्रज्ञान आहे. तसेच त्यांची गुप्तचर यंत्रणाही अत्याधुनिक आहे. बराक ओबामा यांच्या  दौर्यादरम्यान अमेरिकेकडून भारताला याबाबतचे सहकार्य करण्यासंदर्भात महत्त्वाच्या घडामोडी झाल्या. त्यांचा फायदा आगामी काळात भारताला होणार आहे.

**सोशल मीडियाच्या माध्यमातून सुशिक्षित तरुणांना भडकावणे**

सध्याच्या काळात दहशतवादाचे स्वरुप बदलत चालले आहे. आजवर दहशतवादी बनणार्यामध्ये वा दहशतवादी संघटनांमध्ये प्रामुख्याने दारिद्य्र, निरक्षरता, बेरोजगारी या समस्यांनी ग्रासलेल्या तरुणांचा समावेश होत होता. पण गेल्या काही महिन्यांमध्ये पकडल्या गेलेल्या दहशतवाद्यांकडे पाहिल्यावर असे लक्षात येते की, हे तरुण साक्षरच नव्हे तर सुशिक्षित आहेत, तंत्रज्ञानवर त्यांची पकड आहे, चांगल्या पदांवर नोकरी करत आहेत, तसेच त्यांची मिळकतही चांगली आहे; पण असे असूनही  ते दहशतवादाकडे वळत असतील, तर ते नक्कीच धोकादायक आहे. यामागचे एक कारण म्हणजे तंत्रज्ञानाचा गैरवापर करून  सोशल मीडियाच्या माध्यमातून या सुशिक्षित तरुणांना भडकावले जात आहे. धर्माच्या नावावर त्यांच्यात विद्वेष पसरवला जात आहे.

याचबरोबर दहशतवादाचा आणखी एक प्रकार पाहायला मिळत आहे, तो म्हणजे एकलकोंडे किंवा एकटे काम करणारे दहशतवादी अथवा दहशतवादी संघटनांशी संबंध नसणारे दहशतवादी. इंटरनेटवर किंवा

वृत्तपत्रात आलेल्या बातम्यांना बळी पडून काही तरुण अशा प्रकारचे एकटे जिहादी दहशतवादी बनलेले दिसतात. कोणत्याही संघटनेमध्ये सामील व्हायचे नाही, एकट्यानेच काम करायचे आणि एकट्यानेच समाजाचा बदला घेण्याचा प्रयत्न करायचा अशी यांची कार्यपद्धती असल्याचे दिसून येते. अशा प्रकारच्या दहशतवाद्यांना पकडणे हे कठीण काम असते. एखाद्या दहशतवादी हल्ल्यामध्ये अधिक जण सामील असतील तर त्यांना पकडणे वा त्यांचा शोध घेणे सोपे जाते. याचे कारण यापैकी एक दहशतवादी जरी पकडला गेला की इतरांबाबतची माहिती काढून घेता येते. पण दहशतवादी एकटाच असेल तर अर्थातच त्याला पकडल्याशिवाय नेमके काय झाले, का हल्ला केला, काय मागण्या आहेत याबाबतचा पत्ता लागत नाही. म्हणून अशा प्रकारच्या दहशतवाद्यांना पकडण्यासाठी वेगवेगळ्या प्रकारची गुप्तचर माहिती मिळणे आवश्यक असते. ह्यूमन इंटिलिजन्स व तंत्रज्ञानाच्या मदतीने हे दहशतवादी काय करतात यावर लक्ष ठेवणे आवश्यक आहे.

**<u>फ्रिलान्स जिहादी अथवा एकटे दहशतवादी</u>**

अशा प्रकारचे दहशतवादी इंटरनेट अथवा वर्तमानपत्र, मासिके यांच्या माध्यमातून जिहादाविषयीची माहिती मिळवतात. त्यानंतर त्यांचे मतपरिवर्तन होते. मग एखादा दहशतवादाचा पुरस्कर्ता अथवा गुरु अशा प्रकारे मतपरिवर्तन झालेल्या युवकांशी संपर्क साधून त्यांना आणखी प्रोत्साहित करण्याचा वा चिथावणी देण्याचा प्रयत्न करतो. यानंतर अशा तरुणांना दहशतवादी प्रशिक्षण शिबिरांमध्ये पाठवले जाते. तेथे त्यांना शस्त्रास्त्रांबाबत, हल्ल्यांबाबत अथवा प्रत्यक्ष दहशतवादी कारवायांबाबत प्रशिक्षण दिले जाते. असे प्रशिक्षण कॅम्प भारत, पाकिस्तान, अफगाणिस्तान किंवा इतर देशांमध्ये असू शकतात. यामध्ये सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे हा एकटाच दहशतवादी बॉम्बस्फोट कधी आणि केव्हा करायचे हे ठरवतो.

यापूर्वी बॉम्बस्फोट किंवा दहशतवादी हल्ला होण्यापूर्वी दहशतवाद्यांना पाकिस्तानची गुप्तहेर संघटना आयएसआयकडून टार्गेट सांगितले जात होते आणि तेथेच हल्ले केले जात असत. पण या एकट्या दहशतवाद्यांवर असे कोणतेही बंधन नसते.हल्ला कधी करायचा हे सर्वस्वी त्यांच्या मर्जीवर अवलंबून असते. अशा एकट्या दहशतवाद्यांच्या नेटवर्कमध्ये शिरणेही अतिशय अवघड असते. त्यामुळेच त्यांचा धोका अधिक असूनही त्यांना पकडणे कठीण होऊन बसते. अशा दहशतवाद्यांना कसे पकडायचे हे सध्याच्या काळात मोठे आव्हान ठरत आहे. अशा प्रकारच्या दहशतवाद्यांची काही उदाहरणे सध्या समोर आहेत. त्यापैकी एक म्हणजे मेहेंदी मसरुल विश्वास हा  इसिस या संघटनेसाठी ट्विटर अकौंट हाताळण्याचे काम करत होता; परंतु त्याचा इतर कोणाशीही संबंध नव्हता. तो एकांडा शिलेदार होता. त्याचप्रमाणे अलीकडेच पोलिसांनी हैद्राबादमधून इसिसमध्ये सामील होण्यासाठी जाणार्या शोहीब अहमद खान आणि शहा मुझफ्फर यांना पकडले. हेदेखील एकटेच काम करत होते.

**<u>एकट्याने काम करणार्या दहशतवाद्यांवर कसे लक्ष ठेवायचे ?</u>**

यासाठी गरज आहे ती बहुआयामी नियोजनाची. यानुसार अनेक गोष्टींवर आपल्याला लक्ष ठेवावे लागेल. कारण अशा प्रकारचे युवक आणि त्यांची व्याप्ती मोठ्या प्रमाणात आहे. यामध्ये आपल्याला दहशतवादी युवकांच्या कुटुंबियांचा, समाजसेवी संस्थांचा, सुरक्षा यंत्रणांचा आणि समाजातील अभ्यासकांचा-विचारवंतांचा आधार घ्यावा लागेल.  आपल्याला विकसित, अत्याधुनिक आणि अद्ययावत तंत्रज्ञानाचीही गरज भासणार आहे. आज जगभरातील काही देशांकडे यासाठी उपयोगी ठरू शकेल अशा प्रकारचे तंत्रज्ञान उपलब्ध आहे. त्यानुसार आपण पकडू न शकलेल्या एखाद्या दहशतवाद्याचा फोटो उपलब्ध असेल, तर त्या फोटोच्या मदतीने हा दहशतवादी आत्ता कुठे आहे हे शोधता येते. यासाठी हा फोटो संगणकावर घेऊन, सीसी टीव्हीच्या कॅमेर्याद्वारे दिसणार्या फुटेजमधून  त्याचा शोध

घेता येतो. सॉफ्टवेअर सदर फोटोच्या चेहर्याशी मिळतीजुळती व्यक्ती अचूकपणाने सीसीटीव्हीच्या फुटेजमधून हेरते. अशा प्रकारचे तंत्रज्ञान अमेरिका आणि युरोपिय देशांकडे उपलब्ध आहे.

**<u>सॉफ्टवेअरच्या मदतीने दहशतवादी पकडा</u>**

अशा सॉफ़्टवेअरमध्ये आपल्या तपास यंत्रणांच्या यादीतील दहशतवादी, तसेच दहशतवाद्यांना मदत करणार्या व्यक्ती, माओवादी, बांगलादेशी घुसखोर  यांचे फोटो समाविष्ट करून त्यांचा शोध घेता येणे शक्य आहे. तसेच  आंतरराष्ट्रीय गुन्हेगारांच्या छायाचित्रांचाही यामध्ये समावेश करता येणे शक्य आहे. गुप्तचर यंत्रणांकडून एखाद्या ठिकाणी  दहशतवादी हल्ला होणार असल्याची सूचना मिळते तेव्हा त्या परिसरात व इतरत्र सर्व वाहनांची तपासणी केली जाते. अशा वेळी एक सीसीटीव्ही कॅमेरा आणि एक लॅपटॉप यांच्या मदतीने या वाहनांमध्ये जर दहशतवादी आढळला तर त्याबाबत तात्काळ संदेश मिळणे शक्य आहे. सध्या आपल्याकडे पोलिसांचे बॅरिकेटस् लावले जातात; पण त्यामधून सध्या काही ही निष्पन्न होत नाही. मात्र या सॉफ्टवेअरच्या मदतीने दहशतवादी पकडले जाण्याची शक्यता अधिक आहे. अशाच प्रकारे आवाज ओळखणारे तंत्रज्ञानही सध्या उपलब्ध आहे. अनेक वेळा दहशतवादी माध्यमांमधील काही प्रतिनिधींना अथवा माध्यमांच्या कार्यालयामध्ये फोन करून काही माहिती सांगण्याचा, धमक्या देण्याचा प्रयत्न करतात. त्यातून त्यांना सरकारला ईशारा द्यायचा असतो; परंतु अशा प्रकारच्या  आवाजाचा नमुना आपल्याकडे असेल तर त्याच्याशी फोनवरील आवाजाची पडताळणी करून तो  आवाज नेमका कोणत्या दहशतवाद्याचा आहे हे समजणे शक्य आहे. अशा प्रकारचे तंत्रज्ञानही अमेरिका आणि युरोपीय देशांकडे आहे.

आज भारत महासत्ता बनण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे. अशा वेळी आपल्या देशाची ताकद, आर्थिक शक्ती यांचा वापर करून गुगल आणि

इतर इंटरनेट कंपन्यांवर त्यांचे सव्र्हर्स भारतात ठेवण्याबाबत दबाव आणण्याची गरज आहे. भारतामध्ये होणारा इंटरनेटचा ट्रॅफिक हा फक्त भारतातील सव्र्हरमधूनच गेला पाहिजे, अमेरिका किंवा इतर देशातल्या सव्र्हरमधून जाता कामा नये याची सक्ती या इंटरनेट कंपन्यांना करण्याची आवश्यकता आहे. सुरक्षिततेच्या दृष्टीने त्याचा मोठा फायदा आहे. याचे कारण फेसबुकसारख्या सोशलमीडियावर जर एखाद्याने चुकीची माहिती वा धार्मिक द्वेष निर्माण करणारी माहिती अपलोड केल्यास, एखादे चिथावणीखोर वेबपेज तयार केल्यास ते  भारतातील कोणत्या भागातून करण्यात आले आहे हे तात्काळ समजू शकणार आहे. त्यातून त्या व्यक्तीला तात्काळ पकडणे शक्य होईल. यासाठी याहू, गुगल, क्रोम आदी सर्व कंपन्यांना भारतात सव्र्हस प्रस्थापित करण्याची सक्ती करणे गरजेचे आहे. भारतात सव्र्हर आणल्याखेरीज तुम्हाला इथे इंटरनेट सेवा देता येणार नाहीत, असे त्यांना बजावून सांगण्याची आवश्यकता आहे. अशा प्रकारचे तंत्रज्ञान विकसित करण्यासाठी सरकारने आयआयटी पवई या संस्थेला १०० कोटी रुपये दिलेले आहेत. तेथील विद्यार्थी या निधीचा वापर याबाबतच्या संशोधनासाठी करणार आहेत. भविष्यात भारताला त्याचा फायदा नक्कीच  होईल.

**<u>इंटेलिजन्स ब्युरो, रॉ यांचा अमेरिकेतील गुप्तचर यंत्रणांशी संपर्क</u>**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा नुकतेच भारतात येऊन गेले. त्यांच्या भेटीमध्ये सुरक्षेसंदर्भात अनेक सकारात्मक गोष्टी घडल्या आहेत. यापैकी मुख्य म्हणजे यापुढील काळात दहशतवादाला प्रतिबंध करण्यासाठी भारत आणि अमेरिका या दोन देशांच्या सीआयए आणि रॉ या गुप्तचर संस्थांमध्ये  गुप्तचर माहितीची देवाणघेवाण संस्थात्मक पातळीवर होणार आहे. अशा प्रकारे गुप्तचर माहितीचे आदानप्रदान करण्याची प्रक्रिया २६/११ नंतर सुरु झाली होती. २६/११च्या हल्ल्यातील दहशतवादी पाकिस्तानातील आहेत, याची माहिती आपल्याला  अमेरिकेनेच दिली

होती.  त्याचबरोबर मागील महिन्यामध्ये गुजरातमधील पोरबंदरजवळ पाकिस्तानी दहशतवाद्यांची एक बोट सागरी सुरक्षा दलाने उद्ध्वस्त केली. या बोटीतून दहशतवादी येत असल्याची माहितीही भारताला अमेरिकन गुप्तचर खात्याने दिली असावी. अशी माहिती येत आहे. इंटेलिजन्स ब्युरो, रॉ यांचा अमेरिकेतील गुप्तचर यंत्रणांशी संपर्क आहे. पण आता संस्थात्मक संबंध घनिष्ट होणार आहे. रोजच्या रोज गुप्तचर माहितीचे आदानप्रदान करता येणार आहे. यामुळे भारतीय सुरक्षा व्यवस्थांना अमेरिकन संस्थांशी वेळोवेळी संपर्क साधता येणार आहे. पाकिस्तान, चीन किंवा दहशतवाद्यांविषयी जी माहिती अमेरिकेकडे येते ती माहिती आपल्याला मिळणार आहे. त्यामुळे आपल्याला दहशतवादी पकडण्याच्या कामी मोठी मदत होणार आहे. सध्या अशी माहिती अमेरिका युरोपमधल्या काही देशांशी इस्त्राईलशी आदानप्रदान करत आहे. ज्यावेळेस दहशतवादी ईमेल, एसएमएस किंवा पत्रांच्या माध्यमातून काही संदेश पाठवतात, संवाद साधतात तेव्हा ते पूर्णपणे कोड करुन अथवा सांकेतिक भाषांमध्ये पाठवले जातात. अशा प्रकारचे कोडवर्डचे जर डिकोडिंग करता आले, सांकेतिक शब्दांमधील संदेश शोधता आला तर दहशतवाद्यांचा, त्यांना मदत करणार्या व्यक्तींचा ठावठिकाणा समजणे, तसेच त्यांच्या भविष्यातील हल्ल्यांसदर्भातील योजनांची माहिती मिळणे शक्य होते. त्यातून या दहशतवाद्यांना पकडून संभाव्य हल्ले रोखता येऊ शकतात. अशा प्रकारचे कोड केलेले मेसेज ओळखण्यासाठी तंत्रज्ञानाचा मोठा फायदा होतो. याबाबतचे तंत्रज्ञानही  अमेरिकेकडे उपलब्ध आहे. तेही आपल्याला मिळण्याची शक्यता आहे.

**१ मार्च २०१५भारत-इस्त्रायल संबंध वेगळ्या वळणावर**

इस्त्रायलचे संरक्षणमंत्री मोशे येलॉन यांची भारतभेट संपन्न झाली. गेल्या काही वर्षांमध्ये भारत आणि इस्त्रायलचे संरक्षण संबंध वेगाने वाढत आहेत. अमेरिकेच्या खालोखाल इस्राइलकडे संरक्षणासंबंधीचे आधुनिक

तंत्रज्ञान आहे. आजवर भारताला इस्रायलकडून हे तंत्रज्ञान योग्य दरात आणि निर्धारित वेळेत मिळत आलेले आहे. भारतापुढील सध्याची अंतर्गत आणि बाह्य सुरक्षेची आव्हाने लक्षात घेता आपल्याला इस्राईलमधील सायबर तंत्रज्ञानाची, अत्याधुनिक शस्रास्र सामग्रीची गरज आहे. त्यामुळेच ईस्त्रायलशी सामरिक आणि संरक्षण संबंध वाढवणे आवश्यक आहे. इस्रायलच्या संरक्षणमंत्र्यांची भेट ही त्यादृष्टीने एक सकारात्मक पाऊल म्हणता येईल.

इस्त्रायलचे संरक्षणमंत्री मोशे येलॉन हे १८-२१फ़ेब्रुवारी२०१५ला भारतभेटीवर आले होते. इस्त्रायलचे संरक्षण मंत्र्यांनी भारताला भेट देण्याची ही पहिलीच वेळ आहे. जानेवारी १९९२ पासून भारत आणि इस्त्रायलचे संबंध आहेत. आजवर इस्रायलचे अर्थमंत्री, पर्यटनमंत्री आणि कृषीमंत्री यांनी भारताला भेटी दिलेल्या आहेत. मात्र इस्रायलचे संरक्षण मंत्री आजवर कधीही भारतात आलेले नव्हते.

सध्या भारताचे इस्राईलशी संबंध कसे आहेत, यापूर्वी ते कसे होते व भविष्यात या संबंधांचे भारताच्या दृष्टीने काय महत्त्व आहे या सर्व पैलूंवर विचार करण्याची गरज आहे. माजी सरकारच्या निष्क्रिय व भित्र्या धोरणांमुळे इस्राईलशी भारताचे संबंध जवळजवळ संपुष्टात आले होते. माजी सरकारच्या दहा वर्षांच्या कालखंडात तत्कालीन पंतप्रधान मनमोहनसिंग यांनी इस्राईलशी संबंध सुधारण्याकरिता कधीच पुढाकार घेऊन प्रयत्न केले नाहीत. कारण यामुळे आपले अरब राष्ट्रांशी संबंध खराब होतील असे त्यांना वाटत असे.काही वर्षांपूर्वी भारताचे त्यावेळचे संरक्षण मंत्री ए. के. अँटनी हे इस्त्रायल दौर्यावर जाणार होते; पण त्यावेळी केरळमधील मुस्लिम लीग पक्षाने तीव्र आक्षेप घेतला. परिणामी ही भेट रद्द करण्यात आली

'**<u>मोसादशी संबंध वाढवा</u>**

इस्राईलची 'मोसाद ही जगातील सर्वोत्कृष्ट गुप्तहेर संस्थांपैकी एक

समजली जाते. भारताच्या अंतर्गत सुरक्षेची जबाबदारी ‘इंटेलिजन्स ब्युरो व बाह्य सुरक्षेसाठी ‘रॉ अर्थात ‘रीसर्च अँड ॲनालिसिस विंग  ही गुप्तचर संघटनेवर आहे. भारतीय गुप्तचर संघटना व ‘मोसाद यांच्यातील संबंध वाढले, तर भारतातील गुप्तचर संघटनांचा दर्जा आणखी सुधारू शकतो. यामुळे भारतातील अंतर्गत सुरक्षेचे धोकेही कमी होऊ शकतात. ‘मोसाद इस्राईलच्या शत्रूंवर त्यांच्या राष्ट्रात जाऊनही हल्ले करते. भारताचेही अनेक शत्रू भारताच्या बाहेर अनेक देशांमध्ये पसरले आहेत. इस्राईलची मदत घेऊन अशाप्रकारच्या शत्रूंना शोधून काढणे व त्यांना भारताच्या बाहेरसुध्दा(जसे दाऊद इब्राहिमला पकडणे) नेस्तनाबूत करणे शक्य होईल.

**<u>महत्त्वाची संरक्षण सामग्री पुरवठा करणारा</u>** देश

इस्रायल हा भारताचा खूप मोठा संरक्षण सामग्री पुरवठा करणारा देश आहे. आजवर भारताने सहा दशलक्ष डॉलर्स इतक्या किमतीची अत्याधुनिक संरक्षण सामुग्री ईस्त्रायलकडून विकत घेतलेली आहे. २००७ मध्ये सरकारच्या वतीने राज्यसभेत देण्यात आलेल्या माहितीनुसार, त्यापूर्वीच्या पाच वर्षांमध्ये पाच अब्ज डॉलर्स किमतीची अत्याधुनिक शस्त्रे आपण इस्त्रायलकडून विकत घेतलेली होती. यामध्ये काही महत्त्वाच्या शस्रांचा समावेश होता. यापैकी एक म्हणजे एअर बॉर्न वॉर्निंग ॲन्ड कंट्रोल_एअर क्राफ्ट (AWAC).

या विमानाचे महत्त्व म्हणजे हे विमान हवेत असताना त्याच्यामध्ये बसवलेल्या रडारच्या मदतीने शत्रूच्या विमानांवर लक्ष ठेवता येते. तसेच शत्रू देशातून त्यांच्या हवाइदलांच्या तळावरुन उडून भारताकडे येणार्या ४० ते ४५ विमानांवर एकाच वेळी नियंत्रण ठेवण्यासाठी हे विमान उपयोगी ठरते. थोडक्यात ही एक अत्याधुनिक टेहाळणी यंत्रणा आहे. याच्या मदतीने चीन आणि पाकिस्तानच्या हवाई दलावर लक्ष ठेवण्यास आपल्याला मदत मिळते. अशा प्रकारची आणखी दोन दोन विमाने इस्रायलकडून घेतली जाण्याची शक्यता आहे. याशिवाय इस्त्रायलकडून

आपण अत्याधुनिक युएव्ही म्हणजे अनमॅन्ड एरियल व्हेईकल (UAV) विकत घेतली आहेत. तसेच हवाई दलाकरिता एरोस्टेट रडार ही भारताने घेतले आहे. याचा वापर सिमेवर लक्ष ठेवण्यासाठी होतो. याशिवाय, आपल्या  कमांडोंसाठी स्नायपर रायफल आणि एव्हर रायफल्सही भारताने घेतल्या आहेत.

**संरक्षण सिद्‌धतेच्या दृष्टीने अतिशय विश्वासू सहकारी**

गेल्या काही वर्षांमध्ये भारत आणि इस्त्रायलचे संरक्षण संबंध वेगाने वाढत आहेत. याचे मुख्य कारण म्हणजे आजघडीला सर्वाधिक अत्याधुनिक शस्त्रे अमेरिकेकडे आहेत; पण अमेरिका इतर देशांना ती देत नाही; मात्र इस्राइलकडे अमेरिकेच्या खालोखाल आधुनिक तंत्रज्ञान आहे, आणि मुख्य म्हणजे त्यांच्याकडून भारताला अशा प्रकारची आधुनिक शस्रे पुरवली जातात. भारताच्या संरक्षण सिद्‌धतेच्या दृष्टीने अतिशय विश्वासू सहकारी म्हणून इस्रायलचा उल्लेख करावा लागेल. याचे एक कारण म्हणजे आजवर इस्रायलने कधीही रशियाप्रमाणे आपल्या शस्त्रांची किंमत अचानकपणे वाढवलेली नाही. त्यांनी भारताला विकलेली शस्त्रे अत्यंत वाजवी दराने दिलेली आहेत. रशियाने विक्रमादित्य नावाचे एअर क्राफ्ट कॅरीयर ज्यावेळेस भारतातला विकले त्यावेळेस त्याची किंमत १.४ बिलियन डॉलर्स इतकी होती. पण सात वर्षांनी जेव्हा ते भारतात येऊन पोहोचले त्यावेळेस त्याची किंमत दुपटीहून अधिक म्हणजे २.९ बिलियन डॉलर्स इतकी झाली होती. अशा प्रकारचा व्यावहारिक विश्वासघात इस्त्रायलने कधीही केलेला नाही.

**दहशतवादी हल्ले होण्यापूर्वीच थांबवले पाहीजे**

आज संरक्षण सहकार्याशिवाय सायबर सुरक्षा, पाणीबचत, शेती अशा अनेक विषयांवर भारत आणि इस्रायलमध्ये मोठ्या प्रमाणात सहकार्य सुरु आहे. नरेंद्र मोदी यांचे सरकार सत्तेत आल्यानंतर नोव्हेंबर २०१४ मध्ये गृहमंत्री राजनाथ सिंग यांनी इस्त्रायला भेट दिली होती. भारताची अंतर्गत

सुरक्षा अधिक मजबूत कशी करता येईल, हा या भेटीमागचा उद्‌देश होता. इस्त्रायलला चारी दिशांनी शस्त्रू राष्ट्रांनी घेरलेले आहे. त्यांच्यावर दहशतवादी हल्ले होतात, विमानाने हल्ले होतात, क्षेपणास्रांचे मारे होतात; मात्र तरीही अतिशय उच्च दर्जाची सुरक्षाव्यवस्था, तंत्रज्ञान आणि संरक्षण डावपेच यांमुळे हा देश असे हल्ले रोखण्यात ९९ टक्के यशस्वी होतो. त्याचे एक उदाहरण म्हणजे, मध्यंतरी, इस्रायल आणि पॅलेस्टाईन यांच्या सीमेवर संयुक्त राष्ट्रसंघाचे पिसकिपिंग फोर्स आहे. यामध्ये काही भारतीय सैन्याचे अधिकारीही सामिल आहेत. एका भारतीय अधिकार्याने पॅलस्टाईनच्या बाजूने चार दहशतवादी हातामध्ये क्षेपणास्रे घेऊन ते डागण्यासाठी सिमेकडे येताना पाहिले. अक्षरशः दोन मिनीटांच्या आत इस्त्रायली हेलीकॅप्टरनी त्या चार दहशतवाद्यांवर गोळीबार करून क्षेपणास्रे डागण्याच्या आधीच त्यांना उद्‌ध्वस्त केले. अंतर्गत सुरक्षा, गुप्तहेर व्यवस्था, माहिती आणि तंत्रज्ञान यामुळे इस्रायलने अनेक वेळा अशा प्रकारचे दहशतवादी हल्ले होण्यापूर्वीच थांबवलेले आहेत. या सर्वाची सध्या भारताला मोठी गरज आहे. अशा प्रकारचे अनेक अनुभव आणि तंत्रज्ञान इस्त्रायलकडून आणण्याच्या उद्‌देशाने गृहमंत्री राजनाथ सिंग इस्राईलभेटीवर गेले होते.

**<u>मेक इन इंडिया मध्ये इस्त्रायलची महत्त्वाची भुमिका</u>**

आजवर भारतातील अनेक राजकारण्यांनी व्होट बँकेच्या राजकारणापोटी इस्राईलशी संबंध विकसित करण्याबाबत सातत्याने विरोध केला आहे. इस्त्रायल हा मुस्लिमविरोधी वा अरबविरोधी देश आहे, असा त्यांचा समज आहे. नरेंद्र मोदी पंतप्रधान झाल्यानंतर इस्राईल-पॅलेस्टाईन संघर्षादरम्यान विरोधी पक्षांनी लोकसभेतले इतर महत्त्वाचे विषय सोडून इस्त्रायलविरुद्‌ध एक ठराव पास करण्यासाठी गोंधळ घातला होता. हे पूर्णपणे चुकीचे होते. मतांच्या राजकारणासाठी आपण देशाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने महत्त्वाच्या असणार्या देशांशी चांगले संबंध असणे जरुरी आहे. त्यामुळे कुठलेही

सरकार इस्त्रायलशी संबंध सुधारण्याबाबत, घनिष्ट करण्याबाबत बोटचेपी भूमिका घेताना दिसले. मात्र सध्याचे सरकार इस्त्रायलशी आपले संबंध घनिष्ट करण्यासाठी प्रयत्न करत आहे जे नक्कीच जरुरी आहे.

मोदी सरकारने मेक इन इंडिया हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प हाती घेतला आहे. तसेच संरक्षणक्षेत्रामध्ये परदेशी गुंतवणुकीची मर्यादा ४९ टक्क्यांपर्यंत वाढवली आहे. त्यानुसार, संरक्षणक्षेत्रातील शस्रास्रसामग्रीची भारतात निर्मिती, संयुक्त विकास आणि त्यानंतर त्यांची निर्यात असे उद्दिष्ट ठेवण्यात आले असून त्यातून रोजगारनिर्मिती मोठ्या प्रमाणावर करण्याचा सरकारचा मानस आहे. यासाठी भारताला इस्राईलची मोठ्या प्रमाणात मदत अपेक्षित आहे. भारतामध्ये अनेक नवीन शस्त्रे बनवण्यासाठी इस्राईलने तयारी दर्शवली आहे. त्यामुळे सामरिक दृष्ट्या आपला नक्कीच फायदा होणार आहे. अत्याधुनिक शस्त्रे भारतातच तयार झाली तर आपली संरक्षणसिद्धता एका नव्या पातळीवर जाऊ शकेल. शत्रूंशी लढण्यासाठी आपण अधिक सज्ज होऊ शकू. तसेच इस्त्रायलच्या मदतीने आपली अंतर्गत सुरक्षाही अधिक भक्कम करता येणार आहे. त्यामुळेच ईस्त्रायलशी सामरिक आणि संरक्षण संबंध वाढवणे आवश्यक आहे. इस्रायलच्या संरक्षणमंत्र्यांची भेट ही त्यादृष्टीने एक सकारात्मक पाऊल म्हणता येईल.

# प्रकरण 6- माओवाद/ नक्षलवाद/ डावा दहशतवाद

## माओवाद्यांची सत्यशोधन समिती आणी खडंणी राज्य

## माओ हिंसाचार आणी मतपेटीचे राजकारण

## वाढता माओवादी दहशतवाद: राज्यांच्या उदासीनतेचा परिपाक

## महाराष्ट्रात माओवाद आणि आदिवासी विकास

## माओवाद्यांशी वाटाघाटी आणि शांतता-दिल्ली दूर है

**माओवाद्यांच्या बीमोडासाठी व्यापक संयुक्त कारवाई जरुरी**

**माओवाद संपवण्यासाठी सर्व समावेशक उपाय**

**माओवाद्यांचा चक्रव्यूह भेदायचा तर...**

**२०१४-15 मध्ये मावोवाद्यांचा हिंसाचार कमी झाला**

४०% केंद्रिय भूप्रदेशावरील, नवी दिल्ली आणि राज्यांच्या राजधान्यांचे प्रशासकीय नियंत्रण सुटून, ते नक्षलवाद्यांकडे गेलेले आहे. पशुपती, नेपाळपासून तर तिरुपती, आंध्रापर्यंतच्या पट्ट्यातील, नक्षलवाद्यांना त्या त्या क्षेत्रातील गुन्हेगारी विश्वातील दादालोक मदत आणि पाठिंबा पुरवत असतात. तसेच नेपाळातील माओवादीही करत असतात. त्या माओवाद्यांनाही भारतास अस्थिर करण्यात रुची असलेल्या वा त्यात गुंतलेल्या इतर सत्ता उघडपणे आधार देत असतात. देश अक्षरशः दोन भागांत विभागला गेला आहे.

पाकिस्तान, बांगलादेश आणि माओवादी नेपाळ ह्यांसारख्या परदेशांचे, नक्षलवाद्यांशी घट्ट संबंध प्रस्थापित झालेले आहेत. असे सूचित करणारे अहवालही आहेत की, भारतीय माओवादी त्यांच्या नियंत्रणाखालील प्रदेशांतील त्यांच्या हालचालींना अर्थपुरवठा व्हावा म्हणून, वाढत्या प्रमाणात अफूची लागवडही करू लागलेले आहेत. माओवादी, गुन्हेगारी विश्व आणि अंमली पदार्थांचे व्यापारी ह्यांतील घनिष्ट संबंध देशासाठी स्फोटक झालेले आहेत. असेही अहवाल आहेत की, आय.एस.आय.ने नक्षलवादी उतरंडीत जिहादी तत्त्वे (जिहादी दहशतवादी) घुसवलेली आहेत.

जी त्यांना नेतृत्व, शस्त्रास्त्रे आणि अर्थपुरवठा करत असतात.

## <u>अंतर्गत सुरक्षेचा सर्वात मोठा धोका नक्षलवाद</u>

देशाच्या सुरक्षेला सर्वांत मोठा धोका नक्षलवादापासून आहे. आज 35-40% भागावर नक्षलवादाचे आधिपत्य आहे. दरवर्षी 1500-1600 नक्षली हल्ले होतात. प्रत्येक वर्षी 750-1000 सामान्य माणसे हिंसाचारात मारली जातात. प्रत्येक वर्षी नक्षलवादी 10,000 कोटी रूपयांची खंडणी वसूल करीत असावे. आतापर्यंत नक्षलवाद्यांनी 3500-5000कोटी रूपयांची भारतीय संपत्ती बरबाद केली आहे. सरकारने सुरू केलेले आपरेशन ग्रीन हंट सध्या जियो ओर जिने दो या अवस्थेत आहे. घोषणाबाजी करण्याशिवाय सरकार फारसे काही करताना दिसत नाही. हे सगळे आपल्याला माहीतच आहे. अनेक विचारवंत अत्यंत निर्लजपणे नक्षली चळवळीचे खुले समर्थन करतात.

## <u>ऑपरेशन ग्रीन हंट, एक थंडावलेली मोहिम !</u>

छत्तीसगडच्या माओग्रस्त भागात कार्यरत असलेली सीपीआय (माओवादी) ही संघटना आपल्या दहावा स्थापना दिवस मोठ्या प्रमाणात साजरा करण्याच्या तयारीत असून, देशात घातपाती कारवाया करण्यासाठी सर्व नक्षली गटांना एकत्र आणण्याची शक्यता असल्याने नवीन वर्षांत माओवादी आक्रमक होऊ शकतात, असा इशारा गुप्तचर संस्थेने (आयबी) दिला होता.

‘सीपीआय माओवादीच्या वरिष्ठ नेत्यांची एक बैठक  छत्तीसगड ओडिशा सीमेला लागून असलेल्या जंगलात पार पडली. या बैठकीत पुढील वर्षांसाठीच्या रणनितीवर चर्चा करण्यात आली. नवीन वर्ष हे सीपीआय माओवादीचे दहावे वर्ष आहे’,मूळ आधार असलेल्या भागांसह शहरी भागात

विस्तार करण्यासाठी आवश्यक तो पाठिंबा मिळविणे, समविचारी लोकांमध्ये आपले जाळे पसरविणे, ठार झालेल्या नक्षल्यांच्या चरित्रासह माओवादी साहित्य प्रकाशित करणे, पीएलजीए वार्तापत्र आणि आपल्या विचारधारेवर आधारित वृत्तपट तयार करणे, अशा विविध गोष्टींवर या बैठकीत चर्चा झाली. माओईस्ट कम्युनिस्ट सेंटर (एसीसी) आणि पिपल्स वॉर ग्रुप (पीडब्ल्यूजी) या दोन्ही गटांनी एकत्र येत २१ सप्टेंबर २००४ रोजी सीपीआय माओवादी या नव्या संघटनेची स्थापना केली.

२०१३ सालामध्ये महाराष्ट्रात सामान्य नागरिक, सुरक्षा कर्मचारी तसेच दहशतवादी सर्व मिळून ४५ हून अधिक जणांना माओवादी कारवायात प्राण गमवावे लागले. २०१२ रोजी हीच संख्या ४० च्या जवळपास आहे. तर गंभीररीत्या जखमी झालेल्यांची संख्या २०० हून अधिक आहे. हे ८८ सालापासुन चालु आहे. ऑपरेशन ग्रिनहंट या मोहीमेचा गाजावाजा भरपूर झाला. पण प्रत्यक्षात फारशी कारवाई झाली नाही. उलट ग्रिनहंटच्या वर्तमानपत्रे आणि टिव्हीवरच्या प्रचारामुळे माओवादी सतर्क झाले. त्यांनी आपली यंत्रणा अधिक मजबूत केली. सरकार मात्र घोषणाबाजीमध्ये दंग आहे. आता ही मोहीम थंड पडली आहे.

माओवादी निरपराध नागरिकांचे आणि पोलिसांचे रक्त सांडत आहेत. चीन आणि पाकिस्तान या देशांकडून तसेच अन्य अनेक दहशतवादी संघटनांकडून माओवाद्यांना शस्त्र व पैशाचा पुरवठा होतो तसेच माओवादी ग्रामीण, आदिवासी आणि दुर्गम भागातील ग्रामस्थ आणि आदिवासी यांना चिथावणी देऊन, त्यांची दिशाभूल करून, त्यांना आमिष दाखवून किंवा दहशत दाखवून संघटनेत सामील करून घेतात. आपला प्रभाव असलेल्या भागात ते विकासकामे होऊ देत नाहीत. माओवाद्यांचा जर बिमोड करायचा असेल तर त्यांना अन्य देशांकडून मिळणारी पैशाची, शस्त्राची मदत, त्याचबरोबर देशांतर्गत पैशाचा स्त्रोत बंद करण्यासाठी सरकारने

परिणामकारक पावले उचलणे गरजेचे आहे. त्यासाठी केंद्र व राज्य सरकारे यांच्यात अधिक समन्वय, सहकार्याची भावना वाढीस लावणे आवश्यक आहे.

भारतीय नेतृत्वाचा भर कृतीपेक्षा घोषणांवरच अधिक असल्याचे दिसते. दहशतवाद्यांशी थेट सामना करण्यापेक्षा निषेध करण्यावरच आपली नेतेमंडळी भर देतात. यामुळे एक सॉफ्ट स्टेट, अशी भारताची प्रतिमा तयार होत आहे.काश्मीरमध्ये चाललेले छुपे युद्ध, ईशान्य भारतात चाललेले बंगालदेशीकरण, माओवाद आणि बाकी देशात होणाऱ्या आतंकवादी घटना यांचा एकमेकांशी फारच घनिष्ट नाते आहे. चीन आणि पाकिस्ताननी हे आपल्या देशाविरुद्ध चालवलेले छुपेयुद्ध आहे.अशा युद्धांमुळे भारताचे तुकडे करणे सोपे नाही. पण यामुळे आपल्या देशाची प्रगतीचा वेग कमी होतो आणि आपल्या देशात अस्थिरतेचे वातावरण निर्माण होते. आपले चीनशी 2020 पर्यंत युद्ध होण्याची शक्यता आहे. त्या आधी आपण देशाच्या आतील अंतर्गत सुरक्षेच्या समस्येवर पूर्णपणे मात करायला हवी. नाहीतर आपल्याला एकाच वेळी चीन, पाकिस्तान आणि माओवाद्यांच्या विरुद्ध युद्ध करण्याची वेळ येऊ शकते

**माओवाद्यांची सत्यशोधन समिती आणी खडंणी राज्य**

माओवादी समर्थक बुद्धिजीवींकडून हेतूपुर्वक त्यांचे समर्थन केले जाते व ग्रीन हंट ऑपरेशन थांबवून वाटाघाटी करा, असे सांगितले जाते. बुद्धिजीवी दबाव गटाचे काम करतात. वृत्तपत्रे, सामाजिक संस्था, विश्वविद्यालये यांचा उपयोग करून समाजात वैचारिक भ्रम पसरवणारेच हे विचारवंत निरपराध आदीवासींच्या हत्याकांडाला जबाबदार आहेत. समाज त्यांना मोठे लेखक, पत्रकार, विचारवंत म्हणून आदर देतो पण हे मानवतावादी देशाचे प्रचंड नुकसान करीत आहे. माओवाद्यांकडून

मरणाऱ्या निर्दोष नागरिकांबद्दल ते कधीच बोलत नाही. यांची मुले माओवादात कधी सामिल होत नाही.

बचेली/जगदलपूर- छत्तीसगडमध्ये पोलिस व माओवाद्यांमध्ये 28 फ़ेब्रुवारीला झालेल्या चकमकीत सहा पोलिस जवान हुतात्मा झाले व दोघेजण जखमी झाले. चौदा पोलिस जवान दुचाकीवरून चालले होते. यावेळी माओवाद्यांनी स्फोट घडवून आणला. १८ फेब्रुवारी २०१४ च्या रात्री गडचिरोली-गोंदिया सीमेवर पोलिस आणि माओवादी यांच्यात चकमक झाली आणि त्यात सात माओवादी ठार झाले. एके-४७ सह इतर सहा बंदुका, दारुगोळा आणि बरीच माओवादी कागदपत्रे जप्त करण्यात आली. मृत माओवाद्यांची ओळख पटून ते किती वर्षांपासून माओवादी संघटनेत काम करत होते, त्यांच्यावर खुनाचे गुन्हे होते, याचा पूर्ण तपास पोलिसांनी केला. मागील चौदा महिन्यांत तब्बल ३७ माओवाद्यांना मारले आहे. ही बाब स्वत: माओवादी संघटनेनेच मान्य केलेली आहे. आदिवासी तरुण दलममध्ये भरती होण्यास तयार नाहीत, पूर्वी दलममध्ये भरती झालेले अनेक आदिवासी तरुण-तरुणी भ्रमनिरास होऊन मोठ्या प्रमाणात शरण जात आहेत या सर्व बाबी देखील माओवाद्यांनी मान्य केल्याच्या बातम्या वृत्तपत्रातून छापून आलेल्या आहेत.

पोलिसांच्या चकमकीत ७ माओवादी ठार झाल्याबरोबर ४-५ दिवसात दूरच्या आंध्रप्रदेशमधून एक नागरी हक्क समिती सत्यशोधन करण्यासाठी आली आणि तत्काळ 'सत्या' चा शोध लावून पत्रकार परिषदेत पोलिसांवर बेछूट आरोप करणे ,या गोष्टींचे आता आश्चर्य वाटत नाही. याआधी जेव्हा पोलिसांनी माओवाद्यांना मारले होते, त्यानंतर देखील अशीच सत्यशोधन समिती आली होती. माओवादी मारले गेले की लगेच

सत्यशोधन समितीने येणे आणि चकमक खोटी होती, पोलिसांनी निरपराध लोकांना मारले असे आरोप करणे नित्याचे झाले आहे.

या पोलिसांनी राजीनामा द्यावा व सरकारने गडचिरोलीतील माओवादविरोधी मोहिमेवरील सर्व पोलिस माघारी बोलवावे, अशी समितीने मागणी केली. आंध्रप्रदेशातून शेकडो मैलाचे अंतर पार करून आलेली सत्यशोधन समिती इतका शोध कसा लावला?.सत्यशोधन समितीने जी मागणी केलेली आहे, त्यावरून या सत्यशोधन समितीबद्दलचेच ‘सत्य’ अगदी उघड होते. मागणी अशी की सरकारने गडचिरोलीतील माओवादविरोधी मोहिमेवरील सर्व पोलिस माघारी बोलवावे. सत्यशोधन समितीला असे म्हणावयाचे आहे का?, माओवादविरोधी मोहिमेतील सर्व पोलिसांना माघारी बोलावून संपूर्ण गडचिरोली जिल्हा माओवादी दहशतवाद्यांच्या ताब्यात द्यावा.

पोलिसांनी माओवाद्यांना मारले की या तथाकथित सत्यशोधन समित्या येतात आणि पोलिसांनी खोट्या चकमकीत माओवाद्यांना मारले, असा शोध लावून लगेच निघून जातात. प्रश्न असा पडतो की जेव्हा माओवादी सर्वसामान्य माणसांचे, कुऱ्हाडीने हात-पाय तोडतात,त्याना मारतात तेव्हा या सत्यशोधन समित्या  सत्याचा शोध घेण्यासाठी का येत नाहीत? महाराष्ट्रात आजपर्यंत माओवाद्यांनी २०० पोलिसांना आणि साधारणत: ५०० सामान्य नागरिकांना अत्यंत क्रूर पद्धतीने मारलेले आहे. इतक्या लोकांना मारल्यानंतरही कधी या तथाकथित सत्यशोधन समित्यांना या हत्याकांडाच्या ‘सत्या’ चा शोध घ्यावासा वाटला नाही या मागचे खरे कारण काय आहे,.

माओवाद्यांनी चार वर्षाच्या निष्पाप, निरागस, बालकापासून ७० वर्षांच्या

निरपराध वृद्धापर्यंत सर्वांच्या रानटी कत्तली करायच्या आणि असल्या सत्यशोधन समित्यांनी या प्रकाराकडे अगदी सोईस्कर डोळेझाक करायची पण पोलिसांनी मात्र माओवाद्यांना मारले की सत्यशोधन समितीने तेथे जाऊन आकांडतांडव करून सरकार व पोलिसांच्या विरोधात बोलायचे हा प्रकार असाच सुरू आहे. पोलिसांना नामोहरम् करून माओवाद्यांना अप्रत्यक्षपणे मदत करणे हाच असल्या सत्यशोधन समित्यांचा खरा उद्देश असतो .

मानवधिकार संस्था आणि त्यांचे कार्यकर्ते सामान्य जनतेमध्ये दुष्प्रचार करून त्यांचे मतपरिवर्तन करायचा प्रयत्न करतात.त्यांच्या सायकोलॉजिकल युध्द  म्हटले जाते. लोकांचे विचार, भावना, श्रध्दा, दृष्टीकोन यात बदल करणे हा या युध्दाचा हेतू असतो. या युध्दाचा संदेश अनेक प्रकारे सामान्य जनतेकडे पोहोचवला जातो. भाषणे, वृत्तपत्रे, टिव्ही, दूरध्वनी, पत्रे, पोस्टर्स, एस एम एस, इंटरनेट, चॅटिंग, ई-मेल अशा विविध प्रकारे त्याचा प्रचार केला जातो. प्रसारमाध्यमे माओवादांचे मोठे शस्त्र आहे.जो पर्यंत माओ हिंसाचाराला प्रसिध्दी मिळत नाही, तो पर्यंत त्याचे फारसे महत्व नसते.

**<u>नक्षलींची आर्थिक नाकेबंदी आवश्यक</u>**

परदेशांकडून आर्थिक व शस्त्रांची मदत, हिंसाचाराचे प्रशिक्षण आणि त्यांच्याकडून होत असलेला अत्याधुनिक संपर्क यंत्रणेचा वापर यामुळे माओवादी आक्रमक बनले आहेत. माओवाद्यांना परदेशातून मिळणारी आर्थिक मदत हा एक पैशाचा स्त्रोत आहे . माओवाद्यांचा प्रभाव असलेल्या राज्यात वसूल करण्यात येत असलेली कोटय़वधी रुपयांची खंडणी हाही महत्त्वाचा स्त्रोत आहे. या संबंधात केंद्रीय गृहराज्यमंत्री आर. पी. एन. सिंग यांनी राज्यसभेत दिलेल्या माहितीनुसार, देशभरातील विविध ठिकाणचे माओवादी कंत्राटदार, व्यापारी आणि खासगी

कंपन्यांकडून वर्षाला सुमारे १४० कोटी रुपयांची खंडणी गोळा करतात. हे माओवादी विशेष करून तेंदूच्या पानांचा ठेका असलेल्या कंत्राटारांना लक्ष्य करतात आणि त्यांच्याकडून लक्षावधी रुपयांची खंडणी उकळतात तसेच बांधकाम व्यावसायिक, खासगी कंपन्या आणि व्यापा-यांकडूनही ते वारंवार खंडण्या उकळत असतात. बांधकाम व्यावसायिक आणि मोठय़ा कंपन्या या आपल्या व्यावसाय धंद्याला अडचणी येऊ नयेत, यासाठी खंडणीखोर माओवाद्यांना सातत्याने खंडण्या देत असतात.

व्यावसायिकांनी आणि कंपन्यांनी या खंडणीखोरांच्या मागण्यांची पूर्तता केल्यामुळे ते खंडण्या गोळा करण्यास आणखी निर्ढावले व त्यांनी आपले हे 'अर्थकारण' आणखी मजबूत करण्यास सुरुवात केली. या व्यावसायिकांनी, कंत्राटदारांनी आणि कंपन्यांनी जर प्रारंभीच याची माहिती पोलिस व सुरक्षा यंत्रणांना दिली असती तर खंडणीचा हा सिलसिला एवढा पसरला नसता.

पण सर्वच व्यावसायिकांनी खंडण्या देऊन कातडीबचावूपणा केला. त्यामुळे माओवाद्यांचे फावले. माओवादी कोटय़वधीच्या खंडण्या गोळा करतातच, शिवाय बँकांवरही दरोडे घालून लूट करतात. हा सर्व पैसा ते अत्याधुनिक शस्त्रे, दारूगोळा, सुरुंग व संपर्क यंत्रणा खरेदी करण्यासाठी वापरतात. यामुळे या खंडण्या म्हणजे आपल्याच पैशाने आपले मरण असे म्हणावे लागते. म्हणूनच पंतप्रधान मनमोहन सिंग यांनी म्हटले आहे की, माओवाद हा देशाच्या सुरक्षेला असलेला सर्वात मोठा धोका आहे.

माओवाद्यांना अमाप पैसा मिळत असल्यामुळे त्यांचे नेते आणि परिवार सुखाने शहरात राहतात. त्यांची मुले परदेशात जाऊन शिकतात. काही हजार रूपये मिळतात म्हणून आदिवासी माओवादी बनून हिंसाचार करतात. माओवाद्यांचे खंडणी राज्य थांबवायला पाहिजे. त्यांच्या आर्थिक स्त्रोतावर घाला घातल्याशिवाय माओवाद्यांचा बिमोड करता येणार नाही.

## माओ हिंसाचार आणी मतपेटीचे राजकारण

देशात लोकसभेच्या निवडणुका सुरू असताना आणि माओप्रभावित भागांमध्ये कडेकोट बंदोबस्त असतानाही, माओवाद्यांचा हैदोस सुरूच आहे. माओवाद्यांनी केलेल्या बॉम्बस्फोटात सीआरपीएफचे डेप्युटी कमांडर इंद्रजीत आणि दोन जवान शहीद झाले. या घटनेत आठ जवान गंभीर जखमी झाले. वृत्तवाहिन्यांवर इंद्रजीत मदतीची मागणी करीत असतानाचे लाईव्ह कव्हरेज दाखविण्यात आले होते. परंतु, वृत्तवाहिन्यांवर इंद्रजीत नव्हे तर निमलष्कराचा जवान दिलीप याला दाखविण्यात आले. बॉम्ब निकामी करण्याच्या प्रयत्नात गंभीर जखमी झालेल्या इंद्रजीत यांच्या कुटुंबीयांनी त्यांच्या उपचारात निष्काळजीपणा दाखविण्यात आला असल्याचा आरोप केला आहे. देशातील नेते मंडळी मजा मारीत आहेत. परंतु, देशाचे रक्षण करणारे अधिकारी-जवान उपचारा अभावी तडफडून मरत असल्याचे त्यांच्या कुटुंबीयांनी म्हटले आहे. यापूर्वी जखमी जवानांवर पाटण्यातील खासगी रुग्णालयात उपचार करण्यात आले. मात्र इंद्रजीत यांना उपचारासाठी रांचीला का हलविण्यात आले?.

गेल्या ३० वर्षांच्या काळात माओ  हल्ल्यात ९ हजारावर लोक ठार झाले. त्यात सहा हजारांवर नागरिक आणि दोन हजारांवर पोलिसांचा समावेश आहे. प्रत्युत्तरात साडेतीन हजार माओ आणि बंडखोरांना मारण्यात आले. हा खेळ कुठवर चालणार आणि केव्हा  बंद होणार, हे सांगणे कठीण आहे. एखादे खंबीर सरकारच यातून मार्ग काढू शकते.

**माओवाद्यांनी यंत्रामध्ये बिघाड केल्याचा संशय**

काही दिवसांपूर्वीच महाराष्ट्रातील गडचिरोलीत माओवाद्यांनी, निवडणुकीचे साहित्य घेऊन जाणाऱ्या वाहनावर हल्ला केला. त्यात एक जवान शहीद झाला. त्याआधी बिहारमध्ये हल्ला करण्यात आला. त्यात तीन जवान मारले गेले. त्यानंतर  छत्तीसगडमधील बस्तर आणि बिजापूर जिल्ह्यात निवडणूक साहित्य मुख्यालयात आणत असताना, माओवाद्यांनी दोन्ही

ठिकाणी भूसुरुंगाने वाहने उडवून १५ जणांचा बळी घेतला. त्यात केंद्रीय राखीव पोलिस दलाचे पाच जवान शहीद आणि सात निवडणूक कर्मचाऱ्यांसह दहा जण ठार झाले. माओवाद्यांनी रुग्णवाहिकेला भूसुरुंग स्फोटाने उडवून दिले. दुसऱ्या वाहनाचा स्फोट घडवून शिक्षकांच्या चिंधड्या उडविल्या.

बस्तर लोकसभा मतदारसंघातील स्फोटामुळे इलेक्ट्रॉनिक वोटिंग मशिन्सनाही फटका बसला. त्यामुळे तीन ते चार मतदार केंद्रांवर फेरमतदान होण्याची शक्यता आहे. याशिवाय माओवाद्यांनी यंत्रामध्ये बिघाड केल्याचा संशय आहे. त्यामुळेही मशिनच्या वैधतेबाबत प्रश्नचिन्ह उभे ठाकले आहे. या मतदारसंघात १० एप्रिलला मतदान झाले होते. ज्या मतदान केंद्रावरील ईव्हीएम मशिनमध्ये बिघाड झाला, तेवढ्या मतदान केंद्रांवर फेरमतदान १६ मेनंतर होण्याची शक्यता आहे.

**हल्ल्याचा निषेधही नाही**

मे २०१२ मध्ये झालेल्या अनेक पोट निवडणुकीमध्ये अनेक माओवादी बिनविरोध निवडून आले. २४जून २०१२ ला झालेल्या ग्राम पंचायत निवडणुकीत १३९ पैकी १३२ ग्राम पंचायतीला उमेदवार नक्षल्यांच्या भितीमुळे उभेच राहिले नाही.त्यांच्या हातात सत्ता घ्यावी का? बस्तरमधून आम आदमी पार्टीच्या सोनी सोरी या माओवादी महिला निवडणूक लढवीत आहेत. या पक्षाचे एक ज्येष्ठ नेते ॲड. प्रशांत भूषण हे माओवाद्यांचे कट्टर समर्थक आणि पोलिस आणि आदिवासी नागरिकांचे कट्टर विरोधक समजले जातात. त्यामुळेच माओ भागातून निमलष्करी दल काढून घ्यावे आणि ऑपरेशन ग्रीन हंट मोहीम थांबवावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. आम आदमी पार्टी माओवाद्यांना मदत करीत आहे आणि माओवाद्यांकडून निवडणुकीत मदत मागत आहे. त्यामुळेच बस्तर आणि बिजापूरमध्ये माओवाद्यांनी केलेल्या हल्ल्याचा त्यांनी साधा

निषेधही केलेला नाही.

**---लाच मत द्या किंवा बहिष्कार घाला**

राजकीय पक्ष आपल्या सोयीप्रमाणे आणि मतपेटीच्या राजकारणामुळे माओवादाविरूद्ध फारसे बोलायला तयार नसतात. कॉंग्रेस पक्षात अनेक वाचाळ नेते माओविरोधी अभियानास विनाकारण विरोध करतात. भारतीय जनता पक्षाचे माओवाद विरोधी धोरण साफ आणि बरोबर आहे. भाजप राज्यात माओवादाविरुद्ध लढाई बऱ्यापैकी सुरू आहे. नितीशकुमारांच्या पक्षाचे, बिहार विधानसभेचे अध्यक्ष उदय नारायण चौधरी यांनी माओवाद्यांसोबत निवडणुकीत समर्थनासाठी केलेली मागणी सीआरपीएफच्या गुप्तवार्ता विभागाने पकडली. तसेच छत्तीसगड आणि ओडिशात काही नेते माओवाद्यांची मदत मागत आहेत, असेही गुप्त तपासात आढळून आले आहे. गतवर्षी बस्तरमधील दरभा भागात माओवाद्यांनी केलेल्या हल्ल्यात महेंद्र कर्मा, कॉंग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नंदकुमार पटेल, माजी केंद्रीय मंत्री विद्याचरण शुक्ल यांच्यासोबत २७ जण ठार झाले होते. तपासात, माजी मुख्यमंत्री अजित जोगी आणि त्यांचे समर्थक आमदार कवासी लखमा यांचे माओवाद्यांसोबत संबंध असल्याचे राष्ट्रीय तपास संस्थेला (एनआयए) आढळून आले होते. कवासी लखमानेच दरभा घाटीतून कॉंग्रेस नेत्यांची मिरवणूक नेल्याचे तपासात उघड झाले. अलीकडे कॉंग्रेसचे नेते दिग्विजयसिंग यांनीही माओवाद्यांची मदत मागितल्याच्या वार्ता आल्या होत्या.बस्तर हा अतिसंवेदनशील भाग समजला जातो. तेथे आम आदमीचे लोक खुला प्रचार करीत आहेत की, एकतर सोनी सोरीलाच मत द्या किंवा बहिष्कार घाला.

वर्तमानपत्रांतून या साऱ्या बातम्या प्रकाशित होऊनही निवडणूक आयोगाने

अद्याप कोणतीही दखल घेतलेली नाही. त्यांचा इंटेलिजन्स ब्युरो आणि सीआरपीएफवरही विश्वास नाही का?या मतदारसंघात सुमारे ७० टक्के मतदार आदिवासी जनजातींचे असूनही एकंदर तणावग्रस्त परिस्थितीमुळे प्रमुख पक्षांचे उमेदवार प्रचारासाठी मुख्यतः शहरी, निम्नशहरी भागावरच लक्ष केद्रीत करत आहेत.दूरदस्य गावात जाऊन प्रचार करणं त्यांना 'अशक्य' वाटतं. त्यामुळे ग्रामीण भागात खासगी 'हेलीकॉप्टर'ने पोहोचून मतदारांना भेटण्याची नीती अवलंबावी लागली आहे.

**<u>लष्कराशिवाय पर्याय नाही</u>**

इंटेलिजन्स ब्युरोने निवडणूक प्रक्रिया सुरू होण्याआधीच म्हणजे १२ फेब्रुवारीला निवडणूक आयोगाला आणि सरकारला इशारा दिला होता की, माओप्रभावित भागात मोठा हिंसाचार घडविण्याची माओवाद्यांची योजना आहे, तरीही या इशाऱ्याची दखल घेतलेली दिसत नाही. सरकार केवळ प्रत्येक मृत कर्मचारी आणि शहीद जवानांच्या कुटुंबीयांना दहा लाख रुपये देऊन मोकळे होणार आहे.ऑपरेशन ग्रीन हंट मोहीम आखण्याच्या बाबतीतही धरसोडीचे धोरण अवलंबिण्यात आले. केवळ देखावा म्हणून माओवाद्यांवर कारवाई करणे एवढाच भाग दिसत आला आहे.आदिवासी भागांतील विकासाच्या नावावर दरवर्षी अंदाजपत्रकात भरीव रकमेची तरतूद करायची आणि तो पैसा हडप करायचा, हाच क्रम गेल्या अनेक वर्षांपासून सुरू आहे.

शहरी भागांमध्येही माओसमर्थकांनी घुसखोरी केली आहे. यात डॉक्टर आहेत, अभियंते आहेत, शिक्षक-प्राध्यापक आहेत. दिल्ली विद्यापीठात माओसमर्थकांचा मोठा भरणा असल्याचा इंटेलिजन्स ब्युरोचा अहवाल आहे. २०५० पर्यंत आम्ही नेपाळसारखे माओवाद्यांचे सरकार भारतात

स्थापन करू, असा माओवाद्यांचा निर्धार आहे. या सर्व आव्हानांचे पुरावे सरकारजवळ आहेत. तरीही सरकार माओ आणि माओसमर्थकांच्या मुसक्या बांधण्यात का असमर्थ ठरले आहे, हे कळायला मार्ग नाही.

कम्युनिस्ट पक्षाला माओवाद्यांशी वाटाघाटी करायची इच्छा होती. ममता बॅनर्जी यांनी माओ भस्मासुराचा उपयोग कम्युनिस्ट पक्षाला निवडणुकीत हटवण्याकरिता केला. बिहारमध्ये नितीशकुमार, झारखंड सरकार आणि नवीन पटनायकांचे ओडिसा सरकार चुपचाप बसले आहेत, लालूप्रसाद यादव, मुलायमसिंग यादव आणि इतर अनेक नेत्यांना मधून मधून माओवाद्यांचे प्रेम निर्माण होते. असे सगळे राजकीय पक्ष आणि नेते यांना जनतेने मतदान करून धडा शिकवायला हवा. देशाच्या सुरक्षा व्यवस्थेबाबत राजकीय पक्षांमध्ये मतैक्य होणे गरजेचे आहे.

माओ चळवळ पोलिसांच्या आणि नक्षल्यांना विरोध करणाऱ्यांच्या हत्या करीत आहे. रस्त्यांची कामे लष्कराकडून (बॉर्डर रोड ऑर्गनायझेशन) करवून घेण्याची नामुष्की शासनावर आली आहे. सरकार नावाची चीज लुप्त झाली आहे आणि शासन फक्त पोलिसांवरच अवलंबून आहे. या समस्येचा सामना करण्यासाठी लष्कराशिवाय पर्याय नाही.

## वाढता माओवादी दहशतवाद: राज्यांच्या उदासीनतेचा परिपाक

### दोन दिवसांत चार वेळा हल्ले

माओवाद्यांनी छत्तीसगडमध्ये दोन वेगवेगळ्या ठिकाणी केलेल्या हल्ल्यांत आज १४ एप्रिलला चार पोलिस आणि एक जवान हुतात्मा झाले. गेल्या दोन दिवसांत माओवाद्यांनी छत्तीसगडमध्ये सुरक्षारक्षकांवर चार वेळा हल्ले केले आहेत. या हल्ल्यांमध्ये सात पोलिस जखमीही झाले.

येथील दंतेवाडा जिल्ह्यात रस्ताबांधणीचे काम सुरू असताना पोलिस भूसुरुंगविरोधी वाहनातून गस्त घालत होते. या वाहनात 11 पोलिस होते. याच वेळी नक्षलवाद्यांनी हे वाहन स्फोट घडवून उडवून दिले. या

स्फोटामुळे चार पोलिस जागीच ठार झाले, तर इतर सात जण जखमी झाले. जखमींपैकी दोघांची परिस्थिती गंभीर होती. दुसऱ्या एका घटनेत कांकेर जिल्ह्यात नक्षलवाद्यांनी सुरक्षा जवानांवर केलेल्या हल्ल्यात सीमा सुरक्षा दलाचा (बीएसएफ) एक जवान हुतात्मा झाला. छत्तीसगडमध्ये नुकत्याच झालेल्या माओवादी हल्ल्यामध्ये सात जवान शहीद झाले होते.जखमी जवांनांना हेलिकोप्टरनी लवकर बाहेर का काढले नाही? तसेच येत्या काळात माओवाद्यांकडून तुरुंगांवर मोठा हल्ला होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

**<u>राज्य सरकारे प्रश्नाकडे गांभीर्याने पाहत नाहीत</u>**

सध्या सरकारी आकड्याप्रमाणे देशामधल्या १७ राज्यांमध्ये २०० जिल्ह्यांमध्ये माओवाद पसरलेला आहे.  असे असूनही आपल्याकडील राज्य सरकारे या प्रश्नाकडे गांभीर्याने पाहताना दिसत नाहीत. बिहारसारख्या काही राज्यांनी तर सीआरपीएफ आणि पोलिसांचे माओवादीविरोधी अभियान पूर्णपणे थांबवून टाकले आहे. राज्यांच्या या उदासीनतेमुळे अखेर केंद्रीय गृहमंत्री राजनाथसिंग यांनी राज्य सरकारांना थेट इशारा दिला आहे आणि बटालियन्सचा वापर माओवाद्यांविरुद्धच्या अभियानासाठी केला नाही तर केंद्र सरकार त्यांना मागे बोलावू शकते, तसेच केंद्राकडून या अभियनासाठी दिली जाणारी मोठ्या प्रमाणावरील आर्थिक मदत थांबवण्यात येईल, असेही सांगितले आहे.

छत्तीसगडमध्ये शुक्रवारी (१० एप्रिल) झालेल्या माओवादी हल्ल्यामध्ये स्पेशल टास्क फोर्समधील सात पोलिस जवान शहीद झाले.गेल्या १४ वर्षांमध्ये छत्तीसगडमध्ये माओवादी विरोधी अभियानामध्ये पोलिस आणि अर्धसैनिक दलाचे १०५०हून अधिक जवान शहीद झालेले आहेत. म्हणजेच तेथे माओवाद जोर धरून आहे. आता आपल्या अटक झालेल्या सहकार्यांना सोडवण्यासाठी माओवादी तुरुंगांवर मोठा हल्ला करण्याची

शक्यता असल्याचा इशारा गुप्तचर खात्याकडून देण्यात आला आहे.छत्तीसगडमध्ये डिसेंबर २०१४ मध्ये माओवाद्यांच्या हल्ल्यात सीआरपीएफचे १४ जवान ठार झाले होते. यानंतर तेथील सीआरपीएफच्या नेतृत्त्वाने असे आदेश दिले की, दिल्लीमधून जोपर्यंत माओवाद्यांविरुद्ध लढण्यासाठी आदेश दिले जात नाहीत तोपर्यंत आक्रमक अभियान सुरु करायचे नाही. सीआरपीएफचे जवान मारले जाऊ नयेत असा यामागचा मुख्य उद्देश होता. त्यामुळे गेल्या तीन महिन्यांपासून हे अभियान जवळपास थांबवण्यात आलेले आहे. त्यामुळे आता माओवाद्यांविरुद्ध लढण्याचे काम छत्तीसगड स्पेशल टास्क फोर्स पोलिसांच्या दोन बटालियन्समार्फत सुरू आहे.

त्यापैकी ताज्या हल्ल्यामध्ये सात जवान मारले गेले. माओवाद्यांना घाबरून जर अशा प्रकारे त्यांच्याविरोधी सुरू असलेली मोहीम थांबवण्यात आली तर त्यांचे मनोबल आणखी वाढून हिंसाचाराचे प्रमाणही वाढण्यास मदत होईल. नुकत्याच झालेल्या हल्ल्याच्या दुसर्याच दिवशी माओवाद्यांनी त्याच भागामध्ये १७ वाहने जाळून टाकली. त्यामुळे तेथे रस्ते बनण्याचे जे काम सुरू होते ते पूर्णपणे बंद पडले आहे. या सग ळया प्रसंगानंतर आम्ही माओवाद्यांविरुद्धचे अभियान पुन्हा एकदा जोमाने सुरू करू, असे तेथील राजकीय नेतृत्त्वाने सांगितले आहे. पण राज्यकर्ते आणि प्रशासनाने केवळ घोषणा करून उपयोगाचे नाही, तर प्रत्यक्ष जंगलात जाउन आक्रमक कारवाई करण्याची गरज आहे.

## महाराष्ट्रात माओवाद आणि आदिवासी विकास

इंडियन मुजाहिदीन या दहशतवादी संघटनेने सुरतमध्ये अणुबॉंब स्फोट घडवण्याचा कट रचला होता, अशी धक्कादायक कबुली इंडियन मुजाहिदीनचा म्होरक्या यासीन भटकळने दिली आहे.२६-३० डिसेंबर २०१३ मध्ये ४०,००० पोलिस आणी सिआरपिएफ़ जवानांनी माओग्रस्त भागात

ओपरेशन चालवले. त्यामध्ये काहीच निष्पन्न झाले नाही.

**<u>योजना खरोखरच आदिवासी भागात किती पोहोचतात?</u>**

माओवाद्यांच्या दहशतवादास उत्तर द्यायला आपल्याकडे असणार्या सर्व साधनसंपत्तीचा, शस्त्रास्त्रांचा उपयोग व्हायला हवा, ग्रामीण रोजगार योजना, राष्ट्रीय ग्राम आरोग्य मोहीम, सर्व शिक्षा अभियान, अशा कितीतरी योजना सरकारी पातळीवर राबवल्या जात असतात, पण त्यापैकी खरोखरच आदिवासी भागात किती पोहोचतात? हा अभ्यासाचा विषय आहे. माओवाद्यांच्या हिंसाचाराने पोळलेल्या आदिवासींना सामुदायिक विम्याचे संरक्षण देऊन त्यांची जबाबदारी सरकारने उचलायला हवी, असे अनेकदा सुचवून झाले आहे, पण सरकारने त्याचा साधा विचारही केलेला नाही. माओवाद्यांना आदिवासी भागाचा विकास होऊ द्यायचा नसला तरी आम्ही आदिवासी भागात अधिकाधिक विकास घेऊन जाऊ आणि मग पाहू या, माओवादी काय करतात ते, अशा तर्हेचे आव्हान देता येणे शक्य असूनही सरकारने त्याचा विचार केलेला नाही, हे दुर्दैवाचे आहे.

**<u>कुपोषणामुळे होणारे बालमृत्यू वाढत आहे</u>**

खरे तर आदिवासी विकास विभागाबरोबर संबंधित इतर विभागांनी रोजगार, आरोग्य, कृषी विकास, रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या पाहिजेत. आदिवासींना आर्थिक स्थैर्य प्राप्त झाले तरच ते समाजाच्या मुख्य प्रवाहात येऊ शकतील. आदिवासी समाजाला मुख्य प्रवाहात आणण्याच्या दृष्टीने शिक्षण व शिक्षणाच्या माध्यमातून प्रबोधन हाच सर्वात प्रभावी मार्ग ठरू शकतो. परंतु आदिवासी विकास विभाग भ्रष्टाचाराने इतका पोखरलेला आहे की, कोणतीही योजना व त्यांचा निधी शेवटच्या माणसापर्यंत पोहोचतच नाही.

राज्यात ठाणे जिल्ह्यासह पुणे, नाशिक, धुळे, नंदूरबार, जळगाव, नांदेड, नगर, यवतमाळ, गडचिरोली, चंद्रपूर आणि अमरावती या जिल्ह्यातील आदिवासी भागात कुपोषणामुळे होणारे बालमृत्यू वाढतच आहेत. गेल्या वर्षी सरकारने केलेल्या आरोग्य तपासणीत जानेवारी २०१२ अखरेपर्यंत राज्यात तब्बल १० लाख ६७ हजार ६५९ कुपोषित बालके आढळली होती. यापैकी ९ लाख ४३ हजार २१८ मध्यम कुपोषित तर १ लाख २४ हजार ४४१ तीव्र कुपोषित होती. धक्कादायक बाब म्हणजे २४ हजार ३६५ बालमृत्यू झाल्याची बाब उघडकीस आली होती. आरोग्य विभागाच्या ताज्या अहवालानुसार धारणी आणि चिखलदरा तालुक्यांत एप्रिल ते जुलै या चार महिन्यांमध्ये शून्य ते सहा वर्षे वयोगटातील ९१ बालके कुपोषणाने दगावली, परंतु नेहमीप्रमाणेच शासनाने हे मृत्यू कुपोषणामुळे नव्हेत तर विविध आजारांमुळे झाल्याचा दावा केला.

**<u>६५ वर्षांत असे अनेक वेळा दौरे</u>**

आदिवासी भागांमधून कुपोषण व बालमृत्यू झाले की, मंत्री, लोकप्रतिनिधी, नेते यांना प्रसिद्धीसाठी आयतीच संधी प्राप्त होते. अनेक वेळा मुख्यमंत्री, मंत्री, आजी माजी खासदार व सरकारी विविध विभागांतील अधिकारी येतात. आदिवासींच्या विकासाच्या, आरोग्याच्या, विकास योजनांच्या बाबत त्यांच्याकडून विविध आश्वासने दिली जातात. प्रसिद्धीसाठी वर्तमानपत्रांतून फोटो छापून येतात. दूरदर्शनवर दौर्याच्या बातम्या दाखविल्या जातात.

स्वातंत्र्याच्या ६५ वर्षांत असे अनेक वेळा दौरे झाले, विकासाच्या आश्वासनांचा पाऊस पाडण्यात आला, हजारो कोटींचा निधी खर्च झाल्याचे

दाखविण्यात आले तरी आदिवासी समाज फाटकाच राहिला आहे. दारिद्र्य, कुपोषण, भूकबळी त्यांच्या पाचवीलाच पुजलेले आहे.आदिवासींच्या विकासाला शासकीय अनास्था कारणीभूत असली तरी आदिवासी समाजही तितकाच कारणीभूत आहे. आता तरी या समाजाने अंधश्रद्धा, अनिष्ट परंपरा, चालीरीती, भगतांकडे जाणे, बुवाबाजी या सर्वांचा त्याग केला पाहिजे.

**<u>आदिवासी विकास विभाग भ्रष्टाचाराने पोखरलेला</u>**

राज्यात आदिवासींच्या विकासासाठी स्वतंत्र आदिवासी विकास विभागाची निर्मिती करण्यात आली आहे. राज्यातील आदिवासी लोकसंख्येच्या प्रमाणात स्वतंत्र ९ टक्के इतक्या निधीची तरतूद अर्थसंकल्पात करण्यात आली. हेतू हा की, समाजाच्या मुख्य प्रवाहापासून अतिदुर्गम, निर्जन स्थळी वास्तव्यास असणार्या आदिवासी जमातीसाठी शिक्षण, आरोग्य, रोजगार व निवारा या चार प्रमुख बाबींसंदर्भातील पायाभूत सुविधा योग्य प्रकारे राबविण्यात येणे महत्त्वाचे आहे.

आदिवासी विकास विभाग भ्रष्टाचाराने इतका पोखरलेला आहे की, कोणतीही योजना व त्यांचा निधी शेवटच्या माणसापर्यंत पोहचतच नाही. नवसंजीवन योजना, अंत्योदय धान्य योजना, शेतीविषयक पूरक योजना तसेच खावटी योजनेतील धान्य मागील दाराने ठेकेदारांनार हाताशी धरून खुल्या बाजारात किंवा शेजारील राज्यात चढ्या भावाने विकले जाते. तसेच आश्रमशाळा वसतिगृहातील विद्यार्थी-विद्यार्थिनीसाठी आवश्यक असणारे शालेय कपडे, दप्तरे, चादरी ब्लँकेटस, साबण तेल इत्यादी अनेक वस्तू चौफेर भावाने खरेदी करण्यात येतात. आदिवासींच्या नावाने बनावट जातीचे प्रमाणपत्र व वैधता प्रमाणपत्र मिळवून आरक्षणातील शैक्षणिक, आर्थिक व शासकीय सेवेतील नोकरी लाटणारे बिगर आदिवासी (बोगस आदिवासी) जाती समाजही तितकेच जबाबदार आहेत आणि म्हणूनच

अर्थसंकल्पातील अर्धाअधिक निधी बोगस आदिवासी चोरांकडून हडप केला जात आहे.

**लढण्यासाठी देश एक झाला पाहिजे**

केवळ दूरचित्रवाणीवरून घोषणा करून माओवादाशी लढता येणार नाही. माओवाद्यांची लष्करी व्यवस्था त्यांना मारूनच विस्कळित केली पाहिजे. राजकीय पक्ष, पोलीस दलाने एकत्र येऊन माओवाद संपविण्यासाठी एक कार्यक्रम तयार करावा. पोलीस दलाचे आधुनिकीकरण केले पाहिजे. आदिवासींना मदत करणारे कायदे हवेत. राज्यकारभार चांगला हवा व सामान्य नागरिकांनी पोलिसांचे कान व डोळे बनायला हवे. या सर्व गोष्टी असतील तर आपण ही लढाई जिंकू शकू.

**माओवाद्यांशी वाटाघाटी आणि शांतता-दिल्ली दूर है**

२४-३०/११/२०१२पासुन माओवाद्यांच्या "पिपल लिबरेशन गोरिला आर्मिचा रेझिंग सप्ताह" सुरु झाला आहे. त्या निमित्तान्ने केंद्रीय गृहखात्याने रेड अलर्ट जाहीर केला आहे.स्वामी अग्निवेश यानी गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे माओवाद्यांशी वाटाघाटी करायला तयार आहे ही माहीती २०/११/ २०१२ ला दिली .स्वामी अग्निवेश गृहमंत्र्याना याकरता पुढच्या आठवड्यात भेटणार आहेत.२१/०९/२०१२पासुन माओवाद्यांचा विलय सप्ताह सुरू होता . छत्तीसगड आणि ओडीशाच्या जंगलात झालेल्या विशेष सभेत पीपल्स वॉर ग्रुप आणि माओइस्ट कम्युनिस्ट सेंटर या दोन नक्षलवादी संघटनांचे २१ सप्टेंबर २००४ रोजी विलिनीकरण झाले . भाकपा माओवादी ही नवीन नक्षलवादी संघटना उदयास आली . देशातील पूर्व विदर्भ , आंध्र प्रदेश , छत्तीसगड , ओडीशा , झारखंड , पश्चिम बंगाल , तसेच उत्तर प्रदेशच्या काही भागात भाकपा माओवादी संघटनेने नव्या दमाने काम सुरू केले . नक्षलवाद्यांचे स्वरुप बदलून ते माओवादी झाले दहशतवादी

संघटना भारतीय शेअर बाजारात गुंतवणूक करत आहेत. सरकारकडे याची पक्की माहिती आहे असा धक्कादायक गौफ्यस्फोट केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांनी  केला.

पंतप्रधान मनमोहनसिंग यांनी मागच्या स्वातंत्र्यदिनी नक्षलवाद्यांना व माओवाद्यांना सरकारबरोबर चर्चेचा मार्ग स्वीकारण्याचे आवाहन केले होते, स्वामी अग्निवेश यांची मध्यस्थी मान्य करण्यास तयार आहे असे सांगितले जात होते. माओवाद्यांनी चर्चेसाठी पोलिसी कारवाई थांबविण्याची मागणी केली होती. त्या बदल्यात त्यांनी तीन महिने शस्त्रसंधीची तयारी दाखवली होती. पण ही तयारी दाखवत असताना सुरक्षा दलातील जवानांच्या नक्षलींकडून हत्या झाल्याच्या बातम्या येतच राहील्या. त्यामुळे या दोन्ही संघटनांच्या चर्चेच्या होकारावर कितपत विश्वास ठेवायचा हा प्रश्न आहे. आदिवासींच्या ज्या समस्या त्यांनी मांडल्या आहेत, त्या रास्त आहेत व त्याकडे तातडीने लक्ष देणे आवश्यक आहे, यात काहीच शंका नाही. प्रश्न आहे तो निरपराध नागरिकांना पोलिसांचे खबरे ठरवून त्यांचे गळे चिरण्याचा तसेच सुरक्षादलातील जवानांचे मुडदे पाडण्याचा जो उद्योग या संघटनांनी चालविला आहे, तो आदिवासींचे शोषण थांबविण्यासाठी की देशातील प्रस्थापित सरकार उलथून टाकून तेथे एकपक्षीय सरकार स्थापण्यासाठी? त्यासाठी जंगलात शस्त्रास्त्रांचे कारखाने, सुसज्ज व प्रशिक्षित सेना, शत्रूराष्ट्रांशी डावपेचात्मक युती इ., प्रस्थापित करावी लागत नाही. आदिवासींच्या समस्या सोडविण्यासाठी एवढे काही करावे लागते, यावर अरुंधती रॉय, स्वामी अग्निवेश यांचा विश्वास बसत असेल, पण देशातील जनतेचा बसणार नाही.

**<u>चर्चेच्या काळात पुढच्या लढ्याची तयारी करतात हा इतिहास</u>**

या देशात धरणग्रस्त, प्रकल्पग्रस्त, सेझग्रस्त ,अणूवीज प्रकल्पाला विरोध असणाऱ्यांच्या बाजूने अनेक संघटना शांततापूर्ण रीतीने आंदोलन करीत

आहेत. त्यांच्याशी चर्चा होत आहे. सर्वच प्रकरणात न्याय मिळतो आहे असे नाही, पण दोन्ही बाजूंना मान्य होईल असे तोडगे काढण्याचा प्रयत्न होत असतो. माओवाद्यांनी कधीही अशा प्रकारचे आंदोलन केल्याचे ऐकिवात नाही. उलट त्यांनी देशातील सरकार उलथण्यासाठी आदिवासींच्या शोषणाचे निमित्त पुढे करून प्रचंड हिंसाचार माजविण्याची तयारी केली आहे. जे आदिवासी त्यांच्या कचाट्यात सापडले आहेत, त्यांची आता ससेहोलपट होत आहे. त्यांना आदिवासी पट्ट्याबाहेरच्या माणसांशी बोलण्याचीही मुभा नाही. कुणी असे बोलताना आढळला तर त्याला पोलिसांचा खबरी ठरवून अमानुष पद्धतीने त्याची हत्या केली जाते. सर्वच दहशतवादी संघटना अडचणीत आल्या की, चर्चेची तयारी दाखवतात आणि चर्चेच्या काळात पुढच्या लढ्याची तयारी करतात हा इतिहास आहे. भारतातील फुटीर चळवळींचा तर हा गेल्या कित्येक वर्षांचा अनुभव आहे. श्रीलंकेत एलटीटीईने तर अनेक वेळा अशा डावपेचांचा अवलंब केला होता. त्यामुळे नक्षलवादी व माओवादी यांना चर्चा करायची असेल तर त्यांना पूर्णपणे शस्त्रे सरकारकडे जमा करूनच चर्चा करावी लागेल. बंदुकीची नळी रोखून शांतता चर्चा होऊ शकत नाही. नक्षलवाद्यांच्या हिंसाचारात मोठे राजकीय नेते, बडे पोलीस अधिकारी मरत नाहीत, तर पोटासाठी नोकरी करणारे साधे शिपाई आणि पोलिसांच्या भीतीने खबरेगिरी करणारे असहाय आदिवासी मरतात. हे एकप्रकारे कष्टकऱ्यांचे शोषणच आहे. माओ व नक्षलवाद्यांना खरेच सरकारशी चर्चा करायची असेल तर त्यांनी आदिवासींच्या शोषणाचे स्वरूप स्पष्ट करून त्याबाबतच्या मागण्यांचे एक पत्रक सरकार आणि सर्व प्रसार माध्यमांना द्यावे आणि शस्त्रांचा त्याग करून दिल्लीच्या संसद भवनासमोर या मागण्यांसाठी अमर्याद उपोषणाची एकतर्फी घोषणा करावी, त्यांच्या मागे देशाची जनता नक्कीच उभी राहील. आम जनतेचे हे दडपणच सरकारला नमवील.

**<u>माओवाद्यांशी वाटाघाटी कराव्यात का?</u>**

माओवाद्यांशी वाटाघाटी कराव्यात का? त्याला योग्य वेळ कोणती आहे? आतापर्यंत वाटाघाटी करून काय निष्पन्न झाले? वाटाघाटी कोणी कराव्या? केंद्र सरकारने की राज्य सरकारने? आपल्या देशात अनेक आंतकवादी संघटनाशी वाटाघाटी करण्यात आल्या आहेत.
वाटाघाटी करण्यापूर्वी हिंसेचा मार्ग सोडावा लागतो. वाटाघाटी आपल्या घटनेच्या अंतर्गत व्हायला पाहिजे. जर माओवाद्यांना देशाचे कायदे मान्य नसतील तर त्यांच्याशी बोलण्यात फायदा नाही. आपल्या देशात मिझोराम मध्ये वाटाघाटी यशस्वी झाल्या. कारण त्यांची शस्त्रधारींची संख्या भारतीय सैन्याने बहुतांश बरबाद केली होती. आसाम गण परिषदेशी झालेल्या वाटाघाटीमुळे शांतता प्रस्थापित झाली नाही. कारण अनेक बंडखोरांना शांती नको होती. माओवाद्यांमध्ये 32 वेगवेगळे गट आहे. त्यांचा कोणी एक मोठा नेता नाही. बहुतेक गट एकमेकांशी भांडणे करतात. अशा अवस्थेमध्ये वाटाघाटी कुठल्या गटाशी आणि नेत्याशी कराव्या? सध्या वाटाघाटीची वेळ आलेली नाही. प्रथम हिंसाचारावर नियंत्रण मिळवावे लागेल.

**<u>चर्चेचा सापळा</u>**

चर्चेचे निमित्त साधून युद्धबंदी करण्यास सरकारला भाग पाडून स्वतःवरील दडपण काही महिने दूर सारून त्या काळात अधिक जमवाजमव करण्याचा हा सापळा असू शकतो. चर्चेची मारे तयारी त्यांनी दर्शवली असली, तरी ती सफळ संपूर्ण होईल याची शाश्वती काय? त्यांनी पुढे केलेल्या काही अटीही सरळसरळ अस्वीकारार्ह आहेत. अशा प्रकारची कारवाई जर नक्षलवाद्यांच्या दबावापुढे चुकून झाली, तर त्यातून सुरक्षा यंत्रणांचे मनोधैर्य खचल्यावाचून राहणार नाही. नक्षलवाद्यांशी चर्चा करायची असेल तर आधी त्यांनी हिंसाचार सोडून देण्याची ग्वाही द्यावी हीच भूमिका रास्त आहे.

## माओवाद्यांच्या बीमोडासाठी व्यापक संयुक्त कारवाई जरुरी

आम्ही त्यांचा सूड घेऊ असे आमचे केंद्रीय गृहमंत्री सुशील कुमार शिंदे मोठ्या वीरश्रीने म्हणाले. पण या अशा उत्तरामुळे माओवाद्यांच्या हिंसक कारवाया बंद होतील, अशी अपेक्षा ठेवण्यात काही अर्थ नाही. अशा शाब्दिक इशाऱ्याने छत्तीसगड राज्यातल्या दुर्गम जंगलाच्या भागातल्या माओवाद्यांच्या टोळ्यांवर जरब बसणार नाही.

### हेलिकॉप्टरमधून येऊन, परिस्थिती गंभीर आहे अशा प्रकारचे 'बाईटस् देऊन

आता सरकार सूड घेणार म्हणजे काय करणार? काँग्रेस पक्षानेही त्यांच्या विधानाचे समर्थन केले आहे. केवळ या प्रकारची भाषा वापरून माओवाद्यांचा मुकाबला करता येणार नाही. विधानसभेची निवडणूक शांततेत पार पडली आणि आता लोकसभेची निवडणूक शांतपणे पार पडण्यासाठी कंबर कसली, म्हणजे माओवाद्यांचा बदला घेतला, त्यांची कोंडी केली, असा याचा अर्थ असेल, तर ते पूर्ण चुकीचे आहे.

शिंदे यांनी घटनास्थळाला तातडीने भेट देऊन, रुग्णालयात उपचार सुरू असलेल्या जवानांची विचारपूस केली. शहीद जवानांना आदरांजलीही वाहिली. त्याशिवाय अजून ते काय करु शकतात.? दिल्लीश्वर राजकारण्यांना या संघर्षाची दाहकता दिल्लीत बसून जाणवत नाही. उंटावरून शेळ्या हाकल्या जातात आणि प्रत्यक्ष रणभूमीवर माओवाद्यांच्या गोळ्यांना जवान बळी जातात. दिल्लीत बसलेल्या या राज्यकर्त्यांना, नोकरशाहीला पोलीस आणि सीआरपीएफच्या नेतृत्त्वाला या युध्दाचे डावपेच काय असावे हेच कळत नाही. त्यामुळेच असा एखादा हल्ला झाला की हेलिकॉप्टरमधून येऊन या भागाला भेट देऊन, पुष्पहार वाहून, परिस्थिती गंभीर आहे अशा प्रकारचे 'बाईटस् देऊन, मदतीची

घोषणा करून तात्पुरती बोळवण करतात.

या हल्ल्याचा तपास करण्याचे काम राष्ट्रीय तपास संस्था म्हणजे 'एनआयए'कडे सोपवण्यात आले आहे.'एनआयए'ची तपासा करता जंगलात जायची हिंमत आहे का? समजा तपासात हल्ला करणाऱ्या दलमचे नाव कळाले तर त्यांच्या वरती जंगलात जाऊन हल्ला कोण करणार?प्रत्येक वर्षी सर्वसाधारणपणे १५०० ते १६०० हिंसक घटना घडतात. यामध्ये माओवाद्यांकडून केले जाणारे बॉम्बस्फोट, अपहरण, खंडणीसाठीच्या धमक्या आदींचा समावेश आहे. प्रत्येक वर्षी माओवाद्यांच्या हिंसाचारामध्ये ६०० ते ७०० सर्वसामान्य नागरिकांचा बळी जातो, तर १०० ते दीडशे अर्धसैनिक, पोलिस जवान यांचा बळी जातो. एनआयए' कोणाकोणाचा तपास करणार?

**<u>गुप्तचर यंत्रणांकडुन 'ॲक्शनेबल इंटेलिजन्सची अपेक्षा</u>**

होणाऱ्या हल्ल्याचा सरकारला सावधानतेचा इशारा देण्यात आला होता, असे म्हणण्याची पद्धतच पडली आहे. केवळ इशारा देऊन हल्ले कितपत रोखले जाऊ शकतात?. माओवाद्यांना पोलिसांच्या या हालचालींची माहिती तेथील स्थानिकांकडून पुरवली जाते. स्थानिकांचे पाठबळ मोठ्या प्रमाणावर लाभते. यासाठी बंदुकीच्या धाकाचा वापर केला जातो. त्यामुळे या भागातील स्थानिक माओवाद्यांना पाणी देणे, इतर मदत पुरवणे, सीआरपीएफचे जवान कुठे आहेत, कुठे निघाले आहेत, ते किती जण आहे, काय वेगाने निघाले आहेत आदी माहिती देणे, टेहाळणी करणे अशा प्रकारची मदत करत असतात. दुर्दैवाने, आपल्या गुप्तहेर खात्याला या स्थानिकांची मदत (Human intelligence) मिळवण्यात अपयश येते. ताज्या हल्ल्यातून गुप्तचर यंत्रणांचे अपयशही समोर आले आहे.

आपल्या गुप्तचर यंत्रणांकडून कधी तरी, कुठे तरी, केव्हा तरी माओवादी हल्ला होणार आहे, अशा प्रकारची सर्वसाधारण माहिती नेहमीच दिली जात असते. पण अशा प्रकारची माहिती देण्यासाठी गुप्तचर खात्याची गरज नाही. त्यांच्याकडून ‘ॲक्शनेबल इंटेलिजन्सची अपेक्षा आहे. उदाहरणार्थ, ‘रायपूरमध्ये उद्या सकाळी माओवादी हल्ला होण्याची शक्यता आहे, अशी माहिती गुप्तचर यंत्रणेकडून मिळाली तर आपण त्याबाबत ठोस पावले उचलू शकतो, प्रतिबंधात्मक तयारी करू शकतो. मात्र नुसतीच वरवरची आणि प्राथमिक माहिती दिली गेल्यास त्याचा काहीच उपयोग होत नाही. गुप्तचर खात्याची आत जाऊन माहिती काढण्याची हिंम्मत आहे का?.

**<u>पोलिसांच्या नेतृत्त्वाने स्वतः पुढे जाऊन लढणे अपेक्षित</u>**

दंडकारण्य हे जे जंगल आहे त्यामध्ये या माओवाद्यांचे ट्रेनिग कॅम्पस् असून त्यांचे नेतृत्त्वही तेथे वास्तव्यास आहे. हे अतिशय घनदाट जंगल असून आपल्याकडील सिक्युरिटी फोर्सेस, सीआरपीएफ, पोलिस हे या भागात जाण्यास कचरतात. देशामध्ये इतकी भयानक परिस्थिती असूनही देश, राज्यकर्ते, नोकरशाही आणि मीडिया या समस्येकडे पुरेशा गांभीर्याने पहात नाहीत. माओवाद हा जंगलांमध्ये आहे. त्यामुळेच जेव्हा मोठी घटना घडते तेव्हाच त्याबाबत माध्यमांमधून अधिक चर्चा होताना दिसते. राज्यकर्ते, गृहखाते आदी मंडळीही अशा घटना घडल्यानंतर यातील मृतांचा आकडा जाहीर करतात आणि एखादी प्रतिक्रिया देतात; मात्र अशा घटना पुन्हा घडू नयेत यासाठी काय करणार आहोत हे कधीच सांगताना दिसत नाहीत. वास्तविक, पोलिसांच्या नेतृत्त्वाने अशा लढाईमध्ये स्वतः पुढे जाऊन लढणे अपेक्षित असते. पण हे आजिबात घडताना दिसत नाही. त्यामुळेच अशा घटना पुन्हा पुन्हा घडत राहतात. अशी ही सगळी भीषण परिस्थिती आहे.

हत्याकांडे घडवायची, त्यांच्यात दहशत निर्माण करायची हेच माओवाद्यांच्या चळवळीचे मुख्य सूत्र राहिले आहे. माओग्रस्त भागातल्या उद्योगपती आणि श्रीमंतांच्याकडून शेकडो कोटी रुपयांच्या खंडण्या वसूल करणारे हे माओवादी आहेत. आपल्या महिला सहकाऱ्यावर बलात्कार करणारे, कोणत्याही परिस्थितीत जंगलग्रस्त भागातल्या आदिवासींना रस्ते, आरोग्य, शिक्षण आणि अन्य नागरी सुविधा मिळूच द्यायच्या नाहीत, असा चंग बांधूनच त्यांच्या या रक्तपाती कारवाया सुरू आहेत.

**<u>काय करायला पाहिजे?</u>**

माओवाद्यांचा बिमोड करण्याकरता त्यांचे डावपेच, संघटना आणि लढण्याच्या पद्धतीविषयी पूर्ण माहिती असणे जरुरी आहे. माओवाद्यांची बलस्थाने काय आहेत, त्यांच्या कमजोरी काय आहेत? ज्या जंगलात लढाई करायची, त्याविषयी अचूक भौगोलिक माहिती जरुरी आहे. माओवाद्यांचे प्रमुख तळ कुठे आहेत? त्यांना दारुगोळा, अन्नधान्य व पैशाचा पुरवठा थांबवायला काय केले पाहिजे?

केंद्र आणि राज्य सरकारने गुप्तचर यंत्रणा अधिक भक्कम करून जंगलात लपून बसलेल्या माओवाद्यांच्या टोळ्यांचे तळ उद्ध्वस्त करायला हवेत. माओवाद्यांचे आव्हान मोडून काढण्यासाठी हवी असलेली राजकीय इच्छाशक्ती केंद्र सरकारकडे नाही,ती येणे आवश्यक आहे. प्रश्न आहे की नेमके काय करायला पाहिजे? सर्वांनी एकत्र येऊन एक माओवादाचा मुकाबला करण्यासाठी युद्धाचा प्लॅन तयार केला पाहिजे आणि तो केंद्र सरकारच्या अधिपत्याखाली कार्यरत केला पाहिजे. सध्या राज्य सरकारे आपापल्या परीने माओवादाशी लढत आहेत. माओवाद हा देशाच्या बहुसंख्य भागात पसरलेला असल्यामुळे एक-दोन राज्यांनी याविरोधात

लढून काहीही होणार नाही. म्हणूनच सगळ्यांनी एकत्र येऊन केंद्रीय गृहखात्याच्या अधिपत्याखाली लढा देण्याची गरज आहे.

त्याचबरोबर आपले पोलीस/अर्धसैनिक दलाचे नेतृत्त्व हे हल्ला झाला की काय चुका झाल्या हे सांगण्यात धन्यता मानते. पण नेतृत्त्वाचे काम चुका दाखवणे नसते तर जाऊन लढाई करणे असते.आपण सीआरपीएफला, पोलिसांना याबाबत लढण्यासाठी एक वर्ष तरी दिली पाहिजे. त्यात यश मिळाले नाही त्यानंतर सैन्याचा वापर केला पाहिजे. त्यामुळे ते आपल्या पूर्ण क्षमतेने माओवादाशी लढतील आणि माओवाद्यांचे हे आव्हान मोडून काढतील.

माओवादाचा प्रश्न कायमचा सोडवण्यासाठी आपल्याला एखाद्या बड्या राजकीय नेत्यावर माओवाद्यांच्या शक्तीशाली हल्ल्याची वाट पाहावी लागेल का? सध्या निवडणुकांचे दिवस असल्याने आणि माओवाद्यांचा लोकशाहीवर विश्वास नसल्याने असे हल्ले येणाऱ्या दिवसांत वाढण्याची भीती आहे.आज संपूर्ण मध्य भारत माओवाद्यांच्या प्रभावाखाली आहे. देशाच्या अंतर्गत सुरक्षेपुढील क्रमांक एकचे हे आव्हान असणाऱ्या माओवादाचे उच्चाटन करण्यासाठी सर्वंकष प्रयत्न होणे गरजेचे आहे. सर्व शक्ती एकवटून आपण लढा दिल्यास माओवाद्यांचा खात्मा करणे नक्कीच शक्य आहे.

**माओवाद संपवण्यासाठी सर्व समावेशक उपाय**

देशातील अंतर्गत सुरक्षा आणखी बळकट करण्यासाठी कोणती वेगळी पावले उचलता येतील, याचा आराखडा तयार करण्याची सूचना केंद्रीय गृहमंत्री राजनाथ सिंह यांनी देशातील निमलष्करी दलांचे आणि केंद्रीय सुरक्षा दलांच्या प्रमुखांना केली. गृहमंत्री पदाचा कार्यभार हाती

घेतल्यानंतर राजनाथ सिंह यांनी अंतर्गत सुरक्षा सांभाळणार्या विविध दलांच्या प्रमुखांची बैठक घेतली. या बैठकीला राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित देवल, इंटेलिजन्स ब्युरोचे प्रमुख असिफ इब्राहिम आणि रिसर्च अँड ॲनालिसिस विंगचे प्रमुख अलोक जोशी हे उपस्थित होते.केंद्र आणि राज्य संबंधांमध्ये अधिक सुसूत्रता आणण्यासाठी आणि अंतर्गत सुरक्षा अधिक बळकट करण्यासाठी वेगळे काय करता येईल, याचा आराखडा तयार करण्याची सूचना त्यांनी दिली.

देशाच्या सुरक्षेला सर्वांत मोठा धोका माओवाद्यांपासून आहे. आज ३५-४०% भागावर माओवादाचे आधिपत्य आहे. दरवर्षी १५००-१६०० नक्षली हल्ले होतात. प्रत्येक वर्षी ७५०-१००० सामान्य माणसे हिंसाचारात मारली जातात. २००५ पासुन ६५०० हुन जास्त सामान्य माणसे हिंसाचारात मारली गेली आहेत. प्रत्येक वर्षी माओवादी १०,००० कोटी रूपयांची खंडणी वसूल करीत असावे. आतापर्यंत माओवाद्यांनी ३५,०००-५०,००० कोटी रूपयांची भारतीय संपत्ती बरबाद केली आहे. सरकारने सुरू केलेले आपरेशन ग्रीन हंट सध्या जियो ओर जिने दो या अवस्थेत आहे.

**<u>ऑपरेशन ग्रीन हंट एक थंडावलेली मोहीम!</u>**

ऑपरेशन ग्रिनहंट या मोहीमेचा गाजावाजा भरपूर झाला. पण प्रत्यक्षात फारशी कारवाई झाली नाही. उलट ग्रिनहंटच्या वर्तमानपत्रे आणि टिव्हीवरच्या प्रचारामुळे माओवादी सतर्क झाले. त्यांनी आपली यंत्रणा अधिक मजबूत केली. आता ही मोहीम थंड पडली आहे.

१९७२ पासून सैन्याची संख्या १२.५-१३ लाखाच्या मध्ये असून वाढ केली नाही. त्या तुलनेत अर्ध सैनिक दले आणि पोलिसांची संख्या 6 लाखावरून वाढून आता २४ लाखाच्या आसपास आहे पण अंतर्गत सुरक्षा मात्र

अजिबात सुधारलेली नाही. आपण ५०-६० हजार सैन्य वाढवून माओवाद्यांना कां संपवत नाही?

**<u>ऑपरेशन ग्रीन हंट अपयशाची कारणे</u>**

अ) माओवाद्यांच्या बलस्थानाचा अभ्यास व त्याला प्रत्युत्तर तयार करणे.
ब) जंगलाची अचूक माहिती, आदीवासींची सामाजिक वैशिष्ट्ये, यांचा अभ्यास
क) माओवाद्यांच्या तळांवर हल्ले, त्यांचा दारूगोळा, अन्नधान्य आणि पैसा पुरवठा थांबवणे.
ड) आपल्या पोलिसांचे रक्षण करून माओवाद्यांवर जलद व अचानक हल्ले करून मनोवैज्ञानिक लढाई जिंकणे.
इ) एकाच वेळी सगळ्या राज्यात मोहीम सुरू करणे वगैरे....

**<u>ग्रिनहंटमध्ये यश कसे मिळेल?</u>**

लढाईमध्ये बनवलेत्या योजनेची (Plan for Battle) अंमलबजावणी जंगलात जाणारे सैनिक आणि कंपनी आणि बटालियन स्तरावरचे अधिकारी करतात. त्याचे प्रशिक्षण आणि मनोधैर्य उच्च दर्जाचे असेल, तरच आपण विजयी होऊ शकतो. मी लिहिलेल्या लेखात शिफारस केली होती की, पोलीस आणि अर्धसैनिक दलाचे अधिकार्यां ना लढाईच्या वरच्या दर्जाच्या प्रशिक्षणाकरता भारतीय सैन्यावर काश्मीर किंवा ईशान्य भारतात प्रशिक्षणाकरता पाठवावे. तरच ऑपरेशन ग्रिनहंट ला यश मिळू शकते. सैन्याच्या मराठा रेजिमेंट मध्ये असलेले जवान महाराष्ट्रामधले आहेत. त्यांना ६०० हून जास्त विरता पुरस्कार मिळाले आहेत मग महाराष्ट्रातले पोलीस चांगले काम का करू शकत नाही?. नेतृत्वाची कमी हे सर्वांत मोठे कारण आहे.

**“माओवाद्याचे आव्हान, चीनचे भारताशी छुपे युध्द”** या माझ्या पुस्तकात माओवादी आव्हानांच्या वेगवेगळ्या पैलुची समिक्षा केली आहे. महत्त्वाचे आहे की आता आपल्याला काय करता येईल. काश्मीरमध्ये चाललेले छुपे युद्ध, ईशान्य भारतात चाललेली बंडखोरी आणि बंगालदेशीकरण, माओवाद आणि बाकी देशात होणार्या आतंकवादी घटना यांचा एकमेकांशी फारच घनिष्ट नाते आहे. चीन आणि पाकिस्ताननी हे आपल्या देशाविरुद्ध चालवलेले छुपेयुद्ध आहे. आपण देशाच्या आतील अंतर्गत सुरक्षेच्या समस्येवर पूर्णपणे मात करायला हवी.

**लढा पुढील सरकारवर सोडला**

देशाच्या सुरक्षिततेला सर्वाधिक धोका माओवाद्यांकडून असल्याचे भुतपुर्वपंतप्रधान डॉ. मनमोहनसिंग यांनी अनेकदा म्हटले होते. मात्र, माओवादाचा हा प्रश्न सोडविण्याचा मुद्दा त्यांनी, निवडणुकीनंतर येणार्या, सरकारवर सोडला.

महाराष्ट्रातील विदर्भ परिसरात माओवाद्यांनी थैमान घातले आहे, त्यापुढे राज्य सरकारने हात टेकले आहे. राजकीय इच्छाशक्ती नसल्यामुळे महाराष्ट्र सरकारला त्याचे काही वाटत नाही. माओग्रस्त भागांसाठी भरघोस आर्थिक मदतीच्या घोषणा पूर्वीही झाल्या होत्या. त्यांचे काय झाले? आकडेवारीच्या या खेळातून खरेच काही साध्य होते आहे का? गेल्या पंधरा वर्षांतील माओवादी कारवायांत झालेला हिंसाचार पाहिला, तर एक-दोन वर्षे वगळता त्यात सातत्याने वाढ होत असल्याचे दिसते.राज्यात भयोत्पादन निर्माण करण्याचे काम त्यांनी साध्य केले. सरकारचे माओवाद विरोधी अभियान अस्तित्वात आहे, पण माओवाद्यांसमोर ते निष्प्रभ ठरले आहे.

**घोषणा उत्तम, अंमलबजावणी कधी ?**

माओग्रस्त भागामध्ये सुरक्षाविषयक उपायांसाठी केंद्र सरकारने हजारो कोटी रुपयांची एक योजना आखली. गनिमीकाव्याच्या युद्धाचा मुकाबला पोलिसांना करता यावा, यासाठी नागपूर येथे अपरंपारिक युद्धतंत्र प्रशिक्षण केंद्र स्थापन केले. केंद्रीय गृहमंत्र्यांनी उपायांच्या अंमलबजावणीचाही गांभीर्याने पाठपुरावा करावा. माओवादी कारवायांचा प्रश्न त्या भागांत केवळ कायदा-सुव्यवस्था प्रस्थापित करण्याशी संबंधित नाही; तर तेथील नागरिकांत विश्वासाचे वातावरण निर्माण करण्यानेच यावर परिणामकारक मार्ग निघू शकतो. ग्रामीण विकास योजनांची प्रभावी अंमलबजावणी करून लोकांची मने जिंकण्याशी हा प्रश्न निगडित आहे. लोकांची मने बदलण्याची भाषा केली म्हणजे उपाय सापडला असे मानणे हा भाबडेपणा झाला. ही प्रक्रिया अर्थातच दीर्घकालीन आहे. ग्रामविकास योजनांची कसून अंमलबजावणी, शेतकरी-शेतमजुरांची पिळवणुकीतून सुटका, त्यांच्या पुनर्वसनाचे व रोजगाराचे प्रामाणिक प्रयत्न आणि सातत्याने संवाद यांद्वारेच पुढे जायला हवे.

**<u>कालबद्ध कार्यक्रम हवा</u>**

माओग्रस्त राज्यांतील शेतकरी-शेतमजुर यांच्या पुनर्वसनाचा कालबद्ध कार्यक्रम सरकारांनी आखायला हवा. त्याच्या अंमलबजावणीचा पुरेसा निधी केंद्रानेही उपलब्ध करून द्यावा. सरकार आश्वासने देते आणि प्रत्यक्ष कृतीत उणे पडते. ग्रामीण भागांत अनेक नागरी सुविधांची वानवा असते; पण त्याकडे कोणाचे लक्ष नसते. जुलूम आणि अनास्था यांखाली पिचलेल्या नागरिक यांच्या असंतोषात सतत भर पडते आणि विघातक चळवळींना पाठबळ मिळते. पिळवणुकीमुळे शेतकरी-शेतमजुरांची मने आधीच कडवट झालेली आहेत. त्यातच त्यांना विविध कारवायांतही गोवले जात आहे. माओवाद्यांच्या जनअदालत प्रमाणे लगेच न्याय मिळाला पाहीजे. बेरोजगारी आहे, जगण्याची साधनेही मर्यादित; अशा बिकट

स्थितीत केवळ शाब्दिक आश्वासनांनी भागणार नाही, तशी कृती जास्त गरजेची आहे.

**<u>केंद्र सरकारची महत्वाची जबाबदारी</u>**

माओवाद्यांच्या कारवायांचा प्रश्न केंद्र सरकार आणि राज्यांनी हाताळावा. त्यांना केंद्राकडून जी मदत हवी, ती तातडीने मिळणे आवश्यक आहे; मग तो प्रश्न मनुष्यबळाचा असो अथवा अत्याधुनिक साधनसामग्रीचा असो. सर्वंकष आणि आक्रमक कारवाई आणि विकासाच्या धडक योजना अशा दुहेरी पातळीवर माओवाद्यांच्या बंदोबस्ताचा विचार करणे गरजेचे आहे. यांतील आक्रमक कारवाई हा विषय राज्यापेक्षा केंद्र सरकारने आपल्या अखत्यारीत घ्यावा. सध्या कायदा आणि सुव्यवस्था हा राज्याच्या अखत्यारीतील विषय आहे. त्यामुळे माओवाद्यांच्या हिंसाचाराचा बीमोड करण्याची जबाबदारीही राज्यांवर येते. मात्र प्रत्येक राज्य सरकारचे या बाबतीतले धोरण वेगवेगळे दिसते. एक सरकार माओवाद्यांशी लढत असताना दुसरे राज्य सरकार त्यांच्याशी बोलणी करत असते. ही परिस्थिती माओवाद आटोक्यात आणण्यावर मर्यादा आणते. यासाठी माओ कारवायांचा पुरता बंदोबस्त करण्यासाठी केंद्र व राज्य सरकारने संयुक्तपणे एक रणनीती आखून तिची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

**<u>सामाजिक, आर्थिक, राजकीय, मनोवैज्ञानिक सुरक्षाविषयक स्तरावर विविधांगी उपाययोजना</u>**

माओग्रस्त भागामध्ये सामाजिक, आर्थिक, राजकीय, मनोवैज्ञानिक तसेच सुरक्षाविषयक स्तरावर विविधांगी उपाययोजना करूनच माओवादाच्या समस्येचा मुकाबला करावा लागेल. कार्यकारी स्तरावर आक्रमक तसेच परिणामकारक पावले उचलली जाणे आवश्यक आहे.

**<u>सामाजिक व आर्थिक प्रश्न</u>**

दोन वेळच्या जेवणाचा प्रश्न सुटलेला समाज सहजासहजी हातात बंदूक घेऊन दर्या्खोर्यांातून हिंडायला राजी होत नाही, येथे गरिबी, शोषण, विकासाच्या पायाभूत सुविधांचा अभाव या समस्या आढळतात. या भागात दारिद्रयरेषेखाली जगणारा वर्गच मोठा आहे. माओप्रभावित क्षेत्रातील जनजीवन सुसह्य करण्याच्या दृष्टीने करावयाची उपाययोजना त्या भागाचा विकास, सक्षमीकरण आणि त्यातील जनसहभाग या त्रिसूत्रीवर आधारलेली असावी.

माओवाद हा प्रामुख्याने सामाजिक व आर्थिक प्रश्न आहे. त्यामुळे हा प्रश्न सोडविण्यासाठी प्राधान्याने प्रयत्न केले जायला हवेत. ही समस्या सोडविण्यासाठी प्रथम या गोष्टींचा विखार कमी व्हायला हवा.

अ) सरंजामशाही संपविण्यासाठी जमिनीची मालकी व जमीनविषयक सुधारणांना अग्रक्रम देणे.

ब) माओग्रस्त भागांमध्ये बाबा आमटे, आर.के. मिशन, गायत्री परिवार, संघ परिवाराच्या संस्था चांगले सामाजिक कार्य करीत आहेत. यासारख्या संस्थांच्या कार्यालयाला अधिकाधिक प्रोत्साहन देण्यात आले पाहिजे.

क) प्रशासनाच्या भूमिकेत सुधारणा होणे आवश्यक आहे. धडाडीचे व कार्यकुशल प्रशासकीय अधिकारी माओग्रस्त भागांमध्ये नियुक्त करणे आवश्यक आहे.

ड) अर्थसंकल्पात भरपूर निधीची तरतूद करून अनेक योजना माओग्रस्त भागांसाठी तयार करण्यात येतात. मात्र या योजना भ्रष्टाचार तसेच सुरक्षाविषयक अडचणींमुळे राबविणे शक्य होत नाही. माओग्रस्त भागांमध्ये विविध योजनांची प्रभावी व ठराविक मुदतीत अंमलबजावणी

होण्यासाठी या प्रक्रियेवर केंद्रीय कृती गटातर्फे बारीक लक्ष ठेवण्यात आले पाहिजे.

**माओवाद्यांचा चक्रव्यूह भेदायचा तर...**

छत्तीसगडच्या सुकमा जिल्हयामध्ये पुन्हा एकदा माओवाद्यांनी सीआरपीएफच्या १४ जवानांना घात करून ठार मारले. याच ठिकाणी मागच्या वर्षी सीआरपीएफचे ७६ जवान मारले गेले होते. २००९ पासून छत्तीगडमध्ये माओवादी **हिंसाचार** हा अतिशय वाढलेला आहे. आत्तापर्यंत तेथे ११०० हून अधिक पोलीस आणि अर्धसैनिक दलाचे जवान व सामान्य माणसे मारली गेलेली आहेत. या प्रसांगातही अडकलेल्या जवानांना बाहेरून मदत मिळाली नाही. जखमी जवानांना घेऊन जाण्याकरिता एअर फोर्सची हेलीकॉप्टर आली नाहीत. कारण जेथे फायरिंग सुरु असते तेथे एअर फोर्सची हेलीकॉप्टर जात नाहीत. म्हणजे थोडक्यात सीआरपीएफचे जवान घातात अडकतात; पण त्यांना बाहेरची कुठलीही मदत मिळत नाही. याशिवाय या भागात उडणारी यूएव्ही(छोटी पायलट शिवाय उडणारी विमाने) लक्ष ठेवण्याकरिता असतात. ती सुद्‌धा कार्यरत नव्हती. कारण त्यांच्याकडे पुरेसे पेट्रोल नव्हते. अशा प्रकारच्या अक्षम्य चुकांमुळेच अर्धसैनिक दलाचे जवान पुन्हा पुन्हा मारले जात आहेत.

यामध्ये काही चुका पुन्हा पुन्हा होत आहेत. यापैकी  एक म्हणजे आपल्याकडून चुकीची रणनीती वापरली जात आहे आणि दुसरी गोष्ट म्हणजे सीआरपीएफचे नेतृत्व, प्रशिक्षण आणि मनोधैर्य हे कमी पडत आहे. याशिवाय या भागामध्ये गुप्तवार्ताही फारच कमी मिळत आहेत. यापैकी  सर्वप्रथम आपण रणनीतीबाबत जाणून घेऊ.

**सीआरपीएफची सध्याची परिस्थिती**

**अनेक** सीआरपीएफचे सध्याचे जवान हे अतिशय वयस्कर असतात. त्यामुळे त्यांची लढण्याची ताकदही कमी झालेली असते. सीआरपीएफच्या जवानांचे निवृत्त होण्याचे सध्याचे वय ५८ वर्षे आहे ते कमी करुन

सैन्याप्रमाणे ३५ ते ४० वर्षांच्या आत ठेवले पाहिजे. यामुळे लढाईसाठी तरुण सीआरपीएफचे जवान मिळू शकतील.

वयोमर्यादेबरोबरच प्रशिक्षणाबाबतही विचार करणे गरजेचे **आहे.** सध्या सीआरपीएफचे प्रशिक्षण सुरु आहे; पण त्यांचे नेतृत्त्व सर्व बाबींमध्ये कमी पडत आहे. सध्याच्या सीआरपीएफच्या प्रमुखांनी आपल्या ३५ वर्षांच्या कार्यकाळामध्ये सीआरपीएफमध्ये दोन वर्षे सुद्धा काम केलेले नाही. अशा प्रकारे बाहेरून आयपीएस अधिकारी सीआरपीएफमध्ये येतात तेव्हा त्यांना या प्रकारच्या लढण्याचा **पुरेसा** अनुभव नसतो.

सीआरपीएफच्या कंपनीज़् (१०० ते १२० जवान) जंगलामध्ये जातात, त्यावेळी त्यांचे वरिष्ठ अधिकारी त्या जवानांबरोबर जात नाहीत. ते हेडक्वार्टरमध्ये किंवा कंट्रोल रुममध्येच अडकलेले असतात. त्यामुळे जंगलातील महत्त्वाची जबाबदारी सीआरपीएफची **कंपनीद्वारे** लढली जाते. वास्तविक पाहता सीआरपीएफचे नेतृत्व पुढे येऊन जंगलामध्ये नेतृत्व करत नाही तोपर्यंत या लढाईमध्ये **जिंकणे** फार कठीण आहे.

सीआरपीएफची अर्धी ताकद जंगलामध्ये असलेल्या त्यांच्या कॅम्पचे रक्षण करण्यामध्ये जाते. याशिवाय त्यांना दळणवळणीची साधने पुरेशी नाहीत. तसेच माओवाद्यांकडून अनेक रस्त्यांवर बॉम्ब पेरले जातात. त्यामुळे रस्ते सुरक्षित करण्याकरिता त्यांची खूप मोठी ताकद वापरली जाते. परिणामी, जंगलात जाऊन आक्रमक कारवाई करण्यासाठी फार कमी जवान शिल्लक राहतात.

जंगलामध्ये पेट्रोलिंग करण्यासाठी एक किंवा दोन कंपनीज् पाठवल्या जातात. तसेच माओवाद्यांबाबतची गुप्तहेर माहिती किंवा गुप्तवार्तासुद्धा अतिशय नेमकी नसते. नुसता हल्ला होईल एवढेच फक्त सांगितले जाते. हल्ला नेमका कधी, कुठे आणि कधी होणार आहे अशी माहिती सांगितली जात नाही. त्यामुळे या सीआरपीएफच्या जवानांना सदैव सतर्क राहावे लागते. याचा परिणाम त्यांच्या मनोधैर्यावर सुद्धा होतो.

सध्या पाच राज्यामध्ये पसरलेल्या दडंकरण्याच्या जंगलामध्ये माओवादी लपलेले आहेत. इथे त्यांची शेकडो प्रशिक्षण केंद्रे आहेत. या पाश्र्वभूमीवर माओवाद्यांचा समूळ नायनाट करायचा असेल तर जंगलामधील हे सर्व **कॅम्प व** प्रशिक्षण केंद्रे  उद्ध्वस्त करणे आवश्यक आहे.  पण सध्या असे होत नाही. म्हणजेच हृदयाच्या शस्त्रक्रियेची गरज आहे; पण आपण त्यावर चिकटपट्टी लावून जखमा बंद करण्याचा प्रयत्न करतो आहोत.

**<u>दंडकारण्यामध्ये एकाच वेळेला आक्रमक कारवाई जरुरी</u>**

जंगलामध्ये १००-१५० इतक्या अपुर्या संख्येने जवान पाठवून चालणार नाही. कारण जंगलाचे क्षेत्र हे खूप मोठे आहे. अशा विस्तृत जंगलामध्ये कमी संख्येने जवान आले तर माओवादी त्यांच्यावर हमखास हल्ला करतात. याउलट जवान जास्त असतील तर माओवादी काही काळासाठी दुसर्या भागात पळून जातात. अर्धसैनिक दल परत गेल्यानंतर माओवादी आपल्या केंद्रामध्ये परत येतात. बहुतेक वेळा परत जाणार्या  पोलीसांवर किंवा अर्धसैनिकांवर प्रतिहल्ला करून घात केला जातो. सध्याच्या परिस्थितीमध्ये हेच घडले आहे.

या पाश्र्वभूमीवर आपल्याला कारवाई यशस्वी करायची असेल तर संपूर्ण दंडकारण्यामध्ये एकाच वेळेला आक्रमक कारवाई करावी लागेल. यासाठी एक ते दोन लाख अर्धसैनिकांची आवश्यकता भासू शकते. सध्या सीआरपीएफकडे तेवढे सैन्य आहे. सर्व राज्यांच्या पोलिसांनी, सीआरपीएफच्या जवानांनी एकत्रितपणाने कारवाई केली तरच आपल्याला माओवाद्यांना नेस्तनाबूत करण्यामध्ये यश मिळू शकेल. लहान संख्येने कारवाई करून काहीही फायदा होणार नाही.

**<u>धैर्य, साहस ,लढाऊ वृत्तीला चालना द्या</u>**

अशा प्रकारच्या जंगलांमध्ये लढाई करण्यासाठी अर्ध सैनिक दलांकडे आवश्यक असणारे नेतृत्त्व आणि मनोधर्य कमी आहे, तसेच नेतृत्त्व कणखर नसल्यामुळे त्यांच्यातील धैर्य, साहस आणि लढाऊ वृत्ती कमी

आहे. अशा प्रकारच्या वृत्तीला चालना देण्याची गरज आहे. त्यासाठी प्रशिक्षणासाठी गरज भासल्यास सैन्याची मदत घेतली गेली पाहिजे. आज भारतीय सैन्य जम्मू-काश्मीर भागामध्ये मोठ्या प्रमाणावर लष्करी कारवाया करत असते. सीआरपीफच्या जवानांना किंवा पोलिसांना अशा ठिकाणी ठेवून जंगलामध्ये लढाई करण्याचा अनुभव देता येऊ शकतो. पोलिसांना किंवा अर्ध सैनिक दलांना सध्या गुप्तवार्ता मिळण्यामध्ये ज्या अडचणी आहेत त्या दूर करून ही गुप्तवार्ता अधिक प्रमाणात आणि अचूक प्रमाणात मिळेल यासाठी प्रयत्न केले गेले पाहिजेत. त्यासाठी गुप्तहेर अधिकार्यानीही जंगलांमध्ये जाणे आवश्यक आहे. हे सध्या होताना दिसत नाही.

माओवाद्यांविरुद्ध एकत्र कारवाई करण्यासाठी, त्यासाठी आवश्यक असणारे नियोजन आणि सहकार्य प्रस्थापित करण्यासाठी या सर्व भागामध्ये सीआरपीएफच्या महासंचालकांच्या नेतृत्त्वाखाली एक संयुक्त हेडक्वार्टर छत्तीसगडची राजधानी रायपूर येथे तयार केले जाणे आवश्यक आहे. त्यामुळे माओग्रस्त राज्यांमध्ये सुरू असलेल्या कारवायांमध्ये सुसूत्रता आणण्यास मदत होईल.

**सर्वांत खडतर काम सीआरपीएफच्या वाट्याला**

दुसरी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे सध्या सीआरपीएफची अवस्था अतिशय बिकट बनलेली आहे. त्यांचे अनेक जवान हे आजारी असतात. अलीकडेच सीआरपीएफचे जवान मलेरियाने आजारी असल्याचे वृत्त प्रकाशित झाले होते. अशा प्रकारे जंगलामध्ये वास्तव्यास असणार्या सीआरपीएफ/पोलिसांच्या कॅम्पसची स्थिती सुधारण्याची आवश्यकता आहे. अनेकदा तेथे पाणी नसते, रक्षणासाठी पुरेशी जागा नसते, राशन वेळेवर पुरवले जात नाही, दारूगोळा कमी पडतो. वास्तविक, अशा प्रकारची कोणतीही कमतरता त्यांना भासू न देण्यासाठी योग्य ते प्रयत्न करणे आवश्यक आहे. पोलिसांचे सर्वांत खडतर असलेले काम सीआरपीएफच्या

वाट्याला येते, असे आजवर दिसून आलेले आहे. त्यामुळे सीआरपीएफच्या जवानांना सकाळी पाच ते रात्री ११ पर्यंत काम करावे लागते. अनेकदा रात्रीही काम करावे लागते. तसेच सतत माओग्रस्त भागामध्ये किंवा काश्मीरसारख्या दहशतवाद्यांच्या छायेखाली असलेल्या युद्धग्रस्त, असुरक्षित भागामध्ये काम करावे लागते. वास्तविक, दोन-तीन वर्षे अशा ठिकाणी काम केल्यानंतर त्यांना शांतता असलेल्या ठिकाणी आणणे आवश्यक आहे. त्यामुळे त्यांना काही काळ आराम मिळण्यास मदत होईल. सध्या सीआरपीएफचे हजारो जवान हायपर टेन्शनबरोबरच कावीळ, कॅन्सर, मधुमेह, एडस्ने घेरलेले आहे. अनेकांना त्वचारोग झालेला आहे. काही जण मलेरियाने ग्रासलेले आहेत. काही जणांना हृदयरोगानेही ग्रासलेले आहे. परिणामी बरेच जवान हे नैराश्याचे बळी ठरत आहेत. शारीरिक वा मानसिक दृष्ट्या फिट नसणार्या जवानांना तेथून बाहेर काढण्याची गरज आहे. त्यांच्याऐवजी नवीन, तरुण जवानांची भरती करून त्यांची कार्यक्षमता वाढवण्यावर भर दिला गेला पाहिजे. कोणत्याही जवानाला सीआरपीएफ सोडून बाहेर जावयाचे असेल तर त्यासाठी परवानगी दिली गेली पाहिजे. कारण जो जवान मनाने सीआरपीएफमध्ये राहण्यास तयार नसतो, अशा जवानाकडून आपण फार चांगल्या कामगिरीची अपेक्षा ठेवू शकत नाही.

**माओवाद्यांविरुध बहुआयामी लढाई**

सर्वांत महत्त्वाचे म्हणजे ऑपरेशन ग्रीनहंटसारखी कारवाई माध्यमांपासून दूर ठेवून गुप्तपणे केली गेली पाहिजे. तसेच खबर्याची संख्या वाढवून माओवाद्यांच्या नेतृत्वावर हल्ला केला पाहिजे. तसेच शहरांमध्ये आणि लहान गावांमध्ये राहणार्या माओवाद्यांना अटक करून त्यांच्या या चळवळीचा कणा मोडला गेला पाहिजे. पकडलेल्या माओवाद्यांचे खटले एक ते दोन वर्षांमध्ये निकालात काढून त्यातील दोषींना कठोर शिक्षा दिली गेली पाहिजे. शस्त्रधारी कारवायांच्याबरोबरच त्या भागामध्ये

विकासाचे कार्यही युद्धस्तरावर आणि वेगाने हाती घेणे आवश्यक आहे. त्यातून तेथे राहणार्या सर्वसामान्यांना दिलासा मिळू शकेल. तसेच माओवाद्यांविरुद्ध कारवाई करताना गरीब आदिवासी त्यामध्ये अडकता कामा नयेत याची आवश्यक ती खबरदारी घेणे आवश्यक आहे.
गेल्या दहा वर्षांपासून पोलिसांची आणि सीआरपीएफची क्षमता वाढवण्याचे प्रयत्न सुरू आहेत. मात्र ती युद्धक्षमता फारशी सुधारल्याचे दिसत नाही. त्यामुळे आता अर्धसैनिक दलांना दीड ते दोन वर्षांची मुदत देऊन या काळात त्यांना दंडकारण्य जंगलातील माओवाद्यांचा नायनाट करता आला नाही तर त्यांच्याऐवजी भारतीय सैन्याचा वापर करण्याचा विचार केला जावा.

## **२०१४-15 मध्ये मावोवाद्यांचा हिंसाचार कमी झाला**

मोदी सरकार सत्तेवर आल्यापासून माओवाद्यांचा हिंसाचार कमी झाला आहे. २०१३ मध्ये या हिंसाचारामध्ये १५९ सामान्य नागरिक १११ सुरक्षारक्षक मारले गेले. त्यातुलनेत २०१४ मध्ये १२८ सामान्य नागरिक, ८७ सुरक्षाकर्मी मारले गेले. म्हणजेच २०१४ मध्ये मावोवाद्यांचा हिंसाचार कमी झालेला आहे. सध्या सरकारी आकड्याप्रमाणे देशामधल्या १७ राज्यांमध्ये २०० जिल्ह्यांमध्ये माओवाद पसरलेला आहे. माओवाद काही राज्यांमध्ये वाढतो आहे, तर काही राज्यांमध्ये कमी होतो आहे. सरकारी आकड्यांनुसार, माओवादी हिंसाचाराच्या ८५ टक्के घटना या छत्तीसगड, झारखंड, बिहार आणि ओडिसामध्ये घडतात. यापैकी छत्तीसगड भाजपच्या अधिपत्याखाली, बिहार नितीश कुमार यांच्या अधिपत्याखाली, ओडिसा बिजू जनता दलाच्या खाली आहे. झारखंड हे आत्तापर्यंत झारखंड मुक्ती मोर्चाकडे होते, परंतु तीन महिन्यांपूर्वी झालेल्या निवडणुकांमध्ये भाजप सत्तेवर आलेले आहे.

बिहारमध्ये नितीश कुमार माओवाद्यांच्या विरोधात कोणतीही कारवाई करायला तयार नाहीत.जतिनराम मांझी मुख्यमंत्री असताना त्यांनीही माओवादीविरोधी अभियान पूर्णपणे थांबवले होते.लष्करी कारवाईपेक्षा तेथे विकास होणे अधिक महत्त्वाचे आहे, असे त्यांचे म्हणणे होते. पण माओवादी विकासच करू देत नसतील तर काय करायचे, याचे उत्तर मात्र मांझींनी दिले नाही. मांझी असोत वा नितीश कुमार असोत, त्यांनी माओवादीच नव्हे तर जिहादी दहशतवाद्यांविरुद्ध चाललेल्या कारवायाही पूर्णपणे थांबवल्या. त्यामुळेच इतर राज्यांमधील माओवादी बिहारमध्ये येऊन आश्रय घेत आहेत.

दुसरीकडे पश्चिम बंगालमधील ममता बॅनर्जीचे सरकारचीही तीच कथा आहे. पण त्यांच्या सुदैवाने सध्या माओवादी पश्चिम बंगालचा वापर फक्त आश्रय घेण्यासाठी करताना दिसत आहेत. पश्चिम बंगालमधील हिंसाचार फारसा वाढल्याचे दिसून येत नाही. ओडिसा राज्यात सुध्दा बिजू जनता दलाचे सरकारही माओवाद्यांविरुद्ध कठोर पावले उचलताना दिसत नाही. वास्तविक,ओडिशामध्ये २०१३ च्या तुलनेत सध्या माओवाद्यांचा हिंसाचार वाढलेला आहे. यामुळेच केंद्रीय गृहमंत्र्यांनी या सर्व राज्यांना इशाराही देताना असे सांगितले की, तुम्ही तुमच्या राज्यामध्ये असलेल्या सीआरपीएफ, बीएसएफ, सीआयएसएफ आणि एसएसबी बटालियन्सचा वापर माओवाद्यांविरुद्धच्या अभियानासाठी केला नाही तर केंद्र सरकार त्यांना मागे बोलावू शकते. राजनाथ यांच्या ईशार्यानंतर बिजू जनता दलाने थोडी फार कारवाई करण्यास सुरुवात केली. झारखंडमध्ये झारखंड मुक्ती मोर्चाच्या सरकारला माओवाद्यांचे समर्थक मानले जात होते. त्यांनी माओवाद्यांच्या विरुद्धची कारवाई पूर्णपणे थांबवलेली होती. परिणामी, तेथे माओवादी शिरजोर होत चालले होते. नुकत्याच झालेल्या निवडणुकांमध्ये झारखंड मुक्ती मोर्चाचा पराभव झाला. सत्तेवर आलेल्या भाजपसरकारने माओवाद्यांच्या विरुद्ध अभियान सुरू केलेले आहे.

**<u>सर्वांत जास्त हिंसाचार  छत्तीसगड राज्यात</u>**

सर्वांत जास्त हिंसाचार हा छत्तीसगड राज्यात होतो आहे. छत्तीसगड राज्यामध्ये 'दडंकारण्य लिबरेटेड झोन' हे माओवाद्यांचे सर्वांत महत्त्वाचे केंद्र आहे. माओवाद्यांचे ९० टक्के प्रशिक्षण कॅम्प आणि नेतृत्व छत्तीसगडच्या 'दडंकारण्य लिबरेटेड झोन' मध्ये लपलेले आहे. छत्तीसगडमध्ये माओवाद्यांविरुद्ध लढण्यासाठी पोलिसांना ट्रेनिंग करण्याकरिता भारतीय सैन्याचे ब्रिगेडियर पनवर हे निव्रुत्त सैनिक आणि अधिकार्यांच्या मदतीने एक 'काऊंटर इनसर्जेन्सी आणि 'जंगल वॉरफेर स्कूल' चालवतात. या कार्यशाळेच्या माध्यमातून पोलीसांना जंगलामध्ये लढण्याचे कौशल्य अतिशय चांगल्या पद्धतीने शिकवण्यात आले आहे. यामुळे इतर पोलिसांच्या तुलनेमध्ये छत्तीसगडमधील पोलिस गुणात्मकरित्या उजवे मानले जातात. पण त्यांचा वापर व्हीआयपींच्या सुरक्षेसाठी आणि इतर सुरक्षेसाठीच अधिक होता

सीआरपीएफचे निवृत्त डीजीपी दिलीप त्रिवेदी यांनी अलीकडेच सांगितले की, छत्तीसगड पोलीस हे आक्रमक कारवायांमध्ये भाग घेण्यास तयार नाहीत. त्यामुळे आक्रमक कारवायांचा भार सीआरपीएफ किंवा बीएसएफ यांच्यावर ढकलला जातो. परिणामी, सर्वांत जास्त मृत्यू पोलीसांचे होण्याऐवजी सीआरपीएफ, बीएसएफ बटालियन्सचे होत आहेत.

त्रिवेदींच्या म्हणण्यानुसार पोलिसांना उत्तम प्रशिक्षण दिलेले असूनही त्यांचा वापर माओवाद्यांविरुद्ध लढण्यासाठी का केला जात नाही. त्यांच्या या म्हणण्यामध्ये नक्कीच तथ्य आहे. दंडकारण्याचे जंगल हे अतिशय घनदाट आहे. यामध्ये छत्तीसगडमध्ये असलेल्या ३१ सीआरपीएफच्या बटालियन्स (एका बटालियन्समध्ये १००० च्या आसपास जवान असतात) पुरेशा नाहीत. तेथे सीआरपीएफ आणि आक्रमक निमलष्करी दलाची संख्या वाढवण्याची गरज आहे. नुकत्याच झालेल्या हल्ल्यानंतर छत्तीसगडचे राजकीय नेतृत्व माओवाद्यांविरुद्ध आक्रमक अभियानास

तयार आहे; पण त्यासाठी सीआरपीएफची संख्या वाढवणे गरजेचे आहे. तसेच व्हीआयपींच्या सुरक्षेसाठी तैनात असणार्या पोलिस कर्मचार्यांना काढून त्यांना आक्रमक कारवायांसाठी पाठवले पाहिजे.

**<u>आक्रमक कारवाई करा</u>**

नवीन सरकार आल्यापासून केंद्रीय गृहमंत्री राजनाथ सिंग यांनी माओवादी भागांना अनेक वेळा भेटी दिल्या. त्यांनी अनेक बैठका घेऊन माओवाद्यांविरुद्ध अभियान न करणार्या राज्यांना यासाठी भाग पाडण्यास सुरुवात केली आहे. हे अतिशय महत्त्वाचे पाऊल आहे. त्यामुळे जी राज्ये सध्या काहीही करत नाहीत त्यांना आक्रमक कारवाई करणे भाग पडणार आहे. याशिवाय बिहार आणि ओडिसामधून काही सीआरपीएफच्या बटालियन्सचा गैरवापर होत आहे म्हणून काढून त्यांना छत्तीसगडमध्ये पाठवण्याचा निर्णय केंद्राने घेतलेला आहे. कारण छत्तीसगडमधील माओवाद्यांची प्रशिक्षण शिबिरे उद्ध्वस्त होत नाहीत, तोपर्यंत इतर राज्यांमधील माओवाद कमी होणे शक्य नाही. त्यामुळे हा निर्णयही स्वागतार्हच म्हणायला हवा.

**<u>माओवाद्यांनी दिशा बदलली</u>**

ज्या राज्यांमध्ये भाजप सत्तेवर आहे त्या राज्यांमध्ये आक्रमक कारवाई वाढल्यामुळे माओवाद्यांनी दोन वेगळ्या दिशेला आपला मोर्चा वळवला आहे. तामिळनाडू, केरळ, कर्नाटक या तिनही राज्याच्या सीमेवर असलेल्या पश्चिम घाटातील घनदाट जंगलांमध्ये माओवादी प्रवेश करत आहे. केरळ राज्यामध्ये आजवर कधीही माओवादी हिंसाचार झालेला नव्हता. हे राज्य जिहादी हिंसाचारासाठी प्रसिद्ध आहे. पण आता २०१५ मध्ये घडलेल्या अनेक घटनांमुळे माओवाद्यांनी केरळ जवळच्या जंगलामध्ये प्रवेश केल्याचे स्पष्ट झाले आहे.

**<u>आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर</u>**

माओवाद्यांनी पूर्वेच्या दिशेला म्हणजे ईशान्य भारतातही प्रवेश करण्यास सुरुवात केलेली आहे. आदिवासीबहुल भागात माओवाद लवकर पसरतो, असा आजवरचा अनुभव आहे. कारण माओवाद्यांचे सैनिक हे सगळे आदिवासी आहेत. त्यामुळे ईशान्य भारतामध्ये प्रवेश केल्यास त्यांचा लवकर प्रसार होइल, असा अंदाज आहे.

माओग्रस्त भागामध्ये  मोदी सरकारने मोठ्या प्रमाणात तंत्रज्ञानाचा वापर सुरू केला आहे. यामधे युएव्ही म्हणजे वैमानिकरहित विमान हे अडीच ते साडे पाच तास जंगलावर उडून छायाचित्रे घेऊन आपल्या सैनिकांकडे पाठवू शकते. यामुळे माओवादी कुठल्या भागात आहेत ही माहिती सुरक्षारक्षकांना मिळू शकते. पण येथील जंगले प्रचंड घनदाट असल्याने या विमांनाचा वापर कितपत प्रभावी ठरेल याबाबत शंका आहे. तरीही शक्य असेल तिथे तंत्रज्ञानाचा वापर होणे आवश्यकच आहे. एकूणच, मोदी सरकारने दबाव टाकला असला तरी राज्य सरकारांनी याबाबत पुढाकार घेणे आवश्यक आहे.

## प्रकरण 7- दहशवादा विरुध्द सर्व समावेशक उपाय योजना

**4578**

**१२ जुलै २०१५ सीमांवर लक्ष ठेवण्यासाठी युएव्ही--**

**२४ मे २०१५ चीनच्या शेजारील राष्ट्रांशी मैत्री करून चीनला घेरण्याचा भारताचा प्रयत्न ?**

**१४ जून २०१५२१ स्पेशल फोर्सेस म्यानमारमध्ये बंडखोरांच्या ट्रेनिंग कँपवर केलेला हल्ला संदेश ‘प्रत्युत्तराचा**

**२ ऑगस्ट २०१५पुन्हा एकदा ‘एक्सरसाईज मलबार**

### १२ जुलै २०१५ सीमांवर लक्ष ठेवण्यासाठी युएव्ही--

देशाच्या सीमांवर लक्ष ठेवण्यासाठी पारंपरिक पद्धतीने टेहाळणी मनोरे,

विमान अथवा हेलिकॉप्टरमधून टेहाळणी करणे पुरेसे नाही. ''युएव्ही म्हणजे 'अनमॅन्ड एरिअल व्हेईकल म्हणजेच पायलटरहित हलक्या विमानांमध्ये असलेल्या कॅमेर्याद्वारे अथवा रडार यंत्रणेद्वारे शत्रुच्या हालचाली टिपून त्याला संपविता येते. आता ''युएव्हीच्या पुढच्या प्रकारात म्हणजे ड्रोनविमानांमध्ये क्षेपणास्त्र लावण्याचीही सोय आहे. दुर कुठेतरी बसून शत्रुच्या हालचाली टिपतानाच शत्रुला संपविणेही आता शक्य झाले आहे. असे असले तरी या ''युएव्हीच्या वापरामध्ये काही अडचणी येतात. काही अडचणी नैसर्गिक असल्याने आपण त्याबाबत काही करू शकत नाही. मात्र, गुप्तहेर संघटना आणि लष्कराच्या योग्य सहकार्याने ''युएव्हीचा प्रभावी वापर करणे शक्य आहे.

**<u>'अनमॅन्ड एरिअल व्हेईकल म्हणजे 'मानवरहीत विमान</u>**

''युएव्ही हा विमान तंत्रज्ञानाचा हा एक नविन अविष्कार आहे. गेल्या २५ वर्षांपासून या तंत्राचा वापर मोठ्या प्रमाणावर सुरू  झालेला आहे. ''युएव्ही हे पायलटशिवाय आकाशात उडणारे विमान असते. यामुळे त्याची किंमत पायलट चालवणार्या विमानाच्या किमतीच्या फक्त पाच टक्के असते. 'युएव्हीचे वजन ५० ते २५० किलोग्रॅम असते. दोन ते दहा हजार फुट उंचीपर्यंतही हे विमान उडू शकते. एकावेळेला उडाल्यानंतर ते आकाशात अडीच ते पाच तास राहू शकते. या ''युएव्हीचा बेस/युएव्ही विमानपट्टीपासून दूर जाण्याचा पल्ला २५० ते ६०० किलोमीटर  असतो. या ''युएव्हीवरती वेगवेगळ्या प्रकारचे कॅमेरे किंवा रडार बसविलेले असतात. यामुळे हे आकाशामध्ये उडून जमिनी शत्रुच्या हालचालींवरती लक्ष ठेऊ शकते. ''युएव्हीमध्ये पायलट नसला तरी याचे नियंत्रण ''युएव्ही बेसवरती असणार्या जॉकीकडे असते. हा जॉकी आपल्या कंटोल रूममध्ये बसून जॉयस्टिकच्या मदतीने ''युएव्हीला आपल्या लक्ष्यावर उडवू शकतो. याद्वारे मिळालेली माहिती, चित्रीकरण कंटोलरूममधील संगणकाकडे पाठविली जाते. याआधारे सैन्याकडून वेगवेगळी लष्करी ऑपरेशन्स केली

जातात. ‘‘युएव्ही कंट्रोल करणारा जॉकी युद्धभूमीपासून खूप लांब सुरक्षित ठिकाणी बसलेला असतो.

**‘युएव्हीचे फायदे**

‘‘युएव्हीचा आकार छोटा असल्याने शत्रुची विमानभेदी शस्त्रे अथवा क्षेपणास्त्रे याला पाडू शकत नाहीत. अफगाणिस्तानच्या युद्धात फारच थोडे ‘युएव्ही पाडण्यात दहशतवाद्यांना यश आले होते. पायलट असलेले विमान पाडले तर पायलटचा होणारा मृत्यू अथवा जखमा या ‘युएव्हीमुळे पूर्णपणे थांबविल्या जाऊ शकतात. जिथे शत्रुच्या एअर डिफेन्स सिस्टिमचा प्रभाव असतो तेथे पायलट असलेले विमान गेले, तर पायलटचा मृत्यू निश्चित असतो. अशा परिस्थितीत ‘युएव्ही शत्रूच्या एअर डिफेन्स प्रणालीवरती मात करू शकते. थोडक्यात पारंपरिक युद्धात ‘‘युएव्हीचे खूपच उपयोग आहेत.

‘‘युएव्हीद्वारे टेहाळणी करण्याबरोबरच क्षेपणास्त्रही डागता येतात. ‘‘युएव्हीचा पुढचा अविष्कार म्हणजे ड्रोनअसा आहे. ‘युएव्हीच्या तुलनेत ड्रोनवरती कॅमेरा, रडारशिवाय क्षेपणास्त्रेही लावलेली असतात. एखादा शत्रु कॅमेर्यामध्ये पकडला गेला तर कंट्रोल रूममध्ये बसलेला जॉकी त्याच शत्रुवर क्षेपणास्त्र डागू शकतो. ड्रोनमधून डागण्यात आलेल्या क्षेपणास्त्राची अचूकता ९९ टक्के इतकी जबरदस्त असते. एखाद्या घरामध्ये दहशतवादी लपले आहेत असे समजल्यानंतर‘ड्रोनच्या कॅमेर्यामध्ये हे घर दिसले तर त्या घरावर क्षेपणास्त्र सोडून अतिरेक्यांचा खात्मा केला जातो. यामुळे गेल्या काही वर्षांपासून अमेरिका अफगाणिस्तान आणि इराकमध्ये पायलट असलेल्या विमानांऐवजी ड्रोनअथवा ‘युएव्हीचा वापर मोठ्या प्रमाणावर होत आहे. भारताकडेही गेल्या २० वर्षांपासून ‘‘युएव्ही खरेदी करण्यास सुरुवात झालेली आहे. हे ‘‘युएव्ही भारताच्या सैन्यदलात आणि हवाई दलात वापरले जात आहेत.

**सीमेवर घुसखोरीवर लक्ष ठेवण्यासाठी ‘‘युएव्हीचा वापर**

पारंपरिक युद्धात यांचा मोठा उपयोग आहे, पण शांततेच्या काळातही त्यांचा मोठ्या प्रमाणात वापर होत आहे. सीमेवर घुसखोरी करणार्या दहशतवाद्यांच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी सैन्य ‘‘युएव्हीचा वापर करत आहे. याशिवाय म्यानमारमध्ये भारतीय सैन्याने केलेल्या लष्करी कारवाईआधी ‘‘युएव्हीच्या माध्यमातूनच दहशतवाद्यांच्या तळांची छायाचित्रे मिळवली होती. म्यानमारमध्ये जाऊन शत्रुच्या तळाची छायाचित्रे घेणे इतके सोपे नव्हते. यामुळे शत्रुला या कारवाईचा सुगावा लागला असता. हे काम ‘‘युएव्हीच्या मदतीने चांगल्या प्रकारे केले गेले. त्यामुळे म्यानमारमध्ये मिळालेल्या यशात ‘‘युएव्हीचा वाटाही आहे.

**‘‘युएव्हीचा सर्वांत चांगला वापर रस्त्यावर लक्ष**

‘‘युएव्हीचा वापर करून काश्मीरमध्ये दहशतवाद्यांना ठार मारण्यात अपेक्षित यश मिळत नाही. त्याची अनेक कारणे आहेत. ‘‘युएव्हीचा सर्वांत चांगला वापर दहशतवादी किंवा नक्षलवादी येणार्या रस्त्यावर लक्ष ठेवण्याकरता केला जाऊ शकतो. पण युएव्हीचा टेहळणी करण्याचा पल्ला कमी असतो. त्यामुळे हजारो किलोमीटर असणारा सीमाभाग आणि हजारो वर्ग किलोमीटर जम्मू काश्मीर परिसर, नक्षलग्रस्त भाग यावर ‘‘युएव्हीने लक्ष ठेवणे शक्य नसते. म्हणून ‘‘युएव्हीचा वापर गुप्तहेर खाते अथवा सैन्याला मिळालेल्या माहितीनुसार केला तर यश मिळण्याची शक्यता वाढते. ‘‘युएव्हीचा वापर भारत-चीन सीमेवरतीसुद्धा केला जातो. चीनी सैनिक भारताच्या सीमेमध्ये प्रवेश करतात तेव्हा किंवा त्यांच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी ‘‘युएव्हीचा वापर केला जातो. यामुळे नेमक्या कोणत्या भागात चीनचे लष्कर घुसखोरी करत आहे याची माहिती आपल्या सैन्याला मिळते.

चीनी घुसखोरीवर लक्ष ठेवण्याकरीता भारतीय लष्कराने ‘‘युएव्हीचा उत्कृष्ट वापर करून घेतला आहे. आता भारत-म्यानमार सीमेवरतीही

‘‘युएव्हीचा वापर करण्यास सुरुवात झाली आहे. भारत-म्यानमार सीमाभागात मोठ्या प्रमाणावर घनदाट जंगल आहे. त्यामुळे आकाशातून जंगलात काय चालले आहे यावर लक्ष ठेवता येत नाही. ‘‘युएव्हीवरती लागलेल्या कॅमेर्याचा वापर मानवी डोळ्यांसारखा असतो. मानवी डोळ्यांना जे दिसते तेच ‘‘युएव्हीच्या कॅमेर्यानाही दिसते. त्यामुळे घनदाट जंगलात दिसणारे दहशतवादी दिसून येत नाहीत. याशिवाय पाऊस पडू लागला तर ‘‘युएव्हीचा बघण्याचा पल्ला कमी होतो. पावसाळ्यात असणारे ढग खाली आल्यानंतर ढगांच्या खाली होणार्या हालचाली दिसणे कठीण होऊन जाते. याशिवाय रात्रीच्या वेळीही ‘‘युएव्हीद्वारे टेहाळणी करणे कठीण होऊन जाते. आता इन्फ्रारेड या तंत्रज्ञानाद्वारे आपण रात्रीच्या वेळीही बघू शकतो, मात्र त्यावेळी ढग आणि पाऊस नसावा. तसेच खालचा भाग जंगली नसावा. इतक्या त्रुटी या तंत्रज्ञानात आहेत. तरीही म्यानमारच्या सीमेवरती आपल्याला काही प्रमाणात ‘‘युएव्हीचा वापर नक्कीच करता येतो आणि तो होतही आहे.

**<u>बांगलादेश सीमेवर सर्वाधिक चांगला वापर</u>**

‘‘युएव्हीचा सर्वांत चांगला वापर बांगलादेश सीमेवरती होऊ शकतो. कारण बांगलादेशचा सीमाभाग सपाट आहे. तसेच सीमा सुरक्षा दलाच्या तुकडीऐवजी ‘‘युएव्हीचा पल्ला जास्त असल्यामुळे त्याच्या मदतीने लक्ष ठेवणे सोपे असते. बांगलादेशच्या सीमेवरती ‘‘युएव्ही अद्याप आलेल्या नसल्या तरी त्या लवकरच तिथे येणार आहेत. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून आपण बांगलादेशातून होणारी घुसखोरी थांबवली पाहिजे. याकरीता ‘‘युएव्हीचे विमानतळ बनवून चांगले कौशल्य असलेले जॉकी या भागात पाठवावे लागतील.

‘‘युएव्हीचा सर्वांत चांगला वापर सागरी सीमेवर केला जातो. यात आपल्याला चांगले यशही मिळालेले आहे. भारताची सागरी सीमा ही ७६०० किलोमीटर इतकी आहे. या सीमेवर लक्ष ठेवण्यासाठी हेलिकॉप्टर आणि

‘डॉर्नियर या मोठ्या टेहाळणी विमानाच्या बरोबरीने ‘‘युएव्हीचा वापर केला जात आहे. जे ‘‘युएव्हीला दिसत नाही, ते हेलिकॉप्टरच्या मदतीने बघण्याचा प्रयत्न केला जातो. त्याहून पुढे ‘डॉर्नियर विमानाचा वापर केला जातो. पोरबंदरच्या समुद्रात नुकतेच एक यशस्वी ऑपरेशन करण्यात आले. यात पाकिस्तानची एक संशयित बोट ‘‘युएव्हीच्या टेहाळणी पथकाने पकडली होती. यानंतर कोस्टगार्डच्या जवानांनी ती बोट उडवली होती. आगामी काळात समुद्रकिनार्यावरती ‘‘युएव्हीचा वापर आणखी वाढवला गेला पाहिजे. याशिवाय अंदमान निकोबार आणि लक्षद्वीप या दोन बेटांवर लक्ष ठेवण्यासाठीही ‘‘युएव्हीचा वापर सुरू आहे. त्याचे प्रमाण वाढविण्याची गरज आहे.

**<u>माओवादी विरोधी कारवाईसाठी ‘‘युएव्हीचा वापर</u>**

माओवाद्यांच्या विरोधात ‘‘युएव्हीचा वापर करण्याचे प्रयत्न गेल्या काही वर्षांपासून सुरू आहेत. पण ‘‘युएव्ही उडविण्याचे काम करणार्या ‘नॅशनल टेक्निकल रिसर्च ऑर्गनायझेशनङ्क (एनटीआरओ)च्या आळशीपणामुळे याचा वापर पुरेसा करता आला नाही. आता सीमा सुरक्षा दल, छत्तीसगड पोलीस, एनटीआरओ आणि केंद्रीय राखीव सुरक्षा दलामध्ये असलेले भांडण थांबविण्यामध्ये आपल्याला यश आलेले आहे. पण पोलिसांची आणि केंद्रीय राखीव दलाची अशी समजूत आहे की, ‘‘युएव्ही त्यांना माओवाद्यांची सर्व माहिती देऊ शकेल; मात्र त्यांनी हे समजून घ्यायला हवे की, ‘‘युएव्ही हा केवळ आकाशात उडणारा एक कॅमेरा अथवा रडार आहे. या कॅमेर्यामधून केवळ एक ते दोन किलोमीटरपर्यंतचाच भाग दिसू शकतो. हजारो किलोमीटर जंगलावरती ‘‘युएव्ही उडवण्यासाठी आपल्याला शेकडो ‘युएव्हींची गरज लागेल. ते आपल्याला शक्य नाही. या पाश्र्वभूमीवर माओवादी विरोधी कारवाईसाठी गुप्तहेर खाते आणि ‘‘युएव्हीकडून मिळालेल्या माहितीचा योग्य वापर करून यश मिळू शकते. मात्र, ढगाळ वातावरण, पाऊस आणि जंगलावरून टेहाळणी करण्यात

"युएव्हीला येणार्या मर्यादा लक्षात घेता या भागातील जंगलांचे पुर्णपणे उपग्रहाद्वारे मॅपिंग करून "युएव्ही वापरता येईल असे भूभाग शोधून काढणे गरजेचे आहे. तेथेच "युएव्हीचे बेसेस तयार करून त्याचा वापर करता येईल.

येणार्या काळात भारतामध्ये "युएव्हीचा वापर वाढत जाणार आहे.अमेरिकेप्रमाणे "युएव्हीवर क्षेपणास्त्रे लावून शत्रुला संपविणे सध्या तरी आपल्याला शक्य नाही. "युएव्हीच्या मदतीने आपण सध्या फक्त टेहाळणी करू शकतो. थोडक्यात भारत-पकिस्तान, भारत-चीन सीमा आणि समुद्र सीमेवरती यशस्वीपणे "युएव्हीचा वापर करू शकतो, पण म्यानमारची सीमा आणि मध्य भारतातील नक्षलग्रस्त भागात लक्ष ठेवण्यासाठी "युएव्ही बरोबरच गुप्तहेर खात्याचीही गरज लागणार आहे. "युएव्हीला कौशल्यपूर्ण जॉकी आणि गुप्तहेर खात्याची चांगली मदत मिळाली तर आपण देशाच्या संरक्षणासाठी या तंत्रज्ञानाचा चांगला वापर करू शकतो.

## २४ मे २०१५ चीनच्या शेजारील राष्ट्रांशी मैत्री करून चीनला घेरण्याचा भारताचा प्रयत्न ?

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी चीन भेटीनंतर मंगोलिया आणि दक्षिण कोरिया या चीनच्या शेजारील राष्ट्रांना भेट दिली. जसे चीन आपल्या शेजारील श्रीलंका, नेपाळ, बांगलादेश, म्यानमार आणि भूतान या देशांना मित्र बनवून भारतावर सामरिक वर्चस्व निर्माण करायचा प्रयत्न करत आहे, त्याचप्रमाणे आपण सुद्धा या भेटीमुळे चीनच्या शेजारी राष्ट्रांंशी मैत्री निर्माण करून त्यांना जशास तसे उत्तर देत आहोत. मंगोलिया आणि दक्षिण कोरिया या दोन्ही देशांना भेटण्यामागे तीन उद्देश होते. १. सामरिक- ज्यामुळे आपल्याला चीनवर लक्ष ठेवता येईल. २. संरक्षणाच्या दृष्टीने दक्षिण कोरिया हा ताकदवान आणि तंत्रज्ञानाच्या बाबतीत परिपूर्ण आहे. ३. दक्षिण कोरियाची अर्थव्यवस्था अतिशय पुढारलेली आहे. दहा

बिलियन्स डॉलर रुपयांचे दक्षिण कोरियाशी आपले करार झाले. यानंतर मेक इंडियाच्या पॉलीसीखाली अनेक जहाज बांधणीचे उद्योग भारतामध्ये येण्याची शक्यता आहे. याशिवाय दक्षिण कोरियाशी प्रत्येक वर्षी सामरिक आणि संरक्षण दृष्ट्या एक उच्चस्तरीय मिटिंग होऊन संरक्षण सहकार्याचा आढावा घेतला जाईल. यामुळे भारतीय सैन्यदल आणि दक्षिण कोरियाचे सैन्यदलाचे एकमेकांशी सहकार्य वाढेल.

**<u>देशाच्या सुरक्षेकरता आक्रमकपरराष्ट्र धोरण</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मंगोलिया आणि दक्षिण कोरियाला जी भेट दिली हा सुद्धा एक चीनला शह देण्याचा प्रकार होता.  भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी प्रथमच मंगोलियाला गेले, हे भारताच्या इतिहासामधील परराष्ट्रनीतीचे एक वेगळे पाउल होते. मंगोलियामध्ये बहुसंखीय बुद्ध धर्मिय आहेत. यामुळे त्यांच्याशी आपले सांस्कृतिक आणि धार्मिक संबंध आहेत. याशिवाय मंगोलियामध्ये नॅचरल युरिनियम मोठ्या प्रमाणात आहे. आपल्या देशात अणुशक्तीने वीज निर्मिती करण्याकरिता युरिनियमची आवश्यकता आहे. या अगोदरचे सरकार चीनच्या जवळील राष्ट्रांशी चीनच्या भितीमुळे मैत्री करण्याकरिता पुढे जात नव्हते. आपण भारतीय उपखंडाच्या बाहेर जाण्याचे नावही घेत नव्हतो. मोदी सरकार सत्तेवर आल्यापासून आपले परराष्ट्र धोरण जास्त आक्रमक झाले आहे. ज्यामुळे आपल्या शेजारी राष्ट्रांशी चांगले संबंध तयार करून सामरिक, संरक्षण आणि आर्थिक संबंध निर्माण करून त्यांना आपले चांगले मित्र बनवण्यामध्ये आपल्याला यश मिळालेले आहे.

मोदींच्या चीन दौर्याकडे बघताना भारत चीन मध्ये खेळल्या जाणार्या शह आणि प्रतीशहाचा अभ्यास करायला हवा. चीनच्या कुटिल डावपेचांना आपण शह देण्यास सुरूवात केली आहे. मागच्या एक वर्षाचा घटनाक्रम आपण जर बघितला तर आपल्याला हे लक्षात येईल. नरेंद्र मोदी चीनच्या

दौर्यावर असताना चीनने अरुणाचल प्रदेशचा काही भाग आपल्या नकाशातून काढून टाकला. या आधी याला प्रत्युत्तर म्हणून आपण काहीही करत नव्हतो. गेल्या वर्षभरापासून अशा प्रकारची आपली वागणूक आक्रमक झालेली आहे. ज्यावेळी चीनचे अध्यक्ष जीनपिंग भारत दौर्यावर आले होते, त्याच वेळेला भारताचे राष्ट्रपती प्रणव मुखर्जी हे व्हिएतनाम जो चीनचा मोठा शत्रू आहे, त्यांच्याशी तेल उत्खलनाकरिता करार करत होते. चीनने या दौर्याविषयी तीव्र नाराजी व्यक्त केली होती. पण त्याची परवा न करता आपण व्हिएतनामशी संरक्षण संबंध आणि सामरिक संबंध निर्माण केले आहेत.

**<u>शह-प्रतीशहाच्या लढाईत भारताने बर्यापैकी यश</u>**

ज्यावेळेस नरेंद्र मोदी यांचा जपान दौरा झाला त्यावेळी चीनची या दौर्याविषयीची प्रतिक्रिया अजिबात अनुकूल नव्हती. पंतप्रधान मोदी यांनी नेपाळचा पहिला दौरा केला आणि नेपाळला मदत दिली त्याबद्दल सुद्धा चीनची प्रतिक्रिया प्रतिकूल होती. गंमत अशी की नेपाळच्या भूकंपानंतर तिथे भारताने केलेल्या योगदानाबद्दल चीनी माध्यमांनी चीन सरकारलाच जाब विचारला कारण चीनने नेपाळला जेवढी मदत केली त्याच्या अनेक पट जास्त मदत भारतीय लष्कराच्या सहाय्याने भारताने नेपाळला केली. चीन पाकिस्तान, नेपाळ, भूतान म्यानमार, बांगलादेश आणि श्रीलंका यांच्याशी मैत्री करून भारताला घेरण्याची संधी सोडत नव्हता. या शह-प्रतीशहाच्या लढाईत भारताने बर्यापैकी यश मिळवलेले आहे. नेपाळमधील चीनी आक्रमण आता जवळजवळ संपलेले आहे. श्रीलंकेने सुद्धा चीनी पाणबुड्यांना आपल्याकडे येण्याची परवाणगी नाकारलेली आहे. म्यानमारला दिलेल्या भेटीमध्ये सुद्धा म्यानमार आता चीन भारत संबंधाचे संतुलन राखत आहे.

चीन पाकिस्तानला प्रचंड प्रमाणात मदत करून पाकिस्तानचा वापर भारताला शह देण्याकरिता करत आहे. आज व्हिएतनाम आणि जपान हे

फक्त दोनच असे देश चीनशी लढाई करण्याची हिंमत करु शकतात. म्हणून आपण व्हिएतनाम आणि जपानशी अजून आपले मैत्री संबंध वाढवून या दोन राष्ट्रांचा वापर चीनला शह देण्याकरिता करायला पाहिजे.

**<u>चीनच्या आर्थिक सहकार्याशी स्पर्धा करायला मित्र राष्टआंची मदत</u>**

चीनच्या सगळ्या शत्रू राष्ट्रांशी सामरिक फळी आणि संरक्षण सहकार्य करण्याशिवाय, आर्थिक फळीही निर्माण करण्याची गरज आहे. चीन इतर राष्ट्रांना जेवढ्या प्रमाणात मदत देऊ शकतो, त्यांच्याशी स्पर्धा करण्याकरिता आपण ऑस्ट्रेलिया, जपान, दक्षिण कोरिया, व्हिएतनाम या सारख्या देशांशी मदत घेऊन चीनच्या आर्थिक सहकार्याशी स्पर्धा करू शकतो.

चीनच्या शेजारील राष्ट्रे चीनवर नाराज आहेत. ज्यावेळेस चीनने व्हिएतनामवर दबाब टाकला, त्यावेळेस लगेचच व्हिएतनामने आपला शत्रू असलेल्या अमेरिकेशी मैत्री प्रस्थापित केली. व्हिएतनामने आता त्यांच्याच बंदरामध्ये अमेरिकन नौदलाला येण्याची परवानगी दिलेली आहे. दक्षिण चीन समुद्रामध्ये अनेक छोट्या छोट्या बेटांवर चीन आपला एकतर्फी हक्क सांगत आहे. याला फिलीपीन्स, व्हिएतनाम, आशियाई देशांनी विरोध केलेला आहे. पण हे देश छोटे असल्यामुळे केवळ शाब्दिक विरोध करण्याशिवाय त्यांच्याकडे दुसरा पर्याय उरत नाही. म्हणूनच चीन विरोधी या सगळ्या देशांना एकत्र आणण्याची गरज आहे. थोडक्यात वेगवेगळ्या राष्ट्रांना दिलेल्या भेटींमुळे आपल्याला सुद्धा चीनच्या शेजारील राष्ट्रांशी मैत्री संबंध वाढवून चीनला शह देण्यामध्ये नक्कीच मदत मिळू शकते. मध्य आशियातिल राष्ट्र सुध्दा चीनला घाबरुन आहेत.आपण त्यांचा पण वापर केला पाहिजे.

**<u>शत्रूचा शत्रू तो आपला मित्र</u>**

शत्रूचा शत्रू तो आपला मित्र ही कौटिल्य नीती वापरून आपण चीनच्या शेजारी असलेल्या सगळ्याच राष्ट्रांशी दोस्ती करून चीनला त्यांच्याच

भागामध्ये गुंतवण्याचा प्रयत्न करायला पाहिजे. आजच्या घडीला आपल्या शेजारील राष्ट्रांमध्ये फक्त मालदिव या राष्ट्राशी बिघडलेले संबंध सुधारण्यामध्ये आपल्याला यश मिळालेले नाही. बाकी इतर शेजारी राष्ट्रांशी आपले संबंध चांगले सुधारलेले आहेत.

येणार्या काळामध्ये भारत आणि चीन यांची स्पर्धा आणखी तीव्र होणार आहे. चीनला कल्पना आहे की आशिया खंडामध्ये भारत हा एकमेव असा देश आहे की तो चीनशी स्पर्धा करू शकतो. म्हणूनच चीन येणार्या काळामध्ये भारत विरोधी धोरण अवलंबणारच आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या चीन भेटीमध्ये सीमा प्रश्न, भारताला युनोमध्ये मिळणार्या स्थानाकरिता, ब्रम्हपुत्रेच्या पाण्याविषयी, पाकिस्तानला मदत करण्याविषयी चीन काहीही बोलायला तयार नव्हता. या भेटीमध्ये चीनशी केवळ आर्थिक करार झाले. इतर विषयांवर काहीही बोलणे झाले नाही.

**हवाई दल, नौदलाचा अमेरिका आणि ऑस्ट्रेलिया बरोबर युध्द अभ्यास**

भारतीय हवाईदलाने अमेरिकेच्या हवाई दलाबरोबर एक युद्ध अभ्यास केला. हे १९९८ नंतर पहिल्या वेळा भारतीय हवाईदलाला अमेरिकन हवाई दलाबरोबर अभ्यास करण्याचा अनुभव मि्ळाला. अमेरिकन हवाई दल हे जगातील अत्याधुनिक हवाई दल आहे. त्यांच्या बरोबर आपण अभ्यास केला तर आपल्या हवाई दलाची युद्ध क्षमता खूपच वाढेल. भारत आणि अमेरिकन दलातला हा अभ्यास जून महिन्यामध्ये झाला. मागील सरकार अशा प्रकारचा अभ्यास करण्याकरिता चीनच्या भितीमुळे नेहमीच मागे पाऊल टाकत होते.

भारत, अमेरिका आणि ऑस्टड्ढेलिया एकत्र येऊन नौदल लढाईचा लवकरच अभ्यास करणार आहेत. याला ‘एक्झरसाईज मलबार‘ असे नाव दिले जाते. यामध्ये जपानलाही सामील करण्याची आपली इच्छा होती. पण चीन नाराज होऊ नये म्हणून आपण सध्यातरी जपानला बाहेर ठेवलेले आहे. पण यापुढे येणार्या काळामध्ये जपानला सुद्धा आपण या

युद्ध अभ्यासामध्ये सामील केले पाहिजे. ज्यामुळे आपल्या सैन्यदलाला जर गरज पडली तर जपान व्हिएतनाम, अमेरिका, ऑस्ट्रेलिया आणि दक्षिण कोरिया या सारख्या संरक्षण दृष्ट्या सामथ्र्यवान राष्ट्रांची मदत घेतली जाऊ शकते.

**<u>इंडोनोशिया, मलेशिया, तैवान, हाँगकाँगशी सामरिक संबद्ध वाढवा</u>**

चीन पॅसिफिक आणि हिंदी महासागरामधल्या अनेक द्विप समूहांवर आपल्या पाणबुड्यांचा तसेच नौदलाचा तळ निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहे. म्हणूनच ऑस्ट्रेलिया भेटीनंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी हे मॉरेशियस आणि त्याच्या जवळ असणार्या अनेक द्विप समुहांचा दौरा करून आले. त्यामुळे त्या भागात सुद्धा आपण चीनला प्रत्युत्तर देऊ शकतो. चीनने ‘स्ट्रिंग ऑफ पर्ल्स‘  म्हणजे भारताच्या गळ्याभोवती एक गळ फास लावण्याची नीती अनेक वर्षांपासून सुरू केलेली आहे. या चीनच्या नीतीला आपण  उत्तर देत आहोत. त्याकरिता हिंदी महासागर आणि पॅसिफ़िक मधल्या देशांशी संबंध वाढवणे जरुरी आहे.

**<u>चीनी वर्चस्वावर मात करण्याकरिता मित्र राष्ट्रांशी फळी</u>**

याशिवाय दक्षिण पूर्व आशियाई देश जसे की मलेशिया, तैवान या देशांशी सुद्धा संबंध सुधारणे गरजेचे आहे. आज पर्यंत कुठल्याही भारताच्या पंतप्रधानांनी चीनचा नंबर एक शत्रू  तैवान  आणि हाँगकाँगमध्ये जाण्याची हिंमत दाखवलेली नव्हती. ज्याप्रमाणे चीन सागरी महामार्गावर आपले वर्चस्व निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहे. त्याप्रमाणे आपण सुद्धा आपले हितसंबंध जपण्याकरिता या सगळ्या राष्ट्रांशी चांगले संबंध प्रस्थापित करून चीनच्या भोवती विळखा मजबूत करण्याची गरज आहे. चीनला हे समजून दिले पाहिजे जर तुम्ही आम्हाला विळखा घालू शकता तर आम्ही सुद्धा तुमच्या शेजारील राष्ट्रांशी मैत्री करून विळखा घालू शकतो. जर तुम्ही समुद्रामध्ये तुमचे सागरी मार्ग निर्माण करू शकता तर त्याप्रमाणे आम्ही सुद्धा अशाच प्रकारचे सागरी मार्ग तयार करू शकतो.

म्हणूनच आशिया खंड आणि आपल्या आजूबाजूच्या भागावर चीनी वर्चस्वावर मात करण्याकरिता सगळ्या मित्र राष्ट्रांशी फळी निर्माण करून आपण चीनला उत्तर देऊ शकतो. नरेंद्र मोदींच्या वर्षेभर झालेल्या सगळ्या दौर्याचे हे एक उद्दिष्ट होते. आशा करूया की येणार्या पुढच्या काळामध्ये ते इंडोनोशिया, मलेशिया, तैवान, हॉंगकॉंग या राष्ट्रांना भेट देऊन या देशांशी सुद्धा सामरिक संबंध निर्माण करण्याचे प्रयत्न करतील.

**१४ जून २०१५२१ २१ स्पेशल फोर्सेसचा म्यानमारमध्ये बंडखोरांच्या ट्रेनिंग कॅंपवर केलेला हल्ला: संदेश 'प्रत्युत्तराचा**

सैन्याच्या ताकदीला राजकीय इच्छाशक्तीचे पाठबळ मिळाले की काय घडू शकते याचे ताजे उदाहरण म्हणजे भारतीय लष्कराच्या २१ स्पेशल फोर्सेस (पॅरा) च्या जवानांनी म्यानमारमध्ये बंडखोरांच्या ट्रेनिंग कॅंपवर केलेला हल्ला होय.संरक्षणमंत्री मनोहर पर्रीकर यांनी गोळीला गोळीनेच प्रत्युत्तर देण्याची घोषणा केली होती. त्यानुसार काही दिवसांनी बंडखोरांनी मणिपूरच्या चंडेल जिल्ह्यामध्ये केलेल्या हल्ल्याचे प्रत्युत्तर देण्यासाठी भारताच्या २१ स्पेशल फोर्सेसच्या (पॅरा) कमांडोंनी थेट म्यानमारच्या जंगलात जाऊन बंडखोरांच्या प्रशिक्षण तळांवर हल्ला केला आणि सुमारे ६० बंडखोर दहशतवाद्यांना आपला एकही अधिकारी, जवान न गमवता यमसदनी पाठवले. या मोहिमेबद्दल भारतीय सैन्याचे व नेतृत्वाचे करावे तेवढे कौतुक थोडेच आहे.यापुढेही लष्करारच्या ताकदीला राजकीय पाठबळ मिळाले तर भारताकडे वाकड्या नजरेने पाहण्याची दहशतवाद्यांची हिंमत होणार नाही.

मणिपूरच्या चंडेल जिल्ह्यामध्ये बंडखोरांनी केलेल्या हल्ल्यामध्ये भारतीय लष्कराचे १८ जवान शहीद झाले होते आणि १२ जवान जखमी झाले होते. त्याच हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून भारतीय सैन्याच्या २१ स्पेशल फोर्सेस (पॅरा)च्या कमांडोंनी म्यानमारमध्ये जाऊन बंडखोरांच्या प्रशिक्षण कॅम्पवर आणि तळांवर मंगळवारी रात्री साडे तीन वाजता हल्ला केला.

बंडखोरांच्या दोन तळांवर एकाच वेळी हा हल्ला करण्यात आला आणि या हल्ल्यामध्ये बंडखोरांच्या दोन्ही तळांचे नुकसान झाले आहे. त्यामुळे यापुढील काळात या बंडखोर तळांचा वापर त्यांना करता येणार नाही.

**मागच्या सरकारकडुन दहशतवाद्यांकडून, हल्ला झाल्यानंतर उत्तर केवळ घोषणाबाजी करून**

आपण आजवरचा इतिहास पाहिला तर बहुतांश वेळा दहशतवाद्यांकडून, माओवाद्यांकडून अथवा बंडखोरांकडून हल्ला झाल्यानंतर त्याचे उत्तर केवळ घोषणाबाजी करून दिले जात होते. माओवाद्यांनी केलेल्या हल्ल्याला, जम्मू-काश्मीरमध्ये दहशतवाद्यांनी केलेल्या हल्ल्याला किंवा ईशान्य भारतातल्या बंडखोरांनी केलेल्या हल्ल्याला इतके प्रभावी आणि यशस्वी प्रत्युत्तर आजवर कधीच देण्यात आले नव्हते. त्यामुळेच या दहशतवाद्यांची मग्रुरी आणि कारवाया वाढत चालल्या होत्या. त्यांची नांगी ठेचणे आवश्यकच होते आणि ती सैन्याने ठेचली. लष्कराने केलेल्या या मोहिमेच्या यशाची काय कारणे आहेत याचा अभ्यास करणे गरजेचे आहे. जम्मू-काश्मीर भागामध्ये आणि देशभरात इतर ठिकाणी पाकिस्तानची गुप्तचर यंत्रणा आयएसआयकडून पाकव्याप्त काश्मीरमध्ये चालवल्या जाणार्या दहशतवाद्यांच्या प्रशिक्षण कॅम्पवर आपण हल्ला करून ते उद्ध्वत का करत नाही, असा प्रश्न आजवर अनेकदा भारतीयांच्या मनामध्ये उपस्थित झाला होता. म्यानमारमध्ये जाऊन भारतीय लष्कराने केलेल्या कारवाईमुळे सामान्य नागरिकांच्या प्रश्नांना आता नक्कीच उत्तर मिळाले असेल.

**राजकीय इच्छाशक्तीची गरज**

अशा प्रकारच्या परकीय भूमीवर जाऊन हल्ले करण्यासाठी प्रचंड राजकीय इच्छाशक्तीची गरज असते. ताजा हल्ला हा पंतप्रधान आणि संरक्षणमंत्र्यांनी दिलेल्या परवानगीनंतरच करण्यात आला. यासाठी

राजकीय नेतृत्वाला आपले प्रत्युत्तर कसे असू शकते अशा प्रकारच्या युद्धकलेचा अनुभव असणे गरजेचे आहे. कुठलाही निर्णय विचारपूर्वक पण तात्काळ घेण्याची क्षमता नेतृत्त्वामध्ये असणे आवश्यक आहे. अशा प्रकारे परकीय भूमीवर जाऊन हल्ला करण्याला अनेक आंतरराष्ट्रीय आयाम असतात. याशिवाय हल्ला अयशस्वी झाला तर आपले मोठे नुकसान होऊ शकते. त्यामुळे अशा हल्ल्यांची तयारी आणि नियोजन अतिशय गुप्तपणे करावे लागते. ताज्या हल्ल्यासाठी म्यानमारमध्ये नेमक्या कोणत्या भागात हे दहशतवादी तळ आहेत याची बिनचूक माहिती मिळवणे आवश्यक होते. यासंदर्भातील माहिती २१ स्पेशल फोर्सेस (पॅरा)च्या कमांडोजनी स्वत: काढली आणि त्यानंतर तात्काळ हा हल्ला करण्यात आला.

**<u>हल्ला कसा झाला</u>**

एमआय-१७ सारख्या मोठ्या हेलिकॉप्टरच्या मदतीने २१ स्पेशल फोर्सेस (पॅरा)च्या अधिकारी आणि जवानांना भारताच्या सीमेजवळ एका खुल्या जागेत आणण्यात आले. हेलिकॉप्टरचा मोठा आवाज येत असल्यामुळे ते बंडखोरांच्या तळापर्यंत घेऊन जाता येत नाही. या हल्ल्यामध्ये आठ आणि नऊ जून रोजी आपल्या कमांडोजनी तीन वेगवेगळ्या दिशांनी घुसखोरी केली. हा एक युद्धनीतीचा भाग आहे. एकाच बाजूने जाणार्या सैनिकांना बंडखोरांनी अडवले तर इतर दोन बाजूंनी जाणारे सैनिक आपले काम पूर्ण करू शकतात. या हल्ल्यामध्ये एका टीममध्ये ६० ते ७० अधिकारी आणि जवान सहभागी झाले होते. हे सर्व सैनिक जंगलातून बंडखोरांच्या तळांपासून थोड्या अंतरावर एकत्र आले आणि त्यानंतर त्यांनी हल्ला केला. अचानक झालेल्या या जोरदार हल्ल्यामुळे तो बंडखोर तळ पूर्णपणे उद्ध्वस्त झाला. त्यानंतर लागलीच लष्करी जवानांनी या तळामध्ये शिरून उरलेल्या बंडखोरांना यमसदनी पाठवले. या हल्ल्यामध्ये सुमारे ६० हून अधिक बंडखोर मारले गेले आहेत. हल्ल्याची मोहीम फत्तेह

झाल्यानंतर पॅराकंमाडोच्या टीमला तात्काळ आपल्या देशात जंगलातून परत यावे लागले. भारताच्या सीमेमध्ये सुरक्षित पोहोचल्यानंतर हेलिकॉप्टरच्या मदतीने पुन्हा त्यांना त्यांच्या दिमापूर येथील बेसकँपमध्ये नेण्यात आले.

**<u>अजून म्यानमापमध्ये १५ ते २० ट्रेनिंग कॅम्पस्</u>**

दहशतवादी तळांमध्ये १०० ते १५० सशस्त्र दहशतवादी असू शकतात. नॅशनल सिक्युरिटी कौन्सिल, नागालॅण्ड या दहशतवादी संघटनेने आपल्यावर हल्ला केला होता, तिचे एक ते दीड हजार बंडखोर दहशतवादी असण्याची शक्यता अहे. एका अंदाजानुसार म्यानमारमध्ये या दहशतवाद्यांचे ५५ ते ६० ट्रेनिंग कँपस् आहेत. याआधी हे ट्रेनिंग कँप बांगलादेशमध्ये होते. मात्र आता बांगलादेश आणि भारत यांच्यातील संबंध सुधारल्यामुळे हे ट्रेनिंग कँप तेथून हलवून म्यानमारच्या घनदाट जंगलात हलविण्यात आले आहेत.म्यानमार सरकारचे त्यांच्याच घनदाट जंगलावर कोणतेही नियंत्रण नसल्याने हे बंडखोर तिथे सुरक्षितपणे राहू शकतात.

**<u>दहशतवादी तळावरती हल्ला करणे कठीण काम</u>**

साधारणपणे दोन दहशतवादी तळांमधील अंतर हे दोन ते तीन किलोमीटर इतके असू शकते. दोन तळांमध्ये टेहळणी करण्यासाठी ऑब्जव्र्हेशन पोस्ट लावलेल्या असतात आणि तळाभोवती किल्ल्यासारखी तटबंदीही केलेली असते. यावरून दहशतवादी तळावरती हल्ला करणे किती कठीण काम असते, याची कल्पना येईल. अशा प्रकारच्या गुप्त हल्ल्यांचे नियोजन चुकले किंवा दहशतवाद्यांना आपल्यावर होणार्या हल्ल्याची चाहूल लागली तर मोठा धोका निर्माण होतो. हे दहशतवादी सावध होऊन तयारीनिशी जवानांवर मोठ्या प्रमाणात हल्ला करू शकतात. म्यानमारमध्ये केलेल्या हल्ल्याच्या वेळी त्या कँपमध्ये १०० ते १५० दहशतवादी होते. या तळावर आपल्या ६० ते ७० जवानांनी हल्ला केलेला आहे. या प्रकारच्या हल्ल्यांसाठी अतिशय काटेकोर नियोजन असावे लागते. सैनिकांना

जंगलातून जाताना अतिशय सावधगिरी बाळगावी लागते. आधी गोळीबार नंतर ग्रेनेड हल्ला करावा लागतो. त्यानंतर आपल्याकडील कुकरीच्या सहाय्याने दहशतवाद्यांना जवळ जाऊन मारावे लागते. हे काम अतिशय धोकादायक असते. नियोजनातील आणि मोहिमेतील एक छोटीशी चूक संपूर्ण मोहीम अयशस्वी करू शकते, तसेच मोहिमेतील जवानांचीच शिकार होऊ शकते. काही वेळा हल्ला झाल्यानंतर आजूबाजूला दडलेले इतर दहशतवादी एकत्र येऊन आपल्यावर हल्ला करण्याची शक्यता असते. त्यामुळे लवकरात लवकर परत यावे लागते.

**<u>२१ स्पेशल फोर्सेस (पॅरा)ला अनेक शुरता पुरस्कार</u>**

हे सर्व धोके पत्करून, कमालीची गुप्तता बाळगून, चोख नियोजन करून २१ स्पेशल फोर्सेस (पॅरा)च्या शूर आधिकारी आणि जवानांनी ही मोहीम अतिशय चांगल्या पद्धतीने फत्ते केली आहे. त्यामुळेच हे जवान आणि अधिकारी संपूर्ण देशवासियांच्या कौतुकास पात्र ठरले आहेत. २१ स्पेशल फोर्सेस (पॅरा)मध्ये महाराष्ट्राच्या अनेक जवानांचा समावेश आहे. यातील अनेकजण याआधीच्या कारवायांमध्ये गोळ्या लागून जखमी झाले आहेत. या युनिटमधल्या अर्ध्याहून अधिक अधिकार्यांना दोन हुन अधिक वेळा शौर्य पुरस्कार मिळालेले आहेत. अशा या अतिशय शूर व कर्तबगार जवानांनी त्यांच्यावर सोपवण्यात आलेली जबाबदारी उत्कृष्टपणे पार पाडली.

**<u>ही लढाई बराच काळ चालणार</u>**

म्यानमारमध्ये जाऊन अशा प्रकारचा हल्ला हा पहिलाच प्रयत्न आहे. याआधी २००४ मध्ये भूतानमध्ये असलेल्या दहशतवादी तळांवर हल्ला करून भारतीय जवानांनी ६०० ते ६५० दहशतवाद्यांना कंठस्नान घातले होते. त्यावेळी त्या मोहिमेला फारशी प्रसिद्धी मिळाली नव्हती. म्यानमारमध्ये जाऊन केलेल्या हल्ल्याच्या निमित्ताने काही गोष्टी लक्षात घेणे आवश्यक आहे. पहिली म्हणजे अशा प्रकारचे हल्ले करण्यासाठी

आवश्यक असणारी इच्छाशक्ती आणि मानसिकता भारताच्या केंद्रीय नेतृत्वाकडे आहे.

दुसरी गोष्ट म्हणजे, आपल्याकडे असे अनेक चांगले कमांडोज आहेत जे शत्रूवर हल्ला करून त्यांना चोख प्रत्युत्तर देऊ शकतात आणि त्यांची नांगी ठेचू शकतात. तिसरी गोष्ट म्हणजे अशा प्रकारच्या एका हल्ल्यामध्ये यश मिळाल्यामुळे नागालँडमधील बंडखोर दहशतवादी संघटनांची ताकद संपणार नाही, हे लक्षात घ्यावे लागेल. त्यामुळे त्यांच्यावर सातत्याने अशा प्रकारच्या कारवाया करून त्यांना नेस्तनाबूत करावे लागणार आहे. येणार्या काळात भारतीय सैन्याला एनएसएन(के), उल्फाचे पारेश बारूआ ग्रुप आणि मणिपूरमध्ये दहशतवादी तयार करणार्या ३० हून अधिक गटांवर लक्ष ठेऊन वेळोवेळी हल्ले करावे लागणार आहेत. थोडक्यात, ही लढाई अद्याप संपलेली नाही. आता कुठे सुरुवात झाली आहे, असे म्हणावे लागेल. आणखी बराच काळ ही लढाई चालणार आहे. अशा हल्ले आणि प्रतिहल्ल्यांमध्ये दहशतवाद्यांचे नुकसान होतेच; पण आपलेही नुकसान होण्याची शक्यता असते. परंतु हा धोका पत्करून धैर्य दाखवून आणि मुत्सद्देगिरी दाखवून शत्रूला उद्ध्वस्त करणे हेदेखील आवश्यक असते. भारतीय नेतृत्वाने आणि सैन्याने ते करून दाखवले आहे. विशेष म्हणजे, माध्यमांमध्ये कोणतीही प्रतिक्रिया न देता, अतिशय गुप्तता बाळगून राजकीय नेतृत्वाने सैन्याला म्यानमारमध्ये जाण्याची परवानगी दिली. भारतीय सैन्याच्या २१ स्पेशल फोर्सेस (पॅरा) तुकडीने या संधीचे सोने करून एनएसएनकेचे मोठे नुकसान केले. त्यामुळे राजकीय नेतृत्वही अभिनंदनास पात्र आहे. सैन्याच्या अशा हल्ल्यात अधिकारी आणि जवान एकत्र लढाई करतात, अधिकारी मागे रहात नाहीत. अधिकारी लिव्हिंग फ्रॉम फ्रंट नेतृत्व दिले नाही तर अशा प्रकारचे यश मिळत नाही.

**२ ऑगस्ट २०१५पुन्हा एकदा 'एक्सरसाईज मलबार**

समुद्रामध्ये चीनचा हस्तक्षेप  वाढला आहे. चीनच्या धमकीला घाबरून

युपीए सरकारने बंद केलेला इतर राष्ट्रांसोबतचा नौदल सराव ऑक्टोबर महिन्यात झाला. भारत, जपान, म्यानमार,ऑस्ट्रेलिया आणि अमेरिका यांच्यामध्ये होणारा 'एक्सरसाईज मलबार हा सागरी युद्धसराव होता. यातही चीनने आडकाठी आणण्याचा प्रयत्न केला, मात्र भारत सरकारने चीनचा हा विरोध मोडून काढत सराव करण्याचेच धोरण स्वीकारले आहे. या युद्धअभ्यासाने चीनचे विरोधक असलेले राष्ट्र एकत्र येत असल्याने चीनला राग आला. या युद्धसरावाची व्याप्ती वाढवून दक्षिण आशियातील सर्वच देशांना यात सहभागी करून घेण्याची गरज आहे. त्यातून तुम्ही पाकिस्तानला मदत करून आम्हाला त्रास दिला तर आम्हीही तुमच्याविरुद्ध अनेक देशांचे संघटन करून प्रत्युत्तर देऊ शकतो असा संदेश चीनला मिळेल.

अफगाणिस्तानमध्ये पुढचे सरकार कसे असावे यासंदर्भात सध्या तालिबान, पाकिस्तान आणि अमेरिका यांच्यात वाटाघाटी सुरू आहेत. याची पुढची फेरी पुढच्या आठवड्यात चीनच्या शिनझियांग प्रांतात होणार आहे. चीनने आता आपले लक्ष अफगाणिस्तानमध्ये घातले आहे. अफगाणिस्तानमध्ये शांतता प्रस्थापित करण्यासाठी चीन पाकिस्तानला मदत करत आहे. ब्रिटन, चीन आणि अमेरिका या तीन महासत्तांनी अफगाणिस्तानमध्ये नाक खुपसून आपला पराभव करून घेतला आहे. एकोणीसाव्या शतकात ब्रिटनने अफगाणिस्तानवर कब्जा करण्याचा प्रयत्न केला, पण त्यात त्यांना अपयश आले. १९९०च्या दशकात रशियानेही हाच प्रयत्न केला त्यांचाही यात पराभव झाला. अमेरिकाही अफगाणिस्तानमधून परत गेल्याने हा त्यांचाही पराभव मानला जात आहे. चीन आता अमेरिकेची जागा घेऊ शकतो. भारताच्या दृष्टीने याचा परिणाम चांगलाच आहे, कारण चीन अफगाणिस्तानमध्ये अडकणार आहे.

**चीनी घुसखोरीवर हवे लक्ष**

दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे, इंडोनेशियाने चीनचे मच्छिमार ट्रॉलर

स्फोटकांनी उडवून दिले. म्हणजेच दक्षिण पश्चिम आशियातील देश त्यांच्या समुद्रामध्ये चीनी मच्छिमारांची घुसखोरी होऊ देत नाही. चीनमधील शिनझियांग प्रांतात असणार्या युईगर मुस्लीमांना चांगली वागणूक देत नसल्याने तुर्कस्तानमध्ये चीनी नागरिकांविरूद्ध हिंसाचार सुरू झालेला आहे. या युईगर मुस्लीमांचा तुर्कस्तानशी जवळचा संबंध आहे. त्यामुळे तुर्कस्तानमध्ये चीनविरोधी जनमत तयार झालेले आहे. याचाच परिणाम म्हणून चीनच्या तुर्कस्तानमधील नागरिकांवरती अनेक ठिकाणी हल्ले झालेले आहेत.

मालदीवच्या संसदेने अलीकडेच त्यांच्याकडे असलेल्या शेकडो बेटांसाठी नविन कायदा संमत केला आहे. त्यांच्याकडील बेटांपैकी एखादे बेट एखाद्या देशाला ते शंभर वर्षांसाठी भाड्याने देऊ शकतात. चीन तेथल्या एका बेटावर आपले टेहाळणी केंद्र आणि बंदर तयार करून सगळ्या जगावरती लक्ष ठेवण्याचा प्रयत्न करत आहे. यामुळे मालदीवमध्ये होणार्या चीनी घुसखोरीवरती आपल्याला लक्ष ठेवावे लागेल.

मध्यंतरी, प्रसिद्ध झालेल्या एका बातमीप्रमाणे भारताच्या डीआरडीओ या संरक्षण संस्थेने तयार केलेले ‘लक्ष्य हे पालयटलेस टार्गेट एअरक्राफ्ट लवकरच लार्सन अँड टोब्रो ही खासगी कंपनी भारतात बनविणार आहे. ही विमाने सिंगापूर, इंडोनेशिया अशा मित्रराष्ट्रांना विकण्याची परवानगी देण्यात आलेली आहे. त्यामुळे ‘लक्ष्य या विमानाची किंमत कमी होणार आहे. यामुळे कमी किंमतीत आपल्याला विमान मिळणार आहे.

**<u>चीनच्या भीतीने सराव थांबविला</u>**

भारत, जपान, म्यानमार, ऑस्ट्रेलिया आणि अमेरिका यांच्यामध्ये होणारा ‘एक्सरसाईज हा सागरी युद्धसराव येत्या ऑक्टोबर महिन्यात हिंदी महासागरामध्ये झाला. याआधी २००७ साली भारत आणि काही राष्ट्रांच्यामध्ये असाच सराव झाला आहे. सर्व राष्ट्रांशी एकत्रित युद्धअभ्यास हा केवळ चीनच्या विरूद्धच वापरला जाऊ शकतो अशी

भीती असल्याने चीनने त्यावर नाराजी व्यक्त केली होती. युपीए सरकारने चीनच्या या धमकीला घाबरून अशा प्रकारचा सराव पुर्णपणे थांबविला होता. आता आठ वर्षांनंतर पुन्हा एकदा हा युद्धसराव झाला. यात आपण ऑस्ट्रेलिया, इंडोनेशिया, श्रीलंका, थायलंड, म्यानमार, जपान आणि सिंगापूर या देशांच्या नौदलाबरोबर अभ्यास करण्याचे याआधी ठरविले होते. काही भारतिय चीनी प्रेमी तज्ज्ञांनी हा युद्धसराव सर्व राष्ट्रांशी एकत्र करण्याऐवजी वेगवेगळ्या दिवशी वेगवेगळ्या देशां बरोबर करावा असा सल्ला दिला होता.

या सरावामुळे आपल्याला अनेक फायदे झाले. चीनच्या धमक्यांना भीक न घालता आपल्या राष्ट्ररहितासाठी आवश्यक असलेला युद्धसराव मित्रराष्ट्रांसोबत करत आहोत. यामुळे आपल्याला गरज पडल्यास इतर राष्ट्रांचीसुद्धा मदत होऊ शकते. याशिवाय हिंदी महासागर आणि अरबी समुद्रमाध्ये चीनी पाणबुड्यांची हालचाला वाढली आहे. त्यांच्यावरही लक्ष ठेवण्यासाठीही आपल्याला मदत मिळेल.

**<u>जपानला या युद्धसरावासाठी बोलावू नये अशी चीनने धमकी</u>**

इतर राष्ट्रांशी केलेला युद्धसराव चालू शकेल पण कोणत्याही परिस्थितीत जपानला या युद्धसरावासाठी बोलावू नये अशीही धमकी चीनने भारताला दिली होती. मात्र सरकाने एक महत्त्वाचा निर्णय घेऊन जपानलाही युद्धसरावासाठी बोलविले. कारण लष्करीदृष्ट्या जपान एक अतिशय सक्षम देश आहे. जपानचे लष्कर ताकद, तंत्रज्ञान आणि लढावू वृत्तीच्याबाबतीत त्यांना जगातले चौथे मोठे लष्कर समजले जाते. यामुळे जपान आणि व्हिएतनामसारखे युद्धात तरबेज असलेले देश भारताच्या बाजूने आले तर चीनविरूद्ध लढाईमध्ये भारताला त्याचा मोठा उपयोग होऊ शकतो.

जपानी लोक  युद्धकुशल आहेत. इतर राष्ट्रांशी  विनाकारण युद्ध नको म्हणून दुसर्या महायुद्धानंतर लष्कराची ताकद वाढविणार नाही असा

निर्णय जपानने घेतला होता. गेले अनेक वर्षे जपान सरकार या निर्णयाचे पालन करत होते. गेल्या काही वर्षांमध्ये जपान आणि चीनमधील संबंध वेगाने खराब होत आहेत. अनेक बेटांच्या मालकीवरून चीन आणि जपानमध्ये भांडणे आहेत. पार्सेल आयलड, सेनकाकु आयलड ही त्यातील काही बेटे आहेत. जपानला आता चीनची भीती वाटू लागली आहे. त्यामुळे जपानच्या संसदेत नुकताच लष्करी ताकद वाढविण्याचा कायदा संमत करण्यात आला आहे.

**जपानी लष्कराची ताकत वाढणे भारताकरिता फायद्याचे**

यामुळे जपानचे पंतप्रधान शिन्जो एब यांच्या सरकारला यापुढे त्यांच्या सैन्याची ताकत त्यांना असलेल्या गरजेप्रमाणे वाढविता येईल. जपानला सर्वाधिक धोका चीनकडून आहे. चीनच्या विरोधामुळे जपानची ताकद वाढली तर चीनचे पायदळ, हवाईदळ किंवा नौदल जपान चीन सिमेवर आडकून राहील. त्यामुळे भारत-चीन संबंध बिघडले तर चीन आपले संपूर्ण सैन्य भारताच्या सीमेवर आणू शकणार नाही. जपानी लष्कराची ताकत आणि तंत्रज्ञान वाढणे भारताच्या दृष्टीने महत्त्वाची गोष्ट आहे. यामुळे चीनला आपोआप शह मिळेल.

लष्करी महसत्ता होण्यासाठी सर्वांत आधी आर्थिक महासत्ता होणे गरजेचे असते. जपान सध्या जगातील तिसर्या क्रमांकाची आर्थिक महासत्ता आहे. यामुळे त्यांना आपल्या नौदल आणि हवाईदलाच्या आधुनिकीकरणासाठी पैशाची कमतरता पडणार नाही. याचा भारताला मोठा फायदा आहे.

**‘एक्सरसाईज मलबार हा युद्धसराव महत्त्वाचा धोरणात्मक निर्णय**

समुद्रीसीमेवरून जपान, फिलिपिन्स, व्हिएतनाम या सगळ्या राष्ट्रांशी सध्या चीनचे वाद सुरू आहेत. यामुळेच हे सगळेच देश चीनच्या विरोधात जात आहेत. याशिवाय अमेरिकेनेसुद्धा त्यांचे नौदल सध्या अटलांटीक महासागरात होते, त्यांची बदली करून हिंदी महासागर आणि पॅसिफीक महासागरात आणण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे या भागावरचे चीनचे

वाढत्या वर्चस्वाला तोंड देण्याकरता आपल्याला अमेरिका आणि इतर राष्ट्रांची नक्कीच मदत होणार आहे. त्यासाठी भारताने चीनच्या वाढत्या नौदल शक्तीवर लक्ष ठेवणे गरजेचे आहे. आपल्या जवळच्या समुद्रांमध्ये होणार्या चीनच्या हालचालींना गरज पडल्यास प्रत्यूत्तर देण्यासाठी इतर राष्ट्रांची मदत घेतली पाहिजे.

## प्रकरण 8- अंतर्गत सुरक्षेबाबत अतिशय सतर्क राहण्याची गरज

